22-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

NTK/ 11:00

22-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

NTK/ MHM/ SBT/ 11:00

**( सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

<u>अल्पसूचना प्रश्न क्रमांक - 9252</u>

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

-----

**अर्जदार शिजज ांना सतत सतावजाऱ्या अधिज ाऱ्यांच्या वर्तनाबद्दल मा.उच्च -यायालयाने राज्य शासनावर बसविलेला 5000 रुपयाचा उदाहरजीय भूर्दंड**

**(1) * 5684 श्री. रमेश ि◻ि ोसे , प्रा. बी. टी. देशमुज , श्री. ◻◻साहेब बोरस्ते , श्री. क्न्ह. यू. डायजव्हाजे , श्री. वसंतराव जोटरे , श्री. जी. एल. अै◻पूरे** : सन्माननीय उच्च व तंत्रशि◻◻ मंत्री पुढील ◻ोष्टींचा ◻ुलासा ◻रतील ◻ाय :-

(1) अर्जदार शिजज ांना सतत सतावज्यासाठी, त्यांना देज्यात आलेला स्थजनादेश रद्द जरज्यासाठी विभाजातील जुजीतरी अधिजारी मुद्दाम रस घेत असून स्थजनादेश रद्द जरज्यासाठी वारंवार उच्च -यायालयात अर्ज जरीत आहे, असा निष्र्जर्ष जाढून मा.उच्च -यायालयाच्या नाजपूर जंडपीटाने एजा प्रजरजात (सिव्हील अपिल नं. 732 ऑफ 2005 याचिजा ज्रमांज 3787 ऑफ 2001) शासनाची स्थजनादेशाची माज्जी फेटाळून लावजारा निर्जय 2 मार्च, 2005 रोजी दिला हे जरे आहे जाय,

(2) जरे असल्यास, "या जारजासाठी राज्य शासनावर आम्ही 5000 रुपयाचा उदाहरजीय भुर्दंड बसवित आहोत, उपरोक्त ज़ृतिसाठी जबाबदार असलेला अधिजारी शोधून राज्यशासनाने त्याच्याजडून ही रक्जम वसूल जरावी" असेही आदेश या निर्जयात मा.उच्च -यायालयाने दिले हे जरे आहे जाय,

(3) जरे असल्यास, जबाबदार अधिजारी शोधून त्याच्याजडून 5 हजार रुपयांचा भूर्दंड वसूल जरज्याबाबत शासनाने जाय जारवाई जेलेली आहे,

(4) मा.उच्च -यायालयासमोर वारंवार अर्ज जरतांना मा.सर्वोच्च -यायालयाने याबाबतीत दिलेला निर्जयसुध्दा मा.उच्च -यायालयापासून लपवून ठेवज्यात आल्याचा अभिप्रायसुध्दा या प्रजरजी उच्च -यायालयाने व्यक्त जेलेला आहे हेही जरे आहे जाय ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (1) होय.

(2) होय.

(3) संचालज, व्यवसाय शिजज व प्रशिजज यांच्या जार्यालय स्तरावर जार्यवाही चालू आहे.

(4) होय. याप्रजरजी उपसंचालज, व्यवसाय शिजज व प्रशिजज प्रादेशिज जार्यालय, अमरावती यांनी पत्र ज्र. ड-2/शा.स./-या.प्र./2005/5245, दिनांज 11.4.2005 अन्वये विधी व -याय विभाज, नाजपूर यांचेजडून पुढील जार्यवाहीजरीता मार्जदर्शन माजविले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-2

NTK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.5684.....

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी ज्याप्रकारे या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे ते समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी यासंबंधी सविस्तर निवेदन करावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या प्रश्नाला देण्यात आलेले उत्तर योग्य आहे, त्यामध्ये काही बदल केला पाहिजे असे मला वाटत नाही. मा.सदस्यांनी प्रश्न विचारावा मी त्याला उत्तर देण्यास तयार आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, वास्तविक हा प्रश्न दिनांक 15 एप्रिल, 2005 रोजी चर्चेला आला होता. एका विशिष्ट अधिका-याचा बचाव करण्यासाठी, त्यांना सगळे पाठिशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. या प्रश्नाला चार उपप्रश्न विचारण्यात आलेले आहे त्यापैकी पहिल्या प्रश्नाला होय असे उत्तर दिले आहे. 3 एमसीव्हीसीच्या शिक्षक निदेशकांवर झालेल्या अन्यायाच्या संदर्भात ते हायकोर्टामध्ये गेले. हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर हायकोर्टाने त्याला स्थगिती दिली. हे महाशय कारण नसताना हायकोर्टाच्या निर्णयाविरुध्द सुप्रीम कोर्टामध्ये गेले. वास्तविक एका स्वतंत्र केसमध्ये एक अधिकारी सुप्रीम कोर्टात जातो. तेथे गेल्यावर त्यांनी दिनांक 2.3.05 रोजी निर्णय दिला की, हा कोण अधिकारी आहे त्याला शोधून काढून त्याच्यावर 5 हजार रुपयांचा दंड ठोकावा. आज 5 महिने झालेले आहेत त्याच्याकडून दंड वसूल केला नाही तेव्हा हा अधिकारी सापडत नाही असे जाहीर तरी करावे. यामध्ये संपूर्ण विभाग इन्व्हॉल्व्ह आहे. 4-5 महिने झाल्यानंतरही एक अधिकारी सापडत नाही. चौथ्या प्रश्नाला होय असे उत्तर दिले आहे. कशासाठी दिले आहे ? सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय सुध्दा उच्च न्यायालयापासून लपवून ठेवण्यात आल्याचा अभिप्राय सुध्दा व्यक्त केलेला आहे का ? तर या प्रश्नाला होय असे उत्तर दिले आहे. या उत्तरामध्ये पुढे असे म्हटले आहे की, दि.11.4.05 अन्वये विधी व न्याय विभाग, नागपूर यांचेकडून पुढील कार्यवाहीकरिता मार्गदर्शन मागविले आहे. म्हणजे हायकोर्टाने, सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यानंतरही पुन्हा मार्गदर्शन मागविले आहे. सगळयांनी मिळून 5 हजार रुपयांचे वाटप केले असे जाहीर करावे. आम्हाला मान्य आहे, तो अधिकारी तुम्हाला शोधता येत नाही. हा अधिकारी कोण आहे ते शोधले पाहिजे आणि आज त्यांचे नाव सांगितले पाहिजे. याबद्दल शासनाकडे काय उत्तर आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.5684....

श्री.सुरेश शेट्टी : त्या अधिका-यांचे नाव श्री.वसावा असे असून ते उपसंचालक आहेत. गेल्या अधिवेशनामध्ये यासंबंधी चर्चा झाली होती आणि येथे निर्णय घेतला होता की, त्यांची बदली केली जाईल. त्याप्रमाणे त्यांची बदली झाली आहे. 5 हजार रुपये त्या अधिका-याने किंवा शासनाने भरावे असा कोर्टाने निर्णय दिला आहे हे खरे आहे. यासंदर्भात संचालक, तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय कमिटी नेमली आहे. ते एक महिन्याच्या आत संपूर्ण चौकशी करुन यासंबंधी कारवाई करु.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : त्या अधिका-याचे नाव आता सांगितले आहे, त्यांच्याकडून 5 हजार रुपये वसूल केले आहेत काय ?

श्री.सुरेश शेट्टी : 5 हजार रुपये त्यांच्याकडून वसूल करण्यात येणार आहेत.

श्री.दिवाकर रावते : मा.सदस्य श्री.निकोसेसाहेबांनी बरोबर सांगितले होते की, लेखी उत्तराने माझे समाधान झालेले नाही. या शासनाचा एक अधिकारी शिक्षकांना सतवितो, शिक्षकांना सतविण्यामध्ये रस घेतो. याप्रकरणाचा कोर्टात निर्णय लागतो, त्या सामान्य अधिका-याची ग्रेड काय आहे ते माहीत नाही. एक अधिकारी सुप्रीम कोर्टात जातो. सुप्रीम कोर्टात जाणे, येणे, वकीलांची फी भरणे ही काही साधी गोष्ट आहे काय ? शासनाचा एक अधिकारी सुप्रीम कोर्टामध्ये गेल्यावर त्यांना 5 हजार रुपयांचा दंड ठोकून हाकलून लावले जाते. अशा अधिका-याकडून 5 हजार रुपये जप्त केले पाहिजेत. शासनाला किड लावणा-या अधिका-याला धडा शिकवावा ही प्रवृत्ती शासनाची असावयास पाहिजे. येथे प्रश्न आल्यानंतरही वसूल करु असे सांगितले जात आहे. पैसे वसूल न करता येथे शासन सभागृहासमोर येणार असेल तर यांना एखाद्या गोष्टीबद्दल किती आस्था आहे हे कळत आहे. या अधिका-यांना शासन वाचविण्याचा का प्रयत्न करीत आहे त्याचे उत्तर दिले पाहिजे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 11:05

(ता.प्र.क्र. 5684 पुढे सुरु...)

श्री. सुरेश शेट्टी : शासन कोणालाही पाठिशी घालत नाही. जे अधिकारी नियमाप्रमाणे काम करतात त्यांना शासनाचा पूर्ण पाठिंबा राहील. जेव्हा अधिका-यांनी हायकोर्ट आणि सुप्रिम कोर्टात केसेस दाखल केल्या त्यावेळी कोर्टाने, या अधिका-याला आयडेण्टिफाय करुन त्याच्याकडून किंवा शासनाने 5000 रु. भरावेत अशा ऑडर्स् दिल्या. या प्रकरणी डायरेक्टर टेक्निकल एज्युकेशन यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करण्यात येईल. कारण आता या प्रकरणाची व्यापी खूप वाढलेली आहे. हे केवळ एकच प्रकरण नाही तर तीन कोर्ट केसेसमध्ये असे प्रकार झालेले आहेत. अमरावती डिव्हिजनमध्ये कमीत कमी 150 केसेस प्रलंबित आहेत.

**सभापती** : त्या अधिका-याचा त्यामध्ये काही संबंध असावा असे शासनाच्या लक्षात आल्याने त्याची बदली करण्याचा निर्णय शासनाने घेतला असे उत्तर याठिकाणी दिलेले आहे...

श्री. सुरेश शेट्टी : ते प्रकरण दुसरे आहे. ते प्रकरण या प्रकरणाशी संबंधित नाही. सभापती महोदय, मी सभागृहाला अशी खात्री देतो की, या तिन्ही प्रकरणांची चौकशी केली जाईल. डायरेक्टर, टेक्निकल एज्युकेशन यांच्याकडून एक महिन्यामध्ये चौकशी रिपोर्ट आल्यानंतर शासन योग्य ती कारवाई करील.

प्रा. जोगेंद्र कवाडे : हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. हा प्रश्न अमरावती विभागातील एमसीव्हीसीच्या मागासवर्गीय नोकरभरतीशी संबंधित आहे. मा. मंत्री महोदयांनी 150 प्रकरणे कोर्टात प्रलंबित असल्याचे सांगितले. एमसीव्हीसीचा मागासवर्गीयांचा अनुशेष डावलून ज्या नियमबाह्य अशा नेमणुका करण्यात आलेल्या आहेत त्यासंबंधीची ही प्रकरणे आहेत. ही प्रलंबित असलेली प्रकरणे शिवाजी शिक्षण संस्थेशी संबंधित आहेत काय ? तसेच एमसीव्हीसी संबंधी जी 70 प्रकरणे प्रलंबित आहेत ती शिवाजी शिक्षण संस्थेशी संबंधित आहेत काय ? मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागांवर खुल्या प्रवर्गातील लोकांच्या नेमणुका करण्यात आल्यामुळे संबंधित अधिका-याने ही कारवाई केलेली असेल तर ती कारवाई योग्य आहे. सुप्रिम कोर्टामध्ये वकिलाने निर्णयाची प्रत वेळेत सादर न केल्यामुळे 5 हजार रु.ची भरपाई द्यावी असा सुप्रिम कोर्टाने निर्णय दिला आहे काय यासंबंधी मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री. सुरेश शेट्टी : हा निर्णय हायकोर्टाचा होता. जी 70 प्रकरणे प्रलंबित आहेत ती शिवाजी शिक्षण संस्थेशी संबंधित आहेत हे खरे आहे. परंतु त्यामध्ये मागासवर्गीयांचा प्रश्न दिसत नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 5684....)

प्रा. जोगेंद्र कवाडे : मागासवर्गीय उमेदवार मिळत नाहीत म्हणून सदर शिक्षकांच्या जागा खुल्या प्रवर्गातून भरण्यात आल्या. हे शिक्षक एक वर्षभर त्या जागांवर सेवेत राहिले. ह्या नियमबाह्य केलेल्या नेमणुकांच्या बाबतीत दुरुस्ती करुन राखीव प्रवर्गातील उमेदवारांची भरती करावी अशी कार्यवाही चालू असताना नियमबाह्य नेमणुका केलेले शिक्षक कोर्टात गेले आणि त्यामुळे अशा प्रकारची ही प्रकरणे प्रलंबित राहिलेली आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर या संस्थेने खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची नेमणूक केलेली असून अशा प्रकारच्या नेमणुका अमरावती विभागातील अनेक संस्थांनी केलेल्या आहेत. तेव्हा कायद्याची पायमल्ली करणा-या अशा संस्थांच्या बाबतीत शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : मा.सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे अमरावती विभागामध्ये आरक्षित जागांवर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांच्या नेमणुका केल्याची खूप प्रकरणे असून ती प्रकरणे कोर्टात प्रलंबित आहेत, हे खरे आहे.

श्री. रमेश निकोसे : मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासंबंधी 10 जी.आर. निघाले. ह्या जी.आर.ची अंमलबजावणी न करता खुल्या प्रवर्गातील लोकांच्या नेमणुका करणे, ...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही.

ता.प्र.क्र.5684...

श्री. रमेश निकोसे...

अधिकारी कोर्टात जाणे, सुप्रीम कोर्टात जाणे, सुप्रीम कोर्टाने जबाबदार अधिका-यास शोधून पाच हजार रुपयांचा दंड वसूल करणे असे आदेश शासनास दिल्यानंतरही त्याचे पालन न होणे. सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यानंतरही जबाबदार अधिका-यास शोधून पाच हजार दंड का वसूल केला नाही याचे माननीय मंत्री महोदयांनी प्रथम खुलासा करावा. त्याच प्रमाणे अशा अधिका-यास कोर्टाने दंडाची शिक्षा दिलेली आहे त्यामुळे त्या अधिका-यास सस्पेंड का केले जात नाही याचा देखील माननीय मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, संबंधित अधिका-यास सस्पेंड केले तर तो अधिकारी लागलीच कोर्टात जाईल आणि स्टे घेईल. सभापती महोदय,या प्रकरणी एक कमिटी नेमून एका महिन्यात चौकशी करण्यात येऊन त्यानंतर संबंधित अधिका-यावर कारवाई करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन मी सभागृहाला मघाशीच दिलेले आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : या प्रकरणी कमिटी नेमून संबंधित अधिका-या विरुध्दची विभागीय चौकशी एका महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : होय.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी मागासवर्गीय कर्मचा-यांचा जो अनुशेष भरला गेला पाहिजे तो भरला गेलेला नाही ही गोष्ट बरोबर आहे. या ठिकाणी मागासवर्गीय कर्मचा-याऐवजी खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांच्या नेमणुका केल्या गेल्या आहेत आणि ते कर्मचारी कोर्टात गेलेले आहेत अशा अनेक केसेस या विभागात आहेत. मागासवर्गीय प्रवर्गातील योग्य उमेदवार मिळाले नाहीत म्हणून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांच्या नेमणुका केल्या आहेत अशी काही परिस्थिती या ठिकाणी निर्माण झालेली आहे काय ? सदर पदांसाठी मागासवर्गीय प्रवर्गातील योग्य उमेदवार मिळाले नाहीत तर त्या पदांवर तात्पुरत्या स्वरुपात खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची नेमणूक करता येते अशी प्रोव्हीजन आहे. सभापती महोदय, ही शिक्षकांची पदे आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी शिक्षकांच्या नेमणूका होणे आवश्यक असते. लिपिक वा इतर पदे भरण्याची काही आवश्यकता नाही. परंतु शिक्षण क्षेत्रात शिक्षक हा महत्वाचा घटक आहे. ज्या ठिकाणी मागासवर्गीय प्रवर्गासाठीची पदे आहेत परंतु त्या पदासाठी योग्य उमेदवार मिळाले नाहीत तर ती पदे भरण्याबाबत शासनाचे काय धोरण असावे यासंबंधीचा खुलासा मा.मंत्रिमहोदय करतील काय ? 2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : या ठिकाणी मूळ तीन अधिका-यासंबंधीचा प्रश्न विचारला गेला आहे..

श्री. दिवाकर रावते : माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी मागासवर्गीय कर्मचा-यांच्या अनुशेषाबाबतील प्रश्न विचारला त्यास तुम्ही कसे काय उत्तर दिले.

श्री. सुरेश शेटी : सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने संदर्भ दिला त्यामुळे त्यांच्या प्रश्नास मी उत्तर दिले आहे.

**सभापती** : या ठिकाणी मागासवर्गीयांची पदे भरण्याबाबतचा अनुशेष भरावयाचा आहे. या अनुशेषाच्या पदांसाठी मागासवर्गीय प्रवर्गातील योग्य उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर योग्य पध्दतीचा अवलंब करुन अन्य प्रवर्गातून ती तात्पुरत्या स्वरुपात भरण्याची तरतूद आहे. व त्यासंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे आणि श्री. रावते यांनी या ठिकाणी केलेला आहे. मागासवर्गीय पदे भरताना योग्य उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ते पद खुल्या प्रवर्गातून तात्पुरत्या स्वरुपात भरण्याची प्रोव्हीजन आहे. तसे जरी झाले असेल तरी या ठिकाणचा जो मागासवर्गीयांचा अनुशेष आहे तो शंभर टक्के भरला जाईल काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, होय.

------------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 11:10

**(ता. महाड जि.रायगड) येथील शिंन्देकोंड ग्रामपंचायतीमधील गैरव्यवहाराच्या चौकशीची मागणी**

**(२) * ८२२१ डॉ. अशोक मोडक , श्री. रामनाथ मोते , श्रीमती संजीवनी रायकर , श्रीमती कांता नलावडे , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यातील कांबळे तर्फे महाड ग्रामपंचायतीमधील शिंन्देकोंड वसाहतीमध्ये करण्यात आलेल्या विकासाच्या कामामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची मागणी शिंन्देकोंड ग्रामस्थांनी रायगड जिल्हा परिषदेकडे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे माहे जून, २००५ च्या पहिल्या आठवडयात केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. रणजित कांबळे,श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता** : (१) होय.

(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती महाड यांनी चौकशी कलेली आहे.

(३) चौकशी अंती अपहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, प्रश्नाच्या मुख्य शिर्षकामध्ये ग्रामपंचायतीमधील "गैरव्यवहाराच्या चौकशीची मागणी" असा उल्लेख आहे, त्याच प्रमाणे ग्रामस्थांनी जी मागणी केली, आहे त्या मागणीच्या निवेदनात देखील "गैरव्यवहार" असा शब्दप्रयोग केलेला आहे. परंतु शासनाने उत्तरात "अपहार" असा शब्दप्रयोग केलेला आहे. आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक 58 आणि 68 मध्ये "भ्रष्टाचार","अपहार" असे शब्दप्रयोग केलेले आहेत. ग्रामस्थांनी गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी केलेली आहे. ग्रामस्थांनी कोणकोणत्या गैरव्यवहारा संबंधीची चौकशी करण्याची मागणी केलेली आहे यासंदर्भात माननीय मंत्री महोदय काही सांगू शकतील काय ?

श्री. रणजित कांबळे : या ग्रामस्थांच्या चार तक्रारीच्या मागणीचे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे. अनधिकृतपणे पाणी पुरवठयाची कनेक्शन्स दिले गेले आहेत अशी पहिली तक्रार आहे. दुसरी तक्रार पाण्याची टाकीच्या बांधकामाला क्रॅक गेलेले आहेत त्याची चौकशी करावी अशी आहे आणि तिसरी तक्रार अशी आहे की, तेथे असलेल्या नदीच्या पात्रात घाट बांधले गेलेले आहे त्यात मिसअॅप्रोप्रिएशन झालेले आहे. यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ 11:15

ता.प्र.क्र. 8221 पुढे सुरु....

श्री. रणजित कांबळे ...

सभापती महोदय,चौथी तक्रार ही शाळेच्या जागेमध्ये अतिक्रमण झाले आहे अशी होती. त्याचप्रमाणे रस्त्यावरील लाईट बरोबर चालत नाहीत आणि त्यात असलेले बल्ब नादुरुस्त आहेत अशा प्रकारची पाचवी तक्रार करण्यात आली होती. एकूण पाच प्रकारच्या तक्रारी होत्या. त्यांची चौकशी झाली चौकशीमध्ये काही आढळून आले नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पाण्याच्या टाकीला क्रॅक गेला ही गोष्ट खरी आहे. पाणी पुरवठा बरोबर होत नाही. कामामध्ये गैरव्यवहार झालेला आहे. काम पूर्ण झाल्यावर त्याचे व्हॅल्युएशन कोणी केले ? त्यामध्ये काय आढळून आले ? व्हॅल्युएशन करण्यासाठी पंचायत समिती लेव्हलला स्टाफ नाही. जिल्हा परिषदेकडून पंचायत समितीला स्टाफ पुरविला जातो. या कामाचे व्हॅल्युएशन कोणत्या अधिका-याने केले ? तसेच व्हॅल्युएशन पंचायत समिती पातळीवर झाले की जिल्हा परिषदेच्या पातळीवर झाले याची माहिती मंत्रीमहोदय देतील काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, टाकीचे बांधकाम झाले ते काही फूट खाली आणि काही फूट वरती असे झाले. वरचा जो स्लॅब आहे त्याला क्रॅक आहेत. या कामाची चौकशी उपअभियंता यांनी केली होती. कामाचे एस्टीमेट हे ज्युनिअर इंजिनिअर तयार करतो आणि उपअभियंता यांची सही घेऊन नंतर मान्यता दिली जाते. या कामाचे व्हेरीफिकेशन आणि व्हॅल्युएशन हे डेप्युटी इंजिनिअरने केलेले आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मा.मंत्रीमहोदयांनी सांगितले की, पाण्याच्या अनधिकृत कनेक्शनबाबत तक्रार करण्यात आली होती त्यात गैरव्यवहार झालेला नाही. शाळेच्या जागेवर अतिक्रमण झाले आहे असाही एक मुद्दा तक्रारीमध्ये होता. जी चौकशी करण्यात आली त्यामध्ये खरोखरच अनधिकृत पाण्याचे कनेक्शन सापडले काय ? त्याचप्रमाणे जी चौकशी करण्यात आली त्यामध्ये शाळेच्या जागेवर खरोखरच अतिक्रमण झालेले आढळून आले काय ? या चौकशीच्या संदर्भातील निष्कर्ष काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, तक्रार एका कनेक्शनबद्दल होती आणि ती" हॉटेल बॅलन्स" बद्दल होती." हॉटेल बॅलन्स" नावाचे एक हॉटेल याठिकाणी आहे. ही गट ग्रामपंचायत आहे. ही ग्रामपंचायत कांबळे-तारा-महाड या हद्दीमध्ये येते. या दोन्ही मधून नॅशनल हायवे गेला आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 8221 पुढे सुरु...

श्री. रणजित कांबळे ....

नळ कनेक्शन दिले होते ते शिंदेकोंड गाव आहे त्या गावाच्या लाईनवर कनेक्शन दिलेले आहे. त्यांची तक्रार अशी होती की, आमच्या लाईनमधून कनेक्शन दिले आहे आणि आम्हांला त्यामुळे पाणी कमी मिळते. एक ग्रामपंचायत आहे एक नळयोजना आहे. कनेक्शन कुठपासून द्यावयाचे आणि कुठपासून नाही हा ग्रामपंचायतीचा अधिकार आहे. पूर्ण हायवेखालून एक कनेक्शन देणे योग्य नव्हते म्हणून ग्रामपंचायतीने त्या जवळच्या भागातून कनेक्शन दिले होते.शाळेच्या जागेवर अतिक्रमण झाले किंवा नाही असा एक प्रश्न विचारला होता. याबाबत 7 जुलै 2005 रोजी तक्रार आली होती. चौकशी झाली त्याच्यामध्ये हे जवळजवळ 10 वर्षाचे जुने अतिक्रमण आहे.तेव्हा ग्रामपंचायतीने ठरविले की हे अतिक्रमण कोणीही केले असले तरी ते पाडून टाकायचे. डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी 2/3 गोष्टी सहजपणे मान्य केलेल्या आहेत. हेडलाईनला का होईना पण क्रॅक आहेत. अनिधकृत कनेक्शन दिले गेले. मागणीपत्रात आणखी काही मुद्दे आहेत ते मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. स्टॅन्डपोस्टची दुरुस्ती आवश्यक असताना ती करण्यात आलेली नाही. एक प्रकारचा भाई-भतीजा वाद करण्यात आला. आपल्या सगळयांचे दुर्देव असे आहे की, कमी अधिक प्रमाणात अनेक ग्रामपंचायतींमध्ये निवडून आलेले प्रतिनिधी बाकीच्यांना अक्षरश: कस्पटासमान लेखतात आणि लोकशाहीची थट्टा चालते.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8221 डॉ.अशोक मोडक...

या प्रश्नामध्ये मी "गैरव्यवहार" हा शब्द जाणीवपूर्वक वापरलेला आहे. या प्रकरणाची चौकशी कोणा मार्फत करण्यात आली आहे ? हा गुन्हा करणारे आणि या प्रकरणाची चौकशी करणारे यांच्यात जर साटेलोटे असेल तर चौकशी होऊन योग्य निर्णय मिळणार नाही.दिनांक 7 जुलै 2005 ला शासनाकडे या संबंधीची तक्रार करण्यात आली होती तेव्हा शासन या प्रकरणाची फेर चौकशी करणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : याप्रकरणाची या पूर्वी चौकशी करण्यात आली होती ही चौकशी गट विकास अधिका-यांनी केली होती तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांची अशी मागणी आहे की,याबाबत पुन्हा चौकशी करण्यात यावी तेव्हा उप मुख्य कार्यकारी अधिका-याच्या मार्फत पुन्हा चौकशी करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील :त्या गावाला मी स्वत: भेट दिली होती.सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी जे सांगितले आहे ते खरे आहे की, त्या शाळेच्या जागेमध्ये अतिक्रमण झालेले आहे. या जागेमध्ये दोन वर्षापूर्वी अतिक्रमण झाले होते व या बाबतीत तेथील ग्रामस्थांनी तक्रारी केल्या होत्या . जिल्हा परिषदेची ही शाळा असून ती मालमत्ता जिल्हा परिषदेची आहे.मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, त्या ठिकाणी अतिक्रमण झालेले असतांना सबंधित अधिका-याने त्याबाबत दखल का घेतली नाही किंवा सबंधिताविरुध्द कारवाई का केली नाही ? त्याचबरोबर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पाच लाख रुपयापर्यन्तचे काम असेल तर त्याचे एस्टिमेटस तयार करण्याचे अधिकार डेप्युटी इंजिनिअरला आहेत आणि त्यानंतरच्या कामाचे एस्टिमेट तयार करण्याचे अधिकार एक्झिक्युटिव्ह इंजिनिअरला आहेत तेव्हा या कामाचे एस्टिमेट किती रुपयांचे होते ? पाच लाख रुपयाच्या वर जर या कामाची किंमत असेल आणि तरी सुध्दा डेप्युटी इजिनिअरने एस्टिमेट तयार केले असेल तर ते चुकीचे होत नाही काय ?

श्री.रणजित कांबळे : या कामाचे एस्टिमेट 41 हजार रुपयांचे होते व डेप्युटी इंजिनिअरने एस्टिमेट तयार केले होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की , अतिक्रमणाच्या बाबतीत लोकांनी तक्रार केली होती . मी त्यांना सांगू इच्छितो , दिनांक 7 जुलै 2005 ला तक्रार आल्यानंतर जिल्हा परिषदेने असे ठरविले की, त्या जागेचे मोजमाप करण्यात यावे. एकूण 5.5 गुंठे एवढी ही जागा आहे व त्या ठिकाणी अतिक्रमण झाले असेल तर ते अतिक्रमण पाडण्यात येणार आहे.

-----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांपुढे एम.डी. प्रवेशाच्या समस्या**

**(३) * ५६९० डॉ. दिपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनंत तरे , श्री. विलास अवचट तारांकित प्रश्न क्रमांक १६८७ ला दिनांक १५ मार्च, २००५ उत्तराच्या संदर्भात :** स-मा-ा-नीय वैद्य[illegible]ीय शि[illegible] मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम.बी.बी.एस. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील एम.डी./एम.एस. अभ्यासक्रमांसाठी राज्य शास-ा दरवर्षी प्रवेश परीक्षा घेते, परंतु गेल्या दोन वर्षात ही प्रवेश परीक्षाच शासनाने घेतली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.डी., एम.एस. प्रवेश परीक्षा न घेतल्याने सदर दोन्ही अभ्यासक्रमांच्या जागा भरण्यात आल्या नाहीत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एम.डी., एम.एस. प्रवेशाची प्रवेश परिक्षा अखेर ३० जानेवारी, २००५ रोजी घेण्यात आली असता या परीक्षेला मागील वर्षाचे व चालू वर्षाचे उत्तीर्ण विद्यार्थी परीक्षेला बसले हे खरे आहे ाय,

(४) असल्यास, सदर प्रवेश परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी हजारो विद्यार्थी पास झाल्याने एम.डी., एम.एस. साठी राज्यात फक्त ५८९ जागा असून त्यातील ५० टक्के जागा राखीव आहेत हे खरे आहे ाय,

(५) असल्यास, सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.सुरेश शेट्टी,श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता: (१) -ाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) शैजजिज वर्ष २००५-२००६ मधील प्रवेशासाठी दिनांक ३०.१.२००५ रोजी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेला यापूर्वी आंतरवासिता प्रशिक्षण पूर्ण केलेले तसेच दिनांक ३०.४.२००५ पर्यंत आंतरवासिता प्रशिक्षण पूर्ण करणारे विद्यार्थी पात्र होते.

(४) शासकीय/मुंबई महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय आणि खाजगी वैद्यकीय महाविद्यालये मिळून एकूण ७२४ जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी ५०% जागा मागास संवर्गासाठी उपलब्ध होत्या.

(५) सदर परीजा ही स्पर्धा परीक्षा असल्याने सर्वच उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे शक्य नाही.

डॉ.दीपक सावंत : माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : नाही.

डॉ.दीपक सावंत :अध्यक्ष महाराज, वैद्यकीय शिक्षणाचा बेंडबाजा कसा वाजला आहे हे या उत्तरा वरुन आपल्याला दिसून येईल. वास्तविक पाहता या प्रश्नाला उत्तर देत असतांना माननीय मंत्रिमहोदयांनी या प्रश्नासबंधी संपूर्ण माहिती घ्यावयास पाहिजे होती.परंतु तसे न करता अधिका-यांनी जे उत्तर दिले तेच उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी दिले आहे. मी पहिल्या प्रश्नात असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5690 डॉ.दीपक सावंत ..

विचारले होते की, " एम.बी.बी.एस.उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यासाठी पुढील एम.डी./एम.एस अभ्यासक्रमासाठी राज्य शासन दरवर्षी प्रवेश परीक्षा घेते परंतु गेल्या दोन वर्षात ही प्रवेश परीक्षाच शासनाने घेतली नाही हे खरे आहे काय ? या प्रश्नाला " नाही " असे उत्तर देण्यात आले आहे. तेव्हा मला माननीय मंत्रिमहोदयांना पहिला प्रश्न असा विचारावयाचा आहे की,2004 मध्ये एम.डी./एम.एस. साठी प्रवेश परीक्षा झाली होती काय ? त्यानंतर मला माननीय मंत्रिमहोदयांना दुसरा प्रश्न असा विचारावयाचा आहे की, 2005 मध्ये झालेल्या परीक्षेसाठी किती विद्यार्थी बसले होते ? त्यानंतर तिसरा प्रश्न असा विचारावयाचा आहे की, दरवर्षी एम.बी.बी.एस.च्या परीक्षेत किती विद्यार्थी पास होत असतात ?

श्री.सुरेश शेट्टी : 2003-2004 मध्ये पी.जी.कोर्स करता जी सी.ई.टी.घेण्यात आली होती ती 2002 मध्ये घेतली होती आणि त्यानंतर ........

डॉ.दीपक सावत : सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की,.2003-2004 मध्ये परीक्षा तरी घेण्यात आली होती काय ?

श्री.सुरेश शेट्टी : माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण ऐकून घ्यावे. माझे उत्तर पूर्णं ऐकल्यानंतर सन्माननीय सदस्यांचे समाधान होईल असे मला वाटते. महाराष्ट्र शासनाचे असे धोरण आहे की, जूनच्या अगोदर ही परीक्षा घ्यावयास पाहिजे परंतु मधुसिंग व्हर्सेस एम.सी.आय.या प्रकरणात सुप्रीम कोर्टाने दिनांक 31.5.2005 ला एक निर्णय दिला आहे.

नंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शेट्टी (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 5690 ....

त्यामध्ये थोडे अंतर होते. 2002 साठी आपण जी सीइटी परीक्षा घेतली होती ती डिसेंबर मध्ये घेतली होती. दुसरी बॅच 2003-04 मध्ये घेतली नव्हती. आता 2003-04 आणि 2004-05 मध्ये परीक्षा घेतली होती त्यात एकही बॅच शिल्लक राहिलेली नाही. त्यातच सगळ्यांना समाविष्ट करून घेतले होते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांना विषयाची माहिती असल्याचे दिसत नाही. त्यामुळे खरे तर हा प्रश्न राखून ठेवण्याच्याच लायकीचा आहे. कारण इंटर्नशीप करणाऱ्या विद्यार्थ्यांना ही सीइटी 30 मार्च पर्यंत पूर्ण करून द्यावी लागते. असे असताना यांनी त्या अगोदर म्हणजे डिसेंबर मध्ये ही परीक्षा कशी काय घेतली ? हा त्या विद्यार्थ्यांवेर अन्याय आहे. शिवाय वैद्यक परिषदेच्या नियमानुसार पाहिले तरी 2004 साल असेल तर त्यास 2004 मध्ये विद्यार्थी जून-जुलैमध्ये पास होतात आणि 30 मार्च या दिवसापर्यंत इंटर्नशीपचे वर्ष त्यांना पूर्ण करावे लागते, तसा त्यांना बॉण्ड लिहून द्यावा लागतो. असे असताना हे विद्यार्थी डिसेंबर मध्ये या परीक्षेला कसे काय बसले ? आणि 2003 ची परीक्षा 2002 मध्ये यांनी कशी काय घेतली ? सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना या विषयाची पूर्ण माहिती नसल्याने याबाबतची पूर्ण माहिती घेऊन सभागृहासमोर त्यांनी यावे यासाठी आपण हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ज्या विद्यार्थ्यांची 30 एप्रिल 2005 पर्यंत इंटर्नशीप संपली होती त्यांना अगोदर या परीक्षेला बसण्यासाठी आपण संधी दिली होती. ....

डॉ. दीपक सावंत : पण असे करून आपण वैद्यक परिषदेच्या नियमांचे उल्लंघन करीत आहात. सभापती महोदय, या बाबतचे नियम काय आहेत हे तरी आपण मंत्री महोदयांना विचारावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या परीक्षेमध्ये काहीही गोंधळ झालेला नाही. एकाही विद्यार्थ्याची या बाबत तक्रार आलेली नाही. जे विद्यार्थी सीइटी परीक्षा पास झालेले आहेत त्यांना आपण प्रवेश दिलेला आहे.

: माननीय राज्यमंत्र्यांनी हे लक्षात घ्यावे की, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न सरळ आहे. इंटर्नशीप 30 मार्च पर्यंत पूर्ण करण्याची अट असेल आणि या परीक्षेला बसणे हे प्री क्वालिफिकेशन असेल तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यापूर्वीच डिसेंबरमध्ये ही परीक्षा झाली हे योग्य आहे का ?

..... एफ 2 ...

22-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F 2

KBS/SBT/MHM. श्री. गायकवाड नंतर --- 11:25

**सभापती** (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 5690 ....

ही मूळ परीक्षा 2003, 2004 अशा प्रकारे व्हायला पाहिजे. आपण म्हणता आहात की, डिसेंबरला परीक्षा झालेली आहे तेव्हा मंत्री महोदय, आपण या बाबत अधिक स्पष्ट खुलासा करणे जरूरीचे आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले की, महाराष्ट्र सरकारचे पहिले धोरण जे होते त्यानुसार आपण अगोदर परीक्षा घेतली होती. त्यानंतर सुप्रीम कोर्टाचा निर्णय झाला की, ही परीक्षा एमसीआयच्या नियमानुसार जूनमध्ये घेतली पाहिजे. आपण जी परीक्षा घेतली होती त्यामध्ये सर्व विद्यार्थी 2003 च्या बॅचमध्ये जायचे होते त्यांचा निकाल लागला होता. बाकीचे विद्यार्थी त्या बॅचमध्ये उरलेले नाहीत, त्यामुळे परीक्षा घेतली नव्हती.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यामध्ये संपूर्ण एका बॅचचे नुकसान झालेले आहे, तेव्हा हा प्रश्न आपण राखून ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, न्यायालयाचा निर्णय लागला 2005 ला आणि त्याची अमलबजावणी आपण 2003 ला कशी काय केली ? हाही प्रश्न येथे उपस्थित होतो.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, कोर्टाचे जजमेंट हे 2002 चे आहे ...

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, यामध्ये एका संपूर्ण बॅचच्या विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे त्यामुळे पालक आणि विद्यार्थी अक्षरश: रडले आहेत ....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, निम्मे विद्यार्थी तर पासच होऊ शकलेले नाहीत.... तेव्हा ज्यांचे यामुळे नुकसान झालेले आहे ते लक्षात घेता, आणि माननीय मंत्र्यांकडून याबाबत योग्य अशी माहिती येत नसल्यामुळे आपण हा प्रश्न राखून ठेवला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे नुकसान होत आहे हे आपण लक्षात घ्यावे. ...

( यानंतर श्री.जागडे ....जी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....5690.....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 2003-2004 या वर्षासाठी दिनांक 24.2.2002 रोजी, 2004-2005 या वर्षासाठी दिनांक 27.7.2003 रोजी आणि 2000-2005 या वर्षासाठी दिनांक 31.1.2005 रोजी परीक्षा झाली आहे. दि. 24.2.2002 नंतर दोन परीक्षा झालेल्या आहेत. आता कोणावर अन्याय झाला असेल तर त्यांना परीक्षेला बसण्यासाठी परवानगी देऊ.

( गोंधळ )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी विद्यार्थ्यांवर अन्याय झाला आहे. तेव्हा आपण या विषयासाठी उद्या सकाळी अर्धा तास चर्चा घ्यावी.

**सभापती** : एक विशेष बाब म्हणून उद्या या विषयावर मी अर्धा तास चर्चा घेण्यात येईल.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 2003-2004 या वर्षासाठी दिनांक 24.2.2002 रोजी, 2004-2005 या वर्षासाठी.......

**सभापती** : या विषयावर मी उद्या अर्धा तास चर्चा ठेवली आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी त्यावेळी सर्व मुद्यांचे उत्तर द्यावे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे.

**सभापती** : हा विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. त्यामुळे त्या बाबत आपण सविस्तर चर्चा केली पाहिजे.

--

ता. प्र. क्र. 8744

( सदस्य अनुपस्थित )

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती विद्यापीठासाठी जमिनीचे भूसंपादन**

**(५) * ५८२१ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे तारांकित प्रश्न क्रमांक १९१८ ला दिनांक २४ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३० नोव्हेंबर, १९८३ च्या शासन ज्ञापनाच्या परिशिष्टातून संपादित करावयाचे जे दोन शेत सर्व्हे नंबर सुटून गेले होते त्याबाबत दुरुस्ती करुन त्यांचा परिशिष्टात समावेश करणारे शासन ज्ञापन निर्गमित करण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या तारखेला,

(३) नसल्यास, ज्या दोन शेत सर्व्हे नंबर च्या वाढीव मोबदल्याच्या ५० टक्के रक्कम शासनाने ४ आठवडयाच्या आत भरावी असे आदेश मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक २८ ऑगस्ट, २००३ रोजी एका प्रकरणात (अपिल नं. ४९१/२००३) दिले त्याबाबत दुरुस्तीचे ज्ञाप-ा निर्गमित करण्यात निश्चित अडचणी कोणत्या आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याकरिता : (१) हे जरे -ााही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) भूसंपाद-ा केस क्रमांक ४३/९५ मध्ये दिवाजी न्यायालय, अमरावती यांनी दिनांक १.४.२००२ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे शासनातर्फे प्रथम अपिल क्र. ४९१/२००३ दाखल करण्यात आले. मा.उच्च न्यायालयाने दि. २८.८.२००३ च्या आदेशानुसार अवार्ड रक्कमेच्या ५० टक्के रक्कम न्यायालयात भरण्याच्या अटीवर अपिल दाखल करुन घेतले व दिवाणी न्यायालयाच्या निर्णयास स्थगिती दिली. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि. ४.३.२००५ च्या शास-ा निर्णयाद्वारे शासनाने मा.उच्च न्यायालयात भरावयाची रक्कम मंजूर केली आहे. मा.उच्च -यायालया-ो ज्ञापन दुरुस्ती करण्याबाबत आदेश दिलेले नाहीत.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, अमरावती विद्यापीठासाठी लागणा-या जमिनीच्या भूसपंदानाचा हा प्रश्न आहे. दि. 30 नाव्हेंबर 1983 च्या शासन ज्ञापनाच्या परिशिष्टातून संपादीत करावयाचे जे दोन सर्व्हे नंबर सुटून गेले होते त्याबाबत दुरुस्ती करुन त्यांचा परिशिष्टात समावेश करणारे शासन ज्ञापन निर्गमित करण्यात आले आहे काय ? या ठिकाणी असे उत्तर देण्यात आले आहे की, " मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि. 4.3.2005 च्या शासन

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे...

निर्णयाद्वारे शासनाने माच उच्च न्यायालयात भरावयाची रक्कम मंजूर केली आहे. " आता ही किती रक्कम भरली आहे ? ही रक्कम केव्हा मंजूर करण्यात आली आहे ? तसेच शासन ज्ञापन कोणत्या तारखेला निर्गमित करण्यात आले आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दि 2 नोव्हेंबर 1983 साली रुपये 99,16,500/- मंजूर करण्यात आलेले आहेत.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि.4.3.2005 च्या शासन निर्णयाद्वारे शासनाने माच उच्च न्यायालयात भरावयाची रक्कम केव्हा मंजूर केली आहे ? कोणत्या सर्व्हे नंबरसाठी ही रक्कम मंजूर केली आहे आणि ती किती आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 233.19 हेक्टर जमीन संपादित करण्यासाठी दि. 2 नोव्हेंबर 1983 साली रुपये 99,16,500/- मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर अमरावती विद्यापीठाने अजून दोन अतिरिक्त जमिनी संपादित करण्याबाबतची परवानगी मागितली होती. त्यावेळी त्यांना शासनाने असे सांगितले की, अमरावती विद्यापीठ डायरेक्टली भूसंपादन अधिका-याकडे ॲप्रोच होऊ शकते. याबाबत महाराष्ट्र शासनाने कोणतीही मान्यता दिलेली नाही. सर्व्हे क्र. 29 मधील 2.75 हेक्टर आणि 0.33 हेक्टर जमिनीच्या बाबतीत उच्च न्यायालयाने आदेश दिले होते.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : त्याप्रमाणे 50 टक्के रक्कम भरली आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, विद्यापीठाने ही रक्कम भरली आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : किती रक्कम भरली आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 19.10 लाख रुपये भरले आहेत.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : दोन सर्व्हे नंबर बाबत कोर्टाच्या आदेशाप्रमाणे रक्कम भरण्यात आली आहे. उच्च न्यायालयाने ज्ञापन दुरुस्ती करण्याबाबत आदेश दिलेले नाहीत. असे असतानाही आता हे दोन्ही सर्व्हे नंबर त्यामध्ये इनक्लूड करण्याबाबत शासन अमरावती विद्यापीठाला आदेश देईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, या बाबत शासनाने आदेश दिलेले नाहीत. - ( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 7235 : माननीय सदस्य अनुपस्थित.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील सात आयुर्वेद महाविद्यालयांच्या संल□□ी□र□ाबाबत**

**(7) * 5852 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील** : स□मा□□ीय वैद्यजीय शिजज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) महाराष्ट्र आरोज्य विज्ञा□ विद्यापीठ अधि□ियम 1998 मधील जलम 9(4) अ□वये राज्य शास□ा□ आरोज्य विज्ञा□ विद्यापीठास राज्यातील सात आयुर्वेद महाविद्यालयां□ा प्राथमिज संलज्□ीजरज देज्याचे आदेश दिले आहे, हे जरे आहे जाय,

(2) जरे असल्यास, आरोज्य विज्ञा□ विद्यापीठा□ शास□ाच्या आदेशाप्रमाजे प्राथमिज संलज्□ीजरज देज्यासंबंधी जार्यवाही सुरु जेली आहे जाय,

(3) आरोज्य विज्ञा□ विद्यापीठ शास□ाचे आदेश पाळत □सल्यास शास□ विद्यापीठावर जोजती जार्यवाही जरजार आहे व आयुर्वेद महाविद्यालया□ा प्राथमिज संलज्□ीजरज मिळवू□ देज्यासाठी शास□ जोजती उपाययोज□ा आजजार आहे व जधीपर्यंत ?

श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता : (1) शास□ा□ 5 आयुर्वेद महाविद्यालयां□ा प्रथम संलज्□ीजरज देज्याचे आदेश महाराष्ट्र आरोज्य विज्ञा□ विद्यापीठास दिले आहेत.

(2) होय. विद्यापीठा□ दि□ाज 11 मे, 2005 रोजी झालेल्या बैठजीत प्रस्तावांचा विचार जरु□ अहवाल सादर जरज्यासाठी जुलजुरुंच्या अध्यजतेजाली समिती जठित जेली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील जार्यवाही जरज्यात येईल.

(3) प्रश्□ उद्भवत □ाही.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, शासनाने 5 आयुर्वेद महाविद्यालयांना प्रथम संलग्नीकरण देण्याचे आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाला दिले आहेत. असे असूनसुध्दा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने त्या आदेशाची अंमलबजावणी केली नाही. हे आरोग्य विज्ञान विद्यापीठ महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार काम करते की त्यांचे स्वत:चे काही नियम आहेत कां? शासनादेश न पाळणाऱ्या आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विरोधात आपण कोणती कारवाई करणार आहात?

श्री. सुरेश शेट्टी : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ ही स्वायत्त संस्था आहे. ज्या 5 आयुर्वेद महाविद्यालयांचे प्रस्ताव आले होते ते विद्यापीठाकडे पाठविण्यात आले. विद्यापीठाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** 5852** ..

ॲकॅडमिक कौन्सिलने त्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी निघाल्यामुळे ते रिजेक्ट केले. या विद्यापीठाला आणि त्यांच्या ॲकॅडमिक कौन्सिलला त्यांच्या स्टॅटयुट्सप्रमाणे दिलेल्या अधिकारानुसार त्यांनी ते प्रस्ताव रिजेक्ट केले आहेत. त्याकरिता व्हाईस चॅन्सेलरच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली असून त्या समितीमध्ये त्या प्रस्तावांवर पुर्नविचार करुन जे काही निर्णय घेतले जातील ते शासनाला लवकरच कळविण्यात येतील.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, आयुर्वेद आणि ॲलोपॅथी या दोन गोष्टी पूर्णपणे वेगळया आहेत. आयुर्वेदाला हजारो वर्षांची परंपरा आहे. त्यामधून खूप लोकांवर उपचार करण्यात आले आहेत, अनेक लोकांना त्यामधून रोजगार मिळाले आहेत. हे लक्षात घेऊन आयुर्वेदासाठी वेगळे विद्यापीठ करण्याचा शासनाचा विचार आहे काय? तसा विचार झाला नसेल तर स्वतंत्र विद्यापीठ न केल्यामुळे आयुर्वेदिक महाविद्यालयांचे प्रलंबित असलेले प्रश्न तातडीने सोडवावयाचे आहेत त्यासाठी शासन काय कारवाई करीत आहे? उदा. नांदेड येथील पहिले आयुर्वेदिक महाविद्यालय स्थापन झ ाले. त्या ठिकाणी छोटया छोटया सुविधा दिलेल्या नाहीत, त्यांच्या कोर्सेसना मान्यता दिलेली नाही. त्यामध्ये बऱ्याच अडचणी असल्याचे सांगितले जाते तर त्यामध्ये लक्ष घालण्यासाठी शासनाने कोणती योजना अवलंबिली आहे?

श्री. सुरेश शेट्टी : आयुर्वेदिककरिता वेगळे विद्यापीठ स्थापन करण्याबाबत लोकांनी वेळोवेळी विनंती केली आहे. यासंबंधी तीन महिन्यापूर्वी माननीय मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमण्यात आली असून त्यामध्ये सर्व आयुर्वेदिक संस्थांचे प्रतिनिधी घेतले आहेत. त्या कमिटीचा अहवाल आल्यानंतर शासन त्यावर विचार करील.

श्री. जयंत प्र. पाटील : ज्या 5 महाविद्यालयांना शासनाने परवानगी दिली आहे. त्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठाच्या म्हणण्यानुसार कोणत्या त्रुटी आहेत?

श्री.सुरेश शेट्टी : मी अगोदर सांगितले आहे की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ ही ॲटॉनॉमस बॉडी असून त्यांच्या ॲकॅडमिक कौन्सिलने काही त्रुटी काढल्या आहेत. पण ती माहिती आता माझ्याकडे नाही, माननीय सदस्यांना ही माहिती हवी असेल तर ती नंतर देण्यात येईल. दिनांक 21.5.2005 रोजी कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली नवीन कमिटी नेमण्यात आली. त्या कमिटीमध्ये 8 लोक आहेत. त्या कमिटीमार्फत लवकरात लवकर ते प्रस्ताव तपासून त्यासंबंधीचा निर्णय कमिटी घेणार आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5852 . . . .

श्री.वसंतराव काळे : सभापती महोदय, याठिकाणी पहिल्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "शासनाने 5 आर्युर्वेद महाविद्यालयांना प्रथम संलग्नीकरण देण्याचे आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठास दिले आहेत." हे विद्यापीठ स्वायत्त असल्यामुळे विद्यापीठाचे संलग्नीकरण केले तर नुकसान होईल आणि त्यात जर काही त्रुटी असतील तर अशा परिस्थितीत या महाविद्यालयांना संलग्नीकरण द्यावे असे आदेश शासन देऊ शकते का ? हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, जास्त महाविद्यालयांना परवानगी दिल्याचा परिणाम असा झाला आहे की, डेंटल, आयुर्वेदिक, ॲलोपॅथी इ.महाविद्यालयांमध्ये प्रोफेसरच्या जागा भरल्या जात नाहीत. असोसिएट प्रोफेसरच्या जागा भरल्या जात नाहीत. विषयवार लेक्चरर मिळत नाहीत. अशा त्रुटी असताना या महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याच्या बाबतीत शासन आदेश देऊ शकते का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, शासन आदेश देऊ शकते. पण आपण असे करीत नाही. कारण सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमाणे कितीतरी कॉलेजमध्ये म्हणजे आयुर्वेदीक, डेंटल कॉलेजमध्ये पुरेसा स्टाफ नसतो, इन्फ्रास्ट्रक्चर नसते आणि अशा कॉलेजमध्ये विद्यार्थी ॲडमिशन घेऊन मग रडत बसणार. एक्स्ट्रीम केसेसमध्ये शासनाला पॉवर्स् आहेत, पण शासन त्या कमी वापरते.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, याठिकाणी आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या संदर्भात सातत्याने चर्चा होत आहे. माझा प्रश्न असा आहे की, आयुर्वेदिक महाविद्यालयांचे संलग्नीकरण करण्यासंदर्भात प्रश्न विचारल्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, ही विद्यापीठे संपूर्ण स्वायत्त आहेत. पण कोणतीही विद्यापीठे स्वायत्तच असतात. त्यामध्ये शासनाचा हस्तक्षेप होऊ नये असे अपेक्षित असले तरी, कोणालाही वा-यावर सोडून देणे हा याचा अर्थ नाही. तेव्हा ही महाविद्यालये कोणत्या निकषानुसार यामध्ये बसतात किंवा बसत नाहीत याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवली पाहिजे. कारण मघाशी एका प्रश्नाला उत्तर देताना, त्यांनी ही माहिती आता त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे सांगितले आहे. आयुर्वेद या संपूर्ण विषयाच्या बाबतीत त्यांची सक्षमपणाने पात्रता आहे की नाही ? हे पाहण्याची तरी या विज्ञान विद्यापीठाची कपॅसिटी आहे की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. म्हणून आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या संदर्भात सांगावयाचे तर त्यांच्याकडे आयुर्वेद आणि त्याची विचारप्रणाली याबाबतीत सक्षमता नाही. त्यामुळे यासाठी स्वतंत्र विद्यापीठ करणार आहात का ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5852 . . . .

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर अगोदरच दिलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मघाशी ॲकॅडमिक कौन्सिलचा उल्लेख केला आणि सांगितले की, त्यांनी हे प्रस्ताव रिजेक्ट केले आहेत, पण ॲकॅडमिक कौन्सिलमध्ये आयुर्वेदाचे रिप्रेझेन्टेशन होते का ? ॲकॅडमिक कौन्सिलमध्ये शासकीय मेंबर म्हणून मंत्रालयातील सचिव किंवा उप सचिव यांच्यापैकी कोणी असतात का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ॲकॅडमिक कौन्सिलमध्ये शासकीय मेंबर नसतात. पण सिनेटमध्ये दोन प्रतिनिधी असतात.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ॲकॅडमिक कौन्सिलमध्ये आयुर्वेदाचे रिप्रेझ ेन्टेशन होते का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हेल्थ युनिव्हर्सिटीमध्ये आयुर्वेदचे रिप्रेझेन्टेशन होते. तेथे प्रत्येक फॅकल्टीचे रिप्रेझेन्टेशन असते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी सिनेटवर आहे, म्हणून मी सांगतो. मी जाणीवपूर्वक सांगतो की, तसे नाही.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या विद्यापीठ अधिनियम 1998 च्या कलम 9 (4) अंतर्गत असलेल्या अधिकाराचा वापर करुन आपल्याला आदेश देण्याचे अधिकार आहेत. त्याचा वापर करुन आरोग्य विज्ञान विद्यापीठाला आदेश दिलेले आहेत. तेव्हा या आदेशाची अंमलबजावणी करण्याची विद्यापीठाची कायदेशीर जबाबदारी आहे की नाही ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, त्या नियमांचा उपयोग करुन या पाच विद्यापीठांचा मुद्दा युनिव्हर्सिटीकडे पाठविला आहे. म्हणजे कमीतकमी या पाच विद्यापीठांना मदत तर केली आहे. आता जे नियम आहेत, ते तरी त्यांना पूर्ण द्या. नाहीतर आम्हाला प्रेशराईज् करुन परत एलीजिबिलीटी द्या असे म्हणणे हा प्रामाणिकपणा आहे असे मला वाटत नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही उत्तर देण्याची पध्दत नाही.आम्ही जनतेचे प्रश्न विचारीत आहोत. पण माननीय मंत्री महोदयांनी येथे आरोप केला आहे. आम्ही यांना प्रेशराईज् करतो का ?

. . . .आय-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5852 . . . .

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आरोप केलेला नाही. मी सांगितले की, आम्हाला जे अधिकार आहेत, ते आम्ही वापरत नाही.

**सभापती** : जर एखादा अयोग्य शब्द चुकून बोलला गेला असेल, तो मागे घ्यावा.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, होय.

-----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे सोलापूर जिल्ह्यातील शासजीय वैद्यजीय महाविद्यालयाची बांधज्यात येजारी -ावी-ा इमारत**

**(8) * 7105 श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. सुधाज र जजजजे** : स-मा-ा-नीय वैद्य�ीय शि�� मंत्री पुढील �ोष्टींचा �ुलासा �रतील �ाय :-

(1) मौजे सोलापूर जिल्ह्यातील शासजीय वैद्यजीय महाविद्यालय रुज्जालयास -ावी-ा इमारत बांधज्यास शास-ा-ने 15 जोटी -िधी मंजूर जेला आहे, हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, या इमारतीचे 75% जाम पूर्ज झाले असू-ा उर्वरित जामासाठी शास-ा-ने मंजूर -िधी -ा दिल्यामुळे जाम ठप्प आहे, हे जरे आहे जाय,

(3) असल्यास, हि इमारत पूर्ज -ा झाल्या-ने उपचारासाठी येजाऱ्या रुज्जां-ाा जाजजी दवाजा-यामध्ये जावे लाजते याबाबत शास-ा-ने रुज्जालयासाठी आतापर्यंत मंजूर -िधीपैजी जिती वितरीत जेला व उर्वरित -िधी वितरित जेला -ासल्यास त्यासंबंधी चौजशी जरु-ा योज्य ती उपाययोज-ाा जेली वा जरज्यात येत आहे जाय,

(4) -ासल्यास, त्यामाजील विलंबाची जारजे जाय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी श्री.दिलीप वळसे-पाटील यांचेकरिता**: (1) हे जरे -ाही.

(2) 30% जाम पूर्ज झाले आहे. उर्वरीत बांधजाम -िधी अभावी बंद आहे.

(3) व (4) सध्या जु-या इमारतीमध्ये (बी-ब्लॉज) रुज्जां-ाा उपचार देज्याचे जाम नियमित चालू असल्या-ने रुज्जां-ाा उपचारासाठी जाजजी दवाजा-यामध्ये जावे लाजत -ाही. शास-ा-ने रुज्जालयी-ा जर्चाजरिता 2005-2006 या चालू वर्षी रु. 14.70 जोटीचा -िधी मंजूर जेलेला असू-ा रुज्जांच्या सुविधाजरिता त्यामध्ये 4.15 जोटींचा समावेश आहे. सदर सर्व -िधी वित्त विभाजाच्या जॅश फ्लोच्या बंध-ाा-ुसार मासिज पध्दती-ने वापरज्यात येतो. प्रस्तुत इमारतीसाठी आतापर्यंत रु. 4.20 लज इतजा -िधी वितरीत जरज्यात आलेला आहे. परंतु चालू वर्षी या जामासाठी जोजताही -िधी उपलब्ध झालेला -ाही.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, उत्तराच्या दुसऱ्या भागामध्ये "30टक्के काम पूर्ण झाले आहे", असे म्हटलेले आहे आणि तिसऱ्या आणि चौथ्या उत्तरामध्ये "परंतु चालू वर्षी या कामासाठी कोणताही निधी उपलब्ध झालेला नाही नाही", असे म्हटलेले आहे. निधीअभावी काम बंद आहे, असे म्हणणे म्हणजे सोलापूरकरांच्या दृष्टीने असमाधानकारक उत्तर आहे. 30 टक्के काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित काम बाकी आहे, त्यासाठी भरीव अशाप्रकारची आर्थिक तरतूद शासन करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.7105 (पुढे सुरु..

श्री.सुरेश शेट्टी : या संबंधात यावर्षी 11.08 कोटीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविलेला होता. परंतु प्लॅनिंग सब कमिटीने त्यास मंजुरी दिली नाही. म्हणून या बजेटमध्ये तरतूद करु शकलेलो नाही. परंतु आतापर्यन्त 420 लाख रुपये अगोदरच खर्च केलेले आहेत. सोलापूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाला पैशाची आवश्यकता आहे, त्या दृष्टीने प्रयत्न करत आहोत. फायनान्सकडे प्रपोजल पाठविलेले होते, त्याबाबत पुन्हा प्रपोजल परसू करुन, त्यास लवकरात लवकर वित्त विभागाची मान्यता घेऊन तेथील काम पूर्ण केले जाईल.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : किती दिवसामध्ये काम पूर्ण करणार आहात ?

श्री.सुरेश शेट्टी : आमच्या डिपार्टमेंटकडे ते काम नाही. आम्ही पुन्हा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवून त्याचा पाठपुरावा केला जाईल.

श्री.अनंत तरे : "लवकरात लवकर", या शब्दाचा अर्थ काय समजायचा ?

**सभापती** : "ताबडतोबीने", असा अर्थ काढायला हरकत नाही.

श्री.अनंत तरे : महिन्या, दोन महिन्यामध्ये काम पूर्ण केले जाईल, अशाप्रकारचा कालावधी अपेक्षित आहे.

श्री.सुरेश शेट्टी : 11 कोटी रुपयाचे प्रपोजल फायनान्सकडे पाठविलेले होते, त्याबाबत अधिवेशन संपल्यानंतर पुन्हा त्याचा फॉलोअप केला जाईल.

श्री.दिवाकर रावते : माजी मुख्यमंत्री, राज्यपाल यांनी आम्हाला पैसे देत नाहीत अशाप्रकारचे वर्तमानपत्रातून स्टेटमेंट केलेले आहे, त्याबाबतीत गांभीर्याने घेतले पाहिजे.

**सभापती** : मंत्री महोदय, सोलापूर मेडिकल कॉलेज हे जुने आहे, त्यादृष्टीने तरतूद व्हावी. आपण आणि कॅबिनेटचे मंत्री मिळून, मा.मुख्यमंत्री, अर्थमंत्री यांना भेटून सांगितले तर त्याकरिता तरतूद होणे शक्य आहे, त्यादृष्टीने प्रयत्न करावा.

श्री.सुरेश शेट्टी : ठीक आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शासजीय तंत्रनिजेतन/अभियांत्रीजी महाविद्यालयातील तांत्रीज व निदेशज जर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेजी मिळजेबाबत**

**(9) * 5968 श्री. वसंतराव जोटरे , प्रा. बी. टी. देशमुज , श्री. क्व्ह. यू. डायजव्हाजे , श्री. □□साहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अै□पूरे तारांजित प्रश्न ज्रमांज 2515 ला दिनांज 24 मार्च, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय उच्च व तंत्रशि□□ मंत्री पुढील □ोष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) शासजीय तंत्रनिजेतन व अभियांत्रीजी महाविद्यालयातील तांत्रीज जर्मचारी व निदेशज तसेच आय.टी.आय., एम.सी.व्ही.सी. मधील निदेशजांची जर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतची समजजता ठरविज्याची जार्यवाही पूर्ज झाली हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, याबाबत जोजता निर्जय घेज्यात आला,

(3) नसल्यास, विलंबाची जारजे जाय ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांचेकरिता** : (1) व (2) आय.टी.आय., एम.सी.व्ही.सी. मधील निदेशज सदर संस्थांत अध्यापनाचे जार्य जरत असल्याने ही पदे शिजजीय पदे आहेत परंतु शासजीय तंत्रनिजेतन व अभियांत्रिजी महाविद्यालयातील तांत्रिज जर्मचारी व निदेशज हे या संस्थेतील शिजजांना प्रयोजशाळेत तथा जर्मशाळेत विद्यार्थ्यांजडून प्रात्याजिजे जरवून घेज्याच्या जामात सहाय्य जरीत असल्याने ही पदे सहाय्यजारी पदे आहेत.

उपरोक्त जारजास्तव शासजीय तंत्रनिजेतन व अभियांत्रिजी महाविद्यालयातील तांत्रिज जर्मचारी व निदेशजांची पदे आय.टी.आय., एम.सी.व्ही.सी. मधील निदेशजांच्या पदांशी समजज ठरत नाहीत.

(3) जार्यवाही पूर्ज झाली आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, दिनांक 15-07-2005 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील 95 क्रमांकावर प्रश्न विचारलेला होता. त्याला लेखी उत्तर दिलेले आहे. तृतीयश्रेणी तांत्रिक कर्मचाऱ्यांचे म्हणणे असे आहे की, सरकारने पदांना जातीवाचक नावे दिलेली आहेत, उदा.लोहार, सुतार अशी नावे दिलेली आहे. यांना "निदेशक", अशी संज्ञा द्यावी. यामुळे वेतनश्रेणीमुळे फरक पडतो. त्याबाबत कर्मचाऱ्यांनी सातत्याने मागणी केलेली आहे. 15 जुलै रोजी जे लेखी उत्तर दिलेले आहे त्यामध्ये महटलेले आहे की, "या पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित झाल्यानंतर या पदांची जातीवाचक पदनामे बदलण्यासाठी त्यांची देय वेतनश्रेणीनुसार कार्यदेशक,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे..... 11:45

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (पुढे सुरु...

ता.प्र.क्र.5968 (पुढे सुरु....

प्रभारक व निदेशक या तीन टप्प्यात विभागणी करुन तद्नुषंगाने सुधारित सेवाप्रवेश नियम गठित करण्यात येत आहेत." आता जे तिसऱ्या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे त्यामध्ये म्हटलेले आहे की, "कार्यवाही पूर्ण झालेली आहे", याचा अर्थ काय समजायचा ? दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना म्हटलेले आहे की, "उपरोक्त कारणास्तव शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील तांत्रिक कर्मचारी व निदेशकांचे पदे आय.टी.आय., एम.सी.व्ही.सी.स मधील निदेशकांच्या पदांशी समकक्ष ठरत नाहीत". म्हणजे चार दिवसांनी याबाबतचा केव्हा सर्व्हे केला, केव्हा तपासणी केली. समकक्ष ठरत नाही, कार्यवाही पूर्ण झाली आहे...

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार..... 11:50
ता.प्र.क्र.5968...

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे...

सभापती महोदय, म्हणून माझे म्हणणे असे आहे की, आपण केलेली कारवाई योग्य नाही. थोडासा अवधी घ्या त्याचा पुनर्विचार करा. तसा पुनर्विचार करुन त्यांना न्याय देण्यात येईल काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे पूर्ण विचार करायला तयार आहोत. आर्थिक भार आठ कोटी पर्यंत जाणार आहे.तरी परत याबाबत विचार करण्यास शासन तयार आहे.सन्माननीय आणि सदस्य आणि इतर याच्याशी सबंधित सदस्यांबरोबर एकत्रित बसून याचा विचार करु.

श्री. शरद पाटील : सभापती महोदय,व्यवसाय शिक्षण आणि तंत्र शिक्षण असे दोन विभाग होण्यापूर्वी त्यांच्या बदल्या एकमेकांच्या संस्थांमध्ये होत असत. यापूर्वी त्यांना समकक्ष मानले गेले होते. त्याप्रमाणे त्यांना आताही समकक्ष मानण्यात यावे आणि त्यापमाणे त्यांना वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी अशी आमची मागणी आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, तपासून बघू आणि त्यावर विचार करु.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, सुरुवातीला जर व्यवसाय शिक्षण आणि तंत्रशिक्षण हे दोन विभाग सारखेच होते तर ते नंतर कां बदलण्यात आले? याचा विचार करण्याची गरज नाही. एकदा चौथी वेतनश्रेणीत ते एकाच वेतनश्रेणी होते तर त्यांना ती वेतनश्रेणी द्यावयास पाहिजे. तेव्हा तातडीने कसलाही विचार न करता त्यांनी ती वेतनश्रेणी देणार आहात काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या सभागृहातील संबंधित सर्व सन्माननीय सदस्य, असोसिएशनचे प्रतिनिधी यांच्यासोबत एक बैठक घेऊन त्या बैठकीमध्ये या सर्व बाबीवर विचार करण्यात येईल.

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदय, आय.आय.टी.,एम.सी.व्ही.सी. शासकीय तंत्र निकेतन, अभियांत्रिकी यांना निदेशक म्हणून पदनामीत करावे अशा प्रकारची ही मागणी आहे. माझा प्रश्न असा आहे की, आय.टी.आय.मध्ये काम करणा-या निदेशक असे पदनाम दिलेले आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता काय आहे? एम.सी.व्ही.सी.मध्ये काम करणा-या निदेशकांची शैक्षणिक पात्रता काय? तंत्र निकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात काम करणा-यांची निदेशक या पदाची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5968...

श्री. वसंतराव काळे..

मागणी आहे. त्याची शैक्षणिक पात्रता पदवी आणि पदविका असतांना आय.टी.आय.व एम.सी.व्ही.सी.च्या निदेशकांची शैक्षणिक पात्रता कमी असतांनासुध्दा त्यांना निदेशक या पदाचा दर्जा दिला जातो. यांना निदेशक म्हणून दर्जा दिला जात नाही. या उलट यांच्यापेक्षा त्यांच्याकडे कामाचे स्वरुप जास्त आहे हे खरे आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, इन्स्ट्रक्टर आहेत त्यांचे काम वेगळे आहे. मी अगोदरच संगितले आहे, यासंबंधात विचार करायला आम्ही बसणार आहोत. त्यामध्ये याचाही विचार करण्यात येईल.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार..... 11:50

## अभियांत्रिजीच्या हजारो जाजा रद्द जरज्याबाबत

**(10) * 8446 श्री. विलास अवचट , श्री. अ-ांत तरे , श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपज सावंत :** स-मा-ा-ीय उच्च व तंत्रशिजज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) राज्यातील अभियांत्रिजी महाविद्यालयांमधील सुमारे 5000 जाजा अ.भा. तंत्रशिजज परिषदे-ो माहे जू-ा, 2005 पासू-ा रद्द जेल्या आहेत हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, रद्द झालेल्या जाजा प्रामुज्या-ो विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या विभाजातील आहेत हे जरे आहे जाय,

(3) असल्यास, इतक्या मोठया प्रमाजावर जाजा रद्द होज्याची जारजे जाय आहेत,

(4) या जाजा रद्द होवू -ायेत वा त्यां-ाा पु-हा परवा-ाजी मिळावी यासाठी राज्य शास-ा-ो जाय उपाययोज-ाा जेली आहे वा जरीत आहे ?

**श्री. सुरेश शेटी, श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याकरिता** : : (1) होय, परंतू यासंदर्भात ज्या संस्थां-ाी अजिल भारतीय तंत्र शिजज परिषदेस त्रुटींची पूर्तता जरु-ा जाजा पूर्ववत जरज्याची वि-ांती जेली त्या संस्थांच्या रद्द जरज्यात आलेल्या जाजांपैजी बहुतांश जाजा अजिल भारतीय तंत्र शिजज परिषदे-ो पूर्ववत जेल्या आहेत.

(2) प्रश्-ा उद्‌भवत -ााही.

(3) प्रश्-ा उद्‌भवत -ााही.

(4) प्रश्-ा उद्‌भवत -ााही.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, अभियांत्रिकीच्या हजारो जागा रद्द करण्याबाबतचा हा प्रश्न आहे. मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे की, "यासंदर्भात ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस त्रुटींची पूर्तता करून जागा पूर्ववत करण्याची विनंती केली त्या संस्थांच्या रद्द करण्यात आलेल्या जागांपैकी बहुतांश जागा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने पूर्ववत केल्या आहेत." याबाबत माझे दोन प्रश्न आहेत. एकंदर किती संस्था रद्द केल्या ? त्यामध्ये जागा किती होत्या ? पूर्ववत केलेल्या जागांची संख्या किती?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या विषयावर या आगोदर सभागृहात चर्चा झाली होती. त्यासंबंधीचे कागदपत्र मी सभागृहाच्या पटलावर ठेवले होते. याठिकाणी जी माहिती द्यावयाची होती त्यावर सविस्तर चर्चा झाली होती. महाराष्ट्रात एकूण 46789 सीट्स होत्या. युनिव्हर्सिटीवाईज माहिती पाहिजे असेल तर मी द्यावयास तयार आहे.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, एकंदर किती सीट्स रद्द केल्या? याचे उत्तर मिळाले पाहिजे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्रमांक 8446.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पाच हजार सीट्स पैकी विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात किती सीट्स रद्द झाल्या ते सांगावे?

श्री. सुरेश शेट्टी : 2005 ची टोटल इन्टेक कॅपॅसिटी 2370 सीट्स एवढी कमी झालेली आहे. त्यापैकी ..........................................................................................

यानंतर श्री. बरवड....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-1

RDB/ MHM/ SBT/ प्रथम कु. थोरात 11:55 वा.

ता. प्र. क्र. 8446....... श्री. सुरेश शेट्टी ......

एआयसीटीईने अगोदर 1350 सिट्स रिस्टोअर केल्या. या वर्षी आपल्याकडे चार नवीन संस्था आल्या. त्या ठिकाणी 900 सिट्स ॲड झाल्या. एकूण इन्टॅक कॅपॅसिटी 1020 ने रिडयूस झाली. मुंबई युनिव्हर्सिटीमध्ये रिडयूस इन्टॅक कॅपॅसिटी 1190 आहे. पुणे युनिव्हर्सिटीमध्ये 200 सिट्स कमी झाल्या. शिवाजी युनिव्हर्सिटी, कोल्हापूर या ठिकाणी 495 सिट्स कमी झाल्या. उत्तर महाराष्ट्र यूनिव्हर्सिटीमध्ये 540 सिट्स कमी झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिव्हर्सिटी, औरंगाबाद या ठिकाणी 1125, नांदेड युनिव्हर्सिटीमध्ये 600, अमरावती युनिव्हर्सिटीमध्ये 605 आणि नागपूर युनिव्हर्सिटीमध्ये 450 अशी मूळ जी इन्टॅक कॅपॅसिटी रिडयूस झाली होती ती एकूण 5202 जागांची होती आणि त्यापैकी 1350 जागा रिस्टोअर झाल्या.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रश्न विचारण्याचा जो मूळ हेतू आहे तो असा की, मागास भागामधील ज्या जागा होत्या त्या जास्तीत जास्त कमी झालेल्या आहेत. हा यातील महत्वाचा भाग आहे. रद्द झालेल्या जागांमध्ये विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रामध्ये किती जागा कमी झाल्या ? आपण 5 हजार जागांचा ब्रेकअप दिला त्यामध्ये दोन तृतीयांशपेक्षा जास्त म्हणजे जवळजवळ 70 टक्के जागा मागास भागामध्ये रद्द झालेल्या आहेत. ज्या जागा रिस्टोअर झ ाल्या त्या जागा या मागास भागामध्ये रिस्टोअर झालेल्या नाहीत. काल आपले स्टेटमेंट आलेले आहे. मराठवाडयामधील 956 जागा कमी झालेल्या आहेत. हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे.

श्री. सुरेश शेट्टी : ज्या जागा रिस्टोअर झाल्या त्याची यादी मी आपल्याला सांगतो. नांदेडमध्ये 510 सिट्स रिस्टोअर झाल्या. अमरावतीमध्ये 145, नागपूरमध्ये 15, औरंगाबादमध्ये 435, उत्तर महाराष्ट्र युनिव्हर्सिटीमध्ये 450, कोल्हापूरमध्ये 320, पुण्यामध्ये 90, मुंबईमध्ये 405 अशा 2370 सिट्स रिस्टोअर झाल्या.

श्री. दिवाकर रावते : रिस्टोअर झालेल्या जागेमध्ये सुध्दा मराठवाडा आणि विदर्भामधील जागांचे प्रमाण कमी आहे. आमचा विषय तोच आहे. विदर्भ आणि मराठवाडयामध्ये जागा रिस्टोअर होण्याची संख्या कमी आहे. त्या ठिकाणी जागा रिस्टोअर का झाल्या नाहीत ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस त्रुटींची पूर्तता करुन जागा पूर्ववत करण्याची विनंती केली त्या संस्थांच्या रद्द करण्यात आलेल्या जागांपैकी बहुतांश जागा

...2..

ता. प्र. क्र. 8446..... श्री. दिवाकर रावते .....

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने पूर्ववत केल्या आहेत. म्हणजे त्रुटी असल्यामुळे विदर्भ आणि मराठवाडयातील जागा कमी झालेल्या आहेत. त्रुटी पूर्ण न करणाऱ्या संबंधित संस्थांवर काय करवाई करणार ? त्या त्रुटींची पूर्तता त्या संस्था का करीत नाही ? त्यांना मान्यता देऊन कित्येक वर्षे झालेली आहेत. वर्षानुवर्षे हे लक्षात येत नाही म्हणून ते दामटून नेतात, असेल तसे शिक्षण देतात आणि विद्यार्थ्यांचे नुकसान करतात. त्रुटी लक्षात आल्यानंतर जागा कमी झालेल्या आहेत. त्या संस्थांवर कोणती कारवाई करणार ? या संस्थांना शासनाने मान्यता दिली. त्यांना ग्रँट दिली. त्यानंतरही त्रुटी पूर्ण होत नाहीत. त्यामुळे मागास भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. माझा असा प्रश्न आहे की, ज्या संस्थांनी दुर्लक्ष केले, ज्यांनी त्रुटी भरुन काढलेल्या नाहीत त्यांच्या संदर्भात शासनाचे कोणते धोरण राहील ?

श्री. सुरेश शेट्टी : एआयसीटीईने इन्स्पेक्शन करुन ज्या संस्थांमध्ये स्टाफ नसेल, प्रिन्सीपालची जागा रिक्त असेल, स्टाफला नियमाप्रमाणे पगार दिला नसेल किंवा जे नॉर्म्स आहेत ते फॉलो करीत नाहीत म्हणून सिट्स कमी केल्या. सिट्स कमी केल्या ही पनिशमेंटच आहे.

श्री. दिवाकर रावते : त्या ठिकाणी विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. एवढया विद्यार्थ्यांची इन्टॅक कॅपॅसिटी कमी झाली. एवढया विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही. मागास भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय झालेला आहे. अशा जबाबदार संस्थांवर काय कारवाई करणार ? मराठवाडयातील सर्व संस्था रद्द करण्याची पाळी तुमच्यावर येईल. ही बाब शासन गांभीर्याने घेणार आहे की नाही ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते आम्ही नियमाप्रमाणे तपासून बघतो आणि त्यामध्ये आमचा काही अधिकार असेल तर त्यांच्यावर कारवाई करु.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, हा विषय दर्जाशी संबंधित आहे. ज्या ज्या कॉलेजमध्ये दर्जा राखला जात नाही, पुरेसे इन्फ्रॉस्ट्रक्चर त्या ठिकाणी निर्माण केले जात नाही....

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय मंत्रिमहोदयांनी आधी प्रश्न समजून घ्यावा. दर्जा सांभाळण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : मी प्रश्न समजून घेतलेला आहे. पाहिजे तर सन्माननीय सदस्यांनी पुन्हा प्रश्न विचारावा.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8446....

श्री.दिवाकर रावते : क्रिकेटची वन-डे मॅच दिवसभर खेळावी तसे मा.श्री.सुरेश शेट्टी हे संपूर्ण उत्तरे देत होते. आता आपण आलात आनंद आहे. माझा प्रश्न असा आहे की, इन्टेकची क्षमता कमी झाल्यामुळे त्याच्या ब्रेकअपची आम्ही मागणी केली होती ती मा.राज्यमंत्र्यांनी दिली त्यांना मी धन्यवाद देतो. इन्टेक कॅपॅसिटीमुळे मराठवाडा, विदर्भातील जागा कमी झाल्या असे स्टेटमेंट केले आहे. मराठवाडयातील 956 जागा कमी झाल्याचे काल सभागृहात सांगितले आहे. या संस्थांना वारंवार सांगूनही त्रुटी राहिल्यामुळे हया जागा कमी झाल्या आहेत. त्रुटी ठेवणा-या या संस्थांमुळे विद्यार्थ्यांचे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. तेव्हा ज्या संस्थांनी त्रुटी दूर न केल्यामुळे हया जागा कमी झाल्या आहेत त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मा.सदस्यांचा प्रश्न माझ्या लक्षात आला होता. वैद्यकीय महाविद्यालय असेल त्यासाठी एमसीआय आहे, इंजिनिअरिंग असेल त्यासाठी एआयसीटी आहे. हया संस्थांचा दर्जा निश्चित करण्यासाठी अशाप्रकारच्या आस्थापना तयार केलेल्या आहेत. त्यांच्या माध्यमातून वेळोवेळी तपासणी केली जाते. मग बी-फार्मासी, डी-फार्मासी असू द्या, इंजिनिअरिंग असू द्या. त्याठिकाणी जर त्रुटी आढळल्या तर त्या संस्थांच्या जागा कमी केल्या जातात. जागा कमी केल्यानंतर लगेच त्या विद्यार्थ्यांचे नुकसान होते असे मानण्याचे कारण नाही. ही कंटिन्यू प्रोसेस वर्षभर चालू असते. प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी किती जागा आहेत ते जाहीर केले जाते. याठिकाणी इंजिनिअरिंगसंबंधी मुद्दा मांडण्यात आला आहे. गेल्या वर्षी इंजिनिअरिंगच्या जागा मोठया प्रमाणात शिल्लक राहिल्या होत्या. तंत्रशिक्षणाच्या 50 टक्के जागा शिल्लक राहिल्या, इंजिनिअरिंगच्या 8 हजार जागा राहिल्या होत्या. जागा कमी झाल्यामुळे प्रवेश मिळाला नाही असे झालेले नाही. त्या संस्थांच्या जागा कमी करणे हीच त्यांना केलेली शिक्षा आहे. या संस्था त्रुटी दूर करतात तेव्हा एआयसीटी किंवा इतर संस्था त्यांना पुन्हा जागा वाढवून देत असते.

श्री.वसंतराव काळे : सभापती महोदय, महाविद्यालयांचे नुकसान एआयसीटीने केले त्यामुळे मराठवाडा व विदर्भातील, ग्रामीण भागातील भागातील जागा कमी झाल्या. या महाविद्यालयांनी किती तरी वेळा जाहिरात देऊन सुध्दा त्यांना प्राचार्य उपलब्ध होत नाही. प्राचार्य होऊन कोणत्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.8446.... श्री.वसंतराव काळे....

तरी रिमोटखाली काम करण्यास ते तयार नाहीत. प्राध्यापक होण्यास तयार नाहीत. फार्मासी महाविद्यालय असेल, इंजिनिअरिंग असेल, वैद्यकीय महाविद्यालय असेल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबेजोगाई येथे देखील हीच परिस्थिती आहे. सरकार आता वैद्यकीय महाविद्यालयांच्या दर्जासंबंधी सांगत आहे परंतु त्या दर्जाबद्दल कोठेही कॉम्प्रोमाईज होण्याची आवश्यकता नसताना मागासलेला भाग म्हणून ही जी प्राध्यापकांची मानसिकता आहे त्यामुळे प्राध्यापक मिळत नाहीत. त्यामुळे ती महाविद्यालये चालत नाहीत...

**सभापती** : मा.सदस्यांना प्रश्न विचारावयाचा नाही का ?

श्री.वसंतराव काळे : सभापती महोदय, मी आता माझा प्रश्न विचारतो.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-------

3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तराची सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात )

------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा सन 2001-2002 चा लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 12:05

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचा सन 1998-99चा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : सन 1998-99चा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री. दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळता) मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितचा सन 1990-91चा वार्षिक अहवाल सभगृहासमोर ठेवतो.

**सभापती** : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितचा सन 1990-91चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. प्रमोद नवलकर : याठिकाणी 1990-91 चा अहवाल सभागृहाला सादर केलेला आहे. आता या सभागृहामध्ये 1990-91 सालातील एक तरी सदस्य आहे काय ? 15-15 वर्षांनी अहवाल सभागृहासमोर येणार असतील तर ते कोण वाचणार ? इतका विलंब होत असेल तर रौप्य महोत्सवी अहवाल म्हणून 25 वर्षांनी ते सादर करावेत. इतक्या वर्षानंतर अहवाल सभागृहाला सादर झाल्यामुळे ते सभागृहाला सादर करण्यामागील उद्देश सफल होत नाही.

**सभापती** : महामंडळाचे कामकाज कशा पध्दतीने चालले आहे हे समजण्यासाठी त्यांचे अहवाल सभागृहासमोर ठेवले जातात. अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात इतका विलंब होत असेल तर ते अहवाल सभागृहासमोर ठेवण्यामागचा उद्देश सफल होत नाही.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये मी असे सांगितले होते की, ब-याच वर्षांचे ऑडिट झालेले नसल्यामुळे अहवाल सभागृहासमोर येण्यास विलंब होतो आणि या कारणामुळे 1990, 1991, 1994चे अहवाल सभागृहासमोर येत आहेत. आमच्या ट्रेझरी विभागाच्यावतीने सर्वांनी वेळेत ऑडिट करुन घ्यावे अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. ऑडिटचा बॅकलॉग पूर्ण करण्यासाठी विवक्षित वेळ दिलेला आहे. त्यासंदर्भातील जबाबदारीही निश्चित करण्याची व्यवस्था यापूर्वी केलेली आहे. आता मागे झालेल्या कामाचा अहवाल सादर करण्यात आला. महामंडळाचे जुने अहवाल सभागृहासमोर आले तर त्याला काही अर्थ राहात नाही .

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत पाटील पुढे सुरु...)

या मा.सदस्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. याबाबतीत आम्ही आमच्या विभागामार्फत पाठपुरावा करीत आहोत. तसेच विलंबाबाबत आम्ही मॅनेजिंग डायरेक्टरांचे एक्स्प्लनेशन मागविणार आहोत.

--

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 1992-93, 1993-94, 1994-95 चा अनुक्रमे एकविसावा, बाविसावा व तेविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 1992-93, 1993-94, 1994-95 चा अनुक्रमे एकविसावा, बाविसावा व तेविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. दिलीप वळसे पाटील (ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळता) मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री. नितीन गडकरी, तत्कालीन विरोधी पक्षनेता, विधानपरिषद व इतर सन्माननीय सदस्यांनी दिनांक 22 मार्च 2005 रोजी सभागृहात उपस्थित केलेल्या मा. राज्यपालांच्या निदेशाबाबत झालेल्या अनुपूरक प्रश्नोत्तराचे वेळी दिलेल्या आश्वासनानुसार "वार्षिक योजना 2004-2005 मध्ये अंतिमत: वितरित करण्यात आलेला निधी व दिनांक 31 मार्च 2005 अखेर झालेला खर्च इत्यादी तपशील" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : "वार्षिक योजना 2004-2005 मध्ये अंतिमत: वितरित करण्यात आलेला निधी व दिनांक 31 मार्च 2005 अखेर झालेला खर्च इत्यादी तपशील" सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. जयंत पाटील (अर्थ व नियोजन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, दिनांक 1 एप्रिल 2004 ते 31 मार्च 2005 या कालावधीत शासनाच्या वेगवेगळया विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेल्या कर्ज व त्यावरील व्याजास तसेच उभारलेल्या कर्जरोख्यास देण्यात आलेल्या हमी विषयीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवतो

..3..



MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 12:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :  शासनाच्या वेगवेगळया विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेल्या कर्ज व त्यावरील व्याजास तसेच उभारलेल्या कर्जरोख्यास देण्यात आलेल्या हमी विषयीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

--

...नंतर श्री. गिते.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.** :महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती सुधा जोशी ( समिती सदस्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " नागपूर महानगरपालिकेच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण व अनुशेष तसेच महानगरपालिकेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्याता येणा-या विविध कल्याणकारी योजना या विषयावर दिनांक 6 डिसेंबर, 2000 रोजी सभागृहास सादर केलेल्या दुस-या अहवालात समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल" सभागृहास सादर करीत आहे.

**सभापती** : अनुपालन अहवाल सभागृहास सादर करण्यात आला.

-------------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 93 च्या अनेक सूचना आलेल्या आहेत. परंतु वेळे अभावी त्यावर निवेदन करणे शक्य होणार नाही. म्हणून मी फक्त पाच सूचना स्वीकारलेल्या आहेत. त्यासंदर्भात मी माझा निर्णय देत आहे.

सर्वश्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी "शिक्षण विभागातील विस्तार अधिकाऱ्यांच्या मागण्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होऊ शकत नाही. शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सर्वश्री. नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी " भंडारा जिल्हा परिषदेतर्फे संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमाचा खाजगी संस्थेबरोबर केलेला अवैध करार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होऊ शकत नाही. शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर श्री. अरविंद सावंत,वि.प.स. यांनी " ठाणे जिल्हयात रामेश्वर सोसायटी, मिरा रोड येथे सुरु असलेला अनधिकृत मदरसा बंद करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होऊ शकत नाही. शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर श्री. कन्हैयालाल गिडवाणी, वि.प.स. यांनी " सांगली शहरात अशुध्द पाणी पुरवठयामुळे सुरु असलेले गॅस्ट्रो, कॉलराची साथ, तेथील पाणी पुरवठा योजना त्वरित सुरु करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होऊ शकत नाही. शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सर्वश्री शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी " मौजे आकुर्डे,जि.कोल्हापूर येथील श्री.विलास सुतार व श्री. शिवाजी सुतार या आरागिरणी धारकांवर वन खात्याने केलेली बेकायदेशीर कारवाई थांबविण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो विषय नियम 93 चा होऊ शकत नाही. शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

-----------

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात ऑन लाईन लॉटरीचा झालेला सुळसुळाट

**मु. शी.** :राज्यात ऑन लाईन लॉटरीचा झालेला सुळसुळाट याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयंत पाटील( वित्त मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे यांनी " राज्यात ऑन लाईन लॉटरचा झालेला सुळसुळाट " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांच्या शेजारी ऑन लाईन लॉटरींची केंद्रे मोठया प्रमाणात सुरु झालेली आहेत. शाळा आणि महाविद्यालयाच्या इमारतीपासून 200 अथवा 400 मीटर अंतराच्या आत अशा प्रकारची ऑन लाईन लॉटरीची केंद्रे कार्यरत आहेत ती केंद्र तात्काळ बंद करण्यात येतील काय ? प्राप्त अहवालानुसार पोलीस यंत्रणेतर्फे गैर कायदेशीर लॉटरी चालकांविरुध्द प्रत्यक्षात काय कार्यवाही सुरु आहे ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, शाळा आणि महाविद्यालयांच्या जवळ अशा प्रकारची लॉटरी चालू राहणे हे बरोबर नाही. किमान शाळा आणि महाविद्यालयाच्या इमारतीपासून 300 मीटर अंतराच्या आत अशा प्रकारची लॉटरीची विक्री होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. त्याच प्रमाणे गैरकायदेशीर 18 लॉटरी चालकांच्या विरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले असून गृह विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्रातील खणनपट्टया वीज मंडळाला भाडे तत्वावर मिळणे

**मु.शी.**: महाराष्ट्रातील खणनपट्टया वीज मंडळाला भाडे तत्वावर मिळणे बाबत सर्वश्री विनोद तावडे,मधु चव्हाण डॉ.अशोक मोडक व श्रीमती कांता नलावडे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. दिलीप वळसे-पाटील(ऊर्जा मंत्री): सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे,मधु चव्हाण डॉ.अशोक मोडक व श्रीमती कांता नलावडे यांनी महाराष्ट्रातील खणनपट्टया राज्य वीज मंडळाला भाडे तत्वावर मिळणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, परि.5 मध्ये जो प्रश्न विचारला होता त्याला उत्तर देताना एक गोष्ट मान्य केलेली आहे की, महाराष्ट्रात 23 खणनपट्टया असून त्यातील 17 खाजगी कंपनीला देण्यात आल्या आहेत आणि 6 राज्य वीज मंडळाने स्वत: आरक्षित कराव्यात अशी राज्य शासनाची मागणी केंद्र सरकारकडून अजूनही पूर्ण झालेली नाही. महाराष्ट्र शासनाकडून केंद्रातील शासनाला याबाबत विचारणा करण्यास विलंब झाला किंवा नाही हा भाग वेगळा. परंतु केंद्रात आपले सरकार आहे आणि राज्यातही आपलेच सरकार आहे. केंद्र शासन कर्नाटक शासनाला अनुमती देते त्याचप्रमाणे इतर राज्यांना अनुमती देते मग महाराष्ट्राला अशी अनुमती का देत नाही ?अशी अनुमती मिळावी यासंबंधी राज्य शासन कोणती हालचाल करीत आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, खणनपट्टया देण्यासंबंधीचा जो विषय आहे तो एका दिवसात पुढे आलेला विषय नाही. 2002 सालापासून यासंबंधातील प्रोसेस सुरु आहे. या खणनपट्टया महाराष्ट्राला मिळाल्या पाहिजेत यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. दि. 23.5.03 रोजी सचिव(ऊर्जा) यांनी या खणनपट्टया महाराष्ट्राला मिळाव्यात म्हणून पत्र लिहिले. 6.9.03 रोजी राज्य विद्युत मंडळाच्या अध्यक्षांनी केंद्राच्या सह सचिवांना पत्र पाठविले. 19.1.04 रोजी सचिव ऊर्जा यांनी केंद्रीय कोळसा सचिव यांना पत्र लिहून कर्नाटकचा फॉर्म्युला याठिकाणी वापरावा असे पत्र लिहिले. 28.11.04 रोजी राज्याच्या मुख्य सचिवांनी केंद्र शासनाला पत्र लिहिले. 10 डिसेंबर 2004 रोजी केंद्रीय कोळसामंत्री श्री. शिबू सोरेन यांची यासंदर्भात प्रत्यक्ष भेट घेतली व आग्रह धरला होता. 4.2.05 रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय कोळसा मंत्र्यांना यासंदर्भात पत्र लिहिले. दिल्लीमध्ये मा. पंतप्रधानांबरोबर बैठक झाली त्या बैठकीमध्ये सुध्दा आपण ज्या खणनपट्टयांमध्ये इंटरेस्टेड आहोत ते खणनपट्टे महाराष्ट्राला मिळाले पाहिजेत अशा प्रकारचा आग्रह आम्ही धरला. जरी यातील काही ब्लॉक ॲलॉट केलेले असले तरी ते महाराष्ट्रातील असल्यामुळे, महाराष्ट्रातील खणनपट्टे इतर राज्यांना देऊ नयेत अशी आपली सगळयांची भावना आहे. अन्य राज्यांमध्ये सुध्दा कोल बॉक्स आम्ही मागितले आहेत. दोन राज्यांमध्ये संघर्ष करण्याऐवजी यासंदर्भात महाराष्ट्रातील जवळचे कोल बॉक्स महाराष्ट्रालाच कसे मिळतील आणि ओरिसामधील ब्लॉक्स त्यांना कसे मिळतील यासंदर्भात केंद्र शासनाकडे मी स्वत: पाठपुरावा करीन.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यासंदर्भात मी स्वत: केंद्रीय कोळसा मंत्रालयात गेलो असता तेथे आम्हांला प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर आम्ही देऊ शकलो नाही. शासनाने जे उत्तर दिले आहे त्यामध्ये 46 टक्के कोळसा महाराष्ट्रात बाहेरच्या राज्यातून मिळतो असे म्हटले आहे. बिहार,छत्तीसगड,ओरिसा येथून तो मिळत असेल. त्यांचे म्हणणे असे की, तुम्हाला जर तुमच्या राज्यातील खणनपट्टे तुम्हांला पाहिजे असतील तर अन्य राज्यातील कोळसा तुम्ही घेऊ नका या प्रश्नाचे उत्तर आम्हांला देता आले नाही. आता जे खणनपट्टे अजूनपर्यंत दिले गेले नाहीत त्याकरिता राज्य वीज मंडळाकडून याचे फॉलोअप् युध्द पातळीवर झाले पाहिजे. याबाबतीत गेल्या काही वर्षामध्ये हे खणनपट्टे मिळावेत म्हणून गंभीरपणाने प्रयत्न केले गेले नाहीत अशी माझी माहिती आहे माझी विनंती अशी आहे की, महाराष्ट्रातील जे बाकीचे खणनपट्टे आहेत ते आणि ज्या ठिकाणी प्रॉस्पेक्टीव्ह खणनपट्टे आहेत ज्याठिकाणी कोळसा आहे असे महाराष्ट्राला मिळावेत म्हणून प्रयत्न व्हावेत. शासनाने एका वीज मंडळाची तीन कॉर्पोरेशन्स तयार केलेली आहेत . तसेच तुम्ही या खणनपट्टयाकरिता जॉइंट व्हेंचर करा. पण या सगळया खाणींमधून आपण आपला कोळसा मिळवत आहोत असे धोरण स्वीकारा. त्यातून रोजगारही निर्माण होईल. आता जुने खणन पट्टे मिळण्याबाबत वाद करण्यापेक्षा नवीन मिळविण्याचा प्रयत्न करावेत. तर त्यादृष्टीने शासन प्रयत्न करील काय ?

यांनतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील :सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी केलेली सूचना अतिशय महत्वाची आहे.वीजमंडळाची पुनर्रचना केल्यानंतर जनरेशन कंपनीलासुध्दा आपण याबाबतीत सांगितले आहे.,आपल्याला पुढच्या तीस वर्षात लागणारा जो कोळसा आहे तो कोळसा आपल्या राज्यातून किंवा शेजारच्या राज्यातून आणावा लागणार आहे तसेच आवश्यकता वाटली तर इंडोनेशिया वा ऑस्ट्रेलिया या देशात जाऊनसुध्दा कॅप्टीव्ह मायनिंगसाठी आपल्याला ब्लॉक मिळाले तर तो कोळसासुध्दा या ठिकाणी आणावा लागणार आहे या कोळशाच्या बरोबरच आपल्याला जो गॅस लागतो तो गॅस सुध्दा इंटरनॅशनल मार्केटमध्ये जाऊन आणावा लागेल आणि आपल्या राज्यातील गॅसवर आधारित जे प्रोजेक्ट आहेत त्या प्रोजेक्टसाठी लागणारा अतिरिक्त गॅससुध्दा पुढील काही वर्षात आपल्याला उपलब्ध करुन द्यावा लागणार आहे. आज ज्या ब्लॉकमधून आपल्याला कोळसा मिळतो तो कोळसा पुढील काही वर्षात संपणार असल्यामुळे भविष्यकाळात म्हणजे दहा वीस वर्षानंतर कोळशाचे आणि थर्मल पॉवर प्रोजेक्टचे प्रश्न या राज्यात निर्माण होतील. त्यामुळे या सर्व परिस्थितीचा अभ्यास करण्यात येत आहे .यासंदर्भात जनरेशन कंपनीच्या माध्यमातून किंवा त्यासाठी एक स्वतंत्र जनरेशन कंपनी स्थापन करावयास लागली तरी त्या करुन तिच्या माध्यमातून हे ब्लॉक्स कॅप्टीव्ह मायनिंगसाठी घेणे , गॅस घेणे आणि त्याव्दारे ही सगळी वीज निर्मितीच्या फयुएलची अॅरेजमेन्ट करण गरजेचे आहे. यासाठी आवश्यकता वाटली तर जॉईन्ट व्हेचंर करण्याची भूमिकासुध्दा आपण ओपन ठेवलेली आहे.सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात आता काही सूचना केलेल्या आहेत. या अगोदरच्या काळात सुध्दा या बाबतीत ते माझ्याशी बोलले होते.या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून नवीन वीज कंपनी कामाला लागली आहे.

श्री.नितीन गडकरी : आपल्याकडील जनरेशन कॅपेसिटी वाढविण्यासाठी जर आपण कोल वॉश केला तर महाराष्ट्रामध्ये 640 मेगॅवॅटस जनरशेन वाढू शकते. एकूण कॅपेसिटीच्या दहा टक्के जनरेशन वाढू शकते.तेव्हा सध्या ज्या वॉशरीज आहेत त्या वॉशरीजकडे हा कोल नेऊन दहा टक्के जनरेशन वाढविण्याचा प्रयत्न का केला जात नाही ? यासंबंधीचे टेन्डर्स अजूनपर्यन्त तसेच पडलेले आहेत. पाच सात महिन्यापासून हे टेन्डर्स पडलेले आहेत.माझ्या माहिती प्रमाणे 70-80 लोकांनी यासाठी अर्ज केलेले आहेत.तेव्हा ज्यांनी अर्ज केलेले आहेत त्या सर्वाना परवानगी देण्यात आली तर आपल्याला स्पर्धात्मक दर मिळू शकतील तेव्हा हे धोरण का स्वीकारले जात नाही?

2...

श्री.दिलीप वळसे पाटील : सध्या ज्या दर्जाचा कोळसा मिळावयास पाहिजे त्या दर्जाचा कोळसा आपल्याला मिळत नाही.म्हणून राज्य वीज मंडळाने वॉश कोल घेण्यास सुरुवात केलेली आहे.जवळजवळ 3.5 लाख वॉश कोल आपण परचेस केला होता.वॉश कोलच्या संदर्भात सांगावयाचे तर त्यामध्ये मोठया प्रमाणावर गुंतवणूक करावी लागते. वॉशरीज सेट अप करण्याच्या दृष्टीकोनातून मी अशी भूमिका घेतली होती की, या बाबतीत आपल्याला जास्त ओपन होता आले पाहिजे.ठराविक लोकांची मक्तेदारी असेल तर ते त्यांच्या दराने आपल्याला वॉश कोल देत असतात. तसेच ज्या क्वालिटीचा कोल त्यांनी आपल्याला द्यावयास पाहिजे त्या क्वालिटीचा कोल ते आपल्याला देत नाहीत. अशा वेळेला या फिल्डमध्ये अधिक लोक यावयास पाहिजेत असे मला वाटते.ज्या वेळी या सबंधीचे टेन्डर काढण्यात आले होते त्यावेळी 70-80 लोकांनी यासाठी अर्ज केल्याचे दिसून आले होते. ज्या सेक्टरमध्ये 100 कोटी रुपयाच्या आसपास गुंतवणूक करावी लागते त्यामध्ये सहजपणे अर्ज केले गेलेले आहेत असे दिसून आले. सुरुवातीच्या काळात निविदा काढत असतांना निकष प्रसिध्द करण्यात आले होते. यासाठी जो खर्च केला जाणार आहे तो मंडळाचा पैसा खर्च केला जाणार नाही तर त्या कंपनीचा पैसा यासाठी खर्च होणार आहे.त्यामुळे यामध्ये जेन्युईन प्लेअर्स येण्याच्या दृष्टीने ज्या अटी आणि शर्ती होत्या त्यामध्ये काही सुधारणा करुन नजिकच्या काळात महाराष्ट्रात वॉश कोलसाठी वॉशरीज सेटअप करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल व त्या दृष्टीने प्रयत्न सुरु करण्यात आलेले आहेत.

श्री.विनोद तावडे : या निवेदनाच्या पान नंबर 8 वर असे म्हटलेले आहे की,".या धोरणाअंतर्गत प्रकल्पाचे विस्तृत प्रकल्प अहवाल सहा महिन्याच्या कालावधीत,फायनाशिंअल क्लोजर एक वर्षाच्या कालावधीत व प्रकल्प पाच वर्षाच्या कालावधीत कार्यान्वित करणे बंधनकारक आहे" आपल्याकडे हे प्रस्ताव मार्च महिन्यात आलेले आहेत त्याला आता चार महिने होऊन गेलेले आहेत तेव्हा मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की,.किती प्रकल्प अहवाल आपल्याकडे आलेले आहेत ? या सर्व कंपन्यांशी बोलल्यानंतर अजून राज्य सरकार या बाबतीत कोणताही पुढाकार का घेत नाही.? त्यात ॲक्वीझिशनचे विषय आहेत त्या शिवाय इतरही आणखी काही विषय आहेत.सन्माननीय सदस्य श्री.गडकरी फोफनाटगिरी हा शब्द वापरतात तेव्हा तशा पध्दतीचे हे आहे की काय अशी चर्चा आठ कंपन्याचे मालक करीत आहेत तेव्हा यासबंधीची नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील :सान्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे म्हणतात तशाप्रकारे यामध्ये फोफनाटगिरी नाही. त्यांनी विनाकारण सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे नाव घेऊ नये.या बाबतीत ज्यावेळी आपण सामंजस्य करार केला होता त्यावेळी हा करार केल्यानंतर डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट सहा महिन्यानंतर राज्य सरकारला त्यांनी सादर करणे अभिप्रेत होते. डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करीत असतांना त्यांनी साईट आयडेन्टीफिकेशन करावयाची असून त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था आहे किंवा नाही, कोल लिंकेजची व्यवस्था आहे किंवा नाही हे सर्व त्या कंपनीने पहावयाचे आहे.या सबंधीचा अहवाल त्यांनी सहा महिन्यानंतर सादर केल्यावर डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट आपल्याकडे ज्या लोकांचे येतील त्याच्या पुढील सहा महिन्यात फायनाशिंअल क्लोजरची जबाबदारी आपण त्यांच्यावर टाकलेली आहे.मी आपल्याला सांगू इच्छितो की या सर्व कंपन्याबरोबर दोन वेळा मिटींग झाली होती.एक वेळा मुख्य सचिवांच्या स्तरावर मिटींग झाली होती. सभागृहाच्या कामकाजामुळे मला त्या मिटींगला जाता आले नाही परंतु दुस-या वेळेला त्या सर्व कंपन्याबरोबर मी स्वत: वैयक्तिकरीत्या सर्व संबंधित अधिका-यांना भेटलो होतो.त्यावेळी पाटबंधारे विभागाचे अधिकारी त्या बैठकीला उपस्थित होते आणि राज्य सरकारच्या वतीने काय कमिटमेन्ट पाहिजे, राज्य सरकारच्या बाजूने काय मदत पाहिजे याबाबतीत त्यांना स्पष्टपणे विचारण्यात आले होते.जो कालावधी यासाठी विहित करण्यात आलेला आहे तेवढया कालावधीपर्यन्त आपण थांबले पाहिजे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वळसे-पाटील....

म्हणजे मग एकदा का त्यांचे डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट आपल्याकडे सादर झाले की, पुढे कसे जायचे याच्या पुढील स्टेप्स ठरलेल्या आहेत. सहा महिन्यांचा कालावधी दिलेला आहे तेव्हा त्यात साईटस् आयडेंटीफाय करणे, पर्चेस करणे, प्रोजेक्ट कॉस्ट इव्हॅल्यूएट करणे वगैरे या सगळ्या गोष्टी लगेच एक दोन महिन्यात होणाऱ्या नाहीत, एवढा मोठा पॉवर प्रोजेक्ट निर्माण करावयाचा म्हटले तर या कालावधीत ते शक्य होणार नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कोळशाचा उल्लेख करून खूप काही माहिती दिली. पण मला केवळ एवढीच माहिती त्यांचेकडून अपेक्षित आहे की, आपण जो बाहेरच्या राज्यांकडून कोळसा खरेदी करतो त्यामध्ये दगडाची टक्केवारी किती आहे आणि ते जे दगड आपण बाजूला काढतो त्यांचा उपयोग कशासाठी केला जातो ? कारण शेवटी पैसे देऊन आपण ते दगड घेतलेले असतात.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ही बाब काही आपल्या हातामध्ये नाही. शेवटी खाणीतून कोळसा काढणे आणि तो वाहतुकदारांच्या माध्यमातून आपल्याकडे आणणे हे त्यांचे काम असते. त्यातील रिजेक्ट कोल जो असतो त्याची वीज मंडळाच्या नियमानुसार विल्हेवाट लावली जाते. त्याची टक्केवारी किती असते वगैरे माहिती आता माझ्याकडे नाही. ती माहिती वाटल्यास मी पटलावर ठेवतो. पण त्यातील दगडही आपण डिस्पोज करतो.

*****

...... आर 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मौजे मलकापूर (जि.अकोला) येथे कुक्कुट पालनासाठी शासनाने संपादित केलेल्या जागेवर अतिक्रमण होत असल्याबाबत.

**मु.शी.** : मौजे मलकापूर (जि.अकोला) येथे कुक्कुट पालनासाठी शासनाने संपादित केलेल्या जागेवर अतिक्रमण होत असल्याबाबत श्री. गोपीकिशन बाजोरिया यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांनी "मौजे मलकापूर (जि.अकोला) येथे कुक्कुट पालनासाठी शासनाने संपादित केलेल्या जागेवर अतिक्रमण होत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती. तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.

...... आर 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुरबाड (जि.ठाणे) बारागाव खुटल येथील आश्रमशाळेच्या शिक्षकाने घरकाम करणाऱ्या आदिवासी अल्पवयीन मुलीशी ठेवलेले अनैतिक संबंध.

**मु.शी.** : मुरबाड (जि.ठाणे) बारागाव खुटल येथील आश्रमशाळेच्या शिक्षकाने घरकाम करणाऱ्या आदिवासी अल्पवयीन मुलीशी ठेवलेले अनैतिक संबंध याबाबत श्रीमती संजीवनी रायकर, श्रीमती कांता नलावडे, श्री.विनोद तावडे, डॉ.अशोक मोडक डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

---

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर, श्रीमती कांता नलावडे, श्री.विनोद तावडे, डॉ.अशोक मोडक यांनी " मुरबाड (जि.ठाणे) बारागाव खुटल येथील आश्रमशाळेच्या शिक्षकाने घरकाम करणाऱ्या आदिवासी अल्पवयीन मुलीशी ठेवलेले अनैतिक संबंध " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती. तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. ... )

......आर 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 अन्वये मा. गृह राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, या बाबतीत कारवाई पूर्ण झाली पाहिजे. आतापर्यंत जी काही कारवाई शासनाकडून झालेली आहे ती योग्य प्रकारे होत आहे. परंतु या बरोबरच मला असे सांगावयाचे आहे की, आदिवासी भागामध्ये ज्या आश्रमशाळा किंवा वसतिगृहे आहेत तेथे हे प्रकार सर्रास चालतात. आता ही बाहेरची मुलगी आहे आणि ती या शिक्षकाकडे घरकाम करावयाची. परंतु साधारणपणे अशा आश्रमशाळांमध्ये वा वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या मुलीं बरोबर तेथील शिक्षक वा कर्मचारी हे अशा प्रकारे अनैतिक संबंध ठेवतात. त्यामुळे बऱ्याच मुलींचे आयुष्याचे नुकसान झालेले आहे. आताही ही मुलगी गर्भवती झाल्यामुळे ही गोष्ट लक्षात आली. तेव्हा हे जे शिक्षक आणि कर्मचारी नेमलेले असतात त्यांच्या बाबतीत त्या त्या आश्रमशाळांना भेटी देऊन त्यांची नियमित पाहणी केली गेली तर त्या भीती पोटी तरी असे प्रकार होणार नाहीत. तेव्हा या दृष्टीने आपल्या विभागाकडून काही प्रयत्न होतील काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आश्रमशाळांमध्ये असे जे काही अनैतिक प्रकार घडतात ते होऊ नयेत या दृष्टीने त्या ठिकाणी वरचेवर संबंधित अधिकाऱ्यांना पाठवून पाहणी केली जाईल आणि असे काही प्रकार आढळल्यास उचित अशी कारवाई देखील करण्यात येईल.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, ही मुलगी बाहेरची असली तरी हे शिक्षक तेथेच रहात होते काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या घटनेतील सगळे आरोपी पकडले गेले आहेत आणि ते तेथेच रहात होते.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, मग या मुलीवर इतका अत्याचार होऊनही तो अन्य लोकांच्या म्हणजे मुख्याध्यापक वगैरेंच्या लक्षात आला नाही का ? का त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले ? तसे असेल तर त्या बाबतीत संबंधितांवर कारवाई आपण केली का ? नसल्यास, करणार का?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जेव्हा संबंधित मुलीने तक्रार केली तेव्हाच हा प्रकार उघडकीस आला आणि मग त्याबाबत ताबडतोब आपण कारवाई केली आहे.

****

...... आर 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईतील कुर्ला,दादर, सीएसटी रेल्वे स्थानकांवर घातपात घडवून आणण्याबाबत आलेले निनावी पत्र.

**मु.शी.** : मुंबईतील कुर्ला,दादर, सीएसटी रेल्वे स्थानकांवर घातपात घडवून आणण्याबाबत आलेले निनावी पत्र याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मुंबईतील कुर्ला,दादर, सीएसटी रेल्वे स्थानकांवर घातपात घडवून आणण्याबाबत आलेले निनावी पत्र " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती. तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. ... )

......आर 6 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 अन्वये मा.गृह राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर...)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा एका मुंबईतील केवळ धमकीचा प्रश्न नाही. तर जगभरामध्ये मुस्लिम धर्मांध अतिरेक्यांनी जी बॉम्बस्फोटांची मालिका चालविली आहे त्या कटाचा एक भाग असण्याचीही शक्यता आहे. कारण अयोध्या, लंडन मध्ये जे बॉम्बस्फोट झालेले आहेत त्याच वेळेस आपल्याला ही धमकी दिली गेली आहे. तेव्हा त्या कटाशी संबंधितच ही धमकी आहे का ? तसेच जेव्हा जेव्हा आपल्या सभागृहामध्ये या बॉम्बस्फोटावर चर्चा होते तेव्हा फोरान्सिक लॅबच्या लोकांनी दिलेल्या मताबद्दल म्हटले जाते की, ....

( यानंतर श्री. जागडे .....एस 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नीलम गो-हे ....

अमोनियम नैट्रेट या रसायनाचा वापर जिलेटीन बनविण्यासाठी केला जातो. बॉम्बस्फोट करण्यामध्ये हे उपयोगी पडते. जगभरातील बॉम्बस्फोटात हे रसायन वापरण्याची शक्यता आहे. तेव्हा अमोनियम नैट्रेट या रसायनावर तसेच बॉम्बस्फोटाला उपयोगी पडणा-या सर्व रसायनावर बंधने घालण्याचा शासन प्रयत्न करील काय ? माननीय सदस्य श्री. गिडवाणी यांनी आयनॉक्स थिएटरचा उल्लेख केला आहे. या ठिकाणी बॉम्बस्फोट केला जाईल, अशी अफवा बुधवारी पसरली होती. आयनॉक्स थिएटरमध्ये येणा-यांच्या गाड्या विधानभवनाच्या दरवाजापर्यन्त लागल्याचे आपणाला दिसून येईल. त्या गाड्यातून बॉम्बस्फोट घडविण्याची योजना होती. तेव्हा याबाबत शासनाने कोणती कारवाई करावयाचे ठरविले आहे ? मुंबई शहरात रात्रीच्या वेळी तसेच गर्दीच्या वेळी बॉम्बस्फोट होऊ नयेत, म्हणून शासन कोणत्या प्रकारची दक्षता घेणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एक निनावी पत्र पोलीस कमिशनरांकडे आले होते. त्याप्रमाणे दादर, कुर्ला, मुंबई सेंट्रल इ. भागात शनिवारी बॉम्बस्फोट करण्यात येणार होते. शनिवारचे मिशन फेल झाले तर रविवारी ते लोक बॉम्बस्फोट घडविणार होते. पोलीस कमिशनरांना अशा प्रकारचे पत्र आल्यानंतर संबंधित सर्व पोलीस स्टेशनला खबरदारीची उपाययोजना करण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे त्या त्या भागात बॉम्ब शोध पथक, डॉग पथक पाठविण्यात आले. त्या ठिकाणी साध्या वेषातील पोलिसांची गस्त घालण्यात येत आहे. दुसरा माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे की, या रसायनावर कायदेशीररित्या बंधन घातला येईल काय ? आता ही बाबत तपासून इघेण्यात येईल की, तसे काही करता येईल का ? जर करता येत असेल तर या रसायनावर बंधन घालण्यात येईल.

-

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांमधील कर्मचा-यांचे वेतन अतिविलंबाने होणे

मु.शी.: माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांमधील कर्मचा-यांचे वेतन अतिविलंबाने होणे याबाबत सर्वश्री. व्ही. यू. डायगव्हाणे, बी. टी. देशमुख, वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र ऐनापुरे यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री व्ही. यू. डायगव्हाणे, बी, टी. देशमुख, व्ही. डी. खोटरे, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र ऐनापुरे यांनी " माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांमधील कर्मचा-यांचे वेतन अतिविलंबाने होणे " या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, या ठिकाणी जे निवेदन करण्यात आले आहे, त्यामुळे माझे समाधान झाले आहे. परंतु आता फक्त अंमलबजावणीचा भाग शिल्लक राहिला आहे. सभापती महोदय, यामध्ये आमचा मुद्दा असा होता की, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील कर्मचा-यांचे दोन महिन्याचे पगार एकदम पाठविले जातात. 1 तारखेला या कर्मचा-यांना पगार मिळाला पाहिजे, असे शासनाचे आदेश आहेत. असे असतानाही 1 तारखेला कर्मचा-यांना पगार मिळत नाही. यामुळे शासन बदनाम होत आहे. आपले अधिकारी या दृष्टीने वेळीच योग्य ती कार्यवाही वेळीच करीत नाहीत. राज्यातील खाजगी व स्थानिक शिक्षण संस्थांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील कर्मचा-यांना एक तारखेला पगार देण्याबाबतचे निर्बंध घालण्यात येतील काय ? या दृष्टीने माननीय मंत्रिमहोदय एक पत्रक काढतील काय ? सभापती महोदय, हे पगार सहकारी बँकेत जमा होत असतात. आता या ठिकाणी तर मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे सहकारी बॅकेऐवजी नॅशनलाईज्ड बँकेमध्ये हे पगार जमा करावेत, अशी आमची मागणी आहे. त्या दृष्टीने शासन निर्णय घेईल काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, डी. ए. ची रक्कम अंतर्भूत करावयाची होती, म्हणून 5-50 शाळांना हा त्रास झाला. आता यावर्षी प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला पगार देण्यात येईल, या बाबत निश्चितपणे शासन दखल घेत आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले त्यामध्ये त्यांनी अडचण मांडली आहे. हे सर्व लक्षात घेता किमान या वर्ष अखेर अन्य शाळांबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सुध्दा फार मोठी अडचण निर्माण होते. तेव्हा सर्वसामान्य शाळांबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना सुध्दा वर्षभर निश्चितपणे पगार मिळेल याची खात्री आपण बाळगणार काय?

प्रा. वसंत पुरके : आपल्या अनुभवानुसार खात्री बाळगायला हरकत नाही. क्वचित प्रसंगी अवर्षण, अतिवृष्टीमुळे विलंब होत असतो. त्यावेळी निधी वितरीत करीत असतांना प्राधान्यक्रम मागेपुढे झाला असेल. परंतु या वर्षी तसा त्रास होणार नाही याची दखल घेता येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नोकरी करणारे शिक्षक, कर्मचारी, अधिकारी यांना दर महिन्याच्या 1 ते 5 तारखेपर्यंत पगार मिळत असतो. परंतु शेतावर राबणाऱ्याला स्वत:च्या उत्पन्नाची खात्री नसते. त्यामुळे त्याचे वाटोळे होते. नांदेड येथे कापसाच्या चुकाऱ्यासाठी आलेले पैसे शिक्षकांच्या पगारासाठी वापरले याबाबत मंत्रिमहोदय काय सांगणार आहेत?

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे....

श्री. दिवाकर रावते : असा प्रकार झालेला आहे, आपण असे कसे काय सांगता? नांदेडमध्ये कास्तकारांना पैसे मिळालेले नाहीत कारण ते शिक्षकांच्या पगारासाठी वापरले गेले आहेत...

**सभापती** : माननीय सदस्य श्री. डायगव्हाणेजी, असंघटीत असलेल्या शेतकऱ्यावर अनेक ठिकाणी अप्रत्यक्षपणे अन्याय होत असतो. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितलेली परिस्थिती आपण सातत्याने पहातो. अशाप्रकारची एखादी घटना नांदेडमध्ये घडली असेल तर ती आपण टाळावी. आणि शेतकऱ्यांच्या चुकाऱ्याचे आलेले पैसे त्यांनाच दिले पाहिजेत. त्यामुळे माननीय सदस्यांचा हरकतीचा मुद्दा उपस्थित होत नाही.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, शेतकऱ्यांचे पैसे शेतकऱ्यांना दिले पाहिजेत या मताचा मी देखील आहे. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये त्यांचे प्राथम्य डावलले जाणार नाही. या असंघटीत असलेल्या वर्गासाठी दिलेला निधी प्राधान्याने त्याला दिलाच पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाकडून या गोष्टीचा खुलासा झाला पाहिजे की, आपण शिक्षकांच्या पगाराचे पैसे वेळेवर पाठवीत नाही कां? किंवा आपण पाठविलेले पैसे त्या बँकेने दुसरीकडे वापरले आहेत काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत चौकशी केली जाईल.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, निवेदनाच्या दुसऱ्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, "लेखानुदानान्वये मंजूर झालेल्या तरतुदीतून वितरीत केलेल्या तरतुदीची रक्कम अपुरी पडल्याने काही शाळांचे वेतन अनुदान अदा करता आले नाही". मुंबईमधील काही विभागांमध्ये वर्षभर दहा-बारा शाळांना या महिन्यात पगार दिला जातो तर दुसऱ्या महिन्यात बाकीच्या दहा-बारा शाळांना पगार दिला जातो. असे प्रकार होत असतात. तेव्हा प्रत्येक शाळेमध्ये दर महिन्याला पगार होतील काय? तसेच, दोन-तीन महिन्यापासून सतत 25 तारखेला पगार दिला जातो. तेव्हा 25 तारखेला पगार न देता तो महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये दिला जाईल काय? त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी शिक्षकांच्या पगारासाठी केलेली तरतूद दुसरीकडे वळवली जाते असे सांगितले. तेव्हा शिक्षकांच्या पगारासाठी केलेली तरतूद ही त्यांनाच दिली पाहिजे , ती दुसरीकडे वळविली जाणार नाही असे आदेश आपण काढणार काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, डी.ए. चा जी.आर. निर्गमित झाल्याबरोबर काही मुख्याध्यापकांनी डी.ए. ची रक्कम कापून घेतल्यामुळे काही शाळांना त्रास झाला आहे. शिक्षकांच्या पगारासाठी वितरीत झालेला निधी हा त्यांच्यासाठीच वापरला जाईल याची दखल घेण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांकडून गोळा केलेल्या कराची रक्कम म.रा.वि.मंडळाने शासनाकडे जमा न करणे

**मु.शी.**: औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांकडून गोळा केलेल्या कराची रक्कम म.रा.वि.मंडळाने शासनाकडे जमा न करणे याबाबत श्री. कन्हैयालाल गिडवाणी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विनय कोरे (अपारंपारिक ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी "औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांकडून गोळा केलेल्या कराची रक्कम म.रा.वि.मंडळाने शासनाकडे जमा न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, ऊर्जा विभागाने औद्योगिक व वाणिज्यिक वीज वापरणाऱ्यांकडून 4 पैसे प्रतियुनिट या प्रमाणे काही रक्कम वसूल केली आहे. काल या सभागृहामध्ये पूरक मागण्या सादर करण्यात आल्या त्यामध्ये अंदाजे 50 कोटी रुपये इतकी रक्कम असल्याचे म्हटले होते. मी माझ्या भाषणामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे ते 50 कोटी रुपये नसून 100 कोटी रुपये वसूल झाल्याचे म्हटले. आजच्या निवेदनामध्ये तीच माहिती देण्यात आली आहे. तेव्हा या वसूल झालेल्या 100 कोटी रकमेचा अपारंपारिक वीजेसाठी कसा वापर करणार? आणि कुणासाठी करणार?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/MAP पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:40

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, ही रक्कम टॅक्सच्या रुपाने गोळा झालेली असल्यामुळे ती पहिल्यांदा शासनाच्या कॉन्टीजन्सी फंडात येते आणि मग अर्थसंकल्पामध्ये मागण्यांच्या स्वरुपात मंजूर होऊन संबंधित कामासाठी वितरीत होते. त्याची सुरुवात याच पुरवणी मागण्यांमध्ये झाली असून 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, दोन दिवसापूर्वी जेव्हा पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली, तोपर्यंत 50 कोटी रुपये येतील असा अंदाज होता. पण आता 100 कोटी रुपये आलेले आहेत. ते पैसे अर्थ विभागाकडून आपल्या विभागाकडे वर्ग झालेले आहेत का ? तसेच कॉन्टीजन्सी फंडामध्ये येणा-या रकमेचा वापर कशा प्रकारे करणार आहात आणि कधी करणार आहात ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, गेल्या वर्षीचे 100 कोटी रुपये गोळा झालेले आहेत ही वस्तुस्थिती खरी आहे आणि यावर्षीचे 100 कोटी रुपये गोळा होतील ही वस्तुस्थितीही खरी आहे. पण शासनाने जेव्हा 11 हजार कोटीचा प्लॅन मांडला होता, तेव्हा या कामाला प्राधान्यक्रम देता आला नाही. म्हणून आता या कामासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे आणि रिॲप्रोप्रिएशनव्दारे डिसेंबरमधील अधिवेशनात उर्वरित रकमेची शासन तरतूद करणार आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे की, या पैशाचा कशासाठी उपयोग करणार आहात ? जेव्हा आपण हे बिल पास केले, तेव्हाच या पैशाचा उपयोग कशासाठी करावयाचा आहे याची संपूर्ण माहिती दिली होती. यात प्रामुख्याने महाराष्ट्रात अपारंपारिक ऊर्जेचा विकास करण्यासाठी आवश्यक असणारी कामे करणार . ज्याठिकाणी अपारंपारिक ऊर्जा निर्माण होते, अशा ठिकाणी ही ऊर्जा एम.एस.ई.बी.च्या मेन ग्रीडमध्ये आणण्यासाठी ॲरेंजमेंट करणे, त्याठिकाणी पोच रस्ते तयार करणे, महाराष्ट्रात विकास कामासाठी पारंपारिक ऊर्जेला असलेला वाव लक्षात घेता त्याचे रिसर्च प्रकल्प राबविणे, अशा विविध कामांसाठी याचा उपयोग करणार आहोत.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, शासनाकडे निधी उपलब्ध आहे. मराठवाडयातील उद्योजकांनी कापसाच्या पराटयापासून वीज निर्मितीचा प्रकल्प यशस्वीरित्या उभारला आहे. तरी 10 मे.वॅ.वीज निर्मितीसाठी 25 कोटीचा प्रकल्प व्हाएबल होण्यासाठी इंटरेस्ट सबसिडी शासनाने दिली तर शेतक-यांना वीज मिळेल आणि विजेची निर्मिती देखील होईल. तर असे प्रयत्न करणार आहात का ?

. . . .यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पराटयाच्या प्रकल्पाच्या बाबतीत उल्लेख केला. खरेतर महाऊर्जे मार्फत अशा प्रकल्पांना मान्यता देऊन, त्यांना चालना देण्याचे काम अगोदरच केलेले आहे. यासाठी व्याजाची सबसिडी देता येईल का ? अशी भावना सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. तर याचा गांभीर्याने विचार करुन त्याची अंमलबजावणी केली जाईल.

-----

. . . .यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: हडको सभासद संघटनेने त्यांच्या गाळे/प्लॉटच्या
प्रलंबित मागण्यांसदर्भात गृहनिर्माण व क्षेत्रविकास
प्राधिकरण मंडळ,पुणे यांच्या कार्यालयासमोर केलेले
ठिय्या आंदोलन

मु.शी.: हडको सभासद संघटनेने त्यांच्या गाळे/प्लॉटच्या
प्रलंबित मागण्यांसदर्भात गृहनिर्माण व क्षेत्रविकास
प्राधिकरण मंडळ,पुणे यांच्या कार्यालयासमोर केलेले
ठिय्या आंदोलन याबाबत प्रा.शरद पाटील,श्री.जयंत प्र.
पाटील वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील, श्री.जयंत प्र.पाटील यांनी "हडको सभासद संघटनेने त्यांच्या गाळे/प्लॉटच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण मंडळ,पुणे यांच्या कार्यालयासमोर केलेले ठिय्या आदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, हडकोच्या सभासद संघटनेने गाळे त्यांच्या नावावर करावेत, त्या गाळयांची रक्कम निश्चित करावी, व्याजाची आणि दंडाची आकारणी करु नये अशा विविध मागण्यांसाठी सांगली येथील हडकोच्या विभागीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरु केले आहे. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी निवेदनात म्हटले आहे की, 80 गाळेधारकांनी गाळयांची पूर्ण रक्कम भरली असून उर्वरित 152 गाळेधारक थकबाकीदार आहेत . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, तसेच ज्या गाळेधारकांनी मालकी हक्काची पूर्ण रक्कम भरलेली आहे, त्यांच्या नावावर गाळे केले जातील असे हडकोचे धोरण आहे असेही यामध्ये म्हटलेले आहे. 2002 पर्यंत ज्या 80 गाळेधारकांनी पूर्ण रक्कम भरली आहे, त्यांच्या नावावर अद्याप हे गाळे का करण्यात आलेले नाहीत ? असा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, जे 152 गाळेधारक थकबाकीदार आहेत, त्या गाळेधारकांनी हडकोला लेखी पत्र पाठवून सांगितले आहे की, त्यांनी निश्चित किती रक्कम भरावयाची आहे, ते कळविण्यात यावे. ती रक्कम भरण्यास हे गाळेधारक तयार आहेत. पण असे कळवूनही त्यांनी निश्चित किती रक्कम भरावयाची आहे हे हडकोने का कळविलेले नाही ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी सौ.रणदिवे... 12:45

श्री.दयानंद मस्के : एकूण गाळ्यांची संख्या 232 आहे. एकूण थकबाकीदार 152 आहेत. 80 लोकांनी गाळ्यांची रक्कम दिलेली आहे. सुरुवातीला 9,600 इतकी रक्कम होती, आता अंतिम रक्कम 13471 एवढी करण्यात आलेली आहे. हा प्रश्न थकबाकीतून निर्माण झालेला आहे.

प्रा.शरद पाटील : 80 गाळेधारकांनी संपूर्ण रक्कम भरलेली आहे असे असतांना त्यांच्या नावावर अद्याप गाळे का करण्यात आलेली नाहीत ?

श्री.दयानंद मस्के : मुळामध्ये थकबाकीतून प्रश्न निर्माण झालेला आहे.

**सभापती** : ज्या लोकांनी संपूर्ण गाळ्याची रक्कम भरलेली आहे, अशा 80 लोकांच्या नावांवर गाळे का करण्यात आलेले नाहीत ? असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्याचे उत्तर द्यावे.

श्री.दयानंद मस्के : सर्व गाळ्यांची रक्कम पूर्ण अदा झाल्यानंतर त्या दृष्टीने विचार करण्यात येईल.

प्रा.शरद पाटील : निवेदनाच्या पान क्रमांक दोन वरील दुसऱ्या परिच्छामध्ये म्हटलेले आहे की, "गाळ्यांची अंतिम विक्री किंमत ह्या निश्चित करण्यात आलेल्या असून त्या गाळेधारकांना कळविण्यात आलेल्या आहेत व तसेच थकबाकी पूर्ण भरलेल्या गाळेधारक/भूखंडधारक यांच्या गाळे/भूखंड अभिहस्तांतरणाची कार्यवाही सुरु आहे". आता मंत्री महोदय तोंडी उत्तर देत आहेत की, सगळ्या गाळेधारकांनी पैसे भरल्याशिवाय त्यांच्या नावावर गाळे करण्यात येणार नाहीत. ही विसंगती आहे. लेखी दिलेले उत्तर खरे समजायचे की तोंडी दिलेले उत्तर खरे समजायचे ?

श्री.दयानंद मस्के : मूळ प्रश्न थकबाकीतून निर्माण झालेला असल्यामुळे....

प्रा.शरद पाटील : 80 गाळेधारकांनी पैसे भरलेले आहेत, त्यांच्या नावावर गाळे करुन देणार आहात काय ? यामध्ये अडचण काय आहे ?

श्री.दयानंद मस्के : ज्यांनी पैसे भरलेले आहेत त्यांच्या नावे गाळे करण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : 1983 साली लाभार्थींना गाळे वितरित करण्यात आलेले आहेत. 1983 सालच्या किंमतीप्रमाणे हे पैसे भरुन घेणार आहात की 2001 सालच्या किंमतीप्रमाणे पैसे घेणार आहात ?

श्री.दयानंद मस्के : अंतिम रक्कम 13,471 भरण्याबाबत कळविलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : 1983 साली गाळेधारकांना गाळे दिले, त्यावेळच्या किंमत शासन ठरविणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दयानंद मस्के : 13,471 इतकी अंतिम किंमत कळविलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, गाळेधारकांना 1983 साली गाळे वितरित केले. 1983 सालच्या किंमतीप्रमाणे त्यांच्याकडून पैसे भरुन घेणार आहात की 2001सालच्या किंमतीप्रमाणे पैसे भरुन घेणार आहात ?

श्री.दयानंद मस्के : आता अंतिम रक्कम 13,471 ठरविलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : यातून एक प्रश्न निर्माण झालेला आहे की, 1983 साली गाळे वितरित केले. आज 20 वर्षे झालेली आहेत. 1983 सालचे थकबाकीदार आहेत. थकबाकीचे पैसे त्यांनी भरले नाहीत तर त्यांच्याकडून गाळा खाली करुन घेणार आहात काय ?

श्री.दयानंद मस्के : ते रहात असलेला गाळा खाली करुन घेण्याचा प्रश्न नाही.

प्रा.शरद पाटील : दोन वेळा गाळयांचे वाटप करण्यात आलेले आहे. 1983 साली आणि 1986 साली असे वाटप करण्यात आले. 1983 साली त्या गाळयांची किंमत 9 हजार होती ती 1986 ला वाटप झाले त्यावेळेस किंमत 13,471 इतकी करण्यात आली. एवढी तफावत का ठेवण्यात आली ? दुसरा प्रश्न असा की, थकबाकीदारांना नोटिसा देऊन त्यांच्यावर जप्ती आणलेली आहे त्यासाठी आंदोलन चालू आहे, तर ही नोटीस शासन मागे घेणार आहे काय ?

श्री.दयानंद मस्के : सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्याबरोबर बैठक घेण्यात येईल. तोपर्यन्त जप्तीला स्थगिती देण्यात येईल.

--

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**पृ.शी.** : मुंबईतील सायन रुग्णालयातईल हृदयविकार विभागात काम करणाऱ्या डॉक्टरांकडून कायमस्वरुपी पेसमेकर बसविण्यास झालेल्या विलंबामुळे तीन रुग्णांचा झालेला मृत्यू.

**मु.शी.** :मुंबईतील सायन रुग्णालयातील हृदयविकार विभागात काम करणाऱ्या डॉक्टरांकडून कायमस्वरुपी पेसमेकर बसविण्यास झालेल्या विलंबामुळे तीन रुग्णांचा झालेला मृत्यू, याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे,.वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे वि.प.स. यांनी :मुंबईतील सायन रुग्णालयातील हृदयविकार विभागात काम करणाऱ्या डॉक्टरांकडून कायमस्वरुपी पेसमेकर बसविण्यास झालेल्या विलंबामुळे तीन रुग्णांचा झालेला मृत्यू, या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात....

श्री.मधुकर चव्हाण :माननीय मंत्रिमहोदयांच्या मी लक्षात आणून देतो की, ही गंभीर गोष्ट आहे.मूळामध्ये ही लक्षवेधी किंवा तारांकित प्रश्न एक दीड महिन्यापूर्वी विचारला होता. वर्तमानपत्रात गेले चार महिने हे प्रकरण गाजत आहे. मी प्रश्न विचारला आहे की, गेले सहा महिने डीन विरोधात तेथील बाकीचे सगळे डॉक्टर्स आहेत. त्यांच्या लढाईमध्ये त्या हॉस्पिटलचा सगळा कारभार अतिशय हीन दर्जाचा आणि रुग्णांना त्रास होणारा झाला आहे. माननीय मंत्रिमहोदयांच्या मी असे लक्षात आणून देतो की, 6 महिने त्याला कायमस्वरुपी पेसमेकर न बसविल्यामुळे मृत्यू आला का? शासनाने संवेदनाहीन उत्तर दिलेले आहे. दि .22 फेब्रुवारी रोजी त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यानंतर तत्परतेने 22 फेब्रुवारी रोजी त्यांना तात्पुरता पेसमेकर बसविण्यात आला. दि.23-8-2004 रोजी हा रुग्ण घरी गेला. हा रुग्ण त्या रुग्णालयात सहा महिने थांबला. शासनाने पुढे निर्दयपणे असे म्हटले आहे की, "अगेन्स्ट मेडिकल ॲडव्हाईस" हा रुग्ण पळून जाण्याबाबत सायन पोलीस ठाणे येथे त्यांची तक्रार केली. त्यानंतर तो रुग्ण घरी मृत्यू पावला. सभापती महोदय, तो रुग्ण या रुग्णालयात सहा महिने होता. या सहा महिन्याच्या आत त्या संबंधित डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार का  केले नाहीत?. मी माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, के.ई.एम., सायन आणि नायर रुग्णालयात गरीब माणसे जातात. ही माणसे लिलावती वगैरे या रुग्णालयात  जाऊ शकत नाहीत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, सहा महिन्यात त्या रुग्णाला कायम स्वरुपी पेसमेकर कां बसविला नाही? नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर, त्या संबंधातील कारवाई करण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्त यांनी 15 जुलै रोजी दिलेल्या निर्देशानुसार चौकशीचे आदेश दिले आहेत. हा पेशंट गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात मृत्यू पावलेला आहे. एक वर्षभर त्याचे नातेवाईक तक्रारी करीत होते. आपले आयुक्त सहा दिवसापूर्वी त्या तक्रारीची दखल घेऊन जातात. नियम 93 ची सूचना दिल्यानंतर जागे होतात, हा काय कारभार चालला आहे ? माझा प्रश्न असा आहे की, सहा महिने या प्रकरणी ज्या डॉक्टरने हलगर्जीपणा केला, त्यांना चौकशी होई पर्यंत, आज सस्पेंड करणार काय? या ठिकाणी ही चौकशी करण्यासाठी  एक वर्ष एवढा कालावधी लागण्याचे कारण काय?

डॉ. विमल मुंदडा :सभापती महोदय, सदरहू पेशंटला तात्पुरत्या स्वरुपाचा पेसमेकर बसविलेला होता. टेम्परररी पेसमेकर बसविल्यानंतर ॲक्युट कॉर्डीएल इनफेक्शन झालेले होते.

..2..

श्रीमती विमल मुंदडा...

त्या रुग्णाला नंतर परमनन्ट पेसमेकर बसवावयाचा होता. पण परमनन्ट पेसमेकर बसविण्याच्यावेळी तो ॲबस्कॉन्ड झाला. जो सहा महिन्याचा विलंबाचा कालावधी होता, त्याबाबत अहवाल सादर झालेला आहे. संबंधित असोसिएट प्रोफेसरवर विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. विभागीय चौकशीमध्ये जे काही निष्पन्न होईल त्यानंतर ॲक्शन घेण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : निवेदनामध्ये दिलेले आहे की, अहवाल प्राप्त झालेला आहे. तो अहवाल काय आलेला आहे?

(काही सदस्य एकाच वेळी उभे बोलण्यासाठी उभे राहतात)

**सभापती** :सगळे सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी एकदम उभे राहिले तर यदा कदाचित संभाव्य येणारे उत्तर थांबण्याची शक्यता आहे. एकेका सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, 18 जुलैला पालिका मुख्यालयात अहवाल आला आहे. आम्ही प्रश्न विचारल्यानंतर कारवाई सुरु झाली. आम्ही विचारल्यानंतर सगळी धावपळ चालू झाली. आम्ही विचारल्यावर चोकशी चालू झाली. मग आम्हाला अहवाल नको काय? तो अहवाल काय आहे ते आम्हाला सांगावा?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, त्या असोसिएट प्रोफेसराविरुध्द त्या अहवालानुसारच विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. त्यांचा निष्काळजीपणा झालेला आहे हे अहवालात निष्पन्न झालेले आहे. हा प्राथमिक अहवाल आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले की, त्या असोसिएट प्रोफेसरने निष्काळजीपणा केला. प्रथम दर्शनी, त्यांनी निष्काळजीपणा केला असे निदर्शनास आले असेल तर त्याला तुम्ही सस्पेंड करणार आहात की नाही?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, त्यांना निलंबित करण्यात येईल.

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>निवेदन क्रमांक 10 बाबत</u>**.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, या नियम 93 अन्वयेच्या 10 व्या निवेदनामध्ये वेगवेगळया घटनांच्या बाबतीतील तीन निवेदन एकत्रितपणे दिलेली आहेत.

**सभापती** :यासंबंधात सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडे असलेली कागदपत्रे मला द्यावीत. मी ती पाहतो.

-----

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS// MAP/ प्रथम कु. थोरात 12:55 वा.

**पृ. शी.** : लोटे परशुराम (ता.खेड) येथील घरडा केमिकल्स, वाळूंज (औरंगाबद) येथील पश्चिम केमिकल आणि दौंड (जि.पुणे) येथील पॉली पेट्रोकेल या कंपन्यांमध्ये झालेल्या वायूगळती, स्फोट इत्यादी घटनांमुळे कामगारांचे झालेले मृत्यू व झालेले इतर नुकसान.

**मु. शी.** : लोटे परशुराम (ता.खेड) येथील घरडा केमिकल्स, वाळूंज (औरंगाबाद) येथील पश्चिम केमिकल आणि दौंड (जि.पुणे) येथील पॉली पेट्रोकेल या कंपन्यांमध्ये वायूगळती, स्फोट इत्यादी झालेल्या घटनांमुळे कामगारांचे झालेले मृत्यू व झालेले इतर नुकसान याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, श्रीकांत जोशी, प्रा. शरद पाटील, सर्वश्री अनंत तरे, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, डॉ. अशोक मोडक सर्वश्री रामनाथ मोते, नितीन गडकरी, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विलास अवचट, सुरेश जेथलिया व डॉ. नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, श्रीकांत जोशी, प्रा. शरद पाटील, सर्वश्री अनंत तरे, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, डॉ. अशोक मोडक, सर्वश्री रामनाथ मोते, नितीन गडकरी, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विलास अवचट, सुरेश जेथलिया व डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "लोटे परशुराम (ता.खेड) येथील घरडा केमिकल्स, वाळूंज (औरंगाबद) येथील पश्चिम केमिकल आणि दौंड (जि.पुणे) येथील पॉली पेट्रोकेल या कंपन्यांमध्ये वायूगळती, स्फोट इत्यादी झालेल्या घटनांमुळे कामगारांचे झालेले मृत्यू व झालेले इतर नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ SBT/ MAP

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या कारखान्यामध्ये जी गळती झाली...

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, यामध्ये तीन ठिकाणच्या घटनांच्या बाबतीत एकत्रित निवेदन आलेले आहे.

**सभापती** : मी निवेदन क्रमांक 10 पुकारलेले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये तीन निवेदने एकत्रित दिलेली आहेत. आपण आम्हाला थोडा जास्त वेळ द्यावा.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, यामधील तीनही विषय वेगवेगळे आहेत. आम्हाला प्रश्न विचारण्यास थोडा जास्त वेळ द्यावा.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे....

**सभापती** : मी याबाबत चौकशी करतो. सन्माननीय सदस्य म्हणत आहेत तशी परिस्थिती असेल तर त्याबाबत मी पाहतो. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या कारखान्यामध्ये ज्यावेळी गळती झाली ती गळती होण्याच्या आधी फॅक्टरी इन्स्पेक्टरने त्या ठिकाणी केव्हा भेट दिली होती ? संबंधित कारखान्याने कामगारांचा विमा उतरविला होता काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, या कारखान्याने कामगारांचा विमा उरतविला होता. फॅक्टरी इन्स्पेक्टरने कधी व्हिजीट केली होती त्याची तारीख पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला माननीय मंत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे की, घरडा केमिकल्समध्ये दरवर्षी अशा घटना होत आहेत. दरवर्षी त्याबाबत चौकशी होते. दरवर्षी एक दोन कामगार मृत पावतात. गेली चार वर्षे सलग या घटना होत आहेत. त्यांच्यावर काय कारवाई केली ? गेल्यावेळी जी घटना घडली होती त्यासंबंधी काय कारवाई केली ? त्या कंपनीमध्ये दरवर्षी कामगार मृत पावतात आणि शासनाने काही करावयाचे नाही हे बरोबर नाही.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, प्रत्येक वर्षी घडलेल्या अपघाताची चौकशी स्वतंत्ररित्या केली जाते आणि तशी ती केलेली आहे. त्यासंदर्भात जो अहवाल प्राप्त होतो त्या अनुषंगाने कारवाई केली जाते.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, संभाजीनगर या ठिकाणी जो स्फोट झाला...

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ SBT/ MAP

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. निवेदनामध्ये तीन ठिकाणच्या घटनांचा समावेश केलेला आहे. घरडा कमिकल्सच्या संदर्भात जो प्रश्न आहे तो सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी विचारलेला आहे. त्यासंदर्भात त्यांचे काही प्रश्न असतील तर ते आधी होऊ द्यावेत. औरंगाबादची जी घटना आहे तो प्रश्न सन्माननीय सदस्य सर्वश्री विलास अवचट, श्रीकांत जोशी यांनी विचारलेला आहे, दौंड, जिल्हा पुणे येथील जो प्रश्न आहे तो इतर सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. त्यामुळे आपण प्रत्येक घटनेच्या संदर्भात टप्प्याटप्प्याने प्रश्न विचारु द्यावेत.

**सभापती** : हा विषय माझ्या लक्षात आलेला आहे. यामध्ये तीन निवेदने एकत्रित आलेली आहेत. पहिले निवेदन घरडा कमिकल्सच्या संदर्भातील आहे. दुसरे निवेदन वाळूंज येथील पश्चिम केमिकल्सच्या संदर्भात आहे आणि तिसरे निवेदन पॉलि पेट्रोकेल, दौंड, जि.पुणे यांच्या संदर्भातील आहे. त्या पध्दतीने मी सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्यास परवानगी देतो.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, आपण माननीय मंत्रिमहोंदयांनी दिलेले निवेदन वाचले तर पान क्रमांक 2 वर घरडा केमिकल्सकडून झालेल्या प्रमादांचा उल्लेख केलेला आहे. तो उल्लेख पूर्णपणे चुकीचा आहे असे मी म्हणणार नाही पण तो उल्लेख अव्याप्त आहे. मी आपल्याला एक कात्रण वाचून दाखवितो. एमपीसीबीच्या श्री. सोनटक्के नावाच्या अधिकाऱ्यांनी जो आरोप केला आहे तो मी वाचून दाखवितो. घरडा कमिकल्सचे जे सांडपाणी बाहेर पडते त्यावर आवश्यक प्रक्रिया करण्याची गरज असताना ती केली जात नाही असा आरोप त्यांनी केलेला आहे. कॉमन एफ्ल्युएंट प्लँटसंबंधी श्री. सोनटक्के यांनी जो आरोप केलेला आहे तो भयंकर आहे. आपण त्या ठिकाणी चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामध्ये यासंदर्भात मी आपल्याला जे वाचून दाखविणार आहे त्याचा समावेश करणार काय ? यामध्ये असे म्हटले आहे की, "During a survey conducted in April, 77 units were found to be discharging effluents to the C.E.T.P. without preliminary treatment while 10 units found to have not disposed of hazardous waste beyond the permitted period, seven of them for beyond a year." मघाशी सन्माननीय सदस्य श्री. तावडे यांनी जे सांगितले ते 100 टक्के खरे आहे. घरडा केमिकल्सने त्या ठिकाणी धुमाकूळ घातलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

NTK/ MHM/ MAP/ KGS/ SBT/ श्री.बरवडनंतर 13:00

डॉ.अशोक मोडक....

अंजनवेल खाडीच्या किना-यावर मासे मरण पावले होते त्याबाबत शासनाने उत्तर द्यावे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, अगोदरचा प्रश्न कामगार खात्याचा असताना सुध्दा मा.सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी पर्यावरणाचा प्रश्न विचारला आहे त्याचे मी स्वागत करतो. घरडा केमिकल्सबद्दल त्यांनी माहिती दिली त्याबाबत माझ्याकडेही तक्रार आलेली आहे. 15-20 दिवसापूर्वी बातमी आली होती की, पनवेलखाडीमध्ये हजारो मासे मरण पावले आहेत. त्यासंबंधी मा.सदस्य श्री.अनंत तरे यांनी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. त्या केमिकल्सच्या व्यवस्थापनाने संमतीने किंवा विनासंमतीने त्याची अजून चौकशी झालेली नाही परंतु 3 ट्रक भरुन त्या ट्रकमध्ये ड्रम भरले आणि ते तळोजा येथे हजार्डस केमिकल कारखान्यात प्रक्रिया करणारी जी यंत्रणा आहे त्यांच्याकडे पाठविण्याचा भास निर्माण केला आणि त्याच्यातून 1 ट्रक मधून 15 ड्रम त्या नाल्यामध्ये सोडले आणि त्याचा परिणाम म्हणून त्या खाडीमध्ये केमिकल आल्यामुळे मासे मेले अशी माझीही धारणा झालेली आहे. याबाबत उच्च पातळीवरुन जर त्याठिकाणी अशाप्रकारची घटना घडली असेल तर अशा घटना घडविणा-यांवर जास्तीत जास्त कठोर कारवाई करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

श्री.अनंत तरे : या निवेदनाच्या पान क्र.3 वर असे म्हटले आहे की, "या घटनेची पोलीस खात्याकडून सविस्तर चौकशी चालू आहे व कारखान्याच्या संबंधित व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी त्यांच्याकडून कारवाई चालू आहे" हा पोलीस खात्याचा प्रश्न नाही. हा स्फोट कसा घडला, याला कोण कारणीभूत आहे ? त्या कंपनीचा प्रमुख व्यवस्थापक आहे त्यांच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडला आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल केला पाहिजे होता. आजपर्यंत कोणावरही गुन्हा दाखल केलेला नाही, कोणावर गुन्हा दाखल करावयाचा हे सुध्दा त्यांना कळलेले नाही. त्या कंपनीच्या प्रमुख व्यक्तीवर गुन्हा दाखल करणार का ?

श्री.गणेश नाईक : कंपनी अधिनियम अंतर्गत कारवाई करण्याच्या अनुषंगाने चौकशी चालू आहे. याप्रकरणी फौजदारी खटला तर भरला जाईलच. परंतु त्या व्यतिरिक्त औद्योगिक विभागाच्या अंतर्गत असलेल्या नियमानुसार त्यांच्यावर केस दाखल केली जाईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ MAP/ KGS/ SBT/

श्री.विनोद तावडे : निवेदनाच्या पान क्र.3 वर असे म्हटले आहे की, या घटनेमुळे या परिसरामध्ये संतापाचे वातावरण पसरलेले नाही. प्रदूषण मंडळामध्ये जसे मोजमाप असते तसे संतापाचे मोजमाप आहे का ? इतके बेजबाबदार व असंवेदनशीलपणे उत्तर दिले जाते, निदान हे उत्तर तरी या निवेदनातून काढून टाकावे. या घटनेमध्ये दोन व्यक्ती मरण पावल्या असताना लोक संताप व्यक्त करणार नाहीत ?

श्री.गणेश नाईक : हा अतिशय हजार्डस कारखाना आहे. सर्वच बाबतीत जबाबदारी आणि दक्षता पाळण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत असे असताना हा अपघात झालेला आहे. ही जाणुनबुजून केलेली घटना नाही. अपघातानंतर निश्चितपणे चिंतेचे वातावरण निर्माण होते. परंतु त्याठिकाणी संतापाचे वातावरण निर्माण होईल अशी परिस्थिती नाही. जाणुनबुजून केलेली ही घटना नाही. परंतु ही दु:खद घटना आहे हे मी नमूद करु इच्छितो.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, पश्चिम केमिकल्स प्रा.लि.बाबत मला प्रश्न विचारावयाचा आहे. संभाजीनगरमधील वाळूजमध्ये गेल्या तीन महिन्यामध्ये सहा स्फोट झालेले आहेत. या एमआयडीसीने जे भूखंड दिलेले आहेत त्यामध्ये जास्तीत जास्त केमिकल्स कारखाने आहेत. आज नियम 93 ची निवेदने पाहिली तर यामधील जास्तीत जास्त निवेदने केमिकलच्या स्फोटासंबंधीची आहेत. म्हणून यापुढील काळासाठी खबरदारीची उपाययोजना करणे आवश्यक आहे. तेथे जे भूखंड दिलेले आहेत ते केमिकलसाठी दिलेले आहेत व इतर व्यवसायासाठीही दिलेले आहेत. म्हणून शासना यासंबंधी काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ? तसेच ज्या रिॲक्टवर अपघात झाला तो नवीन होता, 48 तासापूर्वी त्याचे उद्‌घाटन केले होते. त्या रिॲक्टरला कारखान्यात बसविल्यानंतर तेथील व्यवस्थापनाने त्याची पाहणी केली होती काय, त्यात त्रुटी होत्या काय याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

श्री.गणेश नाईक : त्या एमआयडीसीकडे अशाप्रकारचे केमिकल्स झोन आहेत. परंतु केमिकल हाताळण्यासाठी ते कशाप्रकारे हाताळावे यासाठी प्रशिक्षण दिले जाते. पश्चिम केमिकल्समध्ये ज्याने रिॲक्टर बनविला होता तो अन्य एका कस्टमरला पाहणीसाठी घेऊन आलेला असताना तोही जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झालेला आहे.

नंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे 13:05

(श्री. गणेश नाईक पुढे सुरु...)

हा रिॲक्टर बनविणारी व्यक्ती आणि अन्य व्यक्ती जर दूर असत्या तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करता आली असती. सदर रिॲक्टरला वापरलेले नटबोल्ट खालच्या दर्जाचे असल्यामुळे हा अपघात घडला असा निष्कर्ष आमच्या खात्याने काढलेला असून त्यानुषंगाने तपास चालू आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : निष्काळजीपणा ह्या एकाच कारणामुळे अशा प्रकारे कारखान्यांमध्ये अपघात होतात. सेफ्टी इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरी नावाची यंत्रणा आहे. असे अपघात होऊ नयेत म्हणून ही यंत्रणा कार्यरत असणे आवश्यक आहे. ज्वालाग्राही रसायन जमिनीवर पडून अपघात घडला असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. ही जी यंत्रणा बसविलेली आहे ती योग्य प्रकारे बसविलेली आहे की नाही हे पाहण्याचे सेफ्टी यंत्रणेचे काम आहे. 2400 लिटर टोलवीन ट्रायलसाठी वापरण्यात आले. ट्रायलसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात हे रसायन वापरण्याची आवश्यकता होती काय ? अधिक प्रमाणात रसायन वापरल्यामुळे हा अपघात घडला असेल तर त्यास कोण जबाबदार आहे ? तसेच सेफ्टी यंत्रणेची याबाबतीतील भूमिका काय आहे ?

श्री. गणेश नाईक : याठिकाणी ट्रायल बेसिसवर प्रोडक्शन सुरु झाले होते. म्हणून 2400 लिटर टोलवीन वापरले होते. हे रसायन जमिनीवर सांडले आणि तेथे स्पार्क झाला आणि त्यामुळे स्फोट झाला.

श्री. मधुकर सरपोतदार : फॅक्टरीचा माणूस त्याठिकाणी कशासाठी होता ?

श्री. गणेश नाईक : तो माणूस दुस-या एका माणसाला ती यंत्रणा दाखविण्यासाठी घेऊन आलेला होता. औद्योगिक सुरक्षा याबाबतीत यंत्रणा सक्षमपणे काम करीत आहे. त्यानुसार जानेवारी 2004मध्ये 33 फॅक्टरीजविरुध्द 39 खटले दाखल करण्यात आले. फेब्रुवारीमध्ये 24 फॅक्टरीजविरुध्द 31, मार्चमध्ये 32 फॅक्टरीजविरुध्द 46, एप्रिल मध्ये 19 फॅक्टरीजविरुध्द 27 अशा प्रकारे 335 फॅक्टरीजविरुध्द 440 खटले दाखल केलेले आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : खटले किती दाखल केले यापेक्षा अपघात किती झाले हा महत्वाचा प्रश्न आहे. शेवटी आपली यंत्रणा प्रभावीपणे काम करीत असेल तर मग असे अपघात कशामुळे होतात असा प्रश्न निर्माण होतो. तर त्या दृष्टीने शासन काय सांगू शकेल ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : आमच्या अधिका-यांनी फॅक्टरींना भेट दिल्यानंतर ज्यांनी ज्यांनी सुरक्षिततेचे उपाय योजले नाहीत असे आढळून आले अशा 335 फॅक्टरींवर 440 खटले दाखल केलेले आहेत. म्हणजे आमची यंत्रणा सक्षमपणे काम करते हे सिध्द होते.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी या कारखान्याला भेट दिलेली आहे. त्याठिकाणी सुरक्षिततेचे कोणतेही नियम कोणत्याही यंत्रणेने पाळलेले नाहीत. केमिकल ॲक्सीडेण्टस्, इमर्जन्सी प्लॅनिंग प्रिपेअरड्नेस ॲण्ड रिस्पॉन्स रुल्स 1996 यामध्ये स्टेट क्रायसिस ग्रुपची स्थापना करणे, डिस्ट्रीक्ट क्रायसिस ग्रुपची स्थापना करणे, लोकल क्रायसिस ग्रुपची स्थापना करणे, ऑक्साईड एमर्जन्सी स्थापन करणे तसेच कॉम्पीटण्ट ॲथॉरिटीची नेमणूक करणे इत्यादी गोष्टी असणे आवश्यक असल्याचे म्हटलेले आहे. ह्या कारखान्यामध्ये टोलवीन सारख्या ज्वालाग्राही पदार्थाला रिॲक्टरमध्ये भरण्यास पारवानगी देताना ह्या सुरक्षेच्या सर्व गोष्टी त्या ठिकाणी आहेत की नाहीत हे पाहिले होते काय ? नसेल तर या हलगर्जीपणाबद्दल आपल्या विभागाच्या अधिका-यांवर आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री. गणेश नाईक :सर्व नियमांचे पालन केल्यानंतर अंतिम परवानगी दिली जाते.

...नंतर श्री.गिते...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 13:10

श्री.गणेश नाईक...

हा अपघात आहे. त्या ठिकाणी अपघात घडलेला आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे मला उत्तर मिळालेले नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांना सांगू इच्छितो की, आपल्या शंकाचे निरसन होणार नाही.

श्री. श्रीकांत जोशी : या ठिकाणी कॉम्पीटंट ॲथॉरिटी कोण आहे याची तरी माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी.

**सभापती** : तुम्हाला जी काही माहिती विचारावयाची आहे ती माझ्याकडे द्या ती माहिती मी माननीय मंत्र्यांकडे सादर करतो. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांना प्रश्न विचारण्यास परवानगी देत आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय,उत्तराच्या पृष्ठ क्रमांक 5 वर असे म्हटले आहे की, उपचार चालू असताना सदर कामगार 13.7.2005 रोजी मरण पावला. हा कामगार क्रुड तेलाची पातळी मोजण्यासाठी टाकीवर गेला होता काय ? त्या कामगाराने तेथे आग पाहून घाबरुन जाऊन त्याने टाकीवरुन उडी मारली. त्यानंतर या कामगाराला बारामती येथे भरती करण्यात आले. त्यानंतर हा कामगार दगावला. आपण असे म्हटले आहे की, सदर जागेस कारखने अधिनियम लागू होत नाही. कुरकुंभ येथील कारखान्यांना हा अधिनियम लागू होत नाही की बारामती येथे अधिनियम लागू होत नाही याचा खुलासा करावा. जर त्या ठिकाणी अधिनियम लागू होत नसतील आपण हा अधिनियम त्या ठिकाणी लावणार काय ? दौड येथील अग्निशमन दलाने तेथे जाऊन आग विझविली. या ठिकाणी रासायनिक आग लागली असेल तर दौंड येथील अग्निशम दलाकडे रासायनिक अग्निशमन यंत्रणा कार्यरत आहे काय ? आपण शेवटच्या परिच्छेदात चांगले उत्तर दिलेले आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली अनर्थ निवारण योजनेचे आराखडे तयार करण्यात आले आहेत. यासंदर्भात माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, आराखडे केले आहेत म्हणजे नेमके काय केले आहे ? या आराखडयाच्या बाबतीत विधान परिषदेचे सदस्यांना त्यांच्या त्यांच्या जिल्हयातील माहिती असणे आणि त्यादृष्टीकोनातून तेथील जनतेला सहभागी करुन घेणे यादृष्टीने शासन काही पाऊले उचलणार आहे काय ?

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले आहेत त्याबाबतीत सांगू इच्छितो की, खरे म्हणजे निवेदन वितरीत केल्यानंतर मीच काही शंका उपस्थित केल्या होत्या. हा कारखाना दोन वर्षापूर्वी बंद झालेला आहे. दोन वर्षापूर्वी बंद झालेल्या कारखान्याच्या टाकीतील क्रुड ऑईलची मोजणी करण्याकरिता कामगारास जाण्याची गरज काय होती अशा प्रकारचा मी प्रश्न विचारलेला आहे. माझा या बाबतीत असा संशय आहे की, हा कारखाना जिल्हाधिकारी यांनी बंद केलेला आहे. मिळावट करण्याच्या नावाखाली या कारखान्यावर दोन-चार केसेस दाखल झाल्या असाव्यात असा माझा अंदाज आहे. बंद पडलेल्या कारखान्यातील माल मालकाला द्यावा अशा प्रकारची वरच्या कोर्टाची ऑर्डर घेऊन आले. तो माल तेथे घेण्यासाठी मालक तेथे गेला असावा. त्या कारखान्यात असलेल्या मालाबद्दल मालकाने विमा काढलेला असेल. विमा एजन्टने त्या बिचा-या कामगाराच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्याला आग लावण्यास सांगितले असावे. दोन वर्षे बंद असलेल्या कारखान्यास मागील काळात आग लागली नाही. ती आग त्याच दिवशी कशी काय लागली ही शंका माझ्या मनामध्ये शंका उपस्थित झालेली आहे. त्या अनुषंगाने तपास करण्याचे आदेश दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांच्या मनात जी शंका आहे त्या शंकेच्या अनुषंगाने कसून तपास करण्याचे आदेश दिलेले आहेत. याप्रकरणाच्या चौकशीचा अहवाल सादर करण्यास सांगितलेले आहे. यात जो कोणी दोषी असतील त्याचे विरुध्द कारवाई करण्याचे आदेश मी दिलेले आहेत.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, पेट्रोल,नाप्ता भेसळ करणारा हा कारखाना आहे. या कारखान्यावर सेल टॅक्सच्या लायबिलीटीज किती आहे ते बघा. आज वाडा,ठाणे येथे पासून ते धुळे, नंदुरबार पर्यन्त भेसळीचे कारखाने पसरलेले आहेत. या कारखान्याची किंमत 2 कोटी रुपये आहे. त्या कारखान्यावरील सेल टॅक्सच्या लायबिलीज वाढलेल्या आहेत त्यामुळे अशा प्रकारे बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तुम्हाला जो संशय आलेला आहे तो बरोबर आहे. या कारखान्याची सी.आय.डी.मार्फत चौकशी करा त्यात सर्व प्रश्नांची तुम्हाला उत्तरे मिळतील. यामध्ये सात प्रकारचे ऑईल्स आहेत. ते ऑईल आणतात नंतर डिझेलमध्ये त्याचे रुपांतर करतात. मला पी.एच.डी. मिळेल इतका या विषयाचा मी अभ्यास केलेला आहे...

यानंतर कानडे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 13:15

श्री. नितीन गडकरी..

ऑईल निरनिराळया नांवाने डिझेल आणि पेट्रोलमध्ये मिक्स केले जाते. नाफ्ता सुध्दा वेगवेगळया प्रकारने आणि वेगवेगळया ग्रेडमध्ये आणून तो पेट्रोल आणि डिझेलमध्ये मिक्स केला जातो. मागील सरकारमध्ये अन्न व नागरी पुरवठा खात्याचे राज्यमंत्री लाल दिव्याची गाडी घेऊन पेट्रोल पंपावर उभे रहात असत आणि सर्व काही सुरळित चालू असे. सगळया महाराष्ट्रात आजची तीच परिस्थिती आहे. माझी विनंती आहे की, या प्रकरणाची चौकशी सीआयडी मार्फत शासनाने करावी.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मा.ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी याठिकाणी जो मुद्दा मांडला आहे त्याच्याशी मी सहमत आहे. मला स्वत:ला संशय आल्यानंतर सखोल चौकशी करुन संबंधितांवर कडक कारवाई करण्याबाबत मी आदेश दिलेले आहेत.

**उपसभापती** : आज 93 च्या सूचनेअंतर्गत आज जवळजवळ 25-30 निवेदने आली आहेत. मला वाटते की, यातील 10-15 निवदने चर्चेला घ्यावीत. अन्यथा सभागृहाचे पुढील कामकाज चालविणे शक्य होणार नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अधिवेशन संपविण्याची घाई शासनाने कशाला केली ? कामकाज पूर्ण झाले पाहिजे.

**उपसभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये याबाबत निर्णय झाला आहे. मा.सदस्य अधिवेशन वाढविण्याबाबत आग्रह कशाला धरत आहेत ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी स्वत: आणि मा.सदस्य श्री. मधुकर सरपोतदार कामकाज सल्लागार समितीमध्ये आहोत. आम्ही दोधांनीही अधिवेशन गुंडाळयाबाबत विरोध केला. परंतु संकेत म्हणून आम्ही चूपचाप राहिलो. आम्ही अशी भावना व्यक्त केली की पुढील वेळेस अशा प्रकारे अधिवेशन गुंडाळण्याचा निर्णय घेतला तर आम्ही विरोध करु आणि डिसेंट नोट देऊ. एवढे महत्वाचे काम या अधिवेशनात असताना अधिवेशन गुंडाळण्यात आले. परंतु संकेत आणि सन्मान म्हणून आम्ही चूपचाप राहिलो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मध्यंतरी पीठासीन अधिका-यांची परिषद झाली होती आणि त्या परिषदेमध्ये वर्षातून किमान 100 दिवस अधिवेशन चालले पाहिजे अशा प्रकारचा ठराव झााला होता आणि निर्णय घेण्यात आला होता. आम्ही गेली अनेक वर्षे पाहतो आहोत की, अधिवेशन हे 2-3 आठवडयात गुंडाळले जाते. अधिवेशन लवकर संपवायचे अशी मानसिकता

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

घेऊनच सरकार काम करीत आहे. उद्याचा दिवस केवळ बिलासाठी ठेवलेला आहे. आम्ही एकाच बिलावर बोलणार आहोत बाकी बिलांचे काय होते ते नंतर पाहू. म्हणजे बिलावर बोलण्याचा आमचा अधिकार सुध्दा कुंठीत केला जात आहे. गेल्या 3-4 वर्षामध्ये एखाद्या बिलावर पूर्णपणे चर्चा झाली असे घडलेले नाही. चर्चारोध आणावयाचा आणि बिल मंजूर करावयाचे असे होत आहे. या राज्यातील जनतेच्या जीवन-मरणाचे जे प्रश्न आहेत ते सोडविण्यासाठी कायदे करण्याकरिता हे सभागृह आहे. कायदे करताना भविष्यात त्याचे कायम स्वरुपी काय परिणाम होणार आहेत याची चर्चा आम्हांला याठिकाणी करायला मिळत नाही. अशा प्रकारे अधिवेशन गुंडाळणे थांबविले पाहिजे आणि सदस्यांच्या हक्काचे संरक्षण झाले पाहिजे अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : एका निवेदनावर एका सदस्याला एकच प्रश्न विचारता येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अधिवेशन लांबविणे आवश्यक होते. एकाच दिवशी 50-50 सूचना आल्या तर अन्याय होईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम आजही उपस्थित नाहीत. पुण्याला काही घटना घडल्यामुळे ते दिल्लीला गेले आहेत. त्यामुळे आजची सहकार विभागावरील अल्पकालीन चर्चा होऊ शकणार नाही. सभागृहाचा आग्रह असेल तर सहकार मंत्री दिल्लीमध्ये कशाला गेले आहेत याची मी पूर्ण माहिती देईन. त्यामुळे आजचा या चर्चेवरील अडीच तासांचा वेळ मोकळा आहे. एकेका निवेदनावर 5-5 मिनिटांत प्रश्नोत्तरे होऊ द्या.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेन्द्र आव्हाड :सभापती महोदय, मी आपल्या मार्फत माननीय मत्रिमहोदयाना असे विचारु इच्छितो की, फॅक्टरी इन्सपेक्टर्सची पूर्वी यंत्रणा होती आता डिश नावाची यत्रणा आहे आणि डिश नावाच्या यंत्रणेत बदल करुन प्रायव्हेट पार्टीचा त्यामध्ये समावेश करु आणि डिश यंत्रणा मजबूत करु अशा प्रकारचे उत्तर या ठिकाणी देण्यात आले होते. बोईसर येथे झालेल्या एका कंपनीच्या अपघाच्या संदर्भात माजी मंत्री श्री.नबाब मलिक यांनी निवेदन करतांना तसे सागितले होते. आजच्या घडीला जेवढया फॅक्टरीज आहेत त्यांच्या तुलनेने सध्याच्या फॅक्टरी इन्सपेक्टरेटची यंत्रणा सक्षम आहे काय ? कारण फॅक्टरी इन्सपेक्टरेटमध्ये जेवढया जागा आहेत तेवढया जागा भरल्या गेल्या नाहीत असा माझा आरोप आहे. तेव्हा तशी परिस्थिती असेल तर यापुढे जर एखादा अपघात झाला तर त्यास कोण जबाबदार आहे आणि या रिक्त जागा भरण्यात येणार आहेत काय ?

श्री.गणेश नाईक : माननीय सदस्यांनी पुन्हा प्रश्न विचारावा

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

श्री.जितेन्द्र आव्हाड : बोईसर येथे झालेल्या एका अपघाताच्या संदर्भात निवेदन करत असतांना माजी मंत्री श्री.नबाब मलिक ..

श्री.दिवाकर रावते :सन्माननीय सदस्य कोणता प्रश्न विचारत आहेत ?.

श्री.जितेन्द्र आव्हाड :फॅक्टरी इन्सपेक्टरच्या संदर्भात मी प्रश्न विचारत आहे.सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना मी सांगतो की, त्यांनी दुस-या सदस्यांची गळचेपी करु नये.असे केल्यामुळे पक्षामध्ये विरोध वाढत जातो........

श्री.श्रीकात जोशी :मी जो प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर दिले नाही.पैसे घेतल्याशिवाय आपल्या विभागातील अधिकारी काम करीत नाही.

श्री मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री.जितेन्द्र आव्हाड यांनी संदर्भ देऊन प्रश्न विचारावा.

श्री.जितेन्द्र आव्हाड : त्या ठिकाणी फॅक्टरी इन्सपेक्टरेटमध्ये डिशची यंत्रणा कार्यरत आहे की नाही.?

( उत्तर दिले नाही )

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : गुजराथ राज्यातून येणा-या दुधात कॉस्टीक सोडा आढळणे

मु.शी : गुजराथ राज्यातून येणा-या दुधात कॉस्टीक सोडा आढळणे या बाबत श्री.अनंत तरे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.बाबा सिद्दीकी (अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी " गुजराथ राज्यातून येणा-या दुधात कॉस्टीक सोडा आढळणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे.निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( निवेदना नंतर )

श्री.अनंत तरे :सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये भेसळ असलेले दूध पुरविण्यात येते हा विषय अत्यंत गंभीर असतांनासुध्दा शासन त्याकडे गांभीर्याने पाहत नाही.मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की,या दुधामध्ये कॉस्टीक सोडा का घातला जातो त्याची चौकशी केली आहे काय ? आणि कास्टीक सोडा आरोग्यास धातक असल्यामुळे अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्याप्रमाणें संबंधिताविरुध्द कारवाई केली आहे काय ? असल्यास संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, जितने दूध में कॉस्टीक सोडे की मिलावट की गई थी, उसे नष्ट किया गया है. संबंधित व्यक्ति के खिलाफ एफ.आय.आर. दाखिल की गई हे. आगे की जांच चालू है.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4..

पृ.शी : मुल्यवर्धित करामुळे मच्छिमारांना डिझेलच्या दरात सवलत न मिळणे

मु.शी : मुल्यवर्धित करामुळे मच्छिमारांना डिझेलच्या दरात सवलत न मिळणे या बाबत श्री.नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे.मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर विनोद तावडे,मधुकर चव्हाण यांनी "मुल्यवर्धित करामुळे मच्छिमारांना डिझेलच्या दरात सवलत न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 13:25

( नियम 93 अन्वये माननीय अर्थमंत्र्यांच्या निवेदनानंतर .... )

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, महाराष्ट्रातील मच्छिमारांच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असा निर्णय होता. मच्छिमारांनी वापरायच्या डिझेलवर आतापर्यंत त्यांना महाराष्ट्र सरकार कडून सवलत मिळत होती ....

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माझा या निवेदनावर हरकतीचा मुद्दा आहे. कालच खालच्या सदनामध्ये माननीय राज्यमंत्र्यांनी या संदर्भात निवेदन केले होते आणि आज आपल्या सभागृहात केलेल्या निवेदनामध्ये मान्य केलेले आहे. खालच्या सभागृहामध्ये शासनाने हे मान्य केलेले आहे की, आम्ही हे देऊ म्हणून. 15 ऑगस्ट पर्यंत याबाबत निर्णय घेऊ....

श्री. जयंत पाटील : आपण प्रश्न विचारल्यास त्याबाबत मी उत्तर देतोच आहे ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.तरे यांचा मुद्दा बरोबर आहे. शासनाने खालच्या सभागृहामध्ये हे मान्य केले असेल तर आपण ते अगोदर येथे तसे सांगितले पाहिजे ....

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, काल तसे उत्तर का दिले वगैरे माहिती मी आपल्याला आपण प्रश्न विचारल्यास सांगू शकेन. ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व मच्छिमारांच्या संबंधातील हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. आतापर्यंत त्यांना डिझेलमध्ये सेल्स टॅक्सची सवलत मिळत होती. परवा त्यांचा या विषयावर मोर्चा आला होता आणि त्या मोर्चाला या सदनातील सन्माननीय सदस्य मेजर सावंत आणि श्री. विनोद तावडे हे उपस्थित होते. त्यावेळी शासनातील एक मंत्री श्री.अनिस अहमद यांनी त्या मोर्चासमोर भाषण केले आणि त्यामध्ये मोर्चेकऱ्यांना त्यांनी सांगितले की, 'मी तुमच्या बाजेने आहे. पण अर्थमंत्री श्री.जयंत पाटील हे काही ऐकत नाहीत. तेव्हा या प्रश्नावर आपण जर त्यांना घेराव घालणार असलात तर मी देखील त्यामध्ये सामील होण्यास तयार आहे, आपण त्यांना मग सरळ करू.' इतकेच नाही तर त्यावेळी ते असेही म्हणाले की, 'ते राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत आणि मी राष्ट्रीय काँग्रेसचा आहे. त्यामुळेच ते आमचे ऐकत नाहीत.' सभापती महोदय, आता एकमेकांचे काय कपडे धुवायचे आहेत ते तुम्ही धूत बसा, आम्हाला त्याचे काही देणेघेणे नाही. तेव्हा माझा या संबंधात प्रश्न असा आहे की, आपल्या शासनातील एका मंत्र्याने आपल्याकडे या संबंधातील प्रस्ताव पाठवून त्यास मंजुरी देण्यास सांगितले आहे. काँग्रेस

....... डीडी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

पार्टीकडून तुम्हाला त्या संबंधीचे निवेदन मिळाले असेलच. तेव्हा आता तरी तुम्ही मच्छिमारांना ही सवलत देणार आहात काय ? आणि देणार असाल तर ती केव्हा पासून लागू करणार आहात ? आपले एक कॅबिनेट मंत्री आपल्याबद्दल इतके गौरवोद्‌गार काढत आहे तेव्हा त्यांचे तरी आपण एवढे ऐकावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, खालचे सभागृह आणि या सभागृहातील निवेदनातील फरकाबद्दल मी आपल्याला अशी माहिती देईन की, सेल्स टॅक्स आणि वॅटच्या खाली अशा स्वरूपाच्या सवलती देण्याचे अधिकार आता बंद झालेले आहेत म्हणून पशुसंवर्धन विभागाला आपण हे रेफर केले आहे की, अशा अशा स्वरूपाची सवलत देण्याचे दृष्टीने बजेटमध्ये तरतूद करून देण्यात यावी म्हणून. अशा सूचना त्यांना देण्यात आलेल्या आहेत त्याप्रमाणे त्यांनी प्रस्ताव केलेला आहे आणि तो मंत्रिमंडळापुढे येईल. त्यानंतर राज्यातील मच्छिमारांना ज्या सवलती देण्याचे धोरण आहे ते स्वतंत्रपणे जाहीर होऊन, त्या दृष्टीने बजेटमध्ये तरतूद करून त्यांना तसे अनुदान देण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, स्वत: मंत्र्यांनी अशा प्रकारचा प्रस्ताव वित्त मंत्र्यांकडे दिलेला आहे. परंतु त्यांनी त्यास मंजुरी दिलेली नाही, ते त्यातील मुख्य अडसर आहेत असे त्यांनी मोर्चापुढे स्पष्टपणे सांगितले आहे. तेव्हा वित्त मंत्री म्हणून हा प्रस्ताव तुम्हाला मिळाला आहे काय ? आणि त्याला तुम्ही अनुमती देणार आहात काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी हे यापूर्वी विरोधी पक्षनेता होते, त्यापूर्वी मंत्री देखील होते. तेव्हा प्रस्ताव कसे येतात आणि त्यांचेवर प्रक्रिया, सोपस्कार करून ते मंत्रिमंडळापुढे कसे जातात हे मी त्यांना स्वतंत्रपणे सांगण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. मी इतकेच सांगू इच्छितो की, असा प्रस्ताव करून ... आता तो कोणत्या टेबलवर आहे वगैरे काही मी सांगणार नाही. ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, वित्त मंत्री म्हणून या प्रस्तावाबाबत आपली भूमिका काय आहे ? आपली भूमिका आपण कॅबिनेटपुढे सांगणार आहात का ? तुमची या प्रस्तावाबाबतची भूमिका होकारार्थी आहे की नकारार्थी आहे ?

( यानंतर श्री.जागडे ....2इ 1 ..

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

माननीय मंत्री अनिस अहमद यांच्यावरआपल्यावर राग आहे काय ? आपला काँग्रेसवर राग आहे काय ? आपला मच्छिमारांवर राग आहे काय ? मा. सदस्य श्री. तरे यांच्यावर आपला राग आहे काय ?

श्री. जयंत पाटील : माननीय सदस्य श्री. गडकरी यांच्या आडनावाबद्दल मला आता जी माहिती मिळाली आहे, ती आता मला खरी वाटायला लागली आहे. माननीय श्री. अनिस अहमद यांनी बाहेर काय वक्तव्य केले, याबद्दल मी वक्तव्य करु इच्छित नाही. हा प्रश्न यापूर्वीही उपस्थित झाला होता. वॅट अंमलात आणल्यानंतर सीएफ फंडातून मच्छिमारांसाठी 13 कोटी रुपयाची तरतूद यापूर्वी मी केलेली आहे. तशी सवलत शासनाने मच्छिमारांना दिली आहे. पावसाळा सुरु होण्यापूर्वी मच्छिमारांच्या बोटी समुद्रात जाण्याचे बंद होते. त्या दरम्यानच्या काळात म्हणजेच अडीच महिन्यात या बाबतचा प्रस्ताव तयार करण्यासाठी संबंधीत विभागाला मी तीन वेळा सूचना दिली आहे. काल देखील मी संबंधीत विभागाच्या सचिवांबरोबर बोललो आहे. तो प्रस्ताव वित्त विभागाकडे आल्यानंतर माझ्या सहीने माननीय मुख्यमंत्र्यांकडे जाईल. माननीय मुख्यमंत्र्यांची या प्रस्तावावर सही झाल्यानंतर हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर येईल. आता त्या प्रस्तावाला मंत्रिमंडळ मान्यता देईल, असे गृहीत धरुन या ठिकाणी तसे सांगणे उचित होणार नाही. सभापती महोदय, मच्छिमाराना मदत करण्याचे शासनाचे धोरण आहे. यापूर्वी शासनाने तशी मदत मच्छिमारांना केली आहे. मच्छिमार अडचणीत येऊ नयेत, या संदर्भात शासन धोरण आखीत आहे. कोणत्या मंत्र्यांनी खाजगीत आणि जाहीरपणाने कोणते वक्तव्य केले आहे, त्या बाबतीत मी वक्तव्य करणार नाही. मी फक्त या ठिकाणी विश्वास देऊ इच्छितो की, मच्छिमारांना सर्वतोपरी मदत करण्याचे धोरण शासनाचे आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री या प्रश्नाबाबत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करतील. त्यानंतर माननीय वित्तमंत्री अर्ध्या तासाने याबाबतची माहिती सदनाला देतील. तोपर्यन्त आपण थांबू या.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मच्छिमारांना मदत करण्याच्या संदर्भात याबाबतची सगळी छाननी झाली आहे. या मच्छिमारांकडे कोणत्या कॅटेगरीच्या बोटी आहेत, त्याचा विचार करुन या बाबतचा प्रस्ताव पूर्णपणाने तयार करण्यात आला आहे. या बाबतच्या प्रस्तावाबाबत सर्व तयारी झाली आहे. आम्ही नकाराबाबत कधीच बोललो नाही. होकारबाबतच आम्ही बोलत आहोत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे, म्हणून आपण थोडा वेळ थांबू या. कारण वॅट हा मार्च महिन्यात लागू झाला. आता जुलै महिना उजाडला आहे. असे असताना अजूनपावेतो कोणताही प्रस्ताव तयार करण्यात आला नाही. गुजरात सरकारने मच्छिमारांसाठी एक सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. उपग्रहाच्या माध्यमातून कोणत्या भागात जास्त मासळी मिळेल, हे मच्छिमारांना सांगण्यात येते. त्यामुळे गुजरात राज्यातील मच्छिमारांचे उत्पन्न वाढले आहे. आपल्या राज्यातील मच्छिमारांना हे सरकार कोणता न्याय देणार आहे ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, गुजरात राज्याने कोणत्याही प्रकारचे सबसिडी मच्छिमारांना दिलेली नाही. ती फक्त आपणच देत आहोत. आता या प्रस्तावाबाबत मंत्रिमंडळ जो काही निर्णय घेईल, तो निर्णय या गडबडीमध्ये जाहीर करणे योग्य होणार नाही. हे शासन मच्छिमाराना मदत करीत आहे. याबद्दल कोणाच्याही मनात दुमत असण्याचे कारण नाही. आता समुद्रात बोटी जावयाला सुरुवात झालेली नाही. नारळी पौर्णिमेनंतर मच्छिमारांच्या बोटी समुद्रात जातील. त्यामुळे युध्दपातळीवर या प्रस्तावाबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी. : बांद्रा ते वरळी आणि वरळी ते नरिमन पॉईन्ट या सागरी सेतूबाबत.

मु.शी.: बांद्रा ते वरळी आणि वरळी ते नरिमन पॉईन्ट या सागरी सेतूबाबत या विषयाबाबत श्री.कन्हैयालाल गिडवाणी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अनिल देशमुख ( सार्वजनिक बांधक ( सार्वजनिक उपक्रम ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी " बांद्रा ते वरळी आणि वरळी ते नरिमन पॉईन्ट या सागरी सेतूबाबत " या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : बांद्रे ते वरळी आणि वरळी ते नरिमन पॉईंट पर्यन्तच्या सागरी सेतूसाठी पूर्वी 500 कोटी रुपयाचा खर्च येणार होता. आता हा खर्च 1500 कोटी रुपयापर्यन्त गेला आहे. यामध्ये एक हजार कोटी रुपयाची वाढ झालेली आहे. या प्रकल्पाच्या खर्चाच्या वाढीबाबत एक कारण असे दिले आहे की, " बांधकाम कालावधीतील भाववाढीमुळे या प्रकल्पाचा खर्च वाढला आहे." सभापती महोदय, या प्रकल्पाबाबत कोणत्या अटी घातल्या होत्या ?

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी...

त्यामध्ये व्याजाचा दर काय होता, आणि त्या रकमेमध्ये किती वाढ झाली याची सविस्तर माहिती मंत्रीमहोदय देतील काय?

श्री. अनिल देशमुख : बांद्रा ते वरळी या सागरी पूलाच्या किंमतीमध्ये किती वाढ झाली असा प्रश्न विचारला आहे. या प्रकल्पाची मूळ किंमत 666 कोटी होती. परंतु भाववाढ झाल्यामुळे ती किंमत वाढली. बांधकाम कालावधीतील व्याजामुळे ही वाढ झाली. तसेच. बांद्रा व वरळी येथे अतिरिक्त केबल स्टेड पूल घेतल्यामुळे वाढ झाली. अशाप्रकारच्या अनेक कारणांमुळे या प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ झाली. व्याजाच्या बाबतीत विचारण्यात आले आहे. अंदाजित भाववाढ डिसेंबर 2003 पर्यंत झाली, 35 कोटी ही प्रकल्पाची मूळ किंमत होती त्याऐवजी 80 कोटी झाली. बांद्रा केबल स्टेड पूलाच्या अंदाजित किंमतीमध्ये 20 कोटींची वाढ झाली. त्याचप्रमाणे वरळीच्या केबल स्टेड पूलाच्या किंमतीमध्ये 50 कोटींची वाढ झाली. अंदाजित भाववाढ डिसेंबर 2003 पर्यंत 65 कोटींची झाली . त्याचबरोबर संभाव्य व्याजासाठी अंदाजित तरतूद आपण त्यामध्ये ठेवली आहे. त्याचप्रमाणे बांधकाम पूर्ण करण्याचा अंदाजित खर्च जो आहे त्यामध्ये सुध्दा भाववाढ झाली. त्यामुळे एकूण 640 कोटींची भाववाढ झाली ही गोष्ट खरी आहे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : व्याजाची आकारणी किती केली आहे?

श्री. अनिल देशमुख : बांधकाम कालावधीतील अंदाजित व्याजामुळे प्रकल्पाची मूळ किंमत 85 कोटी होती त्याऐवजी 315 कोटी झाली. म्हणजे बांधकाम कालावधीमध्ये व्याजाच्या दरामध्ये 230 कोटींची वाढ झाली.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. खरे म्हणजे या गतिशील शासनाला मान खाली घालावी लागेल असे हे प्रकरण आहे. शासन स्वत:ला गतिशील म्हणते परंतु ते किती अकार्यक्षम आहे याचे हे उदाहरण आहे. एकंदर 663 कोटींपैकी सुरुवातीला 420 कोटी रुपयांचा हा पूल होता. त्यामध्ये लव्हग्रोव्ह येथील उड्डाण पूलाचे काम आमच्या काळात पूर्ण झाले आहे. माहीम इंटरचेंज येथील उड्डाण पूल हे कामसुध्दा आमच्या काळात पूर्ण झाले आहे. बांद्रा येथील पोच मार्ग याचे अर्धेअधिक काम देखील आमच्या काळात पूर्ण झाले आहे.बांद्रा ते वरळी येथील समुद्रातील मुख्य पूलाच्या कामाचे 420 कोटी रुपयांचे हिंदुस्थान कंस्ट्रक्शन कंपनीचे टेंडर होते. आता आपण या प्रकल्पाची किंमत 663 कोटी म्हणत आहात, प्रत्यक्षात हा प्रकल्प साडे बाराशे कोटीपर्यंत जातो. म्हणजे दुप्पट किंमत वाढली आहे. यामध्ये 600 कोटी रुपयांचा भुर्दंड



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी,,,

महाराष्ट्र सरकारवर लादला गेला आहे. आणि ही किंमत अजून वाढणार आहे. माझी आपणास विनंती आहे की, या ठिकाणी मी माहितीच्या अधिकारामध्ये एक पत्र पाठविले. आणि या पूलाच्या किंमतीमध्ये कशी कशी वाढ झाली याची माहिती द्या म्हणून विचारले. आपण याठिकाणी जे पाच हेड दिले आहेत त्यापैकी तीन हेडची कामे अगोदर झाली होती. राहिलेल्या दोन कामांच्यावेळी माजी पंतप्रधान माननीय श्री. विश्वनाथ प्रतापसिंह हे हार्टचे ऑपरेशन करण्यासाठी महाराष्ट्रात आले होते. त्यावेळी ते माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना भेटले त्यावेळी त्यांनी या कामाला स्थगनादेश दिला.. भारताचे माजी पंतप्रधान माननीय श्री. विश्वनाथ प्रतापसिंह हे त्यावेळी महाराष्ट्राला 200 कोटी रुपयांची चोट लावून गेले. ते या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले व त्यांनी स्थगनादेश देण्याची मागणी केली. त्यांच्या पत्रावर माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थगनादेश दिला. त्यानंतर मी चौकशी केल्यावर त्यांचे म्हणणे खरे नाही असे आढळून आले. त्यानंतर सरकारने स्थगनादेश उठविला. मधल्या काळात त्यांनी स्थगनादेश दिल्यामुळे ही किंमत वाढली.आणि त्याची जबाबदारी आपल्यावर आली ही वस्तुस्थिती आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड :सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. आव्हाड, आपण आपल्या जागेवर बसावे. आपण विरोधी पक्षामध्ये आहात काय? आपण आपल्या जागेवर जाऊन बसा व त्यानंतर हरकतीचा मुद्दा उपस्थित करा..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांना इतर सदस्यांच्या जागेवरुन हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येणार नाही. त्यांनी त्यांच्या जागेवर जाऊन बोलले पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड आपल्या जागेवर जाऊन बसतात.)

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. प्रश्न गंभीर आहे ही गोष्ट खरी आहे. पण माजी पंतप्रधान जनहितार्थ माननीय मुख्यमंत्र्यांना येऊन भेटतात . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असताना . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यांच्या आरोपांची चौकशी झाल्यानंतर दुर्दैवाने त्यांचे म्हणणे खरे नाही हे सिध्द झाले आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टे उठविला. याचे रेकॉर्ड उपलब्ध आहे. जर माननीय माजी पंतप्रधानांचे म्हणणे खरे झाले असते तर मी बोललो नसतो.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सर्वच राजकीय नेते जे बोलतात, ते खरे बोलतात असे गृहीत धरले जाते का ? मग माजी पंतप्रधान यांनी येथे आल्यावर जनहितार्थ एखादे निवेदन दिले असेल, तर त्यांच्यावर असा आरोप करणे की, त्यांनी महाराष्ट्राला चोट लावली. हा त्यांच्या पदाचा, त्यांच्या प्रतिष्ठेचा, त्यांच्या राजकीय कर्तृत्वाचा अपमान आहे. अशा कित्येक गोष्टी घडतात. बाबरी मशीद पडल्यानंतर हजारो मृत्यूमुखी पडले.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी माझे वाक्य दुरुस्त करतो. मी माझ्या वाक्यातील "चोट" हा शब्द काढून टाकतो. त्यांनी जो स्थगनादेश दिला, त्यामुळे . . . .

श्री.जितेंद्र आव्हाड : तुम्हीच फक्त दादागिरी करु शकता आणि तुम्हीच फक्त आवाज चढवू शकता का ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यांनी स्थगनादेश दिला. याठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत.माननीय मुख्यमंत्र्यांना माजी पंतप्रधान श्री.विश्वनाथ प्रतापसिंगसाहेब भेटले होते. त्यांनी निवेदन दिले, त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी चौकशी केली, 7-8 महिने काम बंद राहीले. नंतर चौकशीचा रिपोर्ट मिळाला, सगळया गोष्टी क्लिअर झाल्या आणि ते काम पुन्हा सुरु झाले. आता त्या कॉन्ट्रॅक्टरने 200 कोटी रुपयांचा क्लेम टाकला आणि आपण त्याला ते दिलेले आहे. दुर्दैवाने माजी पंतप्रधान श्री.विश्वनाथ प्रतापसिंग यांनी स्थगनादेश घेतला नसता तर महाराष्ट्रावर ही वेळ आली नसती. आपण आता हा 200 कोटीचा भूर्दंड भरलेला आहे. ठीक आहे, अजून काही भूर्दंड असेल तरी काही हरकत नाही. उदार अंत:करणाने आपण पुढे जाऊ. आता

. . . .2 जी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

माननीय मंत्री महोदयांना माझा दुसरा स्पेसीफीक प्रश्न असा आहे की, या कामामध्ये तुम्ही जी वाढ दाखविलेली आहे. ती प्रत्यक्षात या 5 पैकी कोणत्या कामावर आहे आणि अशा प्रकारे वाढ दाखविण्याचे कारण काय आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, या पूलाचे काम सुरु असताना बांद्रा-वरळी सिलींगचे ओरिजनल अलाईनमेंट होते. त्यानंतर मच्छिमार बांधवांनी मागणी केली की, अशा प्रकारचा पूल बांधला, तर आमचा मच्छिमारीचा, पोटापाण्याचा जो धंदा आहे त्यावर संकट येऊ शकते आणि त्यांनी या पूलाचे अलाईनमेंट बदलण्याच्या बाबतीत विनंती केली. म्हणून बांद्रा-वरळी हा पूल वरळीच्या गावाजवळून जात होता, तो थोडा समुद्रात घेण्यात आला आणि त्यावर 500 मी. नवीन केबल स्ट्रीट पूल घेण्यात आला. तसेच 350 मीटरचा परत वरळीच्या भागाला एक केबल स्ट्रीट पूल घेण्यात आला. त्यामुळे या संपूर्ण अलाईनमेंट मध्येच बदल झाला.

श्री.नितीन गडकरी (खाली बसून) : 500 मीटरचा पूल पहिल्या अलाईनमेंट मध्ये होता. 350 मी.चा पूल नंतर घेण्यात आला.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यामध्ये नवीन केबल स्ट्रीट पूल घेण्यात आले. अलाईनमेंट मध्ये सुध्दा फरक पडला. कामाची व्याप्ती वाढली आणि त्यामुळे संपूर्ण खर्चात फरक पडला. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो प्रश्न विचारला आहे, त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, . . . .

श्री.नितीन गडकरी(खाली बसून) : कोणकोणत्या हेडखाली किती वाढला ते सांगावे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो. यामध्ये अंदाजित भाववाढ आहे त्यामध्ये 1) यामध्ये भाग 4 मुख्य पूलाची कंत्राटी किंमत 400 होती, ती तशीच आहे. त्यात काही फरक पडलेला नाही. 2) अंदाजित भाववाढ डिसेंबर 2003 पर्यंत 35 कोटी होती, ती 80 कोटी झाली. 3) बांद्रा केबल स्ट्रीट पूलाची अंदाजित किंमतीत वाढ होऊन ती 20 कोटी रुपये झाली. 4) वरळी केबल स्ट्रीट पूलाच्या किंमतीत 50 कोटीची वाढ झाली. 5) डिसेंबर 2003 नंतर अंदाजित भाववाढ जवळजवळ 65 कोटी रुपये झाली. त्याचबरोबर भाग 4 चे बांधकाम पूर्ण करण्यासाठी अंदाजित खर्च 435 कोटी रुपये होता, तो 740 कोटी झाला. भाग-1,2 व 3 म्हणजे अब्दुल गफारखान रोड, जो वरळीला मिळतो. . . . .

. . . .2 जी-3



श्री.विनोद तावडे (खाली बसून) : भाववाढ कसली झाली आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, माझे उत्तर ऐकून घेंतले तर बरे होईल. वरळीच्या "प्रतिक्षा" इमारतीपासून पासपोर्ट ऑफीसपर्यंत हा पूल जातो. त्याचे भाग 1,2 व 3 मध्ये जमीन सुधारणा इ.बाबतचा अंदाजित खर्च 93 कोटीचा खर्च 196 कोटी रुपये झाला. सल्लागार व इतर संलग्न खर्च मिळून 666 कोटी याची एकंदरीत किंमत होती, ती 1300 कोटी रुपये झाली. पण यामध्ये महत्वाचा जो प्रश्न आहे की, . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हे सर्व संशयास्पद आहे . . . .

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे... 13:45

श्री.विनोद तावडे : मुंबईवर भ्रुदंड पडणार आहे. हा सगळा प्रकार संशयास्पद आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी पहिल्यांदाच सांगितलेले आहे की, यामध्ये जी भाववाढ झालेली आहे,त्यामध्ये अनेक कारणे आहेत. बांधकामावरील व्याज आहे, नवीन केबल स्ट्रीट ब्रीज आला, अलाईन्मेंटमध्ये फरक पडला, या सर्व गोष्टीमुळे यामध्ये वाढ झालेली आहे.

श्री.नितीन गडकरी : ही जी भाववाढ आहे, त्याबाबतीत मंत्रीमहोदय सांगतात त्याच्याशी सहमत नाही. काही प्रमाणात भाववाढ आहे, पण ज्या प्रकारे हे मान्य करण्यात आले ते प्रकरण संशयास्पद आहे. या सगळया प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. 663 कोटीचा प्रकल्प आज तो आपण 1500 कोटीपर्यन्त नेतो आहे आणि जनतेकडून ते पैसे वसूल करतो आहे, हे चांगले नाही. हे प्रकरण गंभीर आहे, यातील अनेक गोष्टी आक्षेपार्ह आहेत, याची चौकशी व्हायला पाहिजे. माझी मागणी आहे की, या सर्व प्रकरणाची चौकशी तज्ज्ञ मंडळींची नेमणूक करुन किंमतीमध्ये वाढ झालेली आहे, जस्टीफाय आहे की नाही, हे तपासले पाहिजे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, यामध्ये चौकशी करण्याची काही आवश्यकता नाही.

..(अडथळा)...

(अनेक विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, अलाईन्मेंटमध्ये फरक पडलेला आहे, कामाच्या व्याप्तीमध्ये देखील फरक पडलेला आहे, त्यामुळे किमतीमध्ये वाढ झालेली आहे.

श्री.विनोद तावडे : काही फरक पडलेला नाही.

....(अडथळा)...

श्री.नितीन गडकरी : यामध्ये चौकशी झाली पाहिजे. कमीतकमी 500 कोटीचा भ्रष्टाचार झालेला आहे.

.श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, कामाची व्याप्ती, कामामध्ये वाढ झाल्यामुळे किंमतीमध्ये वाढ झाली.

....(अडथळा)....

**उपसभापती** : आता निवेदन क्रमांक 14 घेण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सरकारच्या भ्रष्टाचाराचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

-

22-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) HH-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

**उपसभापती** : आता निवेदन 14 घेण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहात प्रवेश करतात.)

-

**पृ.शी.** : उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार.

**मु.शी.** : उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार या संदर्भात याबाबत श्री.कन्हैयालाल गिडवाणी व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.कन्हैयालाल गिडवाणी व इतर वि.प.स. यांनी उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहारार.या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : उस्मानाबाद बँकेच्या संबंधात निवेदन आलेले आहे. दोन वर्षापूर्वी वर्धा,उस्मानाबाद आणि नागपूर या तीन बँकेच्या संबंधाने मी प्रश्न उपस्थित केलेला होता. निवेदनामधील उत्तर पाहिले तर यामध्ये सगळेच दोषी ठरलेले आहेत. काही ठिकाणी शासन अगोदर स्थगिती देते आणि नंतर स्थगिती उठवते. यामध्ये काही करायचे नाही हे स्पष्ट होते. या बँकेच्या संचालकांना काही माहीत नसतांना देखील निर्णय झालेले असतील. माझा प्रश्न असा आहे की, दोन वर्षापूर्वी आपण प्रशासक नेमलेला आहे, त्या ठिकाणी आपण निवडणुक का घेत नाही, त्या ठिकाणी एक महिन्यामध्ये नवीन बोर्ड अस्तित्वात आणणार आहात काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सेक्शन 11 खाली ही बँक येत असल्यामुळे आणि सध्या पावसाळा असल्यामुळे सहकारी क्षेत्रातील सगळ्या निवडणुका थांबलेल्या आहेत. याबाबतीत तपासणी करुन पावसाळ्यानंतर निर्णय घेतला जाईल.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : उस्मानाबाद बँकेचा घाटाळा देशामध्ये गाजलेला आहे, अशी बँक आहे. पावसाळा आहे ठीक आहे, परंतु येत्या तीन महिन्यामध्ये निवडणूक घेण्याचा शासन निर्णय घेणार आहे काय ? तीन महिन्याच्या कालावधीमध्ये आपण निवडणुका जाहीर करणार आहात काय ? म्हणजे त्या ठिकाणी भ्रष्टाचार होऊ द्यायचा आणि नंतर पावसाळ्यानंतर पाहू असे म्हणणे बरोबर नाही. तीन महिन्याच्या आतमध्ये आपण निवडणुका जाहीर करणार आहात काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : निवडणूक घ्यायला कोणतीही अडचण नाही. निवडणुकीचे आदेश दिले जातील. निवडणुकीला जी विहित मुदत लागते, त्याप्रमाणे निवडणुका घेता येतील.

--

**उपसभापती** : मी सभागृहाला विचारु इच्छितो. मला जे दिसते आहे ते मी प्रामाणिकपणे सांगतो. आज जवळपास नियम 93 ची 30 निवेदने आहेत, त्यापैकी 18 निवेदने अजून राहिलेली आहेत. त्यानंतर 15 लक्षवेधी आहेत. एकाच दिवशी यावर चर्चा होणे, हे मला स्वत:ला येथे बसून अशक्यप्राय वाटते. तर याबाबतीत मी काय करावे याबद्दल सभागृहाने मार्गदर्शन करावे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

काही सदस्य :मग सोमवारी अधिवेशन घ्या.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय,एका दिवशी पाच विधेयके मंजूर होऊ शकतात तर मग एवढी निवेदने न व्हायला काय झाले ?

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, एवढी सगळी निवेदने सरकार एकाच दिवशी कां देते?

**उपसभापती** : मी याठिकाणी प्रश्न उपसिथत केला की, मी काय करावे?

श्री. कन्हैयालाल गिडवाणी :सभापती महोदय, आपण त्यासाठी लागणारा संपूर्ण वेळ द्यावा.

श्री. विनोद तावडे :आपण आम्हाला न्याय द्यावा.

**उपसभापती** : मला आपली काळजी वाटते, 11.00 वाजल्यापासून आपण येथे बसलेले आहात. आपल्याला भूक वगेरे काही लागत नाही काय?

श्री. विनोद तावडे :जनतेच्या प्रश्नाची आणि ते सोडवायची भूक महत्वाची आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार..... 13:50

**पृ. शी.** : राज्यातील सुमारे 25 हजार बाल कामगारांची छळातून करावयाची मुक्तता.

**मु. शी.** : राज्यातील सुमारे 25 हजार बाल कामगारांची छळातून करावयाची मुक्तता याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण व विनोद तावडे वि.प.स.यानी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गणेश नाईक ( कामगार.मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण व विनोद तावडे यांनी "राज्यातील सुमारे 25 हजार बाल कामगारांची छळातून करावयाची मुक्तता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>नि वे द न</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार..... 13:50

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा एक छोटा प्रश्न बाल कामकारांच्यासंबंधी आहे. बाल कामगारांच्या पिळवणुकीसंबंधी 157 खटल्यांमध्ये शासनाने निर्णय दिलेला आहे की, या प्रकरणतील प्रत्येक मालकाकडून प्रत्येक बाल कामगारांसाठी 20 हजार रुपये दंड वसूल करावा.सभापती महोदय, सरकारने दिलेले उत्तर हास्यास्पद आणि बेजबाबदारपणाचे आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "त्याअनुषंगाने 160 प्रकरणांमध्ये रेव्हेन्यू रिकव्हरी सर्टिफिकेट निर्गमित करण्यात आलेली आहेत. 82,20,000 एवढया दंडाची रक्कम वसूल करणे अपेक्षित आहे. म्हणजे सुमारे एक कोटी रुपये आपण वसुली करणार आहात.पण त्या कलेक्टरनी एक पै सुध्दा वसूल केलेली नाही. त्याबाबत उत्तरात असे म्हटले आहे की,"सदर रक्कम वसूल करणे ही क्लिष्ट व वेळखाऊ असल्यामुळे विलंब लागला."ज्यांनी हे 82 लाख रुपये वसूल केले नाहीत त्याचे कारण काय? न्यायालयाचे आदेश न पाळल्याबाबत त्या जिल्हाधिका-यावर किंवा संबंधित अधिका-यावर कारवाई करणार काय ?

श्री. गणेश नाईक : संबंधितांना उर्वरित दंडाची रक्कम वसूल करण्याच्या अनुषंगाने अंतिम आदेश देण्यात आलेले आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, न्यायालयाने दिलेल्या कालावधीत ही वसुली कां करण्यात आली नाही?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, ज्यांच्याकडून रक्कम वसूल करावयाची होती त्या व्यक्ती तेथे उपलब्ध नव्हत्या म्हणून ते वसूल करण्यात आले नाही.

श्री. विनोद तावडे :बाल मजूर हा कामगार खात्याचा विषय आहे. यामध्ये पोलिसांनी धाडी टाकून त्यांना पकडलेले आहे. इतकी वर्षे हे बाल मजूर काम करीत होते. त्याकडे कामगार खात्याने दुर्लक्ष केले. दिनांक 14 नोव्हेंबर, पर्यंत 25 हजार बाल कामगार मुक्त करण्यात येणार आहेत. त्यासाठी विशेष योजना आपल्या खात्याने तयार केली आहे काय? बालसुधारगृहात त्यांना ठेवल्यानंतर तेथील व्यवस्था काय आहे या सगळया बाबतीत आपल्या खात्याने काय विचार केला आहे ?

श्री. गणेश नाईक : बाल कामगारांची सुटका करण्याच्या अनुषंगाने माननीय उपमुख्यमंत्री व गृहमंत्री आणि मी स्वत: एक बैठक आयोजित केली होती.त्या बैठकीला कामगार आयुक्त आले

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ....

होते. पोलीस अधिकारी आले होते.महिला व बाल कल्याण विभागाचे अधिकारी आले होते. रेल्वेचे अधिकारी आले होते. पोलिसांनी या बाल कामगारांचे संरक्षण करावयाचे. कामगार विभागाने बाल कामगारांची मुक्तता करावयाची व जोपर्यंत याची संपूर्ण शाहनिशा होत नाही तो पर्यंत महिला आणि बाल कल्याण विभागाच्या अधिका-यांनी त्यांची देखभाल करावयाची, रेल्वेच्या लोकोनी त्यांची नेण्याची व्यवस्था करावयाची व ते बालकामगार ज्या राज्यातील असतील त्या राज्यातील अधिका-याकडे ते सुपुर्द करावयाचे अशी यंत्रणा आहे ती सुरु केलेली आहे.

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील जुने मौल्यवान संदर्भ ग्रंथ व इतर पुस्तके जाळून नष्ट करण्याबाबत.

**मु. शी.** : पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील जुने मौल्यवान संदर्भ ग्रंथ व इतर पुस्तके जाळून नष्ट करण्याबाबत प्रा. शरद पाटील व जयंत प्र.पाटील, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, प्रा. शरद पाटील व जयंत प्र. पाटील यानी पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील जुने मौल्यवान संदर्भ ग्रंथ व इतर पुस्तके जाळून नष्ट करण्याबाबतच्या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार..... 13:50

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये शेवटी असे म्हटले आहे की,तथापि, या प्रकरणी सविस्तर चौकशी करुन आवश्यक ती कार्यवाही शासनाकडून केली जाईल." त्यामुळे माझे समाधान झालेले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाराष्ट्रातील पाण्याचे प्रकल्प पूर्ण न होणे तसेच कृष्णा खोरे विकास महामंडळाने त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या पाण्यापेक्षा जादा पाणी वापराचे प्रकल्प घेणे

**मु. शी.** : महाराष्ट्रातील पाण्याचे प्रकल्प पूर्ण न होणे तसेच कृष्णा खोरे विकास महामंडळाने त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या पाण्यापेक्षा जादा पाणी वापराचे प्रकल्प घेणेबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, प्रा. बी. टी.देशमुख वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्य मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, प्रा. बी. टी.देशमुख,वि.प.स. यांनी "महाराष्ट्रातील पाण्याचे प्रकल्प पूर्ण न होणे तसेच कृष्णा खोरे विकास महामंडळाने त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या पाण्यापेक्षा जादा पाणी वापराचे प्रकल्प घेणे"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार..... 13:50

**पृ. शी.** : मोढा गावातील गणेश कृषी केंद्रामार्फत बोगस बियाणंची विक्री

**मु. शी.** : मोढा गावातील गणेश कृषी केंद्रामार्फत बोगस बियाणांच्या विक्रीबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी, नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.बाळासाहेब थोरात ( कृषि मंत्री ) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री श्रीकांत जोशी, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व जगदिश गुप्ता, वि.प.स. यांनी "बोगस बियाणंची विक्री" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. बाळासाहेब थोरात :सभापती महोदय, निवेदनामध्ये एक दुरुस्ती आहे. निवेदनाच्या दुस-या पानावर दुस-या परिच्छेदात "जिल्हयात आतापर्यंत 453 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत." असे म्हटले आहे. त्याऐवजी "जिल्हयात आतापर्यंत 723 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत" असे वाचावे.

**उपसभापती** : निवेदन दुरुस्त केल्याप्रमाणे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, कपाशीच्या बोगस बियाणामुळे परभणी जिल्हयामधील शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. विदर्भातील व मराठवाडयातील शेतकरी आत्महत्या करतात याचे खरे कारण असे की, बोगस बियाणामुळे लागवड कमी होते. न्युजिविडू सिड्स ही चांगली कंपनी आहे. या कंपनीचे बियाणे लावले तर जास्त इल्ड येते असा शेतक-यांचा विश्वास होता. म्हणून या कंपनीचे नवीन बीटी वाण शेतकरी घेऊन गेले आणि ते काहीच उगवले नाही म्हणून शेतकरी मोंढा केंद्रावर गेले होते.

यानंतर श्री. बरवड...

.... .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/ SBT/ MAP/ प्रथम कु. थोरात 13:55 वा.

श्री. श्रीकांत जोशी ....

त्यांना काही दिलासा देण्याऐवजी प्रशासनाने त्यांना लाठ्या हाणल्या. शेतकऱ्यांना लाठ्या हाणणारे सरकार या ठिकाणी आहे असे धोरण यामध्ये दिसते. न्युजिविडू कंपनीचे जे एनसीएस वाण आहे त्याला केंद्र शासनाची मान्यता किती तारखेला मिळालेली आहे ? न्युजिविडू कंपनीने परभणीच्या डिस्ट्रीब्युटरला एकूण किती बियाणे पाठविले आणि त्यांनी किती बियाणाची विक्री केली ? यामध्ये न्युजिविडू कंपनीकडून घोळ झालेला आहे की, डिस्ट्रीब्यूशनमध्ये दुसरी सरकी टाकून घोळ झालेला आहे की, ग्राम सेवा केंद्राकडून घोळ झालेला आहे ? तीनपैकी कोणत्या ठिकाणी घोळ झालेला आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, बी.टी. हे बियाणे तीन चार वर्षापासून इंट्रॉडयूस झालेले आहे. ते केंद्र शासनाच्या कमिटीमधून येत असते. यामध्ये जी.ई.ए.सी. कमिटी आहे. त्यांची मान्यता मिळाल्यानंतर ते बियाणे वितरित करीत असतात. या पध्दतीने याच वर्षी या बी.टी. बियाणाला मान्यता दिली. त्याची तारीख आता माझ्याकडे नाही. परंतु ते याच वर्षी मिळालेले आहे. खरे म्हणजे हे नोटिफाईड बियाणे असते तसे बियाणे आहे. यामध्ये तक्रारी आल्या ही वस्तुस्थिती आहे. यासंदर्भात बियाणे अधिनियम, 1966, बियाणे अधिनियम, 1968, आणि बियाणे अधिनियम 1983 असे जे बियाणे नियंत्रण कायदे आहेत ते पूर्णपणे केंद्र शासनाच्या अधीन आहेत. त्या पध्दतीनेच याबाबतीत कारवाई करावी लागते. या तक्रारींची शहानिशा करीत आहोत. परभणी जिल्हयातील 9 तालुक्यांमध्ये पुन्हा सबकमिटी स्थापन केलेली आहे. परवाच 19 तारखेपासून सगळी पाहणी करीत आहोत. या दोन तीन दिवसांमध्ये यातील 115 शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष पंचनामे केलेले आहेत. त्याची उगवण क्षमता कमी आहे हे सुध्दा अनेक शेतावर निदर्शनास येत आहे. आपल्याला जी कारवाई करावयाची आहे ती केंद्र शासनाच्या ॲक्ट प्रमाणे करावी लागते. यामध्ये आपण काही नमुने घेतले आहेत. त्यांचे सुध्दा परीक्षण करीत आहोत. हे करीत असताना बियाणे अधिनियमाप्रमाणे हे करीत असतो. पर्यावरण संरक्षण कायदा आहे त्याचाही आता आधार घ्यावा लागतो. कारण हे बी.टी. बियाणे आहे. यामध्ये जी कडक कारवाई असेल त्या पध्दतीने कारवाई केली जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/ SBT/ MAP

श्री. श्रीकांत जोशी : त्या कंपनीने परभणीला किती बियाणे पाठविले होते ? डिस्ट्रीब्युटरने किती बियाणे घेतले होते ?

श्री. बाळासाहेब थोरात : सबडीलर म्हणून मे. गणेश कृषी विकास केंद्र आहे. त्या सबडीलरने 9198 पाकिटे विकली. त्यामध्ये 720 च्या बाबतीत तक्रारी आलेल्या आहेत.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/ SBT/ MAP

**पृ. शी.** : रामरत्न विद्यामंदिर, भाईंदर या शाळेतील श्री. प्रतिक खानोलकर या विद्यार्थ्याचा पाण्यामध्ये बुडून झालेला मृत्यू.

**मु. शी.** : रामरत्न विद्यामंदिर, भाईंदर या शाळेतील श्री. प्रतिक खानोलकर या विद्यार्थ्याचा पाण्यामध्ये बुडून झालेला मृत्यू याबाबत डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. वसंत पुरके ( शालेया शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "रामरत्न विद्यामंदिर, भाईंदर या शाळेतील श्री. प्रतिक खानोलकर या विद्यार्थ्याचा पाण्यामध्ये बुडून झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/ SBT/ MAP

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, श्री. प्रतिक खानोलकर हा मुलगा मरण पावला. या निवेदनामध्ये शेवटच्या वाक्यामध्ये असे म्हटले आहे की, सदर प्रकरणी संबंधित विद्यार्थ्याच्या पालकांनी शाळेच्या विरोधात भाईंदर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असून, त्याची चौकशी पोलिसांमार्फत करण्यात येत आहे. ही चौकशी नेमकी किती दिवसात पूर्ण होईल आणि पोलिसांनी याबाबतीत नेमक्या काय स्टेप्स घेतलेल्या आहेत ?

श्री. वसंत पुरके : सभापती महोदय, याबाबत चौकशी देखील झालेली आहे. संबंधित शाळेचे मुख्याध्यापक आणि स्विमिंग ट्रेनर या दोघांना अटक केलेली आहे. त्यांना न्यायालयीन कोठडी मिळालेली आहे. हे प्रकरण गंभीर आहे. म्हणून शासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. म्हणून सी.आय.डी. मार्फत चौकशी करणार आहोत.

-----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/ SBT/ MAP

**पृ. शी.** : सेंट झेवियर्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या शाळेच्या बँक खात्यातून झालेला अपहार.

**मु. शी.** : सेंट झेवियर्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या शाळेच्या बँक खात्यातून झालेला अपहार याबाबत श्री. रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण, राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते व श्रीमती संजीवनी रायकर यांनी "सेंट झेवियर्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या शाळेच्या बँक खात्यातून झालेला अपहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, नवी मुंबईतील एका मोठया शाळेतील हे गंभीर प्रकरण आहे. शासनाने उत्तरामध्ये मान्य केलेले आहे. या संस्थेमध्ये कोटयवधी रुपयाचा अपहार झालेला आहे. म्हणून या उत्तराच्या अनुषंगाने मी जाणून घेऊ इच्छितो. शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी त्यांनाही याप्रकरणाची माहिती आहे. त्यामुळे त्यांच्याकडे सुध्दा हे प्रकरण पाठविलेले आहे. म्हणून याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी होणे आवश्यक आहे. यासंबंधी शिक्षक व पालक संघाने तक्रार केलेली आहे. संबंधित कॉलेजच्या प्राचार्यांनी सुध्दा तक्रार केली आहे. ज्यांच्या माध्यमातून हा अपहार झाला आहे त्याची आम्हाला माहिती पाहिजे. त्या संस्थेने शासनाची आणि धर्मादाय आयुक्तांची फसवणूक केलेली आहे. त्यामुळे याप्रकरणाची सचिव पातळीवर चौकशी होणार आहे काय ? अशाप्रकारच्या विनाअनुदानित शाळा आहेत त्यांना असे वाटते की, शासनाकडून आम्हाला कोणतेही अनुदान मिळत नाही त्यामुळे शासनाचा कोणताही नियम आमच्यावर बंधनकारक नाही. म्हणून या सगळया विनाअनुदानित संस्थांवर अनुदानित संस्थांप्रमाणे ऑडिट बंधनकारक करणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : या शाळेबद्दल आणि संस्थाचालकाविरुध्द प्राचार्यांनी तक्रार केलेली आहे त्याची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल. इंग्रजी माध्यमाच्या विनाअनुदानित शाळांकडून जास्त डोनेशन घेतले जाते आणि पैशाचा अपहार केला जातो आणि गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात आहे त्याबाबत शासन आणि शासनाच्या सर्व अधिका-यांकडून अशा या शिक्षण संस्थांबद्दल कडक कारवाई केली जाईल.

**उपसभापती** : यानंतर निवेदन क्रमांक 21 घेण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नव्या मुंबईमध्ये हा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे, त्याठिकाणी त्या संस्थेविरुध्द आंदोलन केले जात आहे. त्यासंबंधी मला एक प्रश्न विचारावयाचा होता परंतु आपण मला परवानगी नाकारत आहात.

**उपसभापती** : विधानसभेमध्ये स्थगन प्रस्तावाचे केवळ निवेदन वितरित केले जाते, त्याठिकाणी एकही प्रश्न विचारण्यास परवानगी दिली जात नाही. आपल्या सभागृहामध्ये निदान एक तरी प्रश्न विचारण्यास परवानगी दिली जाते.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, यापूर्वी जी निवेदने झाली त्यापैकी काही निवेदनांवर तर 10-10 प्रश्न विचारण्यात आले आहेत. आतापर्यंत झालेल्या निवेदनांवर मी एकही प्रश्न विचारलेला नाही. आपण रेकॉर्ड तपासून पहावे. नियम 93 च्या निवेदनावर एकच प्रश्न विचारावा हे मला देखील कळते. परंतु न्याय सगळयांना सारखा असावा एवढीच माझी अपेक्षा आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, काल 10 हजार विद्यार्थ्यांनी मोर्चा काढला होता याची शासनाला जाणीव आहे काय आणि शासन त्याची दखल घेणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विद्यार्थ्यांनी काढलेल्या मोर्चाची शासनाला जाणीव आहे. यामध्ये दोन विषय आहेत. संस्थेच्या संचालकांनी 14 कोटीचा अपहार केला असल्यामुळे तेथील प्राचार्यांनी पोलिसांमध्ये तक्रार नोंदविली आहे. आमच्या शिक्षण विभागाचा जो विषय आहे त्यामध्ये त्यांनी पैसा जमवून अपहार केला त्याची चौकशी वेगळी आहे. यामध्ये दोन संस्था आहेत, ई-9575 आणि ई-10257 या क्रमांकाने त्यांनी संस्था रजिष्टर केल्या. त्यांनी शिक्षण खात्याची परवानगी न घेता एक संस्था दुसरीकडे वर्ग केली आहे. त्याबद्दल धर्मादाय आयुक्तांनी कार्यवाही केली पाहिजे. त्याठिकाणी प्रशासक नेमण्याबाबत धर्मादाय आयुक्तांना सूचना केली जाईल. शिक्षण विभागाशी संबंधित विषय आहे त्याबाबत उच्चस्तरीय चौकशी केली जाईल असे मी यापूर्वीच म्हटले आहे.

श्री.वसंतराव काळे : केस ट्रान्सफर केली आणि त्याला सरकारची परवानगी घेतली नाही. अशाप्रकारे परवानगी न घेता दुसरीकडे केस वर्ग कशी झाली ? हा प्रश्न शिक्षण खात्याशी संबंधित आहे.

श्री.हसन मुश्रीफ : शिक्षण खात्याशी संबंधित जो प्रश्न आहे त्याची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल आणि तेथे प्रशासकाची नेमणूक करावी अशा सूचना धर्मादाय आयुक्तांना देण्यात येतील असे सांगितले आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, पत्रकार कक्षामध्ये नियम 93 वरील निवेदने वितरित करण्यात आलेली नाहीत.

**उपसभापती** : निवेदनांचे वितरण करण्यात यावे असे मी मघाशी सांगितलेले आहे.

3....



NTK/ MHM/ SBT/ MAP/ KGS/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,...

श्री.मधुकर सरपोतदार (बसून) : आता एकापेक्षा जास्त प्रश्न विचारले जात आहेत. पण मी आता या निवेदनावर प्रश्न विचारणार नाही.

**उपसभापती** : आपण प्रश्न विचारावा. उलट आता ज्या मा.सदस्यांना प्रश्न विचारावयाचा नाही त्यांना सुध्दा प्रश्न विचारा असे सांगणार आहे. (अडथळा) माझ्यावर हेत्वारोप केले तर ते मलाही आवडणार नाही. मी सगळयांना संधी देत असतो.  मी मघाशी विचारले होते की, सभागृहासमोर 30 निवेदने आहेत, त्यामुळे मा.सदस्यांनी एका निवेदनावर एकच प्रश्न विचारावा. त्याला सर्व मा.सदस्यांनी संमती दिली होती.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार : मी एकही प्रश्न विचारलेला नाही. आपण प्रश्न विचारण्यास परवानगी देत नसाल तर मी खाली बसतो.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांचा मी नेहमी आदर करतो. परंतु माझ्यावर जर हेत्वारोप होणार असतील तर ते योग्य नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण मला प्रश्न विचारण्यास परवानगी दिली नाही ही गोष्ट मला खटकली.

**उपसभापती** : मी नेहमीच सर्वांना संधी देत असतो. आज 30 निवेदने असल्यामुळे मा.सदस्यांनी थोडक्यात उपप्रश्न विचारावेत अशी अपेक्षा आहे.

श्रीमती कांता नलावडे : याप्रकरणी शिक्षण संचालकांमार्फत चौकशी करण्यात येईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई व ठाण्यातील विद्यार्थ्यांनी अकरावी आर्टस्, सायन्स, कॉमर्ससाठी नामांकित महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी केलेले अर्ज

**मु.शी** : मुंबई व ठाण्यातील विद्यार्थ्यांनी अकरावी आर्टस्, सायन्स, कॉमर्ससाठी नामांकित महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी केलेले अर्ज याबाबत सर्वश्री अनंत तरे, अरविंद सावंत व डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री अनंत तरे, अरविंद सावंत व डॉ. नीलम गो-हे, यांनी "मुंबई व ठाण्यातील विद्यार्थ्यांनी अकरावी आर्टस्, सायन्स, कॉमर्ससाठी नामांकित महाविद्यालयामध्ये प्रवेशासाठी केलेले अर्ज" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, आजही बरेचसे विद्याथी 11वीच्या प्रवेशापासून वंचित राहिलेले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना जास्त टक्के गुण आहेत अशा विद्यार्थ्यांना चांगल्या कॉलेंजामधून प्रवेश मिळाला. परंतु ज्या विद्यार्थ्यांना कॉलेजातील मेरीट लिस्ट पेक्षा 5-10 गुण कमी आहेत अशा विद्यार्थ्यांना कॉलेजामधून जागा रिक्त असताना देखील प्रवेश दिला गेला नाही ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा याबाबतीत चौकशी करुन अशा विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून द्याल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : मुंबईमध्ये एकूण प्रवेश क्षमता 1 लाख 31 हजार 688 इतकी आहे आणि एकूण विद्यार्थ्यांची संख्या 1 लाख 10 हजार 125 इतकी आहे. म्हणजे मुंबईमध्ये 21हजार 563 जागा शिल्लक आहेत. ठाण्यामध्ये 67 हजार 620 प्रवेश क्षमता असून विद्यार्थ्यांची संख्या 66377 इतकी आहे. म्हणजे 1243 जागा शिल्लक आहेत. यामध्ये असे झालेले आहे की, चांगल्या कॉलेजमधून प्रवेश मिळावा अशी सर्व पालकांची आणि विद्यार्थ्यांची मागणी आहे. प्रवेशाच्या बाबतीत शासनाने कोणताही हस्तक्षेप करु नये असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. 90 टक्के जागा मेरिट प्रमाणे आणि 10 टक्के जागा मॅनेजमेंट कोट्यातून भरल्या जातात. माननीय मंत्री महोदयांनी विधानसभा आणि विधानपरिषदेतील मा.सदस्यांबरोबर बैठक घेऊन एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहाणार नाही याची काळजी घेतली आहे. परंतु विद्यार्थ्यांना हवे ते कॉलेज मिळणार नाही ही वस्तुस्थिती आहे.

श्री. अनंत तरे : 90 टक्के जागा मेरिट प्रमाणे आणि 10 टक्के जागा मॅनेजमेंट कोट्यातून भरल्या जातात असे मा. मंत्री महोदयांनी उत्तर दिले. परंतु 90 टक्के जागा 80 टक्क्यावर आणून मॅनेजमेंट कोटा ज्या कॉलेजांनी वाढविलेला असेल त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : होय.

श्री. जितेंद्र आव्हाड : या प्रवेश प्रक्रियेमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासंबंधीचे पत्र मी संबंधित विभागाला दिलेले आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, प्रवेशप्रक्रियेमध्ये एस.सी.,एस.टी. व्ही.जे.एन.टी. आणि ओ.बी.सी. यांच्यासाठी आरक्षण लागू केलेले आहे. पहिल्यांदा खुल्या प्रवर्गाची मेरिट लिस्ट लावताना जर मागासवर्गीय विद्यार्थी मेरिटमध्ये असेल तर त्याला खुल्या प्रवर्गातून प्रवेश दिला गेला पाहिजे. परंतु असे होत नाही. खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या मेरिट लिस्ट नंतर मागासवर्गीयांची मेरिट लिस्ट लावली जाते. काही

...3..



(श्री. जितेंद्र आव्हाड...)

कॉलेजांमधून रिझर्व्ह कॅटगरीचे पर्सेण्टेज हे ओपन कॅटेगरीच्या पर्सेण्टेजपेक्षा जास्त झालेले आहे. हे कसे काय झाले ? तेव्हा याबाबतीत काय कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : माननीय सदस्यांनी अशा कॉलेजांची नावे दिली तर त्याबाबतीत अवश्य चौकशी करु.

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

**पृ.शी.** : रायगड जिल्ह्यातील खोपोली शहरातील सुभाषनगर परिसरातील दरड कोसळून त्याखाली अनेक कुटुंबे

सापडण्याची शक्यता

**मु.शी** : रायगड जिल्ह्यातील खोपोली शहरातील सुभाषनगर परिसरातील दरड कोसळून त्याखाली अनेक कुटुंबे सापडण्याची शक्यता याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, शरद पाटील, अनंत तरे व डॉ. नीलम गो-हे वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम (सावर्जनिक उपक्रम) मंत्री : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, शरद पाटील, अनंत तरे व डॉ.नीलम गो-हे यांनी "रायगड जिल्ह्यातील खोपोली शहरातील सुभाषनगर परिसरातील दरड कोसळून त्याखाली अनेक कुटुंबे सापडण्याची शक्यता"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला आपण अनुलक्षून निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. जयंत प्र. पाटील : सुभाषनगर परिसरातील दरड द्रुतगती मार्गामुळे कोसळणार नसेल तर ती कशामुळे कोसळेल ? तसेच अशा कोसळणा-या दरडीच्या बाबतीत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 14:10

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, खोपोली येथील सुभाषनगर परिसरातील अतिशय मोठी दरड कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे तयार करण्यात आला त्यावेळी त्या ठिकाणी ब्लास्टींग करण्यात त्यामुळे दरड कोसळण्याची शक्यतेचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केलेला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे करीत असताना कंट्रोल ब्लास्टींग केले गेले आहे. कंट्रोल प्रकारचे ब्लास्टींग केले असल्यामुळे अडीच ते तीन कि.मी.पर्यन्त काहीही परिणाम झालेला नाही. सुभाषनगर येथे दरड कोसळण्याचे संकट आलेले आहे त्याचे कारण वेगळे असू शकेल. सभापती महोदय, हायवे निर्माण करीत असताना केलेल्या ब्लास्टींगचा या दरडीशी काही संबंध येत नाही. सुभाषनगर येथील वस्तीवर दरड कोसळण्याचे संकट आलेले आहे. त्या ठिकाणची स्थानिक नगरपरिषद, तसेच तेथील स्थानिक प्रशासकीय अधिकारी आहेत ते या बाबतची निश्चितपणे दखल घेतील.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी निवेदनात म्हटले आहे की, "या सुरुंग स्फोटाचा सुभाषनपगर परिसरावर परिणाम होण्याची शक्यता दिसून येत नाही." ही जी दरड आहे त्या दरडीखाली 300 कुटुंबे राहतात. सभापती महोदय, स्थानिक नगरपषिदेकडे यासंबंधीची यंत्रणा नाही. येथील नगरपालिका "क" वर्गामधील आहे. म्हणून याबाबतीत शासनाने काही तरी पावले उचलली पाहिजेत. शासनाकडून याबाबतीत काही पाऊले उचलली जातील काय ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकारी-यांचा निदर्शनास ही गोष्ट आणून देण्यात येईल. मी मघाशी असे उत्तर दिले आहे की, मुंबई-पुणे रस्त्याचा आणि त्या दरडींचा काही संबंध येत नाही. स्थानिक प्रशासनास याबाबतीत दखल घेण्यास कळविण्यात येईल.

श्री. जी.एल.अैनापुरे : त्या दरडीखाली राहणारी कुटुंबे अनधिकृत आहेत. त्यामुळे त्या कुटुंबांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी स्थानिक नगरपालिका घेत नाही. जिल्हा प्रशासन देखील यासंबंधी दखल घेत नाही. या ठिकाणी दरड कोसळण्याची भिती असल्यामुळे त्या कुटुंबियांच्या जिवाला धोका आहे. म्हणून नियमाच्या बाहेर जाऊन या कुटुंबियांना प्रोटेक्शन देणे किंवा त्यांचे दुस-या ठिकाणी स्थलांतर करणे हाच एकमेव यामधील मार्ग आहे. त्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याचा बाबतीत शासन विचार करील काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सुभाषनगर येथील वसाहत ही अनधिकृत आहे हे खरे आहे. ही वसाहत अनधिकृत असली तरी त्या कुटुंबियांच्या जिविताचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. या कुटुंबियांचे दुस-या ठिकाणी स्थलांतर करता येऊ शकते काय याबाबतीत नगर परिषद, स्थानिक प्रशासन याबाबतीत निर्णय घेऊ शकतात. परंतु पुन्हा याबाबतीत स्थानिक प्रशासनाला यासंदर्भातील कल्पना देण्यात येईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर,भंडारा,वर्धा आणि गोंदिया या भागात जपानी मेंदुज्वराची आलेली साथ.

**मु. शी.** : नागपूर,भंडारा,वर्धा आणि गोंदिया या भागात जपानी मेंदुज्वराची आलेली साथ याबाबत डॉ.दीपक सावंत,श्री. विलास अवचट वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत,श्री.विलास अवचट यांनी "नागपूर,भंडारा,वर्धा आणि गोंदिया या भागात जपानी मेंदुज्वराची आलेली साथ"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, निवेदनानुसार पाहिले तर 2003-03,2003-04,आणि 2004-05 या तिन्ही वर्षी जॅपनीज एन्सेफेलायटीसची साथ आलेली आहे. या साथीत नागपूर,भंडारा, गोंदिया, वर्धा हेच जिल्हे ॲफेक्टेड झालेले आहेत. हा आजार सॅडफ्लॉय मुळे होतो असे निवेदनात म्हटले आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, हा रोग गेल्या तीन वर्षापासून त्या विभागात येतो आहे आणि त्यामुळे रुग्ण मृत होत आहेत. 2002-03 या वर्षात या आजारामुळे साधारणपणे 16 मृत्यू झालेले आहेत. 2003-04 या वर्षात 7 रुग्णांचा मृत्यू झालेला असून 6 रुग्णांना या साथीच्या रोगाची लागण झालेली आहे.

यांनंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

सभापती महोदय, हा रोग आटोक्यात आणण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना पूर्वी का घेतल्या नाहीत ?तसेच रक्तजल नमुन्याचे निष्कर्ष 13.7.2005 रोजी प्राप्त झाले आहेत ते 19.7.05 रोजी का पाठविले आणि यासाठी एवढा उशीर का लागला ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना घेतल्या होत्या. एनआयव्ही या संस्थेकडून त्यासंबंधातील रिपोर्ट आले आहेत.ही साथा 2004-05 मध्ये ही साथ नियंत्रणाखाली आली होती. आताचे जे रक्तजल नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते त्यामध्ये हा चंडिपुरा व्हायरस आहे. नवीनच आहे. 1965 साली भारतात आणि नागपूरमध्ये हा आढळून आला होता आणि अचानक ताप येऊन काही जणांचे मृत्यू त्यामध्य झाले होते. 36 जणांना लागण झाली होती. 20 मृत्यू झाले होते. प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पीएचसी सेंटर्स,ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हा सामान्य रुग्णालये याठिकाणी उपचारांची सोय आहे. पीएचसीमध्ये डॉक्टर्सची उपलब्धता आहे. चंडिपुरा या व्हायरसचा प्रादुर्भाव प्रामुख्याने ओलसर भाग,शेणाचे खत,गुरांचा गोठा किंवा घरामध्ये ओलसरपणा असतो तेथून होतो. याठिकाणी पूर्ण फवारणी केलेली आहे. चार बाधित जिल्हे आहेत त्याठिकाणी सुध्दा फवारणी करण्यात आली आहे. राज्यमंत्री गेले होते. व्हीजीट दिलेली आहे. परिस्थिती नियंत्रणाखाली आहे. मेडिकल कॉलेजमध्ये सुध्दा चांगल्या पध्दतीने गरज आहे तेथे मेडिकल ट्रीटमेंटची संपूर्ण व्यवस्था केलेली आहे. नव्यानेच परिस्थिती उद्‌भवल्यामुळे ती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न सार्वजनिक आरोग्य विभागाने केलेला आहे. लेट रिपोर्ट झालेला नाही. 13 जुलै रोजी रिपोर्ट आला. 15-20 दिवस लागतात. रिपोर्टची वाट न पाहता सस्पेक्टेड केसेस म्हणून उपाययोजना केली होती. विलंब झालेला नाही आणि परिस्थिती आटोक्यात आहे.

------

**उपसभापती** : पुढील निवेदन क्र. 25 संदर्भात या खात्याचे मंत्री सभागृहात नाहीत. त्यांना निरोप पाठवू. ते नंतर घेऊ. तोपर्यंत पुढील निवेदन चर्चेला घेऊ.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: गिरगांव येथील पिंपळवाडी भागातील म्हाडाच्या इमारतीचे बांधकाम व पुनर्बांधणी

**मु.शी.**: गिरगांव येथील पिंपळवाडी भागातील म्हाडाच्या इमारतीचे बांधकाम व पुनर्बांधणी याबाबत श्री. विलास अवचट,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दयानंद म्हस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. विलास अवचट,वि.प.स. यांनी गिरगांव येथील पिंपळवाडी भागातील म्हाडाच्या इमारतीचे बांधकाम व पुनर्बांधणी या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....3

**निवेदनानंतर**

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, म्हाडाच्या दृष्टिकोनातून गिरगांव येथील पिंपळवाडी येथील हा ऐतिहासिक प्रकल्प आहे याची मला कल्पना आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे म्हाडाला 134 गाळे मिळणार आहेत याचीही मला कल्पना आहे. परंतु म्हाडाने याठिकाणी जो आततायीपणा केला आहे त्याबद्दल मी बोलू इच्छितो. याठिकाणी निवेदनात म्हटले आहे की, विकासकातर्फे तसेच म्हाडातर्फे नोटीस बजाविण्यात आली होती. सदर नोटीसा भाडेकरुंनी स्वीकारल्या परंतु त्यांची पोच देण्यास नकार दिला असून त्यांनी त्यांच्या जुन्या खोल्या रिकाम्या केल्या नाहीत. रहिवाशांनी प्रखर विरोध दर्शविला आणि पोलिसांना पाचारण करण्यात आले. सभापती महोदय, एवढा मोठा प्रकल्प आहे आणि म्हाडाला 134 गाळे मिळणार आहेत परंतु यामध्ये भाडेकरुंच्या काही समस्या होत्या. या समस्यांना सामोरे न जाता येनकेन प्रकारेण या खोल्या ताब्यात घेऊन विकासकाने पर्यायी जागा घेण्याचा हेतू होता. ज्या विकासकाने जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत त्या मंत्रीमहोदयांनी पहाव्यात.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट ..

त्या ठिकाणी पोलिसांना का पाचारण करण्यात आले होते.? एका बाजूला आपण असे सांगत आहात की त्यांना नोटीसेस दिल्या होत्या.अधिनियमातील कलम 51 प्रमाणे सबंधितांना नोटीस दिल्यानंतर आपण त्यांना पर्यायी जागा देतो आणि या जागा त्यांना खाली करावयास सांगतो..परतु आज त्यांनी पावतीसुध्दा घेतलेली नाही तेव्हा याबाबतीत निश्चितपणे शासन कोणती कारवाई करणार आहे? माननीय मंत्रिमहोदयांना मला दुसरा असा प्रश्न विचारावयाचा आहे की, त्यांना आपण 23 तारखेपर्यन्त मुदत दिलेली आहे. म्हणजे आठ दिवसांची मुदत वाढवून दिलेली आहे. काही भाडेकरु माझ्याकडे आले होते व त्यांनी मुदत वाढवून मिळावी अशी मागणी केलेली आहे. आपला प्रकल्प रखडत नाही, त्याचे काम चालू आहे तसेच न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे ठराविक मुदतीत हा प्रकल्प पूर्ण करावयाचा आहे तेव्हा माझी माननीय मंत्रिमहोदयांना अशी विनंती आहे की दिनांक 31.7.2005 पर्यन्त म्हणजे आणखी आठ दिवसांची मुदत वाढवून द्यावी. तेव्हा त्यांना ही मुदत वाढवून देण्यात येणार आहे काय ?

श्री.दयानंद मस्के : त्यांना मुदत वाढवून देण्याचा प्रश्न निर्माण झालेला नाही. या संदर्भात त्या ठिकाणचे खासदार आणि बाकीच्या लोकांची एक बैठक झाली होती आणि सर्व भाडेकरुची समोरच्या 9 नंबरच्या इमारतीमध्ये सोय करण्यात आलेली आहे.त्यामुळे हा प्रश्न निकाली निघालेला आहे.

श्री.विलास अवचट : माननीय मंत्रीमहोदय खासदाराच्या बैठकीसबंधी संगत आहेत परंतु या सभागृहाचा सदस्य या नात्याने मी त्यांना विनंती करीत आहे.दिनांक 23.7.2005 पर्यन्त खोल्या रिकाम्या करुन इमारत क्रमांक 9 मध्ये स्थलांतरित करण्याविषयी त्यांना सांगण्यात आल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.म्हणजे आठ दिवसाची मुदत वाढवून देण्यात आली आहे का?

श्री.दयानंद मस्के :आज हे सर्व भाडेकरु स्थलांतरित झालेले आहेत.

श्री.विलास अवचट : परंतु काही भाडेकरु जर अजूनही स्थलांतरित झालेले नसतील तर ही मुदत वाढवून देणार आहात काय ?

श्री.दयानंद मस्के :स्थलांतरित झाले नसतील तर ही बाब तपासून त्यांच्यासाठी मुदत वाढवून देऊ .परंतु भाडेकरु स्थलांतरित झालेले आहेत

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : ज्ञानेश्वर नगर ,शिवडी येथील संक्रमण शिबिरात राहत असलेले घुसखोर

मु.शी : ज्ञानेश्वर नगर, शिवडी येथील संक्रमण शिबिरात राहत असलेले घुसखोर या बाबत श्री.मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) :अध्यक्ष महोदय, श्री.मधुकर चव्हाण यांनी " ज्ञानेश्वर नगर शिवडी येथील संक्रमण शिबिरात राहत असलेले घुसखोर "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे.निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( ्प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.मधुकर चव्हाण :या निवेदनामध्ये माननीय मंत्रिमहोदयांना काही सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री.दयानंद मस्के : नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय,ज्ञानेश्वर नगर येथील 128 गाळया पैकी 47 गाळे कोणाला दिले आहेत, 2 गाळे कोणाला दिलेले आहेत, 66 गाळे कोणाला दिलेले आहेत , दहा गाळे कोणाला दिलेले आहेत व 3 गाळे कोणाला दिलेले आहेत याची विगतवारी या निवेदनात देण्यात आलेली आहे. तीन गाळे रिकामे दाखविलेले आहेत. आणि निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये सात गाळे रिकामे दाखविलेले आहेत.तेव्हा दोन्हीमध्ये हा फरक का आहे? देखभाल विभाग व भाडे वसुली कार्यालयासाठी वापरात असलेले गाळे तीन दाखविण्यात आलेले आहेत म्हणजे हे गाळे रिकामे नाहीत. एकही गाळा रिकामा नाही परंतु गाळा क्रमांक 502,513,611,702,703 व 704 हे रिक्त आहेत.असे निवेदनाच्या तिस-या परिच्छेदात सांगितले आहे. तेव्हा त्या ठिकाणी 135 गाळे आहेत काय ? गेल्या मार्च महिन्यात असे उत्तर दिले होते की, त्या ठिकाणी फक्त 90 घुसखोर आहेत परंतु आता निवेदनात असे म्हटलेले आहे की,त्या ठिकाणी 653 घुसखोराना जानेवारी महिन्यापासून बाहेर काढलेले आहे". हे उत्तर बरोबर आहे.सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारु इच्छितो की, हे सरकारी गाळे आहेत आणि ती शासकीय मालमत्ता आहे. तेव्हा घरफोडी केल्याच्या गुन्हयाखाली त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा का दाखल केला नाही ? या घुसखोरांना तेथून काढण्यात आलेले आहे. आपल्याकडे एक फॉर्म असतो व त्यातून त्या घुसखोरांना विचारले जाते की,तुझी जुनी इमारत कोणती आहे ? व्हेकेशन नोटीस तुला दिली आहे काय ? तुला येथे जागा कोणी दिली होती ? या घुसखोराच्या विरुध्द घरफोडी केल्याच्या गुन्हयाखाली फौजदारी गुन्हा पोलीस स्टेशनमध्ये का दाखल केला नाही ? अशा प्रकरणांमध्ये ज्यांनी पैसे दिले आहेत त्याला ॲरेस्ट केले जाते आणि घुसखोरालाही ॲरेस्ट केले जाते. तेव्हा 653 घुसखोरांना अटक करुन त्यांनी घरफोडी केली होती असा आरोप लावून त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा का दाखल केला नाही ?

श्री.दयानंद मस्के : आपण घुसखोरांना तेथून काढून टाकत असतो. कोणत्याही परिस्थितीत आपण त्यांना तेथे राहू देत नाही.यासाठी प्राधिकरणाने मुख्य दक्षता अधिकारी श्री.खिलानी यांना

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दयानंद मस्के ...

चौकशी करण्याबाबतचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्यांचा चोकशीचा अहवाल आल्या नंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : माननीय मंत्रिमहोदयांना मला असे सांगावयाचे आहे की, काही लोकांचे पाप आपण डोक्यावर घेऊ नका.1996 साली युती शासन सत्तेवर असतांना त्यांनी पोलिसांना काही अधिकार दिले होते. यातील काही गुन्हे आपण .आर्थिक गुन्हा अन्वेषण विभागाकडे तपासासाठी देत असतो.जो घुसखोर मिळेल त्याच्याकडून एक फॉर्म भरुन घेतला जातो व तुला येथे टाळे कोणी फोडून दिले हे विचारले जाते आणि तो ज्या व्यक्तीचे नाव सांगेल त्या दलालाच्या विरुध्द आपण फौजदारी गुन्हा दाखल करीत असतो. त्याने जर कोणाचे नाव सागितले नाही तर त्या व्यक्तीने टाळे फोडून सरकारी मालमत्तेचा कब्जा घेतला म्हणून त्या व्यक्तीच्या विरुध्द जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करीत असतो..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (पुढे चालू...)

सभापती महोदय, मला मंत्री महोदयांकडून नेमके उत्तर पाहिजे. आपण त्या धुसखोरांवर पोलीस कारवाई का केली नाही ? हे जे 643 घुसखोर लोक आहेत ते स्वत:च त्या खोल्यांमध्ये गेले असतील तर त्यांचेवर आपण फौजदारी कारवाई करावयास पाहिजे आणि समजा त्यांना दुसऱ्या कोणी त्या जागेमध्ये जाण्यास सांगितल्यामुळे, पैसे घेऊन वा अन्य प्रकारे, ते त्या जागांमध्ये रहावयास गेले असतील तर ज्यांच्या कोणाच्या सांगण्यावरून ते तेथे गेले असतील त्यांच्यावर फौजदारी कारवाई व्हायला पाहिजे. तशी ती आपण केली आहे काय ? नसल्यास, करणार आहात का ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली सूचना लक्षात घेऊन अशी प्रकरणे असतील तर त्यांचेवर त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझ्या पहिल्या प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. आपण येथे अगोदर सांगितले की, तेथे खोल्या रिकाम्या नाहीत परंतु पुढे म्हटले आहे की, 7 खोल्या रिक्त आहेत. तर हा फरक का झाला ?

श्री. दयानंद मस्के : एकंदर 10 खोल्या रिक्त आहेत.

****

....... पीपी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईतील उपकर प्राप्त इमारतीची दुरूस्ती करण्यासाठी आमदारांचा स्थानिक विकास निधीचा वापर करण्यास केलेली बंदी.

**मु.शी.** : मुंबईतील उपकर प्राप्त इमारतीची दुरूस्ती करण्यासाठी आमदारांचा स्थानिक विकास निधीचा वापर करण्यास केलेली बंदी याबाबत श्री.विलास अवचट यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

श्री.दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.विलास अवचट यांनी "मुंबईतील उपकर प्राप्त इमारतीची दुरूस्ती करण्यासाठी आमदारांचा स्थानिक विकास निधीचा वापर करण्यास केलेली बंदी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती. तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. ... )

...... पीपी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 अन्वये मा.गृहनिर्माण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. म्हाडा संबंधात आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्याबाबत माननीय सभापतींनी सांगितले होते की, 23 तारखेला निवेदन होईल. पण उद्या आपले अधिवेशन संपणार आहे आणि उद्या केवळ विधेयक चर्चेला घेतली जाणार आहेत. मी माझ्या नियम 93 च्या सुचनेमध्ये विनंती केली होती की. आमदारांचा जो विकास निधी आहे हा घरदुरूस्ती मंडळाला आम्ही देत होतो ते आता आपण बंद केले आहे. या संदर्भात हे जे निवेदन आम्हाला देण्यात आलेले आहे त्याबाबतीत आमच्या पीजन होलमध्ये 18 जुलै 2005 रोजीचे एक शुद्धीपत्रक टाकण्यात आलेले आहे. एकीकडे माननीय राज्यमंत्री आपल्या या निवेदनात म्हणताहेत की, उपकरप्राप्त इमारतीच्या दुरूस्ती कामासाठी आमदार निधी वापरण्यासंबंधी लोक प्रतिनिधींच्या तीव्र भावना विचारात घेऊन, उपकरप्राप्त धोकादायक इमारतींच्या दुरूस्तीसाठी आमदार निधी वापरण्याच्या दृष्टीने 1 जून 2005 च्या शासन निर्णयातील अनुक्रमांक 16 व 127 येथील उपरोक्त अटी शिथिल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. म्हणजे त्या दृष्टीने आपल्याकडून कार्यवाही करण्यात येत आहे. आणि असे शुद्धीपत्रक आलेले आहे त्याचीही माहिती माननीय राज्य मंत्र्यांना नाही. तर मग आम्ही याबाबत काय समजायचे ?

**उपसभापती** : याबाबतचा खुलासा अधिवेशन संपण्यापूर्वी मंत्र्यांनी माझ्या दालनात करावा असे मी सांगतो.

श्री. दयानंद मस्के : ठीक आहे.

****

..... पीपी 4 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : विदर्भातील काही जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह पावसाने मांडलेले थैमान.

**मु.शी.** : विदर्भातील काही जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह पावसाने मांडलेले थैमान. याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, शरद पाटील, अनंत तरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

डॉ.राजेंद्र शिंगणे (मदतकार्य व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र.पाटील, शरद पाटील, अनंत तरे यांनी यांनी विदर्भातील काही जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह पावसाने मांडलेले थैमान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती. तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. ... )

...... पीपी 5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मौजे सातवली, ता.वसई, जि.ठाणे येथील आदिवासींच्या जमिनी बेकायदा बिगर आदिवासींच्या नावे करणे.

**मु.शी.** : मौजे सातवली, ता.वसई, जि.ठाणे येथील आदिवासींच्या जमिनी बेकायदा बिगर आदिवासींच्या नावे करणे याबाबत सर्वश्री. जगदीश गुप्ता,पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. जगदीश गुप्ता यांनी "मौजे सातवली, ता.वसई, जि.ठाणे येथील आदिवासींच्या जमिनी बेकायदा बिगर आदिवासींच्या नावे करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली होती. तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. ... )

...... पीपी 6 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी सुचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे</u>.**

श्री. बाबा सिद्दीकी (अन्न व औषधी द्रव्ये) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, सागर मेघे, डॉ.वसंत पवार यांनी दिनांक 12.7.2005 रोजी दिलेल्या लक्षवेधी सुचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्या प्रमाणे, अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेसे : कृपया सोबतची अधिक माहिती येथे छापण्यात यावी. )

....... पीपी 7 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधु चव्हाण : सभापती महोदय, आम्ही सकाळी 10 वाजल्यापासून येथे आलो आहोत. तेव्हा कृपया आता आपण अर्धा तास सुटी घेतली तर बरे होईल.

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 3.00 वाजता पुन्हा भरेल.

सभागृहाची बैठक दुपारी 2.28 वाजता 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.

( यानंतर श्री.जागडे ....क्यूक्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी : मा. उपसभापती )**

पृ.शी. : मॅफकोच्या निर्गुंतवणूकीबाबत

मु.शी.: मॅफकोच्या निर्गुंतवणूकीबाबत सर्वश्री अशोक मोडक, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( दुग्धविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री अशोक मोडक, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी मॅफकोच्या निर्गुंतवणूकीबाबत या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, निवेदनाच्या शेवटच्या पानावर असे म्हटले आहे की, " दि. 3.6.2005 रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली व त्यामध्ये मॅफकोच्या निर्गुंतवणूकीकरणाची कार्यवाही सिकॉममार्फत करण्याचा निर्णय झाला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे." सभापती महोदय, ही बैठक 3 जून रोजी झाली आणि 8 जून रोजी मॅफकोच्या एम. डी. ना एक पत्र शासनाने पाठविले आहे. त्यानुसार आता मॅफको बंद करण्यात येणार आहे. त्या पत्रात असे म्हटले आहे की, "M.D. should write to M.D. SICOM for that particular scheme of closure of MAFCO." 3 जूनच्या बैठकीत मॅफकोच्या निर्गुंतवणूकीकरणाची कार्यवाही करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आणि नंतर त्याच बैठकीचा आधार घेऊन एम. डी. पाठविलेल्या पत्रात मॅफको बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे त्या ठिकाणी आता आतंग पसरला आहे. मॅफकोचे कर्मचारी हे आझाद मैदानावर उपोषणाला बसले आहेत. सभापती महोदय, वर्तमानपत्रात या बाबत उलटसुलट बातम्या आलेल्या आहेत. आता त्या ठिकाणी जो आतंग माजला आहे, त्याला जबाबदार कोण आहे ? शासनाचे या बाबत नेमके धोरण काय आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, जे उपक्रम तोट्यात चालतात, ते बंद करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. त्याप्रमााणे मॅफकोचा अभ्यास करण्यासाठी उपासनी समिती नेमली होती. या कर्मचा-यांना कशा प्रकारे व्हीआरएस द्यावा. तसेच असलेल्या प्रॉपर्टीचे काय करावे, या बाबतचा अभ्यास करुन या बाबतचा अहवाल देण्यासाठी उपासनी समिती नेमली होती. त्याप्रमाणे या समितीने आपला अभ्यास सुरु केला. परंतु नंतर श्री. उपासनी यांनी राजिनामा दिला. त्यानंतर त्यांच्या जागी श्री. पिंटो आले. त्यानंतर मॅफकोच्या निर्गुंतवणूकीकरिता इक्रा या सल्लागार एजन्सीची नियुक्ती केली. इक्रा या संस्थेने मॅफकोच्या खाजगीकरणाकरिता प्रथम मागविलेल्या निविदामध्ये फक्त एकाच पार्टीने निविदा सादर केली होती. या ठिकाणी एकच निविदा आली असल्यामुळे ही बाब रद्द करण्यात आली. त्यानंतर श्री. पिंटो यांनी राजिनामा दिला. त्यानंतर या बाबतचा विचार करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली हाय पॉवर कमिटी नेमली. दि.3.6.2005 रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली व त्यामध्ये मॅफकोच्या निर्गुंतवणूकीकरणाची कार्यवाही सिकॉममार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला. सभापती महोदय,

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ.....

मॅफकोमध्ये 589 कर्मचारी होते. त्यातील 480 कर्मचा-यांनी व्हीआरएस घेतला आहे. आता मॅफकोमध्ये 109 कर्मचारी आहेत.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

आता त्यांची आर्थिक परिस्थिती अशी आहे की, 18 लाख रुपये कर्मचाऱ्यांच्या एका महिन्याच्या पगारावर खर्च होत आहेत. आणि 12 लाख रुपयांचे स्लॉटर हाऊसचे उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे जोपर्यंत निर्गुंतवणूक होणार नाही तोपर्यंत हे बंद केले जाणार नाही. निर्गुंतवणूक झाल्यानंतर तीन वर्षेपर्यंत त्या कर्मचाऱ्यांना नोकरीमध्ये ठेवावे लागेल. त्या कर्मचाऱ्यांना जर व्ही.आर.एस. घ्यायची असेलतर त्यांनी ती घ्यावी. त्यांनी व्ही.आर.एस. घेतल्यानंतर त्यांना पैसे देऊन हे काम आपल्याला संपवावे लागेल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, माझा बेसिक मुद्दा वेगळा आहे. 3 जून 2005 ला निर्गुंतवणूक करण्यासंबंधीचा निर्णय झाला होता तर केवळ 5 दिवसात असे आभाळ काय कोसळणार होते? मंत्रालयातून एम.डी. ना कळविले गेले की, "That the concern be closed down" याचे आम्हाला उत्तर पाहिजे. असंतोष किंवा आतंग हा त्यामुळे माजला आहे.

श्री. हसन मुश्रीफ : आम्ही क्लोजर लावून बंद करणार नाही.

डॉ. अशोक मोडक : मूळ हे पत्र त्यांनी पाठविले आहे त्यामध्ये कर्मचाऱ्यांचा असंतोष व्यक्त होत आहे....

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासन म्हणून मी सांगतो की, ते बंद होणार नाही.

डॉ. अशोक मोडक : तरमग मुळात हे कां पाठविले?

श्री. हसन मुश्रीफ : त्याची चौकशी करु.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, क्लोजर लावण्याबाबत कुणी कळविले? त्यावर मंत्रिमहोदयांनी चौकशी करतो असे उत्तर दिले. या निर्गुंतवणुकीनंतर आपण 109 कर्मचाऱ्यांना 3 वर्षापर्यंत नोकरीत ठेवण्याबाबत अट घालणार आहात. आमचे म्हणणे आहे की, आपण त्यांना सेवानिवृत्त होईपर्यंत ठेवावे. त्यांना जर व्ही.आर.एस. घ्यायची असेल तर मी समजू शकतो. परंतु ज्यांना नोकरी करायची आहे त्यांना तीन वर्षाची अट कां घालता, ती आपण काढून टाकणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : जे कुणी मॅफ्को घेणार आहे ते् कर्मचारी घेणार नाहीत. म्हणून त्या ठिकाणी आपण तीन वर्षाची अट घालीत आहोत की, निदान कुणीतरी निविदा भरण्यासाठी पुढे यावे. पूर्णपणे तोटयात चालणारे हे महामंडळ शासनाला चालविणे शक्य नाही. या 109 लोकांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ....

व्ही.आर.एस. घेतलेला नाही. त्यामुळे निर्गुंतवणुकीसाठी कुणी पुढे येणार नाहीत याकरिता ही अट घातली आहे. त्यांना 3 वर्षे नोकरीवर ठेवून त्यांचा नोकरीचा जो काही सेवाकाळ असेल तो त्यांना देऊन त्यांना हटविण्याशिवाय दुसरा मार्ग नाही.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, आपण कबूल केले आहे. 35 वर्षाची उलाढाल आहे. म्हणून त्यांच्या निर्वाहाचा प्रश्न आहे.आपण कबूल केले आहे की, 2 कोटीवरुन 45 कोटींपर्यंत उलाढाल गेली आहे. मागील 7-8 वर्षाचा अपवाद वगळता ते तोटयात गेले त्याला व्यवस्थापक जबाबदार आहेत. माझी विनंती अशी आहे की, या संबंधी आपण तातडीने निर्णय न घेता संघटनेला विश्वासात घेतले पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : यासंबंधी त्यांच्या संघटनेबरोबर चर्चा करु.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वडाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाची मोडकळीला आलेली इमारत.

**मु.शी.**: वडाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाची मोडकळीला आलेली इमारत. यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, वि.प.स. यां-ी दिलेली लजवेधी सूच-ा.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-े -ियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वज-िज महत्वाच्या बाबीजडे स-मा-ा-ीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी -िवेद-ा ज़रावे, अशी वि-ंती ज़रतो.

"मुंबईतील वडाळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहाच्या सिध्दार्थ इमारतीची अवस्था अतिशय बिकट असून कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता असल्याने महापालिकेने त्याप्रमाणे नोटीस दिलेली असणे, त्यामुळे या इमारतीच्या तळमजल्यावर काही वर्षांपासून सुरु केलेली इंग्रजी माध्यमाची शाळा यंदा शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशीच बंद करण्यात आल्याची नोटीस व्यवस्थापनाने लावणे, यामुळे 700 बालकांची शिक्षणाची अडचण निर्माण झालेली असणे, त्यामुळे पालकवर्गात संतापाचे वातावरण निर्माण होणे, यांसंदर्भात शासनाने विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करणे जरुरीचे असणे, शासनाने सदर इमारत तातडीने दुरुस्त करुन 700 विद्यार्थ्यांचे शेक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : अध्यज महाराज, लजवेधी सूच-ेसंबंधीच्या -िवेद-ाच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ा आधीच वितरीत ज़ेल्या असल्यामुळे मी ते -िवेद-ा आपल्या अ-ुमती-े सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : -िवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

-िवेद-ा

( प्रेस : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, वडाळयाचे सिध्दार्थ वसतिगृह हे आंबेडकरी चळवळीचे मोठे केंद्रे होते. बहुरंगी असलेल्या या इमारतीचे अंतरंग कोसळण्याच्या अवस्थेत आहेत. आज त्या ठिकाणी विद्यार्थी रहात नाहीत. अन्य नोकरदार माणसे त्या ठिकाणी रहातात. बऱ्याच वर्षापासून त्या ठिक्राणी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंद केले आहे. प्रश्न असा निर्माण होतो की, त्या ठिकाणी अनधिकृत प्राथमिक शाळा कधीपासून चालवायला दिली? कुणी दिली? या संस्थेची इमारत पडायला आली आहे म्हणून महानगरपालिकेने त्या शाळेला दुसरीकडे जागा दिली आहे काय? असल्यास, कुठे?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय,1992 सालापासून ही शाळा आहे. त्याठिकाणी माध्यमिक विद्यालयाला शासनाची परवानगी आहे. परंतु प्राथमिक शाळेसाठी महानगरपालिकेची परवानगी घेतलेली नाही. गेल्या वर्षी या शाळेत 700 विद्यार्थी होते, आज 500 विद्यार्थी आहेत. ही इमारत पडण्याच्या अवस्थेत आहे, मोडकळीला आलेली आहे. या 500 विद्यार्थ्यांचे भवितव्य या इमारतीमध्ये गुंतून पडले आहे. ही इमारत खाली केली पाहिजे अशी महानगरपालिकेने नोटीस दिली. म्हणून या विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांच्या विद्यार्थ्यांनी कुठे प्रवेश घ्यायचा हा प्रश्न निर्माण झाल्यामुळे पालकांनी शाळेच्या संचालकांना भेटून पुन्हा ही शाळा सुरु करायला लावली. 13.6.2005 पासून शाळा सुरु करता येणार नाही अशी नोटीस दिली तरी पालकांच्या आग्रहामुळे ही शाळा सुरु केली. सभापती महोदय, या शाळेतील विद्यार्थ्यांची व्यवस्था बन्सीगर अग्रवाल नावाची महानगरपालिकेची शाळा आहे त्याठिकाणी करणार आहोत. त्याचबरोबर...

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

मुंबई पब्लीक स्कूल, जी.आय.एस. आणि सिताराम प्रकाश हायस्कूल या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची सोय करीत आहोत. पण याबाबतीत पालक, विद्यार्थी या सर्वांना समजावून सांगावे लागेल की, या इमारतीत मुलांचे भवितव्य चांगले नाही, ती शाळा पडावयास आली आहे. अशा वेळी तेथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय होणार नाही यादृष्टीने शासन त्यांची दुसरीकडे सोय करेल.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, आता ही शाळा बंद झाली आहे आणि तेथील विद्यार्थ्यांना दुसरीकडे सामावून घेतले आहे असे माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे आहे का?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पूर्वी या शाळेमध्ये 700 विद्यार्थी होते, सध्या तेथे 500 विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, तेथे शाळा चालू करावी. परंतु शासन आणि महानगरपालिका या विद्यार्थ्यांचे दुसरीकडे समायोजन करीत आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, या विद्यार्थ्यांचे समायोजन कुठे करीत आहात ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच या शाळांची नावे सांगितली आहे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, महाराष्ट्रात अनेक शाळा विनापरवाना सुरु आहेत. पण ज्यावेळेला या शाळेची इमारत मोडकळीस आली, त्यावेळी त्यांनी महानगरपालिकेकडे अर्ज केला नाही का ? याची चौकशी करावी. शासनाने नागपूरला 1 रुपया दराने 10 ते 15 एकर जमीन दिलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने सुरु असलेली शाळा गरीब लोक चालवित आहेत. म्हणून शासनाने या शाळेसाठी दुस-या जागेची व्यवस्था करावी आणि त्या शाळेला मान्यता द्यावी अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न आहे. याबाबतीत चर्चा करुन काय करता येईल ते पाहतो.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, मग एवढी वर्षे का चालविली ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, महानगरपालिकेची परवानगी नसताना प्राथमिक शाळा चालविण्यात येत होती, त्याबद्दल महानगरपालिकेने त्यांना नोटीस दिलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी माध्यमिक शाळेला शासनाची मान्यता होती. पण शाळेला मान्यता देत असताना शाळेकडे इमारत होती की नाही याची खात्री केली होती

. . . .2 एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

का ? हा माझा पहिला प्रश्न आहे. येथील प्राथमिक शाळा अनधिकृत आहे आणि आता तेथील विद्यार्थ्यांचे दुसरीकडे समायोजन करण्यात येणार आहे. प्राथमिक शाळा अनधिकृत होती, त्याचे मी समर्थन करणार नाही. सध्या महाराष्ट्रात सर्व ठिकाणी ज्या अनधिकृत शाळा आहेत, त्या बंद होत आहेत आणि नियमाप्रमाणे त्या बंद झाल्या पाहिजेत. अशा वेळी तेथील सर्व विद्यार्थ्यांचे समायोजन करण्याची जबाबदारी शासन घेणार आहे का ? असा माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही शाळा इंग्रजी माध्यमाची आहे. त्यांना नेहमीचे अनुदान नाही. 1992 मध्ये शाळेची हीच इमारत दाखविण्यात आली होती आणि तेव्हा ती ब-या स्थितीत होती. आता त्याला 10-12 वर्षे झाली आहेत. याठिकाणी महानगरपालिकेचे नॉ-ऑब्जेक्शन सर्टीफीकेट न घेता प्राथमिक शाळा सुरु केली होती. इंग्रजी मिडिअमच्या शाळा कशाही प्रकारे काम करतात, मघाशी देखील अशाच विषयावरील एका निवेदनावर चर्चा झाली आहे. याबद्दल शासनाने वेगळे जाचक नियम करुन अशांना पायंबद घालण्याची गरज आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मुंबईतील वडाळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने चालविली जाणारी शाळा ही पिपल्स एज्युकेशन सोसायटीची आहे का ? तसे जर असेल तर पिपल्स् एज्युकेशन सोसायटी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेली संस्था आहे आणि मुंबई महानगरातील ती प्रतिष्ठीत संस्था आहे. या वसतीगृहाच्या सिध्दार्थ इमारतीची अवस्था अत्यंत शिकस्त झाली असून ती केव्हाही कोसळण्याच्या स्थितीत आहे. असे असले तरी या संस्थेला इमारतीची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने शासनातर्फे आदेश दिलेले आहेत का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, दि.17-4-2002 पासूनच याचा पाठपुरावा करणे सुरु आहे. ही इमारत स्वतंत्रपणे दुरुस्त करावी आणि तत्पूर्वी मुलांची दुसरीकडे व्यवस्था करावी अशा सूचना त्यांना निश्चितपणे दिलेल्या आहेत.

-----

. . . .2 एस-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT 15:10

पृ.शी.: नाशिक शहरातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी आरक्षित असलेला भूखंड व्यक्तीगत कामासाठी वापरण्यात येणे.

मु.शी.: नाशिक शहरातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी आरक्षित असलेला भूखंड व्यक्तीगत कामासाठी वापरण्यात येणे यासंबंधी सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी,जगदीश गुप्ता,सागर मेघे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"नाशिक शहरातील सर्व्हे क्र.750, 751 व 755 येथील प्लॉट क्र. 541 ची 34 हेक्टर म्हणजे सुमारे 85 एकर जमीन त्या जमिनीचा पूर्वीचा मालक श्री.खतीब यांच्याकडून श्री.ठक्क्र यांनी कुलमुखत्यार पत्रावर घेणे यातील 30,000 चौरस मीटरचा भूखंड मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी आरक्षित असणे व त्यासाठीच्या भूसंपादन कार्यवाहीत अनेक प्रकारच्या अनियमितता असणे व इतर जागा ही अन्य व्यक्तीगत कामासाठी वापरण्यात येणे,सध्या शासनाचे दरमहा रुपये 65 लाख भाडयापोटी जात असताना उपरोक्त 85 एकर जागा मात्र एखाद्या व्यक्तीच्या ताब्यात असणे, केंद्र शासनाची सर्व कार्यालये देखील भाडयाच्या जागेत असणे व त्यामुळे देखील व्याजापोटी शासनाचे पैसे जाणे, शासनाची दरमहा व्याजापोटी वाया जाणारी रक्कम वाचविणे शक्य असताना देखील त्याकडे आतापर्यंत दुर्लक्ष होणे, शासनाला अकारण सतत होणारा भूर्दंड व तो ताबडतोब थांबविण्याची आवश्यकता."

श्री.विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे... 15:15

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे अतिशय गंभीर अशाप्रकारचे प्रकरण आहे. नाशिक महानगरामध्ये सर्व्हे नं.750,751 आणि 755 नवीन विशेष आराखडयाअंतर्गत प्लॉट क्रमांक 541,हा प्लॉट जवळपास 34 हेक्टर म्हणजे 85 एकरचा हा प्लॉट आहे. त्या जमिनीचा मूळ मालक श्री.खतीब आहे. या खतीबांकडून श्री.ठक्कर नावाच्या बिल्डने कुलमुखत्त्यार प्लॉट करुन घेतला. हा बिल्डर एवढ्यावरच थांबला नाही तर महानगरपालिकेच्या आराखड्यामध्ये हा प्लॉट आरक्षित होता. महानगरपालिकेचा आराखडा 1994 साली कार्यान्वित झाला, त्यामध्ये हा भूखंड आरक्षित होता. या श्री.ठक्करनी आपल्या एकट्याच्या नावे तो प्लॉट न करता, त्यांनी दुर्बल घटकांसाठी म्हणून ग्रामीण हौसिंग सोसायटी निर्माण केली. या सोसायटीतील सदस्य हे सगळे त्या बिल्डच्या कुटुंबातील सदस्य झाले. त्या सोसायटीने हे आरक्षण रद्द करण्याच्या संबंधात शासनाकडे अर्ज केला. वन विभागाकडे अर्ज केला, महसूल खात्याकडे केला. त्यावर शासनाने ताबडतोब स्थगिती दिली. ही स्थगिती दिल्यानंतर काही काळ हे प्रकरण तसेच पडून राहिले. सन 2002 मध्ये ही स्थगिती दिल्यानंतर त्या ठिकाणी मागच्या कालखंडामध्ये मा.महसूल मंत्री यांनी दिनांक 5-07-2004 ला स्थगिती दिली. आदेश पारित केला. त्या संबंधाने दिनांक 18-10-2004 रोजी अधिसूचना प्रसिध्द केली आणि हे आरक्षण रद्द केले. हे मागच्या महसूल मंत्र्यांनी केले. त्यानंतर नाशिक विभागाच्या आयुक्तांनी पुन्हा एकदा आदेशाचे पुनर्विलोकन झाले पाहिजे, म्हणून वन विभागाने महसूल विभागाकडे पुन्हा अर्ज केला. हा अर्ज केल्यानंतर त्याची चौकशी सुरु झाली. या चौकशीमध्ये किती अनियमितता झालेली आहे त्याबाबत निवेदनामध्ये सांगितलेले आहे. प्रचंड प्रमाणात या कायद्याची ऐशी तैशी झाली. भूसंपादन अधिनियम 1894, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966, नागरी जमीन कमालमर्यादा कायदा 1976, मुंबई मुंद्रांकशुल्क अधिनियम 1958, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1966., इतक्या नियमांचे उल्लंघन केले गेले. कुल मुखत्यार पत्र केल्यामुळे जवळपास 15 कोटी रुपयाची मुद्रांक चुकविल्याची नोटीस सरकारने श्री.ठक्कर बिल्डर आणि त्या हाऊसिंग सोसायटीला दिली. सभापती महोदय, माझ्या लक्षात येत नाही की, इतकी अनियमितता चालू आहे, कोट्यावधी रुपयाचा भूखंड त्या ठिकाणी भूसंपादन थांबवून, सरकारची त्याबाबतची कारवाई थांबवून ती रद्द करुन तो भूखंड गिळंकृत करण्याचा प्रयत्न चालू आहे. त्या ठिकाणचे कलेक्टर,त्या ठिकाणचे विभागीय आयुक्त यांनी शासनाला या जागेची किती आवश्यकता आहे याबाबतचा रिर्पार्ट दिला. आता नाशिक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे चालू.....

शहरामध्ये जागा नाहीत. नाशिकमधील 800 शासकीय इमारती या भाड्याच्या जागेमध्ये आहेत, त्याचे लाखो रुपये भाडे शासनाला द्यावे लागते. म्हणून या प्रशासकीय इमारतीसाठी भूखंड आरक्षित केलेला होता. त्याची भूसंपादनाची कारवाई सुरु झालेली होती. फक्त सेक्शन 9 ची नोटीस निघालेली होती, फक्त अवॉर्ड व्हायचे होते, ते थांबविले गेले आणि भूसंपादन रद्द केले गेले. माझी मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, श्री.ठक्कर हौसिंग सोसायटी करुनच थांबले नाहीत त्यांनी अनेक कंपन्या रजिस्टर केल्या. नाशिक शहरामध्ये एकाच फॅमिलिने जवळपास 125 कंपन्या रजिस्टर केल्या आणि नाशिक शहरातील प्रचंड शेकडो एकर जमीन या एकाच फॅमिलीने लाटण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे प्रकरण गंभीर आहे. म्हणून मा.मुख्यमंत्री महोदयांसमोर याचे हिअरिंग झालेले आहे. उत्तर देताना सांगितलेले आहे की, कलेक्टरांना प्रस्ताव दिलेला आहे, त्यामध्ये अनियमितता झालेली आहे, त्याची चौकशी चालू आहे. माझी मागणी आहे की, यामध्ये क्रिमिनल अफेन्स झालेले आहेत. अनियमितता दाखवत असतांना अशाप्रकारच्या कंपन्या प्रस्तापित करुन त्यांनी क्रिमिनल गुन्हे देखील केलेले आहेत, म्हणून या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी. इन्क्वायरी आपण करणार आहात काय ?

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार..... 15:20

श्री. विलासराव देशमुख : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, ते प्रशासकीय इमारतींसाठी शासनाला जी जागा संपादित करावयाची आहे, त्यासंदर्भातील हा मूळ प्रश्न आहे. या सगळया प्रकरणाची सुरुवात 1993 पासून झालेली आहे. अजूनही तो प्रश्न अनिर्णित स्वरुपात राहिलेला आहे. मधल्याकाळामध्ये ही जमीन संपादनातून वगळावी अशा प्रकारचे आदेश पूर्वीच्या महसूल मंत्र्यांनी दिलेले होते. त्यानंतर कमिशनरांनी, कलेक्टरांनी त्या निर्णयाच्या विरोधात माझ्याकडे रिव्हिजन दाखल केलेले आहे. क्वासी ज्युडिशिएल ॲथॉरिटी महसूसल मंत्र्यांकडे असते त्या ॲथॉरिटीखाली त्याची सुनावणी माझ्याकडे झालेली आहे. ती सगळी कागदपत्रे त्यांनी माझ्याकडे दाखल केलेली आहेत. अंतिम निर्णय महसूल मंत्र्यांनी द्यावयाचा आहे. तेव्हा ते प्रकरण या स्टेजला इथपर्यंत आलेले आहे. म्हणून त्याचा निर्णय जो काही असेल तो तातडीने दिला जाईल. त्याची सगळी सुनावणी झालेली आहे. सगळे कागदपत्र आमच्याकडे आलेले आहेत. त्याचा निर्णयसुध्दा लगेच दिला जाईल. पूर्वीचा निर्णय योग्य होता कां अयोग्य होता? हे सगळे बारकाईने पाहून, तो निर्णय काय असणार आहे, याबद्दल मी आता सांगणे उचित होणार नाही. कारण ती एक ॲथॉरिटी आहे. आणि त्या ॲथॉरिटीमध्ये तो निर्णय केलेला आहे. त्या निर्णयावर मी जोपर्यंत ऑफिशिएली सही करीत नाही. कारण पुन्हा तो निर्णय हाय कोर्टात चॅलेंज होऊ शकतो. त्या नियमाप्रमाणे पुढे जावे लागते. परंतु मी एवढेच सांगेन की, तातडीने आठ-दहा दिवसात त्याचा जो काही निवाडा असेल तो देणार आहोत.. त्यानंतर दुसरा एक मूलभूत प्रश्न याठिकाणी उपस्थित केलेला आहे. मधल्याकाळात फार मोठया प्रमाणात नाशिकमध्ये अशी अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत.तेथील जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिका-यांनी अनेक प्रकरणांची माहिती शोधून काढलेली आहे.काही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. न्यायालयामध्ये त्याच्यासंदर्भातील निर्णय प्रलंबित आहेत. न्यायालयानेसुध्दा काही आदेश दिलेले आहेत. त्यामध्ये झालेले सगळे बदल किंवा फेरफार झालेले आहेत ते योग्य आहेत की, नाही हे तहसिलदारामार्फत पहाण्याची व्यवस्था सुध्दा शासनाने निर्माण केलेली आहे. मला असे वाटते की, सर्व स्थारावर याची चौकशी सुरु झालेली आहे. महसूल विभागामार्फत ही चौकशी पूर्ण केली जाईल. ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यामध्ये आणखी काही आढळले तर अवश्य पुढची कारवाई करण्यासाठी सरकार तयार आहे.

..2..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे की, इतक्या अनियमितता ती एकच व्यक्ती करते. एकच व्यक्ती मुद्रांक शुल्क चुकवते. एकच व्यक्ती महापालिका, सरकार, नगररचनाकार या सर्वांना बायपास करुन आणि डायरेक्ट महसूल मंत्र्यांशी संपर्क करुन हे भूसंपादन रद्द करते. एकच व्यक्ती इतक्या नियमांचे उल्लंघन करते. मग तो भूसंपादनाचा नियम असेल, नगररचनेचा नियम असेल. महसूलाचा नियम असेल. जमीनधारणा कमालचा नियम असेल, मुद्रांकचा नियम असेल आणि सहकारी संस्थांचा नियम असेल. इतक्या नियमांचे उल्लंघन करुन जी व्यक्ती आता सरकारलाही काही समजत नाही अशा प्रकारची भाषा वापरते. अशा व्यक्तिच्या संपूर्ण प्रॉपर्टीची आणि संपूर्ण व्यवहाराची सरकार सी.आय.डी. मार्फत चौकशी करणार आहे काय? हा माझा सवाल आहे. याचे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी द्यावे.ज्या व्यक्तिने सरकारला ठकवले, कोटयावधी रुपयाची प्रॉपर्टी ढापण्याचा प्रयत्न चाललेला आहे. ज्या व्यक्तीकडून त्याने जमीन घेतली त्या व्यक्तीच्या नांवाने मुद्रांक शुल्क चूकवलेला आहे.सभापती महोदय, हे गंभीर प्रकरण आहे. त्यावर कारवाई व्हावयास पाहिजे. या प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात यावी. आपला याबाबतचा निर्णय तर होईलच. पण ज्यांनी इतक्या अनियमितता केल्या आहेत, त्याला आपण सोडणार आहात काय? आपण नियम केला की, भूसंपादन करावे. तर हा विषय संपला काय? ज्या व्यक्तीने इतके केले त्या व्यक्ती संबंधी आपण काय निर्णय घेणार आहात? म्हणून या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन दोषी व्यक्तीला आपण सजा देणार आहात काय?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या संदर्भात महसूल विभागाच्या मार्फत विविध स्तरावर चौकशी झालेली आहे. शेवटी सी.आय.डी.कडे एखादी चौकशी देणे म्हणजे त्यामध्ये काही क्रिमिनल स्वरुप आहे काय? काही फौजदारी गुन्हा केलेला आहे काय? हा भाग नंतर येईल. पहिल्यांदा महसूल विभागाच्या वतीने किंवा अर्बन डेव्हलपमेंटचे जे नियम आहेत.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड.....

श्री. विलासराव देशमुख ....

किंवा अर्बन डेव्हलपमेंटचा जो नियम आहे, यामध्ये कोणकोणत्या कायद्यांचे, कोणकोणत्या नियमांचे उल्लंघन केले आहे याची माहिती निवेदनामध्ये दिलेली आहे. ज्या ज्या कायद्याचा त्यांनी भंग केलेला आहे ही सगळी चौकशी महसूल विभागामार्फत पूर्ण होईल. त्या चौकशीचा अहवाल आल्यानंतर त्यामध्ये फौजदारी स्वरुपाचे, क्रिमिनल ब्रिच केले आहे असे जर त्यासंदर्भात उघडकीस आले तर आपण म्हणता त्याप्रमाणे चौकशी केली जाईल. कारण हे सर्व सिव्हील नेचर आहे. यामध्ये एकदम फौजदारी चौकशीसाठी देण्यापेक्षा महसूल विभागाच्या वतीने, अर्बन डेव्हलपमेंटच्या नियमाप्रमाणे जी चौकशी होत आहे ती चौकशी आधी आपण पूर्ण करु. त्यातील दोष पक्के करु. त्यानंतर आवश्यकता भासली तर अवश्य हे प्रकरण पोलिसांकडे देण्यास सरकारची हरकत राहणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न नागपूरच्या अधिवेशनामध्ये उपस्थित झ ाला होता. त्यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित झाला होता. याही अधिवेशनामध्ये प्रश्नोत्तराच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न झाला. गेले वर्ष दीड वर्ष याची चौकशी चालू आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, ही चौकशी किती दिवसात पूर्ण होणार ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, वेगवेगळया स्तरावर काही लोक कोर्टामध्ये गेलेले आहेत आणि स्थगिती आदेश मिळविलेले आहेत. एकाच ठिकाणी हे चालले आहे अशातील भाग नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी फार मोठा अभ्यास करुन त्यांनी या सगळया प्रकरणाचा शोध लावलेला आहे. त्यांना सुध्दा हे काम करण्यामध्ये दररोज काही अडचणी निर्माण झाल्या. ही परिस्थिती पाहून सरकारने त्यांना पूर्ण ताकदीने संरक्षण देण्याची भूमिका स्वीकारलेली आहे. यामध्ये फार विलंब लावण्याची आमची इच्छा नाही. जेवढया लवकर हे पूर्ण करता येईल त्याप्रमाणे हे काम पूर्ण करु.

------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**पृ. शी.** : वांद्रे (पूर्व) येथील एम.आय.जी.कॉलनी, गांधीनगर म्हाडा वसाहतीतील तळमजल्यावरील रहिवाशांनी केलेली अतिक्रमणे.

**मु. शी.** : वांद्रे (पूर्व) येथील एम. आय. जी. कॉलनी, गांधीनगर म्हाडा वसाहतीतील तळमजल्यावरील रहिवाशांनी केलेली अतिक्रमणे यासंबंधी ॲड. अनिल परब, सर्वश्री मधुकर चव्हाण, अनंत तरे, नितीन गडकरी व श्रीमती संजीवनी रायकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड. अनिल परब ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वांद्रे (पूर्व) येथील एम.आय.जी. ज\`ल□, जांधी□रमधील म्हाडा वसाहतीतील (विशेषत: ग्रुप 4 मधील 16 इमारती) तळमजल्यावरील सर्व रहिवाशां□ प्रचंड प्रमाजात अतिज्रमजे जेली असल्याबाबत वरील मजल्यांवर राहजाऱ्या रहिवाशां□ वारंवार शास□तील विविध संस्थांजडे अ□ज तज्रारी जेलेल्या असजे, हया इमारतींच्या पाठीमाजील बाजूस महा□र जॅसची पाईप लाई□जेलेली असू□ अशा परि□स्थतीत जर जधी आज लाजल्यास परिस्थिती आटोक्यात आजज्यास अ□ज अडचजी येऊ□ प्रचंड प्रमाजात जीवित हा□ होज्याची शक्यता असजे तसेच आजीचे बंब त्या ठिजाजी पोचज्याची अजिबात शक्यताच □सजे, सदर धोजा लजात येऊ□ म्हाडाच्या अधिजाऱ्यां□ योज्य ते आदेश देऊ□ही सर्व अ□धिजृत अतिज्रमजे हटविज्याची त्वरित जारवाई जरज्याचे आदेश देज्याची आवश्यजता, वांद्रे (पूर्व) येथील असिस्टंट म्यु□सिपल जमिश□ हयां□ हया 16 इमारतीतील तळमजल्यावरील एजूज 40 रहिवाशां□ अतिज्रमजाबाबत जायदेशीर जारवाई जरज्यात येईल अशा स्वरुपाच्या □टीसा दिलेल्या असजे, याबाबतीत म्हाडाच्या एजंदर जिती वसाहतीत तळमजल्यावरील भाडेजरु□ अशा प्रजारे अ□धिजृत बांधजामे जेली आहेत तसेच, सदर बांधजामांवर म्हाडा□जोजती जारवाई जेली आहे याचा त्वरित जुलासा होज्याची आवश्यजता, या संदर्भात येथील रहिवाशांची संभाव्य जीवित व वित्तहा□ टाळज्यासाठी याबाबत शास□□ तातडी□ जरावयाची आवश्यजता व प्रतिज्रिया."

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. विलासराव देशमुख ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, या निवेदनामध्ये ज्या गोष्टींचा खुलासा झालेला आहे त्यामध्ये बऱ्याच गोष्टी क्लिअर झालेल्या आहेत. मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. ज्या 16 इमारतींचा यामध्ये विशेष ग्रुपमध्ये उल्लेख केलेला आहे त्यांच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव म्हाडाकडे आलेला आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, म्हाडाच्या वतीने या सगळया ज्या इमारती आहेत त्यासंदर्भात उत्तर देत असताना त्यांचा विकास कशा पध्दतीने करावयाचा ही सगळी माहिती निवेदनामध्ये दिलेली आहे. आपण जे सांगत आहात...

ॲड. अनिल परब : ग्रुप- 4 मधील 16 इमारतींबाबत मी विचारलेले आहे.

श्री. विलासराव देशमुख : ग्रुप-4 मधील ज्या 16 इमारतींचा प्रश्न आपण उपस्थित केलेला आहे ती बाब मी अवश्य तपासून घेईन आणि त्यासंदर्भामध्ये सुध्दा तोच न्याय दिला जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : वरच्या मजल्यावर राहणाऱ्या भाडेकरुंनी शासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत हे खरे आहे काय ? सन 2002-03 मध्ये जी कारवाई करणार होते ती कारवाई का केली नाही ?

श्री. विलासराव देशमुख : खरे म्हणजे ही जी कारवाई करावयाची आहे त्यासंदर्भामध्ये आपण महानगरपालिकेला कळविलेले आहे. कारण महानगरपालिकेने यासंदर्भामध्ये कारवाई करावयाची आहे. त्यांनी जे काही अतिक्रमण केलेले आहे ते अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात महानगरपालिकेला आपण सूचना दिलेल्या आहेत आणि महानगरपालिकेने ही कारवाई करण्याचे मान्य केलेले आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/ श्री.बरवडनंतर 15:30

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या निवेदनामध्ये जी माहिती दिलेली आहे त्या माहितीबद्दल माझा प्रश्न आहे. आपण असे म्हटले आहे की, "त्या वसाहतीतील सर्व सेवा सन 1979 पासून सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वाधीन करण्यात आलेल्या आहेत." या ग्रुपमधील 16 इमारतींचे कन्व्हेंस कधी पूर्ण झाले आणि महापालिकेला हे अधिकार देण्यापूर्वी म्हाडाच्या अतिक्रमणविरोधी पथकाने या सर्व अनधिकृत बांधकामाविरुध्द कारवाई का केली नाही ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, खरे म्हणजे सुरुवातीच्या काळामध्ये म्हाडाने बांधकाम केले. त्यानंतर रहिवाशांची सोसायटी झाल्यावर त्यांच्याकडे ते बांधकाम ट्रान्सफर केले जाते. त्यानंतर ते लोक तेथे रहिवासी म्हणून रहावयास आले. परंतु तळ मजल्यावरील काही रहिवाशांनी कुंपण घातलेले आहे. त्याठिकाणी कुंपण घालून जागा ताब्यात घेण्याचे प्रकार घडलेले आहेत. मा.सदस्य म्हणत आहेत की, म्हाडाने त्याबाबत कारवाई का केली नाही ? म्हाडाकडून यापूर्वी कारवाई झाली नाही, ती झाली पाहिजे होती. आता त्यांच्या सोसायटया झाल्यामुळे म्हाडाने आपली जबाबदारी महापालिकेकडे सोपविली आहे..

श्री.मधुकर सरपोतदार : त्या सोसायटयांचे कन्व्हेंस केव्हा झाले ?

श्री.विलासराव देशमुख : कन्व्हेंस केव्हा झाले त्याची तारीख माझ्याकडे नाही मी ती तारीख पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : याबाबतची मूळ तक्रार अनधिकृत बांधकामाबाबत आहे. त्याठिकाणच्या सर्व भाडेकरुंनी ही तक्रार केलेली आहे त्यामुळे हे अनधिकृत बांधकाम ताबडतोब काढावे असे आपण संबंधितांना आदेश द्यावेत.

श्री.विलासराव देशमुख : यासंदर्भात आजच बैठक झाली होती, आयुक्त या बैठकीला हजर होते. यासंबंधी तक्रार आल्यानंतर तातडीने हे अनधिकृत बांधकाम काढून टाकावे अशी मी आयुक्तांना सूचना केलेली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : आता आपण जे म्हणत आहात त्याला माझा विरोध आहे. तेथे आता सोसायटया निर्माण झाल्या आहेत त्यांचे ते भाडेकरु आहेत. त्यांचे कन्व्हेंस झाले आहे. पण कन्व्हेंस करण्यामध्ये म्हाडाने विलंब का लावला ? हा भाडेकरुंच्या आपापसातील प्रश्न असल्यामुळे शासनाने त्याच्यामध्ये हस्तक्षेप करण्याचे कारण नाही. सहकारी सोसायटयांच्या सभासदांकडून

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तक्रार येते आणि ती तक्रार तातडीने मुख्यमंत्री स्तरावर येऊन त्यांना आदेश द्यावे लागतात. परंतु मुंबईतील सगळया म्हाडाच्या परिसरामध्ये अशी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत ती काढण्याचे आदेश आपण देणार काय, परंतु ते होणार नाही.

**उपसभापती** : मी या लक्षवेधीबाबत आदेश दिलेले आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याप्रकरणी नियमानुसार अशाप्रकारे आदेश कसे देऊ शकता ?

श्री.विलासराव देशमुख : मा.सदस्यांनी लक्षवेधीवर प्रश्न विचारले म्हणून मी सांगितले की, ही अनधिकृत बांधकामे काढण्यात येतील. त्यांचे म्हणणे आहे की, म्हाडाने यापूर्वी का कारवाई केली नाही त्याची माहिती दिली आहे. मुंबईतील म्हाडाच्या इमारतींमध्ये अशाप्रकारची अनधिकृत बांधकामे असताना यांच्या पाठीमागे का लागलात असे त्यांचे म्हणणे असेल तर मा.सभापती महोदयांनी नेमके आदेश दिले तर बरे होईल. याबाबत आपले निदेश आम्हाला पाहिजेत.

**उपसभापती** : आदरणीय मुख्यमंत्र्यांनी या लक्षवेधीला उत्तर देताना याठिकाणची अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठी संबंधिताना आदेश देण्याचे मान्य केलेले आहे. त्या आदेशाचे पालन करण्यात यावे असे मी यासंदर्भात निदेश देतो.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अंधेरी उपनगर रेल्वे स्टेशनच्या पूर्व बाजुच्या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होणे.

**मु.शी.**: अंधेरी उपनगर रेल्वे स्टेशनच्या पूर्व बाजुच्या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होणे यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, श्रीमती कांता नलावडे यां-ी दिलेली लज्वेधी सूच-ा.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-े नियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनिज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-ा-ीय मुख्य मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी निवेद-ा ज्रावे, अशी वि-ंती ज्रतो.

"मुंबईतील अंधेरी उप-ाजर रेल्वे स्टेश-ाच्या पूर्व बाजुच्या रस्त्यावर बेस्ट बसेसची वाहतुज बऱ्याच प्रमाजात असजे, या भाजात रिजा चालज्ां-ी रेल्वे स्टेश-ाजवळ अवैधरित्या रिजा थांबविजे, अ-ाधिज़्त फेरीवाल्यां-ी फुटपाथवर अतिज्रमज ज्रजे, ज्यामुळे सदर रस्त्यावर वाहतुजीची वारंवार ज्ोंडी होजे, या भाजात लोज्ांची प्रचंड वर्दळ असू-ा ज-ातेला या वाहतुज ज्ोंडीला सामोरे जायला लाजजे, सदर वाहतुज ज्ोंडीज्डे पोलीस प्रशास-ा-ो जाजीवपूर्वज दुर्लज ज्रजे, यामुळे या भाजातील ज-ातेमध्ये असंतोषाचे वातावरज निर्माज होजे, यावर शास-ाची प्रतिज्रिया व ज्रावयाची उपाययोज-ा."

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : अध्यज महाराज, लजवेधी सूच-ेसंबंधीच्या निवेद-ाच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ा आधीच वितरित ज्ेल्या असल्यामुळे मी ते निवेद-ा आपल्या अ-ुमती-े सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेद-ा सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

<u>निवेद-ा</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेद-ा छापावे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या लक्षवेधीबाबत मा.मंत्रिमहोदयांनी केलेले निवेदन समाधानकारक असल्यामुळे मला उपप्रश्न विचारावयाचे नाहीत.

------

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

**पृ. शी.** : मुंबई, ठाणे परिसरातील पब्स व मॉलमधून मोठया प्रमाणात सुरु असलेले गैरधंदे.

**मु. शी.** : मुंबई, ठाणे परिसरातील पब्स व मॉलमधून मोठया प्रमाणात सुरु असलेले गैरधंदे यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य सर्वश्री जितेंद्र आव्हाड, सदाशिवराव पोळ, वसंतराव चव्हाण, प्रा.फौजिया खान, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री राजेंद्र जैन, जगन्नाथ शेवाळे, श्रीमती मंदा म्हात्रे यां-ी दिलेली लज्ञवेधी सूच-ाा.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, पब्स, मॉल हे विषय देखील डान्सबार प्रमाणेच महत्वाचे असल्यामुळे आम्ही ही लक्षवेधी सूचना योग्य कालावधीमध्ये दिली होती. परंतु शेवटच्या दिवसापर्यंत त्याबाबतचे निवेदन येऊ नये याचे कारण काय ?

**उपसभापती** : मा.उपमुख्यमंत्र्यांकडून ही लक्षवेधी पुढे ढकलण्यात यावे अशी विनंती करण्यात आली असून त्यांच्या विनंतीनुसार ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ही लक्षवेधी केव्हा घेणार, कारण उद्या अधिवेशन संपत आहे.

**उपसभापती** : पुढील अधिवेशनामध्ये ही लक्षवेधी घेण्यात येईल.

------

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या संदर्भात दिलेले निवेदन हे अत्यंत दिशाभूल करणारे, खोटे आणि कोणत्याही प्रकारच्या वस्तुस्थितीवर आधारलेले नाही. याठिकाणी मा.मुख्यमंत्री देखील उपस्थिती आहेत. आपल्या राज्यांमध्ये दलितांवर होणा-या अत्याचारांमध्ये भीषण आणि भयावह अशा प्रकारची वाढ होत आहे. परभणी जिल्हयातील पूर्णा तालुक्यामध्ये रेगाव हे गाव आहे. या रेगावमध्ये 25 जूनला दुपारी 2.00 वाजता ही घटना घडली. घटना अत्यंत गंभीर असून महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाला कलंक लावणारी आहे. या प्रकरणी कैलाश गायकवाड हा नवरदेव लग्नासाठी रेगावला गेला. लग्न मंडपात जाण्यापूर्वी शेवंती नावाचा एक संस्कार केला जातो. त्याठिकाणी मारुतीच्या मंदिरात जाऊन नवरदेवाला अहेर देण्याची प्रथा आहे. मारुतीच्या मंदिरामध्ये जाताना गावातील 30-40 सवर्ण जातीयवादी गुंडांनी मारुतीचे मंदिर बाटवले म्हणून त्यांना मारहाण केली. या घटनेची तक्रार पूर्णा पोलीस स्टेशनला दिली असताना पोलीसांनी या घटनेची नोंद ॲट्रॉसिटी ॲक्टखाली केली नाही. मारहाणीमध्ये श्रीमती बहिणाबाई गायकवाड, छाया गायकवाड, उत्तम भांगे, प्रकाश गायकवाड, नारायण कांबळे, आणि नवरदेव कैलाश गायकवाड ही मंडळी जखमी झाली त्यांना शासकीय रुग्णालयामध्ये नेण्यात आले.

**उपसभापती** : मा.सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा. जोगेंद्र कवाडे : हा अत्यंत गंभीर प्रकार असल्यामुळे मला एक-दोन मिनिटे अधिक वेळ द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे. शासनाने दिलेले निवेदन हे दिशाभूल करणारे आहे. हल्लेखोर हे सवर्ण जातीयवादी प्रवृत्तीचे गुंड आहेत. त्यांना पाठिशी घालून अन्याय करण्यास हे शासन त्यांना उद्युक्त तर करीत नाही ना अशी शंका येते. जखमींना शासकीय रुग्णालयामध्ये नेल्यानंतर ही पोलीस केस असल्यामुळे डॉक्टरांनी पोलिसांना पाचारण केले आणि त्यानंतर पोलिसांनी ती केस नोंदवली ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : हे सवर्ण कोण आहेत ? मा.सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

प्रा. जोगेंद्र कवाडे : मी जातीयवादी सवर्ण गुंड असे म्हणालो. खरे म्हणजे जखमींचे हॉस्पीटलमध्ये बयाण घेतले. डॉक्टरांनी पोलीस स्टेशनला कळविल्यानंतर पोलिसांनी बयाण घेतले आणि तो प्रकार नोंदविला. असे असतानाही निवेदनामध्ये दिशाभूल करणारी माहिती देण्यात आलेली आहे. हा गुन्हा ॲट्रॉसिटी ॲक्टखाली का नोंदविला नाही ? दुस-या दिवशी रात्री 8.30वा

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 15:35

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

गुन्हा नोंदविला. ॲट्रॉसिटी ॲक्टच्या कलम 4 अन्वये जे अधिकारी मागासवर्गीयांवर होणा-या अत्याचाराची नोंद आणि तपास करण्यास कुचराई करतील त्यांच्या बाबतीत 6 महिने किंवा वर्षाच्या शिक्षेची तरतूद केलेली आहे.

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.शिगम 15:40

**उपसभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या ठिकाणी ॲट्रॉसिटीचा गुन्हा घडल्यानंतर संबंधित पोलीस स्टेशनने ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा का नोंदवून घेतला नाही ? ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा नोंदवून घेऊन नंतर डी.वाय.एस.पी. स्तरावर या प्रकरणाची चौकशी व्हावयास पाहिजे होती. तसे सदरहू पोलीस स्टेशनने तशी कार्यवाही का केली नाही ? या गोष्टीस डी.वाय.एस.पी.श्री. नंदनवार हे जबाबदार आहेत.तसेच पी.आय.श्री. मुंडे आणि पी.एस.आय.श्री. पोळ हे देखील तेवढेच जबाबदार आहेत. त्यांनी या ॲक्टखाली गुन्हा नोंदवून घेण्यासाठी कुचराई केलेली आहे आणि जातीयवाद्यांना सावरण्याचा प्रयत्न केला आहे. या अधिका-यांच्या विरुध्द निलंबनाची कारवाई शासनाकडून करण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, रेगाव येथे श्री. कैलास गायकवाड यांच्या लग्नाच्या वेळी कैलास गायकवाड यांच्या पाहुण्यांमध्ये भाजी चांगली झाली नाही म्हणून बाचाबाची झाली. बाचाबाचीचे रुपांतर मारामारीत झाले. दगडफेक झाली. गायकवाड यांच्याकडे आलेले पाहुणे एकमेकांमध्ये दगडफेक करीत होते.त्या दगडफेकीमध्ये रस्त्याच्या बाजुला चालत असलेल्या एका लहान मुलाला दगड लागला. त्या पाहुण्यांना असे वाटू लागले की, ज्या मुलास दगड लागला ते लोक पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार करतील म्हणून गायकवाड यांच्या पाहुण्यांनी अगोदरच पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार नोंदविली. 25 तारखेस पोलीस तक्रार नोंदविली. सदर पोलीस स्टेशनमध्ये दिनांक 26 तारखे पासून ते दिनांक 1 तारखेपर्यन्त वेळोवेळी तक्रारदारांना आणि साक्षीदारांना त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी बोलाविलेले आहे. तक्रारदांराना आणि साक्षीदारांना बोलाविल्यानंतर जवाब नोंदवून घेण्यासाठी बोलाविले होते. परंतु त्या लहान मुलाचे पालक आपल्या विरुध्द तक्रार करतील या भितीने तक्रारदारांनी आणि साक्षीदारांनी पोलीस स्टेशनमध्ये सांगितले की, आम्ही आमचा जवाब नंतर देऊ. पोलीस स्टेशनने जे स्टेटमेंट घेतलेले आहे त्या अनुषंगाने संबंधितावर गुन्हा नोंदविला आहे. ॲट्रॉसिटी ॲक्टप्रमाणे गुन्हा का नोंदवून घेतला नाही यासंबंधी निश्चितपणे उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : मुलीच्या वडीलांचे नाव श्री. गणपत सकट आहे. त्या गावात मातंग समाजाची फक्त सात-आठ घरे आहेत. ॲट्रॉसिटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला जाणार असे लक्षात आल्यानंतर त्या पोलीस अधिका-यांसह गावातील हल्लेखोर जातीयवादी गुंडानी त्या परिवारावर

2...

प्रा.जोगेंद्र कवाडे...

दबाव टाकला. तुम्ही जर ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला तर आम्ही तुमची घरे पेटवून टाकू. तुम्हाला गावात राहू देणार नाही. अशा प्रकारचा दबाव पोलिसांसह जातीयवादी हल्लेखोर गुंडानी टाकला ही बाब खरी आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आमच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणला गेला नाही असे फिर्यादीनी लेखी स्वरुपात आपले म्हणणे पोलीस स्टेशनला सादर केलेले आहे. फिर्यादींवर दबाव टाकण्याचा प्रश्न येत नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, तक्रार नोंदविल्या नंतर संबंधित पोलीस स्टेशनने ॲट्रॉसिटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करावयास पाहिजे होता. सदर पोलीस स्टेशनमध्ये य्सदर कायद्यान्वये गुन्हा का नोंदवून घेतला गेला नाही ? ही तक्रार खरी आहे की खोटी आहे याचा तपास करण्याचे काम डी.वाय.एस.पी.स्तरावर केला जातो. अशा केसेसचा तपास खालचे अधिकारी करीत नाहीत. परंतु संबंधित डी.वाय.एस.पी.श्री.नंदनवार यांनी ही जबाबदारी पोलीस इन्स्पेक्टर टाकली. या प्रकारावर पांघरुण घालून ॲट्रॉसिटीच्या ॲक्टचा फायदा घेऊन दलित मंडळी नाहक कोणाला सताविण्याचा प्रयत्न करतात असा गैरसमज इतर समाजात निर्माण केला जात आहे. म्हणून माझा यासंदर्भात पुन्हा तोच प्रश्न आहे की, या प्रकरणी ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा का दाखल केला गेला नाही ? या घटनेचा तपास डी.वाय.एस.पी. यांनी करावयास पाहिजे होता तो त्यांनी का केला नाही ? ज्या अधिका-यानी यासंदर्भात कुचराई केलेली आहे त्या अधिका-याविरुध्द ताबडतोबीने कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ॲट्रॉसिटी ॲक्टखाली का गुन्हा नोंदविला गेला नाही याची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल. जर जाणून बुजून याकामी कुचराई केली गेली असेल तर संबंधितांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

---------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.शिगम 15:40

**पृ. शी.** :औद्योगिक वसाहतींमधील प्रदुषणयुक्त दुषित पाणी नदीत सोडल्याने मासे मृत्यूमुखी पडणे.

**मु. शी.**:औद्योगिक वसाहतींमधील प्रदुषणयुक्त दुषित पाणी नदीत सोडल्याने मासे मृत्यूमुखी पडणे यासंबंधी सर्वश्री. अनंत तरे,अशोक मोडक,मधुकर चव्हाण,विनोद तावडे, रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर,सर्वश्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" ठाजे जिल्हयातील तळोजा औद्योजिज वसाहतीमधील जेमिज्ल्स जारजा-यांमधील दूषित पाज्यावर प्रक्रिया -ा जरता दिवाळा जोळीवाडयातील जाडीत सोडल्यामुळे जाडीजि-ारी हजारो मासे मरु-ा पडल्याची झालेली दुर्घट-ाा, तसेच रोहा रेवदंडा दरम्या-ा जुंडलिज -ादीच्या जाठी असलेल्या परिसरातील एम.आय.डी.सी. मधील अ-ोज जारजा-यांमधील रसाय-ायुक्त पाजी मोठया प्रमाजात जुंडलिजा -ादीत सोडज्यात येत असल्यामुळे -ादीतील मासे प्रचंड प्रमाजात मृत्यूमुजी पडल्या-ो या -ादीजाठी असलेल्या 30 ते 35 जावातील मच्छीमारीवर अवलंबू-ा असलेल्या सुमारे साडेती-ा हजार जुटुंबियांच्या उदरनिर्वाहाचा निर्माज झालेला जंभीर प्रश्-ा, सदर अचा-ाज घडलेल्या घट-ोमुळे तेथील हजारो जोळीबांधवांवर आलेली उपासमारीची पाळी, दूषित पाजी सोडजाऱ्या जारजा-यांवर तातडी-ो जारवाई जरज्याबाबत प्रदुषज नियंत्रज मंडळा-ो दाजविलेली अजम्य बेपर्वाई, प्रदुषजयुक्त दूषित पाजी सोडल्या-ो ज्या जारजा-यांतू-ा पाजी सोडज्यात आले अशा जारजा-यांज्डू-ा दंडात्मज जारवाई म्हजू-ा प्रती जारजा-ाा लाज-दो-ा लाज रुपये वसूल जरु-ा तेवढीच रक्जम शास-ाा-ो त्यात घालू-ा तेथील जोळी बांधवां-ाा आर्थिज मदत देज्याची नितांत आवश्यजता, प्रदुषज नियंत्रज मंडळ निष्क्रिय असल्या-ो तमाम मक्च्छमार समाजात पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लजात घेता याप्रजरजी शास-ाा-ो तातडी-ो जेलली वा जरावयाची उपाययोज-ाा व शास-ााची प्रतिक्रिया."

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ( पर्यावरण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : राज्यात एका बाजुला मासळीचा दुष्काळ दुस-या बाजुस मत्सोद्योगास मिळणारी सवलत व्हॅटचे कारण दाखवून बंद करण्यात आली. त्यामुळे रायगड,रत्नागिरी, सिंधुदूर्ग,ठाणे, मुंबई या संपूर्ण विभागात मच्छिमारी करणारे मच्छिमार बांधव फार अडचणीत आलेले आहेत.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे...

सभापती महोदय, 26 तारखेला बेलापूर खाडीच्या पट्टयात 5-6 ठिकाणी प्रचंड प्रमाणावर मासे मेले. मच्छिमार लोकांची फार मोठी हानी झाली आहे. असे असताना सुध्दा या विभागाचे मंत्री किंवा राज्यमंत्री त्याठिकाणी गेले नाहीत. कोणतेही अधिकारी गेले नाहीत. निवेदनात म्हटले आहे की ,सदर घटनेसंदर्भात खाडीच्या पाण्याच्या तसेच वसाहतीमधून सोडल्या जाणा-या सांडपाण्याचे नमुने गोळा केले असता ते विहित मर्यादेत आढळून आलेले आहेत. माशांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आलेले असून त्याचा अहवाल प्राप्त झालेला नाही. सभापती महोदय, पर्यावरण खात्याच्या मंत्र्यांनी स्टेटमेंट केले होते की, ज्या भागात ही दुर्घटना झालेली आहे त्या भागातील औद्योगिक कंपन्या आम्ही बंद करु. परंतु दुसरीकडे अधिका-यांनी या कंपन्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. दूषित पाण्याचे नमुने घेतले असता त्यामुळे मासे मेले नाहीत असे सांगितले. सभापती महोदय, पाण्याचे नमुने घटना घडल्यानंतर दुस-या-तिस-या दिवशी तपासणीसाठी घेतले. ज्या दिवशी घटना घडली त्याच दिवशी पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले नाहीत. माशांचे नमुने तपासणीसाठी पाठविले आहेत असे नमूद केले आहे. त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे काय ? ज्या गावामध्ये आणि ज्या भागामध्ये ही घटना घडली तेथील मच्छिमारांना शासन मदत करणार आहे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील तळोजा एमआयडीसीच्या परिसरामध्ये ही घटना घडलेली आहे. याठिकाणी 10 दशलक्ष घनमीटर पाण्याची साठवण टाकी आहे आणि त्यातून पाणी प्रक्रिया करुन शुध्द करुन खाडीत सोडले जाते. या भागातील सांडपाण्याचे प्रमाण वाढले आहे म्हणून अतिरिक्त 10 दशलक्ष घनमीटर क्षमता असलेली टाकी बांधण्याचे काम सुरु आहे. 26 तारखेला ही घटना घडली आहे. काही कंपन्यांच्या सांडपाण्यामध्ये अशा प्रकारे ऑक्सीजनचे प्रमाण कमी असतो आणि ते पाणी ओव्हरफ्लो झाल्यानंतर वाहून गेले. मा.सदस्यांनी याठिकाणी सांगितले की, अधिका-यांनी जे पाण्याचे नमुने घेतले त्यामध्ये विहित प्रमाणात ऑक्सीजन मिळाला. त्यामुळे या पाण्यामुळे मासे मरु शकणार नाहीत असे निवेदनात म्हटले आहे. मा.सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित करण्यापूर्वीच मी अधिका-यांना सांगितले की, ज्या दिवशी खाडीत पाणी आले ते दुस-या दिवशी भरतीने निघून जाणार आहे. दुस-या दिवशी पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेणार काय ? त्यामुळे पाण्याच्या नमुन्यामध्ये मासे मरण्यासाठी जे केमिकल

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 15:45

श्री. गणेश नाईक ....

मिसळले ते दिसेल अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. हे मासे फोरेन्सिक लॅबोरेटरीमध्ये पाठविले होते. ही बाब खरी आहे की, या भागामध्ये लाखो मासे मेले आहेत. 50 ग्रॅम,100 ग्रॅम,500 ग्रॅम एवढेच नाही तर 1 कि.ग्रॅ.वजनाचे मासे देखील मेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक ..

नवीन मुंबई आणि पनवेलच्या किनारपट्टीवर अशा प्रकारे लाखो मासे मेल्यानंतर मी स्वत: त्या भागाला भेट दिली होती. सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनीसुध्दा दिवाला या गावाला भेट दिली होती.मी त्या ठिकाणी गेल्यानंतर जवळजवळ 300 मच्छिमारांनी मोर्चा वजा प्रेमाचा घेराव मला घातला होता. हे सर्व लोक माझ्या मतदारसंघातील आहेत.त्या मच्छिमारांनी मला असे सांगितले की, आता तीन महिने मासे उपलब्ध होऊ शकणार नाही त्यामुळे आमच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. ही गोष्ट खरी आहे की, एम.आय.डी.सी.च्या परिसरात ज्या पध्दतीने प्रदूषण नियंत्रण करावयास पाहिजे त्या पध्दतीने केले जात नाही. पर्यावरण विभागाचा मंत्री या नात्याने मी या कामाबाबत खुष नाही.म्हणून मी संबंधित अधिका-यांना असे सांगितले की, एखादी मोठी कंपनी जरी या गोष्टीस जबाबदार असली तरी त्या कंपनीच्या विरुध्द कारवाई करणे गरजेचे आहे.23 तारखेला ही घटना घडल्यानंतर 26 तारखेला मी जेव्हा या संबंधी अधिक माहिती घेतली तेव्हा मला असे समजले की,घर्डा केमिकल कंपनीचे हे वेस्ट हझार्डस होते आणि तीन ट्रकमधून हे 27 टन वेस्ट हझ ार्डस तळोजा येथील एका हझार्डस वेस्टवर प्रक्रिया करुन ते न्युट्रलाइज करणा-या यंत्रणेकडे आले होते.त्यावर प्रक्रिया केली असती तर त्याला 8 लाख रुपये खर्च आला असता.तीन ट्रकमधून हा माल नेण्यात आला होता त्याचे नंबर्स असे होते की, 1) एमएच-18-एम-3583 2)एमएच-04-एफ - 4886 3)एमएच-43-ई-988. तेव्हा या संदर्भात उच्च स्तरीय चौकशी करण्याच्या बाबतीत मी निदेश दिलेले आहेत. 27 टन वेस्ट तेथून निघाल्यानंतर कोणत्या घटकाकडे ते हॅन्ड ओव्हर करण्यात आले होते ? कोणत्या वाहतूक कंपनीला हे काम देण्यात आले होते आणि हा माल कोणत्या ठिकाणी पाठविण्याचे आदेश त्यांना देण्यात आले होते ?. या संबंधी चौकशी करण्यात येणार आहे या वेस्ट पैकी 15 ड्रम वेस्ट त्यांनी पडघा गावाजवळील नाल्यात टाकला होता व तीन दिवसानंतर पाऊस पडल्यानतर हे सर्व प्रदूषित पाणी दिवाळा गावापर्यन्त आले आणि त्यामुळे हा प्रकार घडला आहे याबद्दल माझी खात्री झाली आहे.म्हणून या सर्वच प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करुन त्या कंपनीविरुध्द कारवाई करण्याच्या अनुषंगाने मी निदेश दिलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी सांगितले की मच्छिमारांच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण

झाला आहे. हा मुद्दा देखील अतिशय महत्वाचा आहे.याबाबतीत व्यक्तिगत मला जर विचारले तर मी असे म्हणेन की , संबंधितांना काही तरी मदत द्यावयास पाहिजे. परंतु या ठिकाणी मी तसा

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.कानडे 15.30

श्री.गणेश नाईक ..

शब्द दिला तर महाराष्ट्रात ठाणे, रत्नागिरी,रायगड, रत्नागिरी,सिंधुदूर्ग इत्यादी क्षेत्रातील अनेक कारखांन्यामध्ये असे प्रकार वारंवार घडत असतात आणि त्यावेळी जर सबंधित व्यक्तीना नुकसानभरपाई देण्याचे ठरविले तर नुकसान भरपाई देण्याच्या बाबतीत मर्यादाच राहणार नाही.म्हणून ज्या घटकांकडून अशी घटना घडलेली असेल अशा घटकांकडून पैसे घेऊन ज्याचे नुकसान झालेले आहे त्याला मदत द्यावी अशा प्रकारची सुधारणा कायद्यात करण्याच्या अनुषंगाने माझी आमच्या विभागाच्या अधिका-याबरोबर मी चर्चा सुरु केलेली आहे.अशा प्रकारची दुर्देवी घटना भविष्यात घडू नये आणि जर घडलीच तर ज्यां कोणाला त्याचा त्रास होतो त्या व्यक्तीला मदत देण्याच्या दृष्टीने कशा प्रकारची कार्यवाही करता येईल याचा विचार चालू आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी काल सुध्दा सभागृहाचे लक्ष या विषयाकडे वेधले होते. आज सुध्दा सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे.महाड येथे सुध्दा केमिकल्स उद्योग सुरु झालेले आहेत. केमिकल्स इन्डस्ट्रीज फक्त कोकणामध्ये मोठया प्रमाणावर सुरु करण्यात आलेली आहे.चिपळूण येथील लोटे परशुराम येथे तसेच महाड येथे केमिकल्सचे कारखाने आहेत. त्या केमिकल्सच्या कारखान्यांचे दुष्परिणाम मोठयाप्रमाणावर होत असतात त्याबाबतीत काल सुध्दा चर्चा झाली होती. महाड जवळून गांधारी नदी वाहते आणि त्या नदीत प्रदूषण युक्त पाणी सोडले जाते .प्रदूषण नियंत्रण करण्याच्या बाबतीत आपली जी यंत्रणा आहे ती कुचकामी आहे हे आतापर्यन्त निष्पन्न झालेले आहे.चिपळूणमध्ये सुध्दा असेच प्रसंग वारंवार उदभवत असतात.

नतर श्री.सुंबरे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कुलकर्णी ....

आणि हे सर्व सांडपाणी, रसायनयुक्त पाणी आहे त्यामुळे लोकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते आहे तेव्हा त्यासाठी प्रथम आपली यंत्रणा सुधारण्यासाठी आपण काय करणार आहात ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, जसे रस्ते विकास महामंडळ आहे, जलविकास महामंडळ आहे अशा अनुषंगाने एक कंपनी स्पेशन पर्पज व्हेइकल प्लॅन खाजगीकरणातून काढण्याच्या दृष्टीने ग्लोबलाईज टेंडर काढून नगरपालिका, महानगरपालिका, एमआयडीसी, साखर कारखाने वगैरे सर्व ठिकाणी होणाऱ्या पाण्यातील प्रदूषणावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने कंपनी करून त्यामार्फत या प्रदूषणावर नियंत्रण आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, नामदार मंत्र्यांनी अगदी विस्तृत आणि चांगले असे उत्तर या ठिकाणी दिलेले आहे. परंतु या होणाऱ्या प्रदूषणाच्या संदर्भात आपण कारखान्यांवर जशी कारवाई करणार आहात त्याचबरोबर हे कारखाने प्रदूषित पाणी सोडतात त्यावेळेस आपले अधिकारी त्याकडे लक्ष देत नाहीत आणि म्हणून त्यांचेवर आपण कारवाई काही करणार आहात की नाही ? तसेच याठिकाणी नुकसान भरपाई देण्याचे तत्त्व, ज्याप्रमाणे मच्छिमारीच्या दुष्काळाचे तत्त्व या शासनाने मान्य केलेले आहे त्याप्रमाणे, मान्य करून या जलप्रदूषणामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई मच्छिमारांना आपण देणार आहात काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, या घटनेनंतर तेथील सर्व अधिकाऱ्यांची त्वरित बदली करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नुकसान भरपाईच्या बाबतीत मी येथे उत्तर दिलेले आहे की, भविष्यात अशीही योजना आपण करू. अर्थात त्याच्या मोजमापा बद्दल आपण नंतर ठरवू.

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदया, माननीय मंत्री वारंवार म्हणत आहेत की, संबंधित कारखान्यांवर कारवाई करू. पण यामध्ये आपण हेही लक्षात घ्यायला पाहिजे की, यामध्ये सीइटीपी देखील तेवढीच जबाबदार आहे. हे मी म्हणत नाही तर एमपीसीबीचे प्रिंसिपल सायंटिफिक ऑफिसर श्री.पी.पी.नांदुसेकर यांनी ओळीने कशा प्रकारे यामध्ये दोष काढले आहेत हे सांगितले आहे. या कारखान्यांमध्ये आपणच हे ट्रीटमेंट प्लांट उभे केले असतील आणि त्यातून प्रदूषण होणार असेल तर आपण काय करणार आहात ? मी आपल्याला श्री.नांदुसेकर यांनी काय म्हटले

...... 3बी 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. मोडक .....

आहे ते वाचूनच दाखवितो. श्री. नांदुसेकर म्हणतात की, Apart from these violations, the CETP had not sent about 300 tones of sludge to the Taloja disposal facility on time. Hazardous waste, if stored for long, can leach into the soil, or, if it has a high calorific value, it carries an explosion risk. म्हणून याचाही आपण गंभीरपणे विचार करावा. स्पेशल परपज व्हेइकल आपण जे उपयोगात आणत आहात त्यामुळे आपल्याला यासाठी परवानगी मिळणार नाही.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.मोडक यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, कारखान्यांबरोबरच सीइटीपीचे घटकही यामध्ये जबाबदार आहेत. परंतु हे सीइटीपी काही शासनाचा प्लांट नाही, तर हा प्लांट तेथील उद्योगाच्या घटकाबरोबर चालविला जातो. एक गोष्ट खरी आहे की त्या ठिकाणी स्लज तेथे जे साचले होते आणि ते वेळेवर शिफ्ट न केल्यामुळे प्रदूषण झाले असेल तर तीही बाब तपासून पाहिली जाईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदया, डहाणू पासून ठाणे, रत्नागिरी आणि रायगड येथे अनेक कारखान्यांतून रासायनिक पाणी प्रक्रिया न करताच सोडले जाते असे जे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले ते बरोबर आहे. सन्माननीय मंत्री महोदय हे स्वत: मासळी खाणारे आहेत. म्हणून त्यांनाही याचा अनुभव असेल की, अशा पाण्यातील मासळी खाताना त्याला रसायनांचा वास येतो. तेव्हा माझी या निमित्ताने विनंती आहे की, नदी-खाडीमध्ये प्रक्रिया न करता जे दूषित पाणी सोडले जाते ते आपण थांबविणार आहात की नाही ? आणि जे अधिकारी या बाबतीत त्वरित दखल घेऊन कारवाई करीत नाहीत त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ?

( यानंतर श्री.जागडे ..... 3सी 1

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, आम्ही हे सर्व सांडपाणी थांबविणार आहोत. औद्योगिक परिसरात असलेल्या साठवण टाक्यांची क्षमता संपली आहे. त्यामुळे दुस-या टाक्या बसविण्यास सांगण्यात आले आहे. तसेच काही टाक्या लिकेज झाल्या आहेत. त्यादेखील बदलण्यास तसेच दुरुस्त करण्यास सांगण्यात आले आहे. लोटे परशुराम एम.आय.डी.सी.च्या साठवण टाकीमध्ये मोठ्या प्रमाणात लिकेज आहे. त्यामुळे तेथील टाकी बदलण्यास सांगण्यात आले आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्र. 8 बाबत**

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याची मागणी माननीय मंत्रिमहोदयांनी केली आहे. त्या प्रमाणे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदय हे मागासवर्गीय आहेत. त्यांनी या लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्याची आवश्यकता आहे.....

( गोंधळ )

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी ही लक्षवेधी सूचना पुकारलेली नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी केलेली विनंती मान्य करुन ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे. मी या ठिकाणी माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे यांच्या मताशी सहमत आहे.

( गोंधळ )

श्री रमेश निकोसे : मी समाजकल्याण खात्याचा मुद्दा बाजुला ठेवीत आहे. सभापती महोदया,....

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी ही लक्षवेधी सूचना पुकारलेली नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदया, ही लक्षवेधी सूचना कधी घेण्यात येणार आहे ?

( गोंधळ )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी विनंती केल्यामुळे ही लक्षवेधी सूचना आपण पुढे ढकलली आहे. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. उद्या तर लक्षवेधी सूचना घेण्यात येणार नाही. तेव्हा माननीय सदस्यांनी जी व्यथा मांडली आहे, ती योग्य आहे.

( गोंधळ )

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, माजी आमदार नारायण करवाळे यांच्या मुलांकडून उपसंचालक,आरोग्य या अधिका-यांने 2 लाख रुपये मागितले आहेत. ही रक्कम ते देऊ शकले नाही. सभापती महोदय, यामध्ये जे आरोप केले होते, ते सिध्द झालेले नाहीत. विभागीय चौकशीमध्ये हे चारही आरोप सिध्द झालेले नाहीत........

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी ही लक्षवेधी सूचना पुकारलेली नाही. माननीय सदस्य जे काही बोलत आहेत, ते रेकॉर्डवर येणार नाही.

( गोंधळ )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा तसाच राहिला आहे. तीन दिवसापूर्वी ओबीसींचा प्रश्न आला होता. तेव्हाही असाच प्रसंग निर्माण झाला होता. आता या ठिकाणी मागासवर्गीयांच्या दृष्टीने पॉलीसी मॅटरचा प्रश्न निर्माण झाला आहे. माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे हे कोणत्या पक्षात आहेत, हा प्रश्न नाही. ते या सदनात सदस्य म्हणून बसले आहेत. मागासवर्गीयांच्या बाबतीत शासन अशा प्रकारे वागत असेल तर त्यांनी शासनाचा निषेध करुन बहिर्गमन केले पाहिजे. त्याशिवाय या बाबतचे गांभीर्य शासनाला समजणार नाही.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : माननीय सदस्यांनी अशा प्रकारे दुस-या सदस्यांना सल्ला देऊ नये.

( यानंतर श्री. सरफरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदया, आपण माझे एकदा ऐकून घ्या. माझ्यासारख्या मागासवर्गीय आमदारावर नेहमी अन्याय होत आहे...

(गोंधळ)

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी एवढा त्रास करुन घेऊ नये...

(गोंधळ)

(विरोधी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

**तालिका सभापती** : आपण सर्वजण कृपया खाली बसावे. माननीय सदस्य श्री. निकोसे साहेबांनी पोटतिडिकीने ज्या भावना याठिकाणी व्यक्त केल्या आहेत त्यांच्याशी मी स्वत: सहमत आहे. परंतु आता मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे त्याबाबत आपण काही करु शकत नाही. आपण मघाशी म्हटल्याप्रमाणे या संबंधी माननीय आरोग्य मंत्री जर काही सांगू शकत असतील तर त्यांना मी उत्तर देण्यासाठी परवानगी देते. माननीय आरोग्य मंत्र्यांनी माननीय सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्यावीत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, तत्पूर्वी मला एक हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माननीय सदस्यांकडून अगोदर पासून ही सूचना दिलेली असते. हे अधिवेशन उद्या संपणार आहे, आणि मंत्रिमहोदयांना त्याची कल्पना आहे. त्यांनी आपणाकडे कधी पत्र पाठविले याची मला कल्पना नाही...

**तालिका सभापती** : हा मुद्दा मघाशी मी मांडला होता...

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सदस्य श्री. निकोसे साहेबांची व्यथा योग्य आहे. या ठिकाणी मागासवर्गीयाचा हा प्रश्न आहे. ज्या खात्याकडे हा विषय दिला आहे त्या खात्याचे मंत्री या प्रश्नाचे उत्तर देण्याचे टाळीत आहेत असा माझा आरोप आहे. म्हणून ते या सभागृहामध्ये उपस्थित रहात नाहीत. त्यांनी सभागृहामध्ये अनुपस्थित राहिल्याबद्दल आपण कोणती कारवाई करणार आहात? ही लक्षवेधी सूचना सुरु होण्यापूर्वी आपण त्यांना निरोप देऊन बोलावून घ्यायला हवे होते. पिठासीन अधिकाऱ्यांनी ही गोष्ट करावयास हवी होती ती त्यांनी केली नाही. आणि ज्यावेळी लक्षवेधी सूचना जाहीर केली जाते त्यावेळी मंत्रिमहोदय या सभागृहात उपस्थित नाहीत अशी माहिती दिली जाते हे योग्य नाही हा माझा हरकतीचा मुद्दा आहे. त्या अनुषंगाने आपण खुलासा करावा व माननीय सदस्यांना आपण न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे.

22-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3D 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मा. सामाजिक न्यायमंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे सभागृहामध्ये हजर होतात.)

**तालिका सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांना सभागृहामध्ये बोलाविण्याची व्यवस्था करण्यात येईल असे मी या ठिकाणी सांगणार होते, व तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलणार होते. परंतु सुदैवाने मंत्रिमहोदय सभागृहामध्ये आता उपस्थित झाले आहेत. तेव्हा ते आपल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देतील.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे यांनी मागासवर्गीयांच्या आरक्षणाच्या संदर्भात मांडलेला मुद्दा जेन्युइन आहे त्याबद्दल दुमत नाही. परंतु लक्षवेधी सूचनेमधील विषय हा सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित आहे. ही लक्षवेधी सूचना चुकीने माझ्याकडे आली आहे. तरीसुध्दा शासनाची त्याबाबतीत...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, आपण संबंधित मंत्रिमहोदयांना बोलवावे..

श्री. दिवाकर रावते : तोपर्यंत आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदया, आपण माझा विषय डावलू नका. सामाजिक न्याय मंत्री उत्तर देऊ शकत नाहीत. हा विषय सामान्य प्रशासन विभागाकडे जातो. या सदनाचे माजी आमदार श्री. नारायणराव करवाडे यांच्या मुलाला सूडबुध्दीने उपसंचालकांनी कामावरुन बडतर्फ केले आहे. हा प्रश्न मी मोठया तळमळीने या ठिकाणी मांडीत आहे. मी छोटासा माणूस आहे, प्रश्न मांडण्यासाठी तळमळतो आहे. मी नागपूरला ज्या ठिकाणी रहातो त्या ठिकाणी माझ्या बाजूला ही व्यक्ती रहाते. तेव्हा एका मागासवर्गीयावर अन्याय होत असेल व माननीय आरोग्य मंत्री या प्रश्नाचे उत्तर देण्यास तयार असतीलतर त्यांनी ती जबाबदारी घ्यावी आणि हा प्रश्न संपवून टाकावा.

**तालिका सभापती** : माननीय सामाजिक न्यायमंत्र्यांच्या म्हणण्याप्रमाणे हा विषय सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित असून त्यांच्याकडे चुकीने गेलेला आहे. मंत्रिमहोदयांनी ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत आपल्याकडे विनंती केली आहे. त्यामुळे जी.ए.डी. शी संबंधित असलेला विषय आपल्याकडे चुकून आला हे आपल्याला केव्हां कळले? आणि कळले असेलतर त्यावेळी मंत्रालयामध्ये संबंधित विभागाकडे आपण वेळेवर कां पाठविले नाही?

(यानंतर सौ. रणदिवे)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

 पूर्वी श्री.सरफरे . . . . 

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, त्यांना सकाळीच सांगितले आहे की, जे माननीय मंत्री महोदय आहेत, त्यांना याबाबतीत . . . .

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आम्ही महिनाभर अगोदर लक्षवेधी सूचना देतो.

**तालिका सभापती** : आपले म्हणणे अगदी बरोबर आहे आणि आम्ही सर्वजण तुमच्या म्हणण्याशी सहमत आहोत.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, याचे कोणाला गांभीर्यच नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**तालिका सभापती** : माननीय आरोग्य मंत्री महोदया काही सांगत आहेत.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, मला तो विषय पूर्णपणे माहिती आहे. कारण ज्यावेळी आरोग्य विभागाच्या पूरक मागण्या होत्या, तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.निकोसे साहेबांनी हा विषय मांडलेला होता. त्यावेळी मी आमच्या विभागाच्या डेप्युटी सेक्रेटरींना तात्काळ चौकशीचे आदेश दिलेले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, सेवेत समाविष्ट करुन घ्यावे. कारण उप संचालकांनी चौकशी केली आहे. आम्ही पूर्ण तपासणी करु. त्याची पूर्ण चौकशी करु आणि निश्चितपणे योग्य ती कार्यवाही करु.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, याबाबतीत स्पेसीफीक निर्णय दिला पाहिजे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, त्याची चौकशी झाली पाहिजे. गुन्हेगार असेल तर तो डिसमिस झाला पाहिजे. परंतु त्याला सेवेत ठेऊन घ्या. त्याच्या मुलांच्या ॲडमिशनचा प्रश्न आहे. त्याची बायको घरात रडत आहे. त्यांनी कोणता गुन्हा केला आहे. माझ्याकडे "महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम 1979 हे पुस्तक आहे. त्यात स्पष्टपणे म्हटलेले आहे की, फौजदारी गुन्हा सिध्द झाल्याशिवाय, त्याला ॲरेस्ट झाल्याशिवाय त्याला नोकरीतून काढता येत नाही. मी कलम नंबरही सांगतो. मा.डॉ.अविनाश चौधरी, उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांनी हेतूपुरस्सर, सूडबुध्दीने सेवा मुक्त केले. दोन लाख रुपये मागितले, दिले नाहीत. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील नियम 13 (एक) (दोन) अन्वये सक्तीची सेवानिवृत्ती ही शिक्षा लादली, नियमानुसार नियम 13(एक) अन्वये शासकीय कर्मचा-याच्या ज्या वर्तनामुळे त्याच्यावर फौजदारी गुन्हयाचा आरोप ठेवण्यात येऊन तो दोषी ठरला असेल व

. . . .3 ई-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याला कोणतीही शिक्षा देय झाली असेल तर, आणि नियम 13 (दोन) अन्वये या नियमामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 8 ते 12 मधील तरतूद केलेल्या मधील पध्दतीनुसार चौकशी करणे वाजवी पध्दतीने व्यवहार्य ठरत नाही अशी शिस्तभंग विषयक प्राधिकरणाची खात्री पटली असेल व त्याने त्याबाबतची कारणे लेखी नमूद केली असतील, तर हया नियमानुसार शिक्षा देय आहे. परंतु 25 वर्षे तो नोकरीमध्ये आहे. त्याच्यावर कोणताही फौजदारी गुन्हा नाही.सूडबुध्दीने शिक्षा देण्यात आली आहे. अशा वेळी माजी आमदार श्री.नारायणराव करवाडे 12 वर्षे येथे होते. आम्ही अधिका-यांच्या विरोधात बोलत आहोत. श्री.ढोंबरे, आरोग्य संचालक यांच्या घरामध्ये एक कोटी रुपये मिळतात आणि हे अधिकारी अशा प्रकारे व्यवहार करीत असतील आणि मागासवर्गीयांवर अन्याय करीत असतील तर मला उपोषणाला बसावे लागेल. मला याबाबतीत निर्णय पाहिजे. त्यांना नोकरीत घ्या आणि मग त्याची चौकशी करा. चौकशी केल्यावर डिसमिस करा, जेलमध्ये टाका, वाटेल ते करा.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदया, मी दोन दिवसाच्या आत पूर्ण निर्णय घेते आणि सन्माननीय सदस्य श्री.निकोसे साहेबांबरोबर देखील मी लगेचच चर्चा करते. मी दोन दिवसाच्या आत योग्य निर्णय घेते.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, दोषी असेल तर त्याच्यावर कारवाई करा.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**तालिका सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय . . . .

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इंफरमेशन आहे . . . .

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना परवानगी दिलेली आहे. सर्वांनी खाली बसावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.निकोसे यांनी जो विषय मांडलेला आहे. आपण अशा अनेक कर्मचा-यांचे विषय या सदनात ऐकत असतो. एखाद्या

. . . .3 ई-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्मचा-यावर कोणताही गुन्हा असो, मग तो करप्शनचा असो, रंगेहाथ पकडलेला असो. जर तो 48 तास तुरुंगात राहीला तर त्याला निलंबित करता येते. अन्यथा निलंबित करता येत नाही हा पहिला मुद्दा आहे. यासंदर्भात कोणतीही पोलीस केस वगैरे काही नाही. त्यामुळे यात निलंबन हा विषय नाही. दुसरे म्हणजे एखाद्या व्यक्तीला निलंबित केल्यानंतर सहा महिन्याच्या आत जर चार्टशीट दिली नाही तर चौकशी चालू रहाते आणि त्याला नोकरीवर घेतले जाते. हे प्रकार यामध्ये झालेले नसल्याने, केवळ दोन लाख रुपये मागितले हा दोष आहे म्हणून त्याच्यावर सूडबुध्दीने कारवाई होणार असेल तर माझे माननीय मंत्री महोदयांना सांगणे आहे की, तुम्ही निवेदन करण्यापूर्वी मला विनंती करु द्या. त्यांचे म्हणणे आहे की, आपण चौकशी करा, काहीही करा.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी सौ.रणदिवे.... 16:15

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

पण येथे जाहीर करा की, सर्व्हीसमध्ये घेते आणि चौकशी चालू ठेवते. एवढीच आपल्याकडून अपेक्षा आहे. एवढे गंभीर काय आहे की ते या नियमामध्ये बसते, हे सांगा.

डॉ.विमल मुंदडा : दोन दिवसाच्या आत यासंबंधीचा मी निर्णय देते. वरिष्ठांनी त्यांच्यावर अन्याय केला असेल असे वाटत असेल तर त्यामध्ये मला चौकशीच करावी लागेल. त्यामुळे निश्चितपणे मी त्यांच्यावरही विभागीय चौकशी सुरु करते...

...अडथळा...

श्री.जितेंद्र आव्हाड : माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी सगळी इन्फर्मेशन दिलेली आहे. इन्फर्मेशन काही राहिली नाही.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोया, या प्रकरणी चौकशी झालेली आहे. माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. सन्माननीय सदस्यांनी बोलताना अगोदरच सांगितलेले आहे. दोषारोप पत्र सादर केलेले आहे, विभागीय चौकशी झालेली आहे. विभागीय चौकशीमधील दोषारोप क्रमांक 1, "पार्शली अंशत: सिध्द होते", दोषारोप क्रमांक (2) सिध्द होत नाही. असे म्हटलेले आहे. म्हणजे "सिध्द होते, पुढे म्हटलेले आहे की "सिध्द होत नाही." एकूण पाच आरोप ठेवलेले आहेत त्यापैकी दोन पार्शली सिध्द होतात आणि तीन आरोप सिध्दच होत नाहीत. यावरुन आपण त्या व्यक्तीला सस्पेंड करणार असाल तर ते योग्य आहे काय ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

**तालिका सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

...(अडथळा)....

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, मंत्री महोदयांनी याबाबत सभागृहात सांगावे.

**तालिका सभापती** : आता मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. आता कोणाला बोलता येणार नाही. पुन्हा पुन्हा मंत्री महोदया सांगत होत्या. आता काही बोलता येणार नाही कृपया आपण खाली बसावे. मंत्री महोदया सक्षम आहेत. त्यांनी सभागृहाला आश्वासन दिलेले आहे की, उद्या अधिवेशन संपण्याच्या आत सर्व माहिती घेऊन, त्या त्याच्यावर निर्णय देणार आहेत. तो निर्णय निश्चितपणे न्यायकारक असाच असेल, त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.निकोसे साहेबांचेही समाधान होईल. म्हणूनच आता ही लक्षवेधी चर्चिलेली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**तालिका सभापती** (पुढे सुरु.....

आहे. त्यावरील जो निर्णय आहे, तो उद्या मंत्री महोदया देतील... आता मंत्री महोदया निवेदनाच्याच द्वारे त्या येणार आहेत, त्यामुळे निवेदनच होणार आहे. आता लक्षवेधी क्रमांक 9 घेण्यात येईल.

--

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृ. शी.** : बार्शी जि.सोलापूर येथील शहा ॲग्रो एजन्सीचे न उगवलेले बियाणे.

**मु. शी** : बार्शी जि.सोलापूर येथील शहा ॲग्रो एजन्सीचे न उगवलेले बियाणे, यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.वसंत काळे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.वसंतराव काळे ( औरंगाबाद विभग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"उस्मा□बाद जिल्हयातील ज्ळंब तालुक्यातील येरमाळा परिसरातील साप□ाई, उपहाई आजि अ□ जावातील शेतज्यां□ बार्शी जि. सोलापूर येथील शहा ॲग्रो एज□सीज्डू□ महाबीजचे सोयबी□चे बियाजे दि.27.6.2005 रोजी जरेदी ज्रु□ दि.28.6.2005 रोजी पेरजी ज्ेली असता व त्यादिवशी पाऊसही पडत असता□ही शेतामध्ये बियाजे उज्वले □सल्यामुळे त्या भाजातील जरीब-अल्पभूधारज शेतज्यांचे लाजो रुपयांचे झालेले □ुज्सा□, यामुळे शेतज्यांवर आलेले संज्ट, ज्ृषी अधिजारी, जि.प. उस्मा□बाद यांचेज्डे तज्ार ज्रु□ही अद्याप संबंधित व्यापाऱ्यावर जार्यवाही □ होजे, शेतज्यां□ ज्ेलेली □ुज्सा□ भरपाईची माजजीची दजल □ घेजे, तसेच पैशाच्या जोरावर बियाजे विज्रेत्याज्डू□ हा प्रज्ार दडपू□ टाजज्याचा होत असलेला प्रयत्□, त्यामुळे बाधीत शेतज्यांमध्ये □र्माज झालेले असंतोषाचे वातावरज, याबाबत शास□ा□ तातडी□ जरावयाची जार्यवाही व शास□ाची प्रतिज्रिया".

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या आहेत. त्यामध्ये आपल्या परवानगीने थोडी दुरुस्ती करावयाची आहे. परिच्छेद क्रमांक 4 मध्ये "त्यापैकी" च्या ऐवजी "वरील व" असे वाचावे. दुरुस्ती केल्याप्रमाणे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.वसंतराव काळे : सभापती महोदया, निकृष्ट दर्जाचे बियाणे, बोगस बियाणे शेतकऱ्यांना विक्री केल्यामुळे पेरणीनंतर बियाणे उगवले नाही.... तुम्ही तास तास वेळ घेता...डॉ. सावंत...

**तालिका सभापती** : आपण आपापसात बोलू नये.

श्री.वसंतराव काळे : बाहेर बोलू.

**तालिका सभापती** : बाहेर बोला. कृपया आपण चेअरला उद्देशून बोलावे.

श्री.वसंतराव काळे : उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यामध्ये उपळाई नावाच्या गावात बार्शी येथील शहा एजन्सीकडून महाबीजचे सोयाबीनचे बियाणे खरेदी केले त्या पावत्यांवर लॉट नंबरही लिहिलेले नाहीत. ते बियाणे पेरले परंतु ते उगवले नाही.

यानंतर कु.थोरात...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ 16:20

श्री. वसंतराव काळे ..

शेतक-यांनी तक्रारी केल्या, त्यानंतर कृषि अधिकारी येऊन गेले आणि त्यांच्या मदतीने शाहा एजन्सीने, बियाणे न उगवण्याची विविध कारणे काय आसू शकतात यासंबंधात वर्तमानपत्रात जाहिरात दिली. बियाणे विक्रते, गुणनियंत्रण करणा-या यंत्रणेची जी अपेक्षा असते ती अपेक्षा त्यांनी वर्तमानपत्रात छापलेली आहे व "यात आमचा काही दोष नाही," अशा स्वरुपाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सभापती महोदया, मला अतिशय दु:खाने सांगावेसे वाटते की, या प्रकरणामध्ये कृषि अधिका-यांनी केलेली चौकशी चुकीची आहे. पक्षपाती आहे. कंपनी आणि त्या बीज विक्रेत्याला मदत करणारी आहे. असा प्रकार लातूर जिल्हयात झाला. परभणी कृषि केंद्राच्या बाबतीत आज सकाळीच या सभागृहात चर्चा झाली. त्यामुळे या लक्षवेधीच्या संदर्भात शासनाने जे उत्तर दिलेले आहे, त्या उत्तराने आमचे पूर्ण समाधान होणार नाही. म्हणून मला याठिकाणी प्रश्न विचारावयाचा आहे. दर वर्षी असे प्रकार घडतात. सरकारने आता असा सल्ला दिला आहे की, ग्राहक मंचाकडे जा. शेतक-यांचे हे सरकार आहे. ग्रामीण भागातील जनतेच्या मतावर निवडून आलेले सरकार आहे. मी या सरकारला विचारु इच्छितो की, या देशाचा तारणहार शेतक-याचे एवढे नुकसान होते, त्यवेळी त्यांना फक्त बियाणाच्या पिशव्या देऊन नुकसान भरपाई मिळणार नाही. म्हणून बियाणे न उगवल्यामुळे शेतक-याच्या उत्पन्नावर झालेला परिणाम लक्षात घेऊन या शेतक-याला नुकसानभरपाई पर एकराप्रमाणे दिली जाणार आहे काय? हे बियाणे उत्पादन करणा-या महाबीज या कंपनीमधील यंत्रनेला कीड लागलेली आहे. त्या किडीचा बंदोबस्त करण्यासाठी त्या यंत्रणेतील जे भ्रष्ट अधिकारी आहेत, त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय?या बियाणे विक्रेत्याचे लायसन रद्द करुन त्याच्यावर फौजदारी खटले दाखल करणार आहात काय? सभापती महोदया, दर वर्षी असे प्रकार घडतच असतात. वेगवेगळया खाजगी कंपन्या आणि महाबीज यांच्यामार्फत उत्पादन केलेली बियाणे उगवत नाहीत. त्यामुळे हजारो एकर जमिनीवर उत्पादन होत नाही. शेतक-यांचा हंगाम आणि पीक तेवढेच असते. शेतक-याच्या उत्पादनाचे साधन तेवढेच आहे. उत्तरामध्ये दिलेले आहे की, महाबीज उगवले नाही, त्यामुळे शेतक-यांना बियाणांच्या पिशव्या पुरविण्यात आल्या. त्या बियाणांच्या पिशव्यांचा काही उपयोग नाही. शेतक-यांचा हंगाम गेलेला असतो. पेरणीची वेळ गेलेली असते. म्हणून माझी मागणी अशी आहे की, नुकसान भरपाईच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ 16:20

श्री. वसंतराव काळे...

संदर्भात कायम स्वरुपी निश्चित धोरण ठरण्याची गरज आहे. कुठल्या पध्दतीने ही नुकसान भरपाई द्यावयाची यासाठी कायम स्वरुपी धोरण आखावे. ते धोरण ठरविण्यासाठी तज्ञ माणसे नेमावीत आणि नुकसानभरपाईचे आकडे निश्चित करावेत. जमिनीची पत, हवामान, पाऊस हा सगळा संदर्भ घेऊन स्थायी स्परुपाचे धोरण शेतक-यांच्या हितासाठी सरकार आखणार आहे काय आणि विमा कंपनीचे संरक्षण घेणार आहे काय या सगळया प्रश्नांची उत्तरे मंत्रिमहोदयांनी द्यावीत.

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सगळे प्रश्न लक्षात असतील तर माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदया, वस्तुस्थिती अशी आहे की, कोणकोणते प्रश्न विचारले हे जर आता सन्माननीय सदस्यांना विचारले तर त्यांनाही ते सांगता येणार नाहीत. सभापती महोदया, यामध्ये सन्माननीय सदस्यांनी एक महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. दरवर्षी बियांणांच्या बाबतीत तक्रारी असतात. बोगस बियाणे असेल, उतारा बरोबर आला नसेल तर त्याबाबतीत काही तरी धोरण असले पाहिजे असा सन्माननीय सदस्यांचा विचारण्याचा उद्देश आहे. मी एवढेच सांगेन की, हा केंद्र सरकारचा कायदा आहे. आता केंद्र सरकारने नवीन कायदा प्रस्तावित केलेला आहे. त्या कायद्यामध्ये काय काय समाविष्ट असावे त्याबाबतीत आपण असे म्हणत आहोत की, अशा पध्दतीने कंपनीच्या चुकीमुळे जर शेतकऱ्यांचे नुकसान होत असेल तर त्याला नुकसानभरपाई मिळाली पाहिजे. असा आग्रह राज्य शासनाच्या वतीने केंद्र शासनाकडे धरलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न महाबीजच्या संदर्भात विचारलेला आहे...

श्री. पांडुरंग फुंडकर : नुकसानभरपाईच्या संदर्भात सांगावे.

श्री. बाळासाहेब थोरात : बियाणांच्या संदर्भातील जो कायदा आहे त्यामध्ये नुकसानभरपाई नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : तुम्ही कसेही बियाणे दिले तरी ते शेतकऱ्यांनी पेरावे आणि त्यांचे नुकसान झाले तरी चालेल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : त्या कायद्यामध्ये जो बदल प्रस्तावित आहे त्या बदलामध्ये नुकसानभरपाई मिळावी असा आग्रह राज्य शासनाने धरलेला आहे.

श्री. सुधाकर गणगणे : यासंबंधात जे गुन्हे करतात त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होणार की नाही ?

श्री. बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत त्यामध्ये महाबीजच्या संदर्भात ज्या तक्रारी आहेत त्यासंदर्भातील प्रश्न विचारलेला आहे. त्यांच्या ज्या स्पेसिफिक तक्रारी असतील त्या त्यांनी लेखी स्वरुपात द्याव्यात. त्याची पूर्ण चौकशी करुन त्यामध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. बाळासाहेब थोरात .....

जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. आणखी एक तक्रार करण्यात आली की, बियाणाच्या पिशवीवर लॉट नंबर नव्हता. तशी तक्रार आढळून आली तर त्याचीही चौकशी करण्याची राज्य शासनाची तयारी आहे. त्यामध्ये जर दोषी आढळून आले तर ती कारवाई केली जाईल.

( काही सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागतात )

**तालिका सभापती** : शेतकऱ्यांच्या प्रश्नावर महिला सन्माननीय सदस्या प्रश्न विचारण्याची परवानगी मागत आहेत त्यामुळे आधी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांना मी प्रश्न विचारण्याची परवानगी देत आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदया, आपण मला प्रश्न विचारण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देते. आज बीबियाणांच्या बाबतीत शेतकऱ्यांचे अनेक प्रकारे फसवणूक होत आहे. काही कंपन्या जाहिरात करतात. मध्यंतरी बी.टी. बियाणाच्या बाबतीत एका कलाकाराने जाहिरात केली होती. असे कलाकार जाहिरातीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रभावित करतात आणि शेतकरी ते बीबियाणे घेतात. ते बियाणे पेरल्यानंतर शेतात उगवत नाही. अशा प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक होत असते. अशी जाहिरात करणारे जे कलाकार आहेत किंवा कंपन्या आहेत त्यांच्यावर गुन्हा दाखल करणार काय ? त्यांची चौकशी करणार काय ? त्यांच्याबाबतीत काय ॲक्शन घेणार ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदया, या प्रश्नाचे उत्तर मी यापूर्वी सुध्दा दिलेले आहे. जे अधिकृत असते त्याची जाहिरात केली जात असते. त्यामुळे कलाकारांवर कारवाई करण्याची आवश्यकता नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना बियाणांचा पुरवठा महाबीज किंवा बियाणे महामंडळ करु शकत नाहीत त्यामुळे वेगवेगळया कंपन्यांच्या माध्यमातून या बियाणांचा पुरवठा होत असतो. महाबीज तसेच बियाणे महामंडळ जे बियाणे पुरवितात ते बियाणे सुध्दा ते टेंडरच्या माध्यमातून विविध राज्यातून मागवितात आणि तेच बियाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना देत असतात.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदया, या वर्षाला बियाणे महामंडळ, महाबीजने सोयाबीन, तीळ आणि इतर वेगवेगळया प्रकारच्या बियाण्यांचे टेंडर काढले होते. या टेंडरच्या माध्यमातून सोयाबीनचे टेंडर अशा व्यापा-याला दिले की ज्याचा या बियाण्याशी काही संबंध नाही, तो मध्य प्रदेशातील खरेदीदार आहे. त्या खरेदीदाराच्या माध्यमातून दिले गेले. असे जे बियाणे आहे ते बाजारातून शेतक-यांकडून खरेदी केले जाते आणि महाराष्ट्रात पाठविले जाते. तेच बियाणे मग थैल्यांमध्ये भरुन शेतक-यांना दिले जाते. या वर्षाला जे बियाण्याचे जे टेंडर दिले ते मध्य प्रदेशातील एका व्यापा-याला दिले होते हे खरे आहे काय ? इतर व्यापा-यांनी सुध्दा सप्लाय करण्याची तयारी दाखवून सुध्दा काही व्यवहार करुन एका विशिष्ट व्यापा-याला दिले गेले हे खरे आहे काय आणि त्या व्यापा-याचा दुरान्वयानेही बियाण्याशी संबंध नाही अशा व्यापा-याला दिले गेले हे खरे आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदया, सोयाबीनचे बियाणे खरीप 2004 मध्ये तयार केले गेले. यावर्षी मागणी मोठया प्रमाणावर असेल म्हणून महाबीजने 5 लाख 30 हजार बियाण्याची त्यांनी तयारी केली. आतापर्यंत महाराष्ट्राच्या बाहेर बियाणे करीत होतो. परंतु महाराष्ट्रातील शेतक-यांना मदत व्हावी म्हणून महाराष्ट्रात ते प्लॉट घेतले आणि 80 टक्के बियाणे महाराष्ट्रात तयार करण्यात आले. त्यासंबंधी मा.विरोधी पक्ष नेते ज्या पध्दतीने सांगत आहेत की कोणत्या तरी व्यापा-याला टेंडर दिले, अशा पध्दतीने दिले, यामध्ये तशी वस्तुस्थिती नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बियाणे महामंडळाने जे टेंडर स्वीकृत केले त्याची यादी माझ्याजवळ आहे. पण मंत्रिमहोदय स्पष्टपणे नाही म्हणत आहेत. मध्य प्रदेशातील प्राग्या एजन्सीचे 1 लाख 10 हजाराचे टेंडर मंजूर केले आणि त्यांना ते दिले आहे आणि तुम्ही नाही म्हणता ? बियाणे महामंडळातील ज्यांनी टेंडर मंजूर केले आणि अशा बियाण्याची मागणी केली आणि त्यांनी पुरवठा केला आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : मध्य प्रदेशातून काही बियाणे तयार करुन घेतो. त्यामध्ये मा.विरोधी पक्ष नेते सांगत आहेत त्या सगळया प्रकारची चौकशी केली जाईल. त्याच्यामध्ये दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : बियाणे तयार करायला लावणे आणि तेथून मागविणे हे मी समजू शकतो. परंतु ज्याचा बियाण्याशी संबंधच नाही, तो फक्त धान्य खरेदीचा व्यापारी आहे, काही लोकांच्या संगनमताने या धान्य खरेदी करणा-या व्यापा-याला टेंडर दिले, हे मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. पूर्ण माहिती देण्यास मी तयार आहे. माझा प्रश्न आहे की, आता त्यांनी जर माल मागविला नसेल तर ते टेंडर रद्द करुन ज्यांनी हे टेंडर पास केले त्याच्यावर कारवाई करणार आहे का ?

श्री.बाळासाहेब थोरात : याची सर्व चौकशी केली जाईल आणि त्यात जे दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे मी यापूर्वीच सांगितले आहे.

श्री.दिवाकर रावते : मा.सदस्य श्री.वसंतराव काळे यांनी भ्रष्ट अधिका-यांवर कारवाई करणार का ? असा प्रश्न उपस्थित केला होता. मा.मंत्रिमहोदय म्हणाले की, आम्ही अवश्य करु. याच सदनामध्ये लातूरच्या बी-बियाण्यामध्ये भ्रष्टाचार करणा-या मोरे नावाच्या अधिका-यावर कारवाई करण्यासाठी लेखी तक्रार केली तेव्हा श्री.गोविंदराव आदिक हे कृषी मंत्री होते. त्यानंतर विशेष उल्लेख उपस्थित केला त्याचे आजही मला उत्तर आलेले नाही. त्या भ्रष्टाचारी अधिका-याच्या मालमत्तेची यादी दिली होती. त्याच्यावर कारवाई झालेली नाही. तेव्हा मी मोरे नावाच्या अधिका-याबाबत जे पत्र दिले आहे ते तुमच्या कार्यालयात असेल, ते काढून कारवाई करणार का आणि आता आपण धक्कादायक सांगितले की बियाणे ॲक्टमध्ये नुकसान भरपाईची कोणतीही तरतूद नाही. मग कोणतेही बियाणे पेरले आणि माझ्याकडे उगवण झाली नाही तरी मला काही मिळणार नाही. मग या राज्यात बी.टी.कॉटनच्या नावाने एवढी पत्रके काढली आणि शेतक-यांच्या हातात बेडया ठोकू अशी पत्रके काढली, त्याच्यानंतर धाडी टाकून बोगस बीटी पकडत आहे, एवढया लाखाचे बीटी कॉटनचे बियाणे पकडत आहे असे सांगितले आहे. बियाणे ॲक्टमध्ये जर नुकसान भरपाईची तरतूद नसेल तर आपण हे सगळे कोणासाठी करीत आहात, कोणाला प्रोटेक्ट करण्यासाठी करीत आहात ? बियाणे ॲक्टमध्ये बदल करीत आहोत असे सांगितले आहे, धन्यवाद, पुढील अधिवेशनामध्ये बिल आणावे. आम्ही तुमचे मनापासून कौतुक करु. बीटी कॉटनच्या संदर्भात आणि आता बोलगार्डमध्ये लोक फसले आहेत, त्यासंबंधी काय करणार आहात ? बोलगार्डचा संपूर्ण शेतक-यांचा प्रश्न होता.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 16:35

(श्री. दिवाकर रावते..

बी.टी.कॉटन बियाणाची उगवण झाली नाही. कायद्यामध्ये तरतूद नसल्यामुळे शेतक-यांना नुकसान भरपाई मिळणार नाही, परिणामी शेतकरी हवालदील झालेला आहे. तेव्हा या शेतक-याला शासनाच्या माध्यमातून कोणत्या पध्दतीने नुकसान भरपाई मिळेल ?

श्री. बाळासाहेब थोरात : बियाणाचा कायदा हा केन्द्र सरकारचा आहे ही वस्तुस्थिती आहे. त्या कायद्यामध्ये नुकसान भरपाईची तरतूद नाही. मा.सदस्यांनी बी.टी.कॉटनचा उल्लेख केला. त्याबाबतीत पर्यावरण संरक्षण ॲक्टचाही संबंध येतो असे मी सांगितलेले होते आणि तो वेगळा विषय आहे.

(दोन्ही बाजूचे अनेक मा.सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात...)

श्री. पांडुरंग फुंडकर : मागील वर्षी तिळाच्या संदर्भात नुकसान भरपाई दिली होती...

श्री. बाळासाहेब थोरात : मा.सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. बियाणाच्या बाबतीत असा प्रश्न निर्माण झाल्यानंतर कायद्यामध्ये नुकसान भरपाईची तरतूद नसल्यामुळे जिल्हाधिकारी, कृषी अधिकारी यांना एकत्र बसवून शेतक-यांना कशा प्रकारे मदत करता येईल यादृष्टीने कारवाई करण्यात येत असते.

श्री. श्रीकांत जोशी : माझा स्पेसिफिक प्रश्न असून त्याला मंत्री महोदयांनी स्पेसिपिक उत्तर द्यावे. बियाणे बोगस निघाले ही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत 11 दिवसात जबाबदारी का निश्चित करण्यात आली नाही ? महाबीज, डिस्ट्रीब्यूटर आणि विविध सेवाकेन्द्रे यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : ज्या वेळी तक्रार येते त्यावेळी पंचनामा केला जातो. जिल्हा आणि तालुका स्तरावर कृषी अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली कमिट्याही स्थापन केलेल्या आहेत. यामध्ये जर्मिनेशनचा पिरिअड किती आहे हे पाहणे आवश्यक असते. बियाणाचा कायदा हा स्वतंत्र कायदा असल्यामुळे अन्य कोणत्याही कायद्यांतर्गत याप्रकरणी केस दाखल करता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. अधिका-यांची स्पेसिफिक नावे सांगितली तर त्याबाबतीत तपासणी करुन कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : मी मोरे या अधिका-यांची लेखी तक्रार केलेली आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : त्यासंदर्भात देखील चौकशी केली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत काळे : अधिका-याला काय शिक्षा होते हा विषय दुय्यम आहे. बियाणे न उगवल्यामुळे शेतक-यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अशी आमची मागणी आहे. मात्र मंत्रीमहोदय, हा केन्द्र सरकारचा कायदा आहे, त्यामध्ये नुकसान भरपाईची तरतूद नाही असेच सारखे सांगत असून आम्हाला ते कात्रजचा घाट दाखवत आहेत. केन्द्राच्या कायद्यामध्ये जो काही बदल करावयाचा असेल तो करावा. पण महाराष्ट्र सरकार या नुकसान भरपाईची जिम्मेदारी उचलून शेतक-याला मदत देण्यासाठी स्थायी स्वरुपाचे धोरण आखणार आहे काय ?तसेच मराठवाडयामध्ये ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारचे नुकसान झालेले आहे त्या त्या ठिकाणच्या शेतक-यांना शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ? तसेच ज्यांनी बोगस बियाणे विकेले त्यांची लायसन्सेस रद्द करुन त्यांच्यावर फौजदारी कारवाई करणार काय ?

....नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 16:40

श्री. वसंतराव काळे पुढे सुरु....

सभापती महोदया, मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, आमच्या जिल्हयाचे तरुण तडफदार राज्यमंत्री यांनी उस्मानाबाद येथे शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यास काही हरकत नाही अशा प्रकारची घोषणा केली आहे...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : आपण कृपया खाली बसा. .

श्री. वसंतराव काळे : सभापती महोदया, मला आपण कोणतीही शिक्षा दिली तरी चालेल. पण मला एका प्रश्नाचे उत्तर हवे आहे. उस्मानाबाद जिल्हयातीलच शेतक-यांचे नुकसान झालेले आहे. या शेतक-यांना नुकसान भरपाई दिली जाणार आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या संदर्भात केंद्र शासनाचा कायदा असला तरी राज्य सरकारने याबाबतीत काही तरी धोरण ठरविले पाहिजे.

**तालिका सभापती** : केंद्र शासनाचा कायदा असून त्यात नुकसान भरपाई देण्याची प्रोव्हीजन नाही. तरी देखील या शेतक-यांना नुकसान भरपाई कशी देता येईल याचा शासन जरुर विचार करील असे माननीय मंत्र्यांनी सांगितलेले आहे. शासनाला विचार करु द्या.

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय सदस्य श्री. वसंत काळे यांनी मघाशी सांगितले की, तरुण आणि तडफदार राज्यमंत्र्यांनी नुकसान भरपाई देण्याची घोषणा केलेली आहे. राज्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेची अंमलबजावणी करण्यात येईल काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी जी घोषणा केली त्यात असा उल्लेख केला आहे की, महाबीज कंपनीकडून नित्कृष्ट दर्जाचे दिले गेले असेल व त्यामुळे शेतक-यांचे नुकसान झाले असेल तर त्यास महाबीज कंपनीच जबाबदार राहील. महाबीज कंपनी ही शासनाचीच कंपनी आहे. ज्या शेतक-यांचे महाबीजच्या बियाण्याच्या माध्यमातून नुकसान झाले असेल त्या शेतक-यांना नुकसान भरपाईची देयके दिली जातील एवढेच मी बोललो आहे.

श्री. वसंतराव काळे : या वर्षी ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले त्यांना नुकसान भरपाई दिली जाईल काय ? सभागृहात लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने बरीच चर्चा झाली. परंतु शेतक-यांच्या पदरात मात्र काहीच पडले नाही.श्री. बाळासाहेब थोरात : मी मघाशी सांगितले आहे की, जिल्हाधिकारी, कृषी अधिकारी आणि कंपनीचे अधिकारी त्याच प्रमाणे शेतक-यांचे प्रतिनिधी एकत्र बसून यासंदर्भात तडजोड करुन शेतकऱ्यांना मदत देण्याचा प्रयत्न करणार आहोत. 2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सन्माननीय सदस्य श्री. काळे यांचा स्पेसिफीक प्रश्न आहे की, नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई शासनाकडून देण्यात येणार आहे काय ?

श्री. वसंतराव काळे : माझ्या प्रश्नाचे उत्तर या ठिकाणी आलेले नाही. मला माननीय मंत्र्यांकडून उत्तर मिळाले पाहिजे. या ठिकाणी चर्चा उपस्थित करुन शेतक-यांना मदत दिली जाणार नसेल तर चर्चा करण्यात काहीही अर्थ नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, कुठल्याही मार्गाने शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याचा विचार केला जाईल. त्यांनी तसा मघाशी उल्लेख केलेला आहे. कुठल्याही त-हेने शेतक-यांना नुकसान भरपाई दिली जाईल याचा जरुर विचार केला जाईल. यामध्ये "जरुर" हा शब्द अतिशय महत्वाचा आहे. त्या शब्दाखाली अंडरलाईन केलेली आहे. शेतक-यांना या संकटातून आपल्याला बाहेर काढावयाचे आहे. या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाने निश्चितपणे नोंद घ्यावी.

श्री. बाळासाहेब थोरात : आपल्या निदेशाप्रमाणे नोंद घेतली आहे.

------

यानंतर श्री. कानडे..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी मा. सभापती)**

**पृ.शी.**: राज्यातील साखर कारखाने भाडेपट्टीवर देणे.

**मु.शी.**: राज्यातील मोडीत निघण्याच्या मार्गावर असलेले साखर कारखाने भाडेपट्टीच्या तत्वावर देण्यासंबंधी श्री. कन्हैयालाल गिडवाणी,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय,मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने मा.सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"साजर पॅजेज" च्या -ावाजाली तोटयात चालजाऱ्या जेवळ 64 सहजारी साजर जारजा-यांची -ावे निक्श्चत जेली असता-ाच दुसरीजडे मोडीत -िघज्याच्या मार्जावर असलेले सहजारी साजर जारजा-े भाडेपट्टीवर देज्याचा प्रस्ताव साजर आयुक्तां-ी दि-ांज 27 जू-, 2005 रोजी तयार जेल्या-े सहजार जेत्रात उडालेली प्रचंड जळबळ, या -व्या प्रस्तावाच्या आधारे बंद पडज्याच्या मार्जावर असजाऱ्या सहजारी साजर जारजा-यांच्या संचालज मंडळाला "जारजा-ा मोडीत जाढा, -ाहीतर भाडेपट्टीवर द्या" असा जबरदस्तीचा देज्यात आलेला इशारा, सध्या राज्यातील चार जारजा-यांच्या भाडेपट्टीच्या -िविदा साजर आयुक्तां-ी जाढलेल्या असजे, -व्या प्रस्तावा-ुसार आता जारजा-ा सात वर्षासाठी भाडेपट्टीवर द्यावा लाजजार असू-ा ज्या जारजा-या-े तो चालवावयास घेतला आहे त्यालाच तो विज्ज्याबाबतची घालज्यात आलेली जाचज अट, त्याचप्रमाजे सात वर्षाच्या जरारा-वये संबंधित जारजा-यां-ा भाडयापोटी जोजतीही आजाऊ रक्जम मिळजार -ासू-ा पहिल्या दो-ा वर्षासाठी उसाच्या जाळपाावर दर हंजामी जिमा-ा जेवळ 50 रुपये प्रति ट-ा भाडे व त्या-ंतर दर वर्षाला जाळपावर जेवळ 75 रुपये, 100 रुपये अशा प्रमाजात अतिरिक्त भाडे वसुल जरज्याची असलेली -ाममात्र तरतूद, त्याचप्रमाजे उस उत्पादज शेतजऱ्यां-ा जेवळ 850 रुपये प्रती ट-ा भाव देज्याचे ठरविज्यात आले असू-ा चूजारे देज्याच्या जालावधीबाबत बाळजज्यात आलेले मौ-ा, त्याचप्रमाजे जारजा-ा चालविज्यास घेजाऱ्यां-ी भाडे देज्यास विलंब जेल्यास त्यां-ा जुठल्याही प्रजारचे विलंब शुल्ज जिंवा दंड आजारज्यात आलेले -ासू-ा जेवळ 10



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी...

टक्जे व्याजदरा-ने पैसे मोजावे लाजजार असल्याची -याममात्र अट, परिजामी साजर ज़ारजा-ने भाडेतत्वावर देज्याबाबतच्या शास-ााच्या -िर्जयामुळे राज्यातील सहज़ारी ज़ारजा-ादारी मोडीत -िघज्याची व्यक्त होत असलेली भिती, भाडेपट्टीच्या -ावाजाली साजर सहज़ाराला जाजजीज़रजाची लाजज झाल्या-ने राज्यातील उस उत्पादज शेतज़री व भाजधारज उध्वस्त होज्याची व्यक्त होत असलेली भिती, परिजामी राज्यातील तमाम उस उत्पादज शेतज़्यांत पसरलेला तिव्र असंतोष व संतापाची लाट, सबब शास-ा-ने या -िर्जयाचा फेरविचार ज़रावा अ-यथा उग्र आंदोल-ा छेडज्यात येईल असा देज्यात आलेला जंभीर इशारा, सबब याबाबत शास-ा-ने तातडी-ने ज़ेलेली अथवा ज़रावयाची ज़ार्यवाही व उपाययोज-ा व शास-ाची प्रतिक्रिया.

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती मा.सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-----

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, गेल्या 20 वर्षापूर्वी राज्यातील सहकारी साखर कारखाने आणि खाजगी साखर कारखाने होते त्यामध्ये खाजगी कारखान्यांना सहकारी साखर कारखाना केल्याशिवाय केंद्राला शिफारस करावसयाची नाही असे ठरले होते. दुर्देवाची बाब अशी की, राज्यामध्ये कॉग्रेसचे आणि देशामध्ये सुध्दा कॉग्रेसचे सरकार असताना सहकारी साखर कारखान्यांचे खाजगीकरण होत आहे. निवेदनातून जे उत्तर आले आहे त्यामध्ये 8 कारखाने विक्रीसाठी काढले आहेत आणि 11 सहकारी साखर कारखाने भाडेपट्टयाने देण्याचा निर्णय घेतला आहे असे म्हटले आहे.8 कारखाने भाडेपट्टयाने देणार आहात त्याच्या निविदा मागविल्या आहेत त्या कमी आहेत म्हणून स्वीकारल्या नाहीत.पुढे याची निविदा काढाल त्यावेळी कारखान्याची किमान किंमत ठरवूनच निविदा काढल्या तर ठीक होईल अन्यथा कारखान्यांचे नुकसान होईल.8 कारखान्यांची विक्री करताना तशी किमान किंमत ठरविली आहे काय ? 11 कारखाने भाडेतत्वावर दिले त्याचे दर काय ठरविले आहेत...

**सभापती** : मा.सदस्यांनी नेमका प्रश्न विचारावा. 10 मिनिटे प्रश्नाची पार्श्वभूमी सांगू नये.प्रश्न डायरेक्ट विचारावा.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, 11 कारखाने भाडेपट्टयाने दिलेले आहेत त्यासाठी वित्तीय संस्थांची परवानगी घेतली आहे काय ? आयडीबीआय,नाबार्ड आणि रिझर्व्ह बँक यांची परवानगी घेतली आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, 3 कारखाने भाडेतत्वावर दिलेले आहेत. 11 दिलेले नाहीत. आजरा,शिवशक्ती मागासवर्गीय कारखाना आणि पांझराकांड हे तीन कारखाने आहेत. पुढील इतर काही कारखाने भाडे तत्वावर देण्याचे प्रस्ताव आयुक्तांच्या स्तरावर किंवा शासन स्तरावर आहेत. काहींच्या जाहिराती दिलेल्या आहेत .याबाबतीत पुन्हा एकदा विचार-विनिमय करुन निर्णय घ्यावयाचा आहे. मागील काळात 10 रु. किलो साखर होती. परंतु लोकरीमावा आणि निसर्गाची अवकृपा यामुळे झालेले ऊसाचे कमी क्षेत्र त्यामुळे अंडर कपॅसिटी क्रशिंग म्हणून कारखान्यांची परिस्थिती बिघडली आणि अडचणी समोर आल्या आहेत. यासाठी पुन्हा या सगळया परिस्थितीचा शासन फेरविचार करणार आहे.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न होता की,भाडेपट्टयावर जे कारखाने दिले आहेत त्याला वित्तीय संस्थांची मान्यता घेतली आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : भाडेतत्वावर जे कारखाने दिले आहेत त्यासाठी वित्तीय संस्थांची परवानगी किंवा संमत्ती घेतली काय ? जे कारखाने अवसायानात काढले जाणार आहेत त्यांची अपसेट प्राईझ आणि व्हॅल्युएशन नक्की केले आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, भाडेतत्वावर कारखाने देताना बँकेची परवानगी घेतलेली आहे. वित्तीय संस्थांची पैशाची हमी सरकारने घेतलेली आहे. वित्तीय संस्थांचा पैसा सुरक्षित आहे.

: लिक्वीडेशनच्या दृष्टीने प्रत्येक कारखान्याची अपसेट प्राईज ठरली आहे काय?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : अशी किंमत काही ठरविण्यात आलेली नाही.परंतु ज्या साखर कारखान्यांची परिस्थिती बिघडलेली आहे अशा सर्व साखर कारखान्यांच्या बाबतीत अभ्यास करण्यासाठी राणे सामिती गठीत करण्यात आली होती आणि या समितीने बुक व्हॅल्यूज काढून ठेवलेल्या आहेत. परंतु अमुक एवढी किंमत असे काही ठरविलेले नाही.हया कारखान्यांची परिस्थिती सुधारावी या दृष्टीने शासनाचे प्रयत्न चालू आहेत.

श्री.श्रीकांत जोशी :गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना हा मराठवाडयातील एक चांगला साखर कारखाना आहे आणि तो भाडेपट्टयावर घेण्यात आला होता. त्या कारखान्याचे दोन वेळा ऑक्शन करण्यात आले होते.त्या कारखान्यासाठी हायैस्ट प्राईस आली होती तरी सुध्दा त्याचे टेन्डर फायनल करण्यात आले नाही. आता विनायक सहकारी साखर कारखाना आणि मराठवाडा सहकारी साखर कारखाना या दोन्ही साखर कारखान्याच्या बाबतीत शासनाने जेवढे मूल्यांकन केले होते तेवढी त्या कारखान्याची किंमत आली नाही परंतु त्यापेक्षा थोडी कमी किंमत आली आहे.हे दोन्ही साखर कारखाने चालू होण्याच्या स्थितीत आहेत. तेव्हा तेथील तीनही कारखाने जर चालू झाले असते तर त्या भागातील शेतक-यांच्या आर्थिक परिस्थितीवर आणि ग्रामीण अर्थ व्यवस्थेवर पुष्कळ चांगला परिणाम झाला असता. या संदर्भात राजकीय अभिनिवेषातून निर्णय न घेता तातडीने शासन या कारखान्याच्या बाबतीत योग्य व चांगला निर्णय घेणार आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : या संदर्भात राजकीय अभिनिवेषातून निर्णय घेण्यात येणार नाही. दोन साखर कारखान्यांवर प्रशासक नेमण्यात आलेले आहेत.गोदावरी दुधना सहकारी साखर कारखाना हा कोणी घेतला आहे याची आपल्याला सुध्दा कल्पना आहे. या सगळया कारखान्यांच्या बाबतीत पुन्हा एकदा फेर विचार करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. मराठवाडा सहकारी साखर कारखाना आणि विनायक सहकारी साखर कारखान्याच्या निविदा काढलेल्या असून अजूनही त्यासंबंधी अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : जो कोणी हा कारखाना चालविण्यास घेणार आहे. त्याच्याकडून बॅन्क गॅरन्टी शासन घेणार आहे किंवा नाही ? शासन त्यांना जी मालमत्ता चालविण्यासाठी देणार आहे ती मालमत्ता आज ज्या अवस्थेत आहे त्या अवस्थेतच मुदत संपल्यानंतर त्या संस्थेच्या किंवा सरकारच्या ताब्यात ते देणार आहेत काय ?.तेव्हा ही मालमत्ता आहे त्याच अवस्थेत ठेवण्यासाठी सरकार त्यांच्याकडून बॅक गॅरटी घेणार आहे काय ?

2...

श्री.जयप्रकाश दांडेगावकर :त्याबाबतीत अजूनही अंतिम निर्णय झालेला नाही. टेन्डर फार्ममध्ये काही अटी असून त्यामध्ये एक कोटी रुपयांची गॅरन्टी घ्यावी अशी अट असून सुरुवातीला ज्या स्थितीत साखर कारखाना ताब्यात घेतला होता त्याच स्थितीत तो कारखाना करार संपतांना परत करावा अशीही अट त्यात घालण्यात आलेली आहे.

श्री.प्रकाश शेंडगे :हे साखर कारखाने तोटयात गेल्यामुळे भाडेतत्वावर चालविण्यासाठी देण्यात आलेले आहेत. याबाबतीत मला माननीय मंत्रिमहोदयांना असा स्पेसिपिफ प्रश्न विचारावयाचा आहे की,जे तीन साखर कारखाने भाडेतत्वावर चालविण्यासाठी दिलेले आहेत त्यांनी आपले भाडे वेळेवर भरले आहे काय ? आणि जर त्यांनी वेळेवर भाडे भरले नसेल तर त्यांच्याकडे एकूण किती भाडे थकलेले आहे आणि त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : आजरा, पांझराकान आणि शिवशक्ती हे तीन साखर कारखाने याच वर्षी भाडेतत्वावर दिलेले आहेत. त्यापैकी शिवशक्ती साखर कारखाना हा एका सहकारी संस्थेला दिलेला आहे. त्याचबरोबर रेणुका शुगर्स आणि सिस्टीम इंडिया यांना बाकीचे कारखाने भाडेतत्वावर दिलेले आहेत.2005-2006 चा गळीत हंगाम चालविण्यासाठी हे कारखाने भाडेतत्वावर दिलेले आहेत त्यामुळे त्यांच्याकडे भाडे थकलेले नाही.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : आठ कारखाने विक्रीला काढण्यात आले होते आणि त्यासबंधी निविदा आल्या होत्या. त्यासबंधी मला असे विचारावयाचे आहे की,हे कारखाने असेच ठेवले तर त्याचा तोटा वाढत जाईल तेव्हा या कारखान्याची विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे काय आणि त्यासाठी फेर निविदा केव्हा काढण्यात येणार आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : मी मघाशी सांगितल्याप्रमाणे अनेक तज्ज्ञांची या संदर्भात मते घेण्यात आली होती व त्यामध्ये वेगवेगळे मतप्रवाह दिसून येत आहेत.काही लोकांचे असे मत आहे की ,हे कारखाने लिक्वीडेशनमध्ये काढून बंद करण्यात यावेत तर काही लोकांचे असे म्हणणे आहे की, लीजिंग करुन हे कारखाने चालविण्यात यावेत. या सर्व प्रकारामध्ये शासनाची कोठे ना कोठे तरी जबाबदारी येणार आहे. परंतु वेगवेगळी मते आलेली असल्यामुळे या संदर्भात सरकारी पातळीवर अभ्यास करुन साखर कारखान्याच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेतला जाणार आहे.

------

3..



पृ.शी : शेतक-यांसाठी वन टाईम सेटलमेन्ट सहकारी बॅन्कांनी लागू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

न करणे

मु.शी : शेतक-यांसाठी वन टाईम सेटलमेन्ट सहकारी बॅन्कांनी लागू न करणे यासंबंधी सव्रश्री नितीन गडकरी,जगदीश गुप्ता,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदवीधर) अध्यक्ष महोदय,मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो :

" राज्यातील शेतज-यांवर भूविजास बॅंज, जिल्हा सहजारी बॅंज, □जरी सहजारी बॅंज व सहजारी सोसायटी इत्यादीच्या बोज्यामुळे शेतज-यांच्या मालमत्तेचा लिलाव जरजे, शेतज-यां□ घेतलेल्या रक्जमेवर 3 ते 4 पट व्याज आजारु□ चक्रवाढ पध्दती□ त्यांचेजडू□ व्याज वसूल जरजे, राष्ट्रीयजृत बॅंजामध्ये उद्योजामधील व्यापा-यांजरीता ओ.टी.एस. (one time settlement) मध्ये प्रधा□ जर्जाच्या 30 ते 40 टक्क्यापर्यंत ओ.टी.एस. ची योज□ राबविली जाजे, परंतु त्यासंबंधीचे धोरज ग्रामीज भाजातील शेतज-यांजरीता शेतीजरीता असलेल्या जर्जावरील व ग्रामीज भाजातील उद्योजाजरीता व ग्रामीज भाजातील उद्योजजांजरीता जेंद्र सरजारजडू□ □बार्ड व रिझर्व्ह बॅंजेजडू□ राज्य शास□च्या सहजार विभाजांजडू□ प्रयत□ □ होजे, त्यामुळे राज्यातील शेतज-यांची होत असलेली पिळवजूज, जृषी जर्जाजरिता व शेतज-यांजरीता ट्रॅक्टर व इतर सामा□ घेज्याजरिता व्याजाचा दर जास्त असजे, याच्या तुल□ उद्योजपती व व्यापा-यांजरीता अलिशा□ मोटारजाडया तसेच चै□च्या वस्तू घेज्याजरिता व्याजाचा दर अल्प असजे, जोरजरीब व अल्प भूधारज शेतजरी यां□ जादा व्याज दरा□ ट्रॅक्टर व इतर शेतीची अवजारे जरेदी जरावी लाजजे, ओ.टी.एस. धोरज हे सर्व सहजारी बॅंजां□ लाजू □ जेल्यामुळे अ□ शेतज-यां□ जर्जबाजारीपजामुळे जेलेल्या आत्महत्या, मुद्दलापेजा जास्त व्याज घेऊ □ असे आदेश असता□ही त्याची अंमलबजावजी □ होजे, तडजोड व ओ.टी.एस. जरिता सहजार आयुक्तांजडे अ□ बॅंजांचे प्रजरजे प्रलंबित असजे व त्यावर होत □सलेले □र्जय, परिजामी याबाबत शेतजरी व सामा□ ज□त □र्माज झालेला तीव्र असंतोष, वर्तमा□ पध्दतीत असलेले दोष दूर जरज्याबाबत शास□ तातडी□ जरावयाची उपाययोज□ व याबाबत शास□ची प्रतिक्रिया."

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील मा.सहकार राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ---)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्या देशामध्ये अनेक राष्ट्रीयीकृत बँका ....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, उद्या आपण ठेवलेल्या अडीच तासांच्या चर्चेसाठी जो विषय आपण ठेवला आहे तोच विषय या लक्षवेधी सुचनेमध्ये आलेला आहे. तेव्हा आता यावर चर्चा करण्यापेक्षा अडीच तासांच्या चर्चेतून हा प्रश्न अधिक चांगल्या प्रकारे आपल्याला मार्गी लावता येऊ शकेल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य म्हणतात ते बरोबर आहे. म्हणूनच या लक्षवेधी सुचनेवर एखाद दुसरा प्रश्न झाला की, मी या लक्षवेधी सुचनेवरील चर्चा संपविणार आहे. अडीच तासाच्या चर्चेतून अधिक चांगल्या प्रकारे आपल्याला न्याय मिळू शकेल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पण त्यासाठी खुद्द सहकार मंत्रीच उपस्थित नाहीत आणि त्यांनी आपल्या राज्यमंत्र्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे की नाही वा कितपत स्वातंत्र्य दिले आहे याचीही आम्हाला कल्पना नाही. असो. मला आपल्याला या लक्षवेधी सुचनेच्या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, शेतकऱ्यांच्या कर्जाच्या बाबतीत सहकाराचा असाही एक कायदा आहे की, त्याने जेवढे कर्ज घेतले आहे त्यावर तेवढेच व्याज त्याचेकडून घेता येते. परंतु त्याही पेक्षा किती तरी अधिक प्रमाणात अनेक ठिकाणी भूविकास बँका, जिल्हा सहकारी बँका आणि अर्बन सहकारी बँकांनी शेतकऱ्यांकडून कर्ज वसूल केलेले आहे. त्यासाठी जप्त्या आणण्याचेही प्रकार घडले आहेत. तेव्हा याबाबतीत सरकार आता काय निर्णय घेणार आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्रामध्ये ज्या अर्बन सहकारी बँका आहेत त्यांच्यामध्ये, राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये प्रिंसिपल अमाऊंट 30-40 टक्के घेऊन ओटीएस केले जाते. तेव्हा या बँकांनी सहकार आयुक्तांकडे कॉम्प्रमाईज ॲण्ड सेटलमेंट पॉलिसी मंजुरीसाठी पाठविली आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार सहकार आयुक्तांची यासाठी परवानगी लागते. पण दीड वर्ष झाले सहकार आयुक्तांकडे हा प्रस्ताव पेंडींग आहे. तेव्हा राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये ज्या प्रकारच्या सवलती आणि संधी ग्राहकांना मिळालेल्या आहेत तशाच त्या भूविकास बँका, जिल्हा सहकारी बँका आणि अर्बन सहकारी बँकांनाही आपण देणार काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, काही वर्षापूर्वी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आपण ओटीएस खाली परवानगी दिलेली होती. ..

.... 3एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, नागपूर सहकारी बँकेच्या बाबतीत अशाच एका प्रकरणामध्ये सहकार आयुक्तांनी लेखी उत्तर आम्हाला दिलेले आहे की, याबाबतीत मंत्रालयामध्ये जाऊनच आम्हाला ठरवावे लागेल. याबाबतीत आम्हाला कसलेही निर्देश मंत्रालयातून आलेले नाहीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : केवळ हे अधिकार नागरी सहकारी बँकांना दिलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : हे अधिकार राष्ट्रीयीकृत बँकांना दिलेले आहेत तेच अधिकारी सहकार बँकांनाही द्यावेत ...

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, या बाबत राज्य सरकार विचार करणार आहे. ज्याप्रमाणे भूविकास बँकेच्या बाबतीत दामदुपटीने वसुली न करण्याचे ठरविले आहे त्याप्रमाणे सहकारी बँका, अर्बन सहकारी बँका या सगळ्यांच्याच बाबतीत बसून एक सगळे धोरण ठरविता येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मागील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी आपल्या उपस्थितीतच आम्ही आपल्या अनुमतीने हा प्रश्न काढला होता. त्यावेळी सहकार खात्याचे मंत्री माननीय डॉ. पतंगराव कदम हेही बसले होते. आपल्यासमोर त्यांनी त्यावेळी संगितले की, मी याबाबत पवार साहेबांबरोबर बैठक ठेवली आहे, तेथे त्यांच्याशी बोलतो, नाबार्ड बरोबर बोलतो वगैरे आणि आम्ही याबाबत ताबडतोब निर्णय घेऊ. मग आता राज्यमंत्री महोदय म्हणत आहे तो विचार कशाचा करणार आहेत ? आम्ही असा असा निर्णय करू असे त्यांनी आताच्या आता सांगावे. अनेक लोक यामुळे आत्महत्या करीत आहेत. मी आपल्याला एक उदाहरण देईन. आमच्या ओळखीची एक कंपनी आहे. वर्धा येथे तिचा एक कारखाना आहे, तिच्यावर 1200 कोटी रुपये कर्ज होते. त्याबाबत सदर कंपनीने बँकेशी वाटाघाटी केल्या आणि मग बँकेनेही ते कर्ज एकदम 1200 हून 600 कोटी केले आणि कंपनीने एक रकमी ती रक्कम परत केली. आपण जर मोठमोठ्या कंपन्यांच्या उद्योगांच्या बाबतीत असे करू शकता तर मग गरीब शेतकऱ्याच्या बाबतीत का करीत नाही. ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, राज्य सरकार या बाबत नाबार्ड सोबत बसून निश्चितपणे मार्ग काढण्याचा, धोरण ठरविण्याचा प्रयत्न करील.

..... 3एन 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यापूर्वी आपल्या उपस्थितीमध्येच माननीय डॉ. पतंगराव कदम यांनी उत्तर दिले होते याची आपल्यालाही आठवण असेल. या प्रश्नावर सभागृहामध्ये मार्ग निघत नाही असे पाहून आम्ही आपल्याला विनंती केली होती की, आपण आपल्या दालनामध्ये या प्रश्नी बैठक बोलवावी. सभापती महोदय, मी आपला आभारी आहे की, आपण जेव्हा जेव्हा मी हा विषय उपस्थित केला तेव्हा तेव्हा या प्रश्नाची तीव्रता सरकारला समजावून सांगितली आहे. ....

( यानंतर श्री.जागडे .....3ओ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

आम्हाला ही सर्व परिस्थिती माहिती आहे. सहकार आयुक्तांनी प्रत्येक बॅकांची सेटलमेंट पॉलीसी ठरविणे बरोबर होणार नाही. माझी अशी सूचना आहे की, माननीय सभापती महोदयांनी आपल्या दालनात या विषयासंबंधीत एक बैठक बोलवावी. त्या बैठकीला माननीय सहकार मंत्र्यांना देखील बोलवावे आणि नंतर या बाबतचा निर्णय करावा.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी जे उत्तर देत आहेत, ते बरोबर नाही. नाबार्ड आणि रिझर्व्ह बॅंकेची परवानगी घेण्याची गरज नाही. कारण सहकार कायद्याप्रमाणे संस्थेच्या संचालक मंडळाला तसा अधिकार आहे. असे असतानाही सहकार खात्यातील ऑडीटर्स याबाबतची हरकत घेतात. संचालकांना नोटीसा देण्यात येतात. हे थांबविण्याचे काम माननीय मंत्रिमहोदयांकडून होईल काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता या सगळ्या बाबींचा एक महिन्याच्या आत निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, तो बरोबर आहे. या बाबत वेळोवेळी चर्चा झाली. मागील चर्चेच्या वेळी तत्कालीन माननीय मंत्रिमहोदय, श्री. पतंगराव कदम यांनी असे सांगितले होते की, या चर्चेच्या अनुषंगाने त्वरीत निर्णय घेतले जातील. आज भू-विकास बॅंकेची काय परिस्थिती आहे ? मी या बाबत माझेच उदाहरण देणार आहे. मी विहीरीसाठी भू-विकास बॅंकेकडून 16 हजार रुपयाचे कर्ज घेतले होते. त्या कर्जापोटी मला 64 हजार रुपये भू-विकास बॅंकेला भरावे लागले आहेत. आता या बाबीकडे कोणीच पाहत नाही. वन टाईम सेटलमेंटबाबत आपण सूचना दिली होती. म्हणून या बाबत शासनाची भूमिका स्पष्ट व्हावयाला पाहिजे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या विषयाबाबत आपल्या सदनात एक बैठक बोलाविण्याबाबतची सूचना केली आहे, ती योग्य आहे. या बाबतची शासनाची स्पष्ट भूमिका समोर आली पाहिजे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : वन टाईम सेटलमेंटची योजना रिझर्व्ह बॅंकेने मंजूर केली आहे. वन टाईम सेटलमेंट करण्याचे अधिकार व्यवस्थापनाला देण्यात आले आहेत. त्याप्रमाणे वन टाईम सेटलमेंटच्या बाबतच्या सूचना नागरी सहकारी बॅंकांना देण्यात आलेल्या आहेत.....

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : मी कॉम्पेन्सेशन आणि सेटलमेंटबाबत बोलत आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : कॉम्पेन्सेशन आणि सेटलमेंटचे अधिकार नाहीत. वन टाईम सेटलमेंटचे अधिकार नागरी सहकारी बँकाना देण्यात आले आहेत.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे आणि या राज्याच्या माननीय सहकार मंत्र्यांनी आणि आम्ही सर्वांनी सांगितले होते त्याप्रमाणे या संबंधी एक महिन्यात निर्णय घेतला जाईल . तो निर्णय अजून झालेला नाही. त्याचा परिणाम असा झाला की, भू विकास व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून ज्या शेतकऱ्यांनी कर्ज घेतले आहे त्यांना पाच ते सहा वेळा कर्जाच्या नोटीसा गेल्या आहेत. या ठिकाणी उत्तर देतांना सांगितलेले खरे आहे. नागरी सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेच्या निकषाप्रमाणे परवानगी दिली व त्याची मुदत वाढविली आहेत.परंतु आज नागरी सहकारी बँकेचे जे शेअर होल्डर आहेत, कर्जदार आहेत त्यांना माहीत नाही. मी एका नागरी सहकारी बँकेचा संचालक आहे. सहा हजार कर्जाची प्रकरणे पेंडींग आहेत. सभासदांना वारंवार सूचना दिल्या जातात. सहकार खाते मात्र त्याबाबतीत वन टाईम सेटलमेंट करीत आहेत.आता सांगण्यात आले की, त्यामध्ये ऑडिट ऑब्जेक्शन काढले गेले आहे. तेव्हा या संबंधी शासनाचे धोरण स्पष्ट झाले नाही. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सूचना केली आहे. खरे म्हणजे या ठिकाणी ही चर्चा काल उपस्थित होणार होती. परंतु माननीय सहकार मंत्री उपस्थित नसल्यामुळे ते आल्यानंतर चर्चा करु असे सांगण्यात आले.आज सुध्दा माननीय सहकार मंत्री आलेले नाहीत व ते येणार नाहीत. त्यामुळे ही चर्चा पुढे ढकलली जाणार आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, काल माननीय सदस्य श्री. जयंत पाटील म्हणाले व आपणही म्हणालात. विशेषत: या विषयाला न्याय मिळावा, या लोकांना न्याय मिळावा म्हणून मी स्वत: त्याबाबत सहमती दर्शविली. तेव्हा माननीय सहकार मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत म्हणून आपण ही चर्चा उद्या घ्यावी असे मी बोललो नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज सुध्दा सहकार मंत्री येण्याची शक्यता नाही. त्यामुळे ही चर्चा पुढे ढकलली जाणार आहे. उद्या जर ही चर्चा ठेवली गेली नाहीतर येत्या 15 दिवसामध्ये आपल्या दालनामध्ये एक बैठक बोलावून याबाबत चर्चा करावी अशी माझी सूचना आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, आता माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे सहकारी बँकेच्या संचालक मंडळाला वन टाईम सेटलमेंटचे अधिकार दिले आहेत. जर शासनाने असा अधिकार दिला असेलतर पुन्हा पुन्हा त्या प्रश्नावर चर्चा घडवून, व बैठक घेऊन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

आपण काय निर्णय घेणार? यासंबंधी निर्णय अगोदरच झाला असेलतर पुन्हा बैठक घेऊन निर्णय घेण्याची आवश्यकता नाही. रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे वन टाईम सेटलमेंटचे अधिकार संचालक मंडळाला आहेत. त्याबाबत सहकार आयुक्तांनी मध्ये लुडबुड कशासाठी केली पाहिजे? रिझर्व्ह बँकेचे नियम हे इतर बँकानासुध्दा बंधनकारक असले पाहिजेत.

श्री. नितीन गडकरी : माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, रिझर्व्ह बँकेने जे धोरण तयार केले आहे ते को-ऑपरेटिव्ह व अर्बन बँकांना सुध्दा लागू केले पाहिजेत.

**सभापती :** या प्रश्नासंबंधीच्या दोन्ही बाजूच्या अत्यंत तीव्र भावना मी समजून घेतल्या आहेत. दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांचे म्हणणे असे की, राष्ट्रीय पातळीवर रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून एक निश्चित धोरण ठरविले जाते ते राष्ट्रीयीकृत बँकांना लागू होते. ज्यामध्ये फार मोठया प्रमाणात कर्जदार आहेत...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी या क्षेत्रातील एक लहान कार्यकर्ता आहे म्हणून सांगतो. या क्षेत्रात मी बरीच वर्षे काम केले आहे. राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये ओ.टी.एस. साठी काही नियम आहेत. अशावेळी बॅंक जर अडचणीत आली तर त्याचे रिपेमेंट करण्यासाठी केंद्र सरकार आपल्या बजेटमध्ये तरतूद करते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा अर्बन बँकेमध्ये ठेवीदारांच्या विशिष्ट ठेवी घेऊन कर्जपुरवठा केला जातो. ओ.टी.एस. च्या बाबतीत अर्बन बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना काही मर्यादा आहेत. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँकेचे जे नियम आहेत ते अर्बन बँकेला व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला लागू करता येणार नाहीत.

श्री. नितीन गडकरी : राष्ट्रीयीकृत बँकांचे जेवढे सेटलमेंट होत असेल त्यामध्ये केंद्र सरकार रिइंम्बर्समेंट करते हे म्हणणे बरोबर नाही. केंद्र सरकारच्या धोरणाप्रमाणे एखादी योजना असेल तर त्या ठिकाणी पैश्याचे वाटप करण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकामार्फत डिसबर्समेंट केले जाते. परतु राष्ट्रीयीकृत बँकाकडून उद्योगपतींना किंवा कमर्शिअल परपजसाठी फायनान्स पुरवितांना उद्या ती बँक अडचणीत आली तर केंद्र सरकारकडून त्याची रिईंम्बर्समेंट केली जाते हे म्हणणे खरे नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : राष्ट्रीयकृत बँकेच्या अनुषंगाने याबाबतीत निर्णय होतात आणि त्याचा कर्जदार मोठा आहे. काही ठिकाणी वन टाईम सेटलमेंटच्या बाबतीत असेही ऐकू येते की, 1 कोटी रुपये थकीत आहेत आणि त्यापैकी किमान 50 लाख रुपये भरले आणि तो खुशीत गेला. पण सहकारी क्षेत्रात नागरी बँका असोत, जिल्हा मध्यवर्ती बँका असोत किंवा राज्य सहकारी बँका असोत, या बँकाच्या बाबतीत, जो फाटका माणूस कर्जदार आहे, तो या बँकामधून अल्प मुदतीचे, मध्यम मुदतीचे कर्ज घेतो आणि भूविकास बँकेच्या माध्यमातून दीर्घ मुदतीचे कर्ज घेतो. त्यांच्या बाबतीत "आहे रे" आणि "नाही रे" अशा पध्दतीची चर्चा आहे. म्हणजे ते आहे असे म्हटले की एखादा म्हणतो की, ते आहे आणि नाही असा विचार केला तर कोणी म्हणते की नाही. त्यामुळे दुर्दैवाने कर्जदार शेतक-यांनाही येथे खरच वन टाईम सेटलमेंट चालते का ? हे माहिती नाही. समजा कोणी वित्तीय संस्थेमध्ये गेला तर त्याला याबाबतीत माहिती द्यावयास हरकत नाही. पण तीही मोठया प्रमाणात दिली जात नाही. आता सन्माननीय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ साहेबांनी सांगितले. मुश्रीफसाहेब, एका वेळेला धोरण नक्के ठरविण्याचा प्रयत्न केला तर, आपल्या ज्या सहकारी वित्तीय संस्था आहे त्यामध्ये अशा पध्दतीने येणारा जो आर्थिक भार आहे, तो कशा पध्दतीने हाताळावयाचा याचाही राज्य शासन आणि आपण एकत्र बसून विचार करु शकतो. पण जर प्रथमच असे म्हटले की, हे करणे थोडे अशक्य वाटते, तर आपण निर्णयाप्रत कधीच येणार नाही. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी ज्यापध्दतीने सूचित केले किंवा माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनीही सांगितले, त्या पध्दतीने माझ्या दालनात सहकार मंत्री माननीय श्री.पतंगराव कदम, त्या विभागाचे माननीय राज्यमंत्री,अधिकारी आणि माननीय विरोधी पक्षनेते यांना बोलवितो. तसेच त्यावेळी आपले गटनेते, सत्ताधारी पक्षाकडील प्रतिनिधी यांनाही मी बोलवितो आणि या विषयाबाबत अत्यंत सर्वंकष अशी चर्चा करु. कारण गेली वर्षे-दोन वर्षे तुम्ही प्रयत्न करीत आहात, तसा मी सुध्दा सातत्याने याबाबतीत प्रयत्न केलेला आहे आणि लोकप्रतिनिधी काम करीत असताना जसा तुमचा असंघटित असलेल्या फाटक्या माणसाशी संबंध आहे, तसा माझाही संबंध आहे. एकीकडे राष्ट्रीयकृत बँकेतील मोठया माणसाला 1 कोटीमध्ये 50 लाखाची सूट या देशात मिळत आहे आणि दुर्दैवाने एखादा मनुष्य, जो असंघटित आहे, त्याच्याकडे 50 हजाराचे कर्ज आहे. त्याने दुसरेही 50 हजार भरलेले आहेत.तरीही त्याला सांगितले जाते की,आता राहीलेल्या कर्जाकरता तुझी लंगोटी आहे,त्याच्यासह

. . . .3 क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

तुझा लिलाव करु. असे होत असेल तर ते या लोकशाहीच्या कल्याणकारी राज्यात योग्य होणार नाही.याकरता मी माझ्या दालनात एक बैठक बोलवितो आणि आपले जे प्रतिनिधी आहेत, त्यांनाही बोलवितो. सन्माननीय सहकार मंत्री, सन्माननीय सहकार राज्यमंत्री, त्या विभागाचे कमिशनर, सचिव या सर्वांना बोलवितो आणि त्यावेळी आपल्याला कोणत्याही परिस्थितीत याचा निकाल घ्यावयाचा आहे यादृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करु.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण एक चांगला निर्णय घेतला आहे. खरोखर या सभागृहात आपण जो संवेदनशील निर्णय घेतला आहे आणि त्याबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत, त्याबद्दल मला अतिशय आनंद झाला असून मी आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद देतो. येथे गरीब माणसाला न्याय देणारा क्रांतीकारी निर्णय झाल्यानंतर त्यात आपली भूमिका फार महत्वाची राहील.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कृष्णा खोरे विकास प्रकल्पांतर्गत सिंचन प्रकल्पांची अर्धवट असलेली कामे.

**मु. शी** : कृष्णा खोरे विकास प्रकल्पांतर्गत सिंचनर प्रकलपांची अर्धवट असलेली कामे, यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, नतिकोद्दीन खतिब, रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीयश जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्याच्या पश्चिम महाराष्ट्रातील अ□मे पूजे, सातारा, सांजली, सोलापूर, जोल्हापूर जिल्हयातील बारामती, दौंड, फलटज, जटाव, माज, भेडपूर, जा□पूर, जत, मिरज, जवठेमहांजाळ, हातजंजले, शिरोळ, जरवीर, जाजल, राधा□र, सांजोला, मंजळवेढा इत्यादी तालुक्यातील जलसिंच□ला वरदा□ठरजारे जृष्जा जोरे विजास महामंडळ प्रजल्पांतर्जत जृष्जा □चे महाराष्ट्र राज्याच्या वाटयाला येजारे पाजी, तत्जाली□शास□□ घेतलेले □र्जय, संपूर्ज आशिया जंडातील मोठी उपसा जलसिंच□योज□ म्हजू□ठरजारी टेंभू योज□, सहजारी योज□ / म्हैसाळ योज□च्या प्रस्तावित सिंच□प्रजल्पाचे जेलेले □योज□, सोलापूर जिल्हयातील मोहोळ तालुक्यातील आष्टी जलसिंच□योज□ तसेच उत्तर सोलापूर तालुक्यातील शिरापू उपसा जलसिंच□योज□ इत्यादि योज□चे जेल्या 5-6 वर्षापासू□अर्धवट स्वरुपात राहिलेली जामे, पायाभूत सोयी-सुविधा वेळीच उपलब्ध □झाल्या□एजंदरीत शास□चा जृष्जा जोरे विजास प्रजल्प शांशजतेच्या भोवऱ्यात अडजजे, याबाबतीत या भाजातील लोजेच्छेचा आदर जरु□शास□□जठोर भूमिजा घेऊ□त्यादृष्टी□जेलेली वा भविष्यात घेऊ जेलेली उपाययोज□ व याबाबत शास□ची प्रतिक्रिया."

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, ही लक्षवेधी कृष्णा खो-याच्यासंबंधातील आहे. त्याचबरोबर दुष्काळी भागातील जनतेच्या, शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न याच्याशी संबंधित आहे. दुष्काळी भागातील जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न याच्याशी संबंधित आहे. या संबंधाने मी काही शंका उपस्थित करणार आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या दृष्टीने कृष्णा खोरे प्रकल्प महत्वाचा मानला जातो. शेतकरी सातत्याने आशेने याकडे पहातात. तत्कालीन सरकारला मला धन्यवाद दिले पाहिजेत. तत्कालीन मंत्री रावते साहेब, गडकरी साहेब यांना धन्यवाद दिले पाहिजेत. पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने महत्वकांक्षी प्रकल्प तत्कालीन सरकारने राबविण्याचे ठरविले. शेतकरी त्याकडे आशेने पहात होता. परंतु आजची प्रकल्पाची स्थिती मात्र अतिशय वाईट आहे. त्या प्रकल्पाची जवळजवळ सर्व काम बंद किंवा अपूर्ण अवस्थेत आहेत. काही प्रकल्पाची कामे 75 टक्के पूर्ण झालेली आहेत आणि काही 50 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. खरे म्हणजे सरकारने या योजनेविषयी चिंतन करण्याची गरज आहे. या प्रकल्पाचे काम उत्पादक आहे. यापासून शासनाला महसूल मिळणार आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असा प्रकल्प आहे. इतर राज्यात जाणारे पाणी अडविणारा हा प्रकल्प आहे. काही प्रकल्पाची कामे 75 टक्के पूर्ण झालेले आहेत, त्या ठिकाणी पाणी देखील अडविले गेलेले आहे. परंतु कालव्याची व्यवस्था नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना त्या पाण्याचा फायदा घेता येत नाही. या प्रकल्पामध्ये प्रचंड गुंतवणूक झालेली आहे, परंतु ही दुरावस्था आहे. त्या ठिकाणी अनेक दुष्काळी भागांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. गेल्या वर्षी 149 तालुक्यांमध्ये दुष्काळ पडला. या कृष्णेच्या खोऱ्यातील तालुक्यांना पिण्यासाठी पाणी नाही, जनावरांसाठी चारा नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे, अशा परिस्थितीत तेथील प्रकल्प पूर्ण करणे अतिशय गरजेचे आहे. दुर्दैवाने असे म्हणावेसे वाटते की, आज दुष्काळी भागाच्या दृष्टीने काही अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या दुष्काळी भागाचा प्रश्न सोडवायचा असेल तर, ज्या भागामध्ये शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, अशा भागाचा प्रश्न आहे. म्हणून माझी विनंती आहे की, तो प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक आहे. या कालावधीत अनुशेषाचा प्रश्न निर्माण झाला. परंतु ज्या भागात शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत., त्या भागातील दुधाचा व्यवसाय चालला पाहिजे, त्यांना पैसे मिळाले पाहिजेत. या दृष्टीने या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, 149 दुष्काळी तालुके आहेत, तेव्हा प्राधान्याने कृष्णा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील....

खोरे प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद करणार अहात की नाही हा खरा प्रश्न आहे. दुसरे असे की, बऱ्याच योजना पूर्ण झालेल्या आहेत परंतु कालवे नसल्यामुळे पाणी मिळत नाहीत.

**सभापती** : आपण एकच प्रश्न विचारा. आणखी प्रश्न विचारुन अजून 12 मिनिटे प्रश्न विचारसण्याते गेला तर उत्तर देताना घोटाळा होईल.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : पश्चिम महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून, दुष्काळी भागाच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे.

**सभापती** : कृष्णा खोऱ्याच्या दृष्टीने राज्याच्या दृष्टीने ही लक्षवेधी महत्वाची आहे असे जरी खरे असले तरी उत्तरही मिळेल व काम मार्गी लागेल या दृष्टीने प्रश्न विचारावा.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : नियोजनाचा अभाव सरकारकडून झालेला आहे. तर आता तरी दुष्काळी भागातील अपूर्ण कामे पूर्ण करणार काय ? कालव्यांची कामे पूर्ण करुन शेतकऱ्यांना पाणी मिळणार आहे काय ?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रच्या अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नावर मा.सदस्यांनी लक्ष वेधले त्याबद्दल मी आभारी आहे. 1996 साली हा महत्वाकांक्षी प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातून ...

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार..... 17:20
श्री. रामराजे नाईक-निंबाळकर....

लवादाचा ऑब्जेक्टिव्ह दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून दि.31 मे, 2000 च्या कट ऑफ डेटला जास्तीत जास्त पाण्याचे युटिलायझेशन कसे होईल यासाठी हा प्रकल्प सुरु करण्यात आला. या प्रकल्पात त्या काळात 385 घन फूट इतका पाण्याचा साठा निर्माण झाला होता. त्या काळात 35 मोठे, 73 मध्यम 818 लघुपाटबंधारे अशा 926 प्रकल्पांच्या बांधकामाचे नियोजन करण्यात आले. या सर्व प्रकल्पातील पूर्ण झालेली कामे वगळता 27 मोठे, 39 मध्यम आणि 355 लघुपाटबंधारे अशी एकूण 421 प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचे उदिष्ट महामंडळ स्थापनेच्या वेळी होते. त्यापैकी मोठे 9, मध्यम 29 आणि लघु 96 असे एकूण 134 प्रकल्पांची कामे आजतागायत पूर्ण झालेली आहेत. सद्य:स्थितीत मोठे प्रकल्प 20, उपसा सिंचन योजना 19, मध्यम 41 आणि लघुपाटबंधारे 266 आजच्या डी.एस.आर. रेट प्रमाणे या 340 प्रकल्पांसाठी सुमारे 11,277 कोटी रुपयाची आज आपल्याला आवश्यकता आहे. 9000 कोटी रुपये गेल्या दहा वर्षात खर्च केलेले आहेत. अनुशेषाचा प्रश्न उपस्थित केला गेला. परंतु गेले नऊ महिने माझे स्वत:चे प्रयत्न हे चाललेले आहेत की, अनुशेष आणि प्रादेशिक असमतोल यामध्ये न पडता उरलेले बारा हजार कोटी रुपयाचे प्रकल्प आगामी 5/10 वर्षात कशा पध्दतीने पूर्ण करता येतील, याला नवीन सोर्सेस केंद्राकडून आणि अन्य मार्गाकडून कसे येतील असे प्रयत्न आहेत. केंद्र सरकारचा जेव्हा विचार करतो तेव्हा ए.आय.डी.पी.सारख्या योजना आपल्या राज्यात जास्तीत जास्त किती आणता येतील हा प्रयत्न जाणीवपूर्वक नऊ महिन्यात झालेला आहे. मला सदनात सांगायला आनंद वाटतो की, जवळ जवळ 800 कोटी रुपये यावर्षी आणि मागच्या वर्षी आपण संबंध राज्यासाठी केंद्र सरकारकडून आणलेले आहेत त्यातील 250 कोटी रुपये कृष्णा महामंडळाच्या अंतर्गत नॉर्मल ए.आय.आर.डी.पी. आणि फास्ट ट्रॅक्ट ए.आय.आर.डी.पी.चे प्रॉजेक्ट महामंडळातंर्गत मंजूर झालेले आहेत, त्यांना आणण्यात आपल्याला यश मिळालेले आहे. मागच्या तीन वर्षात दुष्काळ पडला. माननीय राज्यपाल महोदयांनी 1500 कोटी रुपयाचे खास अनुदान या दुष्काळग्रस्त भागाला दिले. सातारा, सागली, कोल्हापूर वगळता आज टेभू सारख्या महत्वाकांक्षी योजनेचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. ते 11 कोटी रुपये या योजनेतून देता आलेले आहेत. उरमोडी सारखे जे धरण आहे ते खटाव आणि माण या दुष्काळग्रस्त भागाला पाणी देण्यासाठी महत्वाचे असून त्या धरणाला 50,60 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार..... 17:20

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर..

नाबार्ड सारख्या बँकाकडून आरआयडीएस योजनेकडून जास्तीत जास्त प्रकल्प या महामंडळाअंतर्गत कसे आणता येतील याचे प्रयत्न केले गेले आहेत. पाटबंधारे खात्यासाठी 31 मार्च रोजी 150 कोटी रुपयाची नाबार्डने व्यवस्था केलेली आहे. त्यातील 30 ते 35 कोटी रुपये कृष्णा महामंडळाला तरतूद करुन देण्यात यश मिळालेले आहे. नियोजन झालेले नाही. कामे पूर्णपणाने बंद आहेत हे मी मानायला तयार नाही. लवाद बसलेला आहे. 4 ऑगस्टला दुसरी तारीख आहे. लवादासमोर तिन्ही राज्यांनी स्वत:चे म्हणणे दिलेले आहे. त्याच्यावर प्रतिउत्तरे झालेली आहेत. ॲफिडेव्हिटवर रिप्लाय झ ाालेला आहे.हा लवाद पूर्ण गतीने चालू असतांना या महामंडळातंर्गत अपूर्ण प्रकल्पांची कामे पूर्ण गतीने चालू पाहिजे होती असे आपले मत असेल तर त्याच्याशी मी आणि शासन सहमती दाखवू इच्छितो.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर ...

त्यासाठी मी आपल्याला उपाययोजना स्पष्ट केलेली आहे. अनुशेषाच्या संदर्भात विदर्भ, मराठवाडा या मागासलेल्या विभागाच्या आकांक्षा लक्षात घेऊन कलम 371 प्रमाणे माननीय राज्यपालांना जे अधिकार दिलेले आहेत त्या कलमाला हात न घालता काय करणार याबाबत 21 एप्रिल, 2005 ला मंत्रिमंडळाने जो महत्वपूर्ण निर्णय घेतला त्यामध्ये सबंध राज्यातील जे दुष्काळ प्रवण 147 तालुके आहेत त्या तालुक्यांना पुढे करुन एक कमिटी नेमली होती त्या कमिटीच्या माध्यमातून त्या दुष्काळप्रवण भागाला कसे पैसे देता येतील याचा प्रयत्न चालू झालेला आहे. त्याच पध्दतीने सहा सात महिन्यात प्रयत्न करुन घेता येईल असे आश्वासन मी या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने देत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी विस्तृत उत्तर देऊन त्या भागातील प्रकल्पाची किती कुचंबणा होते आणि निधीची गरज किती आहे हे अत्यंत शांतपणे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या ठिकाणी अजूनही 11,277 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. आतापर्यन्त 9 हजार कोटी रुपये खर्च झालेले आहेत असे त्यांनी सांगितले. म्हणजे हे प्रकल्प एकूण 20 हजार कोटीचे आहेत आणि भविष्यातील दहा वर्षात त्यांची किंमत आणखी दोन चार हजार कोटीने वाढेल. यामध्ये एकच खेदजनक वाक्य आहे त्याबाबत सांगतो. वर्षानुवर्षे तुम्ही मागास भागावर अन्याय करीत होता आणि आपल्या कृतीतून पुन्हा त्यांना हिणवता याची मला दुर्दैवाने नोंद करावयाची आहे. आपल्या मंत्रिमंडळाचा निर्णय झाला. 147 अवर्षण प्रवण तालुक्याच्या संदर्भात हा नवीन फॉर्म्युला आपल्या भागामध्ये पैसे आणण्यासाठी केला गेला आणि राजकीय युक्त्या प्रयुक्त्या वापरुन आपण हे केलेले आहे. हे आपले कौशल्य आहे. मागच्या वेळी माननीय राज्यपालांनी पत्र दिले. त्यांनी दिलेले निर्देश बदलले. त्याबाबतीत सभागृहामध्ये युक्तिवाद झाला. या निवेदनामध्ये पृष्ठ क्रमांक 3 वर असे म्हटले आहे की, "माननीय राज्यपाल यांनी घटनेच्या कलम 371(2) अन्वये त्यांना नेमून देण्यात आलेल्या विशेष जबाबदारीच्या अनुषंगाने, वार्षिक योजनेतील तरतुदीचे प्रदेशनिहाय वाटप, अनुशेषाचे प्रमाण आणि त्यास दूर करण्याचा कालावधी आणि वार्षिक योजना 2002-2003 साठी नियतव्ययाचे अनुशेष निर्मुलनासाठी प्रदेशनिहाय वाटप, इत्यादी संदर्भात दिनांक 15.12.2001 ला प्रथम निदेश दिले आहेत. पाटबंधारे विकास

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

श्री. दिवाकर रावते .....

क्षेत्रातील प्रादेशिक असमतोल, इतर अनुशेष असलेल्या विकास क्षेत्राच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या अधिक प्रकर्षाने जाणवतो म्हणून, पाटबंधारे विकास क्षेत्राच्या निधी वाटपासाठी नवीन धोरण या निदेशात आखून दिले आहे." हे सर्व जुने झाले. यामध्ये नवीन काही नाही. गेल्या चार पाच वर्षात आपण काय केले हे सर्व सदनासमोर आलेले आहे. या सदनामध्ये वारंवार झालेल्या चर्चेमधून देखील आपण हे निदेश कसे पायदळी तुडविले हेही सदनासमोर आलेले आहे. सभापती महोदय, आपण या सदनाला न्याय दिला. आपण कायदेशीर सल्ला सुध्दा घेतला. त्या भागाला न्याय देण्याचा प्रयत्न माननीय सभापतींनी केला. परंतु शासन मागास भागाला न्याय देत नाही. असे असूनही आपण या ठिकाणी एका असे वाक्य टाकले आहे की, जणुकाही या योजना रखडलेल्या आहेत आणि या योजनांची कुचंबणा होत आहे, आर्थिक कोंडी होत आहे. यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "या पाटबंधारे विकास क्षेत्राच्या निधीच्या प्रादेशिक वाटपाच्या अवलंबावयाच्या नवीन धोरणाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे एकूणच नियोजनावर बराच दूरगामी परिणाम झाला आहे." जणुकाही विदर्भ आणि मराठवाडयामध्ये पाणी दुथडी भरुन वाहात आहे एवढे काम त्यांनी केले आहे आणि कृष्णा खोरे डबघाईला आले आहे. अशा पध्दतीचा जो उल्लेख आहे तो क्लेशदायक आहे. त्याचा उल्लेख करण्याकरिता मी उभा होतो.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, वास्तविक पाहता टेंभू, ताकारी, म्हैसाळ, आष्टी, शिरापूर इत्यादी ज्या योजना आहेत त्या पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यांसाठी जीवनदायी ठरणाऱ्या योजना असून शासनाने या योजनांच्या बाबतीत अक्षम्य दिरंगाई केल्याचे निदर्शनास आले आहे. कधी अनुशेषाची बाब, कधी निधी नाही तर कधी आणखी काही कारणे काढून या योजना जाणूनबुजून लांबविण्यात आल्या असा माझा स्पष्ट आरोप आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/ श्री.बरवडनंतर 17:30

श्री.प्रकाश शेंडगे....

मध्यंतरी काही लोक असे म्हणावयाचे की, या दुष्काळी भागामध्ये पाणी आले तर ही ऊस सहकारी कारखानदारी आहे. ऊस तोडायला कारखान्यांना कामगार मिळणार नाहीत. म्हणून जाणीवपूर्वक या योजना लांबविल्याचा आरोप त्या भागातील शेतकरी करीत सर्रास आहेत. जे काही करावयाचे असेल तर मा.मंत्रिमहोदयांनी करावे. मा.उपमुख्यमंत्री मा.आबा हे स्वत: त्या भागातील आहेत. त्या भागातील शेतक-यांची 15-20 वर्षापूर्वीची मागणी असूनही हा प्रकल्प होत नाही. जे काय करावयाचे असेल ते करुन शासनाने हे प्रकल्प मार्गी लावावेत. त्यासाठी जो निधी लागणार आहे, आता महाराष्ट्राची कर्ज रोख्यांबाबत बाजारात किती पत आहे हे माहीत नाही. बाजारात कोणी पैसे देणार आहे की नाही हे माहीत नाही.

**सभापती** : मा.सदस्यांना प्रश्न विचारावयाचा नाही का ?

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, ही योजना शासन कधी पूर्ण करणार आहे आणि जे काही कालवे पूर्ण झाले आहेत त्याच्यातून बरेच पाणी गळू लागले आहे, अतिशय निकृष्ट दर्जाचे काम त्या भागात झाले आहे, बाजुची जमीन पाण्याखाली गेली आहे. म्हणून ज्या कंत्राटदारांनी आणि अधिका-यांनी निकृष्ट दर्जाचे काम केले आहे त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय आणि कृष्णा पाणी लवाद आहे त्याचे पाणी आपण विहित मुदतीत अडविणार आहे का ?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : मी लवादाचा पहिला प्रश्न हाताळणार आहे. आता नवीन लवाद नेमलेला आहे. पहिल्या लवादातून किती पाणी दिले, त्याचा वापर झाला आहे किंवा नाही यासंबंधी लवाद नेमलेला आहे. नवीन लवादात कालमर्यादा नाही. 31 मे, 2000 पर्यंत पूर्वीच्या लवादाला मर्यादा दिली होती. 300-300 टीएमसी पाण्याचे फेर वाटप करावे आणि ते तीन राज्यात कसे करावे यासाठी दुस-या लवादासमोर या तीन राज्यांचे प्रयत्न सुरु झालेले आहेत. आपण कालमर्यादा विचारली असून आपल्याच प्रश्नात त्याचे उत्तर आहे. काही कालव्यांची, काही बंधा-यांची कामे प्रगतीपथावर आहेत, काही धरणांची कमी आहेत, त्यामुळे संपूर्ण कृष्णा खो-याच्या कामांचा रिव्हयू घेऊन हे काम 10 वर्षात होईल, 5 वर्षात होईल असे सांगण्याची परिस्थिती नाही. प्रकल्प पाहून, त्यासाठी देण्यात येत असलेला निधी बघून काही कालमर्यादा ठेवण्यात येईल. आपण ताकारी-म्हैसाळ आणि टेंभूचे नाव घेतले आहे, आपल्याला शासनामार्फत मीच विनंती करतो

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर....

की, 30 जानेवारी,2006 च्या पुढे जतसारख्या अत्यंत दुष्काळी भागात आपण कृष्णा महामंडळातर्फे एक टनेलचे काम चालू करीत आहे त्याला आपण उपस्थित रहावे. आपण या तीन लिफ्टचा उल्लेख केला आहे तेव्हा त्यांचा स्टेटस आपल्याला मिळेल. आज 211 कोटी या टेंभू योजनेला दिल्यानंतर आटपाडीपर्यंत हे पाणी जाण्याची परिस्थिती येत्या 6-8 महिन्यात निर्माण होणार आहे. मा.उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.आबा पाटील यांचा उल्लेख केला, तासगावचा उल्लेख केला. टेंभूचे पाणी आपण तासगावलाही नेण्याचा प्रयत्न चालविला आहे. अरथव कालव्यातून त्यांच्याकडे पाणी जाण्याची व्यवस्था झालेली आहे. मी पहिल्या प्रश्नाला उत्तर दिले तेच आता सांगत आहे. अनुशेषाच्या प्रश्नाला आमची कोठेही बाधा न आणता, हे हेक्क राज्यपालांचे आहेत. ते घटनादत्त आहेत, हे ठेवून नवीन सोर्सेस येणा-या 6-8 महिन्यात काढून निश्चित स्वरुपात कृष्णा महामंडळाचे काम होईल, प्लॅनिंग चुकले आहे असे म्हणता येणार नाही, ओव्हर प्लॅनिंग झालेले आहे एवढेच मी सांगेन. कोणत्या प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे ते सांगितले तर त्याची चौकशी केली जाईल.

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : मंत्रिमहोदयांनी आताच सांगितले की, 9 कोटी रुपये या महामंडळाच्या माध्यमातून खर्च झालेले आहेत आणि आणखी 18 हजार कोटीची आवश्यकता लागणार आहे. काही वर्षे ते काम सुरु राहील. मला आवर्जून उल्लेख करावयाचा आहे की, सोलापूर जिल्हयामध्ये आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्हयामध्ये दुष्काळाचे संकट होते. सोलापूर जिल्हयामध्ये गेल्या तीन वर्षात 3.25 लाख जनावरे छावण्यांमध्ये होती. त्यावेळेस सरकारने मदत केली पण ही वस्तुस्थिती आहे. सोलापूर हे शहर गिरणगाव म्हणून ओळखले जाते, म्हणून त्यासाठी सरकारने पॅकेज दिले पण त्याची अंमलबजावणी झलेली नाही, सोलापूरसाठी स्वतंत्र विद्यापीठ झाले, पण कोल्हापूर विद्यापीठाकडून 13 कोटी दिले जातील असे आश्वासन देऊनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे 17:35

(श्री.रणजितसिंह मोहिती-पाटील ...)

माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, उत्तर सोलापूर मधील प्रकल्प, आष्टी तालुक्यातील प्रकल्प तसेच मंगळवेढा तालुक्यातील कालव्याची कामे यासाठी सरकारने तरतूद केलेली आहे काय?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : मा.सदस्यांनी ज्या तीन प्रकल्पांचा उल्लेख केला ते दुष्काळप्रवण तालुक्यातील आहेत. परवाच भारत सरकार बरोबर चर्चा झाली. त्यामध्ये दुष्काळप्रवण तालुक्यातील लिफ्टच्या प्रोग्रॅमसाठी कॉमन मिनिमम प्रोग्रॅममधून मदत करता येईल का यादृष्टीने चर्चा झाली. त्यामध्ये या तिन्ही लिफ्टचा समावेश कसा करता येईल यासाठी केन्द्रीय जल आयोगाची परवानगी घेऊन त्या योजना मार्गी लावण्यामध्ये शासन प्रयत्नशील राहील.

श्रीमती कांता नलावडे : धरण आणि कालव्यांची भरपूर कामे काढलेली आहेत. 19 उपसा सिंचन योजनांची कामे हाती घेतलेली आहेत. याठिकाणी उपसा सिंचन योजनांची जी नावे दिलेली आहेत त्यामध्ये केंजळ उपसा सिंचन योजनेचे नाव दिसत नाही. केंजळ उपसा सिंचना योजनेचे 5 वर्षापूर्वी उद्घाटन झाले असून आजही ती योजना जैसे थे आहे. त्यामुळे वाई तालुक्यातील 20 गावांना पाण्यासाठी दाहीदिशा फिरावे लागत आहे. तेव्हा या केंजळ उपसा सिंचन योजनेचे काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे ?केन्द्राकडून मिळणा-या निधीतून आणि अन्य सोर्समधून निधी उभारुन ही कामे पूर्ण करु असे मा.मंत्री महोदयांनी सांगितले. अन्य सोर्सेस कोणते आहेत ? या कामासाठी राज्य शासनाकडून भर टाकली जाणार आहे काय ? क-हाड तालुक्यातील 22 तालुके कायम दुष्काळी आहेत. कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेमुळे क-हाड आणि खटावला देखील पाणी मिळेल. तेव्हा याही योजनेचा विचार करण्यात येणार आहे काय ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : कवठे केंजळ योजनेच्या उद्घाटन कार्यक्रमाला मी स्वत: हजर होतो. सोल्हापूर जिल्ह्याच्या लिफ्ट योजना तसेच कवठे केंजळ योजना यास केन्द्रीय जल आयोगाने मान्यता दिली तर ज्या पध्दतीने सोलापूरच्या तीन योजना पूर्ण करण्याचा शासन विचार करणार आहे त्याचप्रमाणे कवठे केंजळ ह्याही योजनेचा विचार करण्यात येईल. कृष्णा-भीमा स्थिरीकरण हा विषय वेगळा आहे. याठिकाणी क-हाड तालुक्यातील 22 गावांचा उल्लेख करण्यात आला. त्याठिकाणी टेंभू योजनेतून पाणी देता येईल काय याचाही विचार आज चालू आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सदाशिव पोळ : कृष्णा खो-याची कामे अपूर्ण आहेत. अशा परिस्थिती आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र असा दुसरा लवाद स्थापन झालेला आहे. या दुस-या लवादामुळे आपल्याला मुळात जे पाणी मिळणार आहे त्याच्यावर काही परिणाम होईल काय ? ते मिळणारे पाणी कमी होईल काय ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : लवाद हा सुप्रिम कोर्टाच्या स्टेटसची ज्युडिशियल ॲथॉरिटी असते. मा.सदस्यांनी लवादाचा निर्णय ॲण्टीसिपेट केलेला आहे. मी खात्री देऊ इच्छितो की, कृष्णा खो-याच्या संदर्भात महाराष्ट्र राज्याने लवादासमोर भक्कम बाजू मांडलेली आहे. चांगले वकील नेमलेले आहेत. माझे वैयक्तिक लक्ष आहे. त्यामुळे मा.सदस्यांनी शंका बाळगण्याचे कारण नाही.

श्री. प्रतापसिंह मोहिते पाटील : कृष्णा खोरे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न मोठा आहे, सोलापूर जिल्ह्यातील उजनी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसानाचा प्रश्न तसेच ऊरमोडी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आणि महाराष्ट्रातील अन्य प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अंतिशय गंभीर होत चाललेला आहे. या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन किती दिवसात पूर्ण करणार आहात ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील...

आणि त्याच बरोबर मघाशी प्रश्न उपस्थित केला गेला.ज्या धरणामध्ये पाणी उपलब्ध आहे. परंतु त्या धरणांना कॅनॉलची व्यवस्था नाही. अशा कॅनॉलची कामे करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले दोन्ही प्रश्न निधीच्या संदर्भातील आहेत. निधी उपलब्धते बाबतचा प्रश्न येत्या सहा ते आठ महिन्यात सोडविण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

----------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : उल्हास नदीचे अशुध्द झालेले पाणी.
**मु. शी.** : उल्हास नदीचे अशुध्द झालेले पाणी यासंबंधी सर्वश्री.संजय दत्त,नतिकोद्दीन खतिब,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ज ल्याज-डोंबिवली (जि.ठाजे) पालिजे चा पाज्याचा स्त्रोत असलेल्या उल्हास -नदीचे मोह-ने व बदलापूर येथू-न पाज्याचे -नमु-ने घेऊ-न जे लेल्या सूज्म जैविज चाचज्यांच्या आधारे 35 पट अशुध्द असल्याचा धक्जादायज निष्जर्ष महाराष्ट्र प्रदुषज नियंत्रज मंडळा-ने दि.9 जुलै,2005 रोजी वा त्या सुमारास जाढजे, ई-जोलाय आजि जोलाय जटातील जंतूचे इतर प्रजार यांची 100 मि.ली. पाज्यातील एजूज संज्या फक्त 10 असजे आवश्यज असतां-ना मोह-ने येथील -नमु-यात ही संज्या एप्रिल -मे 2005 मध्ये 275 तर जू-न मध्ये 350 व बदलापूर येथील -नमु-यात सरासरी 350 असजे, हया जंतूच्या प्रादुर्भावा-ने जॅस्ट्रो, जॉलरा, जाविळ इत्यादी रोजाचा प्रसार होत असजे, आरोज्याच्या दृष्टी-ने पाज्याचा स्त्रोत, जलशुध्दीजरज जेंद्र तसेच -नळाच्या पाज्याच्या ठराविज जाळा-ने चाचज्या जरजे पालिजेला बंध-नजारज असता-नाही याजडे संबंधित पालिजा दुर्लज जरीत असल्या-नेच पाज्यातील हा-नीजारज जंतूचे प्रमाज वाढत असल्याचे -नाजरिजां-नी प्रतिपाद-न जरु-न पाजी शुध्दीजरजासाठी घरजुती पध्दतीवरच -नाजरिज अवंलंबू-न असल्याचे त्यां-नी सांजजे, महा-नजरपालिजेच्या बेजबाबदारपजामुळे -नाजरिजांत निर्माज झालेली चिडीची व असंतोषाची भाव-ना , या प्रजरजी शास-ना-ने जरावयाची उपाययोज-ना तसेच प्रतिक्रिया."

श्री.रणजित कांबळे ( पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेचा विषय हा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या दुषित पाणी नमुन्याच्या अहवालाच्या संदर्भातील असताना संपूर्ण निवेदनात त्याबाबत काहीच खुलासा निवेदनात करण्यात आलेला नाही. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात रहाणा-या लोकांचा आरोग्याचा गंभीर प्रश्न आहे. मी माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफीक प्रश्न विचारतो की, उल्हास नदीचे पाणी 35 पट अशुध्द असल्याचे निष्कर्ष महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी मोहने आणि बदलापूर येथून उल्हास नदीचे पाण्याचे नमुने घेऊन केलेल्या सूक्ष्म जैविक चाचणीच्या आधारे काढलेला आहे हे खरे आहे काय ? हे खरे असेल तर महानगरपालिकेला याची माहिती का देण्यात आली नाही ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, प्रदुषण नियंत्रण मंडळाने पाण्याचे नमुने घेतले असतील तर त्या पाण्याचे नमुन्यांचा अहवाल महानगरपालिकेस पाठविण्याची जबाबदारी मंडळाची असते. आज सकाळपर्यन्त महानगरपालिकेकडे दूषित पाण्यासंदर्भात तक्रार प्राप्त झालेली नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, उत्तरात असे नमूद केले आहे की, दर महिन्यात पाण्याचे नमुने घेतले जातात. गेल्या तीन महिन्यातील पाण्याच्या नमुन्यांचा अहवाल काय आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे स्वतंत्र पाणी पुरवठा विभाग आहे. स्वतःचे जे रॉ वॉटर आहे त्याचे नमुने दर महिन्यात ते घेत असतात आणि ते नमुने स्कायलॅब एन्व्हायरमेंट लॅबोटरीकडे पाठविले जातात. ती लॅबोटरी केंद्र शासन पुरस्कृत आहे. ही लॅबोटरी दर महिन्याला आपला अहवाल महानगरपालिकेस पाठवित असते. पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील प्लॅन्ट आहे. त्या प्लॅन्टमधील पाण्याची प्रत्येक तासाला टेस्टींग होत असते. इ.एस.आर. आणि रेसीडेन्शील कनेक्शन्स आहेत त्यासंदर्भात जवळपास 200 ते 225 ठिकाणाहून पाण्याचे नमुने घेतले जातात. सदर पाण्याचे नमुने हे कोकणभवन येथील शासकीय प्रयोगशाळेकडे तपासणी पाठविले जातात. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील आरोग्य विभाग आहे. आरोग्य विभागातील कर्मचारी देखील वेगवेगळया ठिकाणाहून जवळपास 110 ते 115 पाण्याचे नमुने घेतात. ते पाण्याचे नमुने देखील कोकणभवन येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले जातात. त्या प्रयोग शाळेमध्ये पाण्याची टेस्टींग केली जाते. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, मागच्या तीन महिन्यामध्ये पाण्याच्या नमुन्यामध्ये कुठेही बॅक्टेरीया आढळून आलेला नाही.

---------------



ABG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.शिगम 17:40

**पृ. शी.** : मुंबईतील खटाव मिल बंद असल्यामुळे कामगारांना पगार न मिळणे.
**मु. शी.** : मुंबईतील खटाव मिल बंद असल्यामुळे कामगारांना पगार न मिळणे यासंबंधी सर्वश्री. मधुकर चव्हाण,विनोत तावडे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील जटाव मिल मार्च,1997 पासू-न बंद असल्यामुळे सुमारे 6 हजार ज़ामजारां-ना आजपर्यंत पजार -न मिळजे, दि-नांज 8.4.1997 रोजी मा.मुज्यमंत्री महोदयांज़डे सदर जिरजी चालू ज़रज्यासंबंधी व ज़ामजारांची थज़ीत पजार देज्यासंबंधी बैठज़ होऊ-न चर्चेत ठरल्याप्रमाजे सुमारे 2.15 ज़ोटी इतज़ी रक्ज़म व्यवस्थाप-ना-ने जमा ज़रु-न त्यांचे वितरज ज़ामजारां-ना -न ज़रजे, 2003 या वर्षी जिल्हाधिज़ारी बृह-मुंबई यांच्या ज़ार्यालयाज़डू-न ज़ामजारांची थज़ीत रक्ज़म देज्याच्या वेज़वेजळया 18 वसूली प्रज़रजा संदर्भात मा. उच्च -यायालया-ने दिलेल्या आदेशाच्या अ-नुषंजा-ने जिरजीतील मशि-नरीचा लिलाव ज़रज्यात येजे व सदर लिलाव होऊ-न 31 प्रज़ारच्या मशि-नरीसाठी रु.61 लाज अंतिम बोली ज़रज्यांत येजे व लिलावात जमलेली 61 लाज लाज रुपये इतज़ी रक्ज़म ज़ामजारां-ना थज़बाज़ी म्हजू-न -न देजे, दि-नांज 7.6.2004 रोजी मा. मुज्यमंत्री यांच्या अध्यजतेजाली जटाव मिल ज़ामजारांच्या प्रश्-नासंदर्भात संबंधितांची बैठज़ होऊ-न बैठज़ीमध्ये व्यवस्थाप-ना-ने 104 ज़ोटी रुपये ज़ामजारांची देय रक्ज़म 15 दिवसांत अदा ज़रज्याबाबत एज़ महि-ना मुदत माजू-न ठोस प्रस्ताव सादर ज़रज्याचे आश्वास-न देऊ-नही अंमलबजावजी -न होजे, जटाव मिलच्या जमि-नीच्या विज़ासातू-न उपलब्ध होजाऱ्या -निधीतू-न ज़ामजारांची ज़ायदेशीर देजी देज्याबाबत मा-न्य ज़रज्यात येऊ-नही अद्यापपर्यंत ज़ामजारांची देजी भाज़विजे शक्य -नाही, असे व्यवस्थाप-ना-ने सांज़जे, या संदर्भात जटाव मिलच्या ज़ामजारांची देजी व अ-न्य माज़ज्यांसंबंधी जटाव मिलचे मालज़ व संबंधित अधिज़ाऱ्यांची बैठज़ त्वरित लावली जाईल, असे आश्वास-न ज़ामजार मंत्र्यां-नी मार्च-एप्रिल-2005 च्या अधिवेश-नात विधा-नपरिषदेत देऊ-नही त्याची अंमलबजावजी -न होजे, त्याचप्रमाजे म्हाडामार्फत

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जिरजीची जाजा विजसित जरु-ा जामजारांची देजी व अ-य घटजांची देजी या अ-ुषंजा-ने प्रयत्-ा जरज्याचे आश्वास-ा सभाजृहात देऊ-ाही त्याची अंमलबजावजी -ा होजे, परिजामत: सुमारे 6 हजार जामजार व त्यांचे जुटुंबिय यांचे जीव-ा उध्वस्त होऊ-ा त्यांच्यात असुरजिततेची व संतापाची भाव-ाा -िर्माज होजे, यासंबंधी शास-ााची प्रतिज्रिया व शास-ाा-ने जरावयाची उपाययोज-ाा.

श्री. गणेश नाईक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी एक अतिशय दुर्देवाची गोष्ट आहे की, सहा हजार कामगार देशोधडीला लागले आहेत. शासन, कामगार संघटना, राष्ट्रीय मिल मजदूर

संघ हे कामगारांच्या जीवनाशी कशा प्रकारे खेळ खेळत आहेत ते मी सांगतो.सभापती महोदय, मार्च महिन्यामध्ये या सदनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी अतिशय प्रामाणिकपणे उत्तरे दिली होती..

यानंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ 17:45

श्री. मधुकर चव्हाण ...

सभापती महोदय, मी तीन प्रश्न विचारणार आहे. मंत्रीमहोदयांनी स्वयंप्रेरणेने उत्तर दिले तर बरे होईल. आपण असे म्हटले होते की, म्हाडा,गिरणी मालक आणि संबंधित अधिकारी यांची बैठक अधिवेशनाच्या कालखंडामध्ये लावली जाईल. सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, 4000 कामगारांपैकी पाठपुरावा केल्यामुळे 10 दिवसात पैसे दिले जाणार आहेत त्याबद्दल मी अभिनंदन करतो. 4000 कामगारांचे दावे भविष्य निर्वाह निधीच्या रकमेसाठी कार्यालयाकडे प्राप्त झाले आहेत. 52 दावे कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी परत करण्यात आले असून 619 दावे अंतिम टप्प्यात आहेत. 104 कोटी रुपयांचे देणे 15 दिवसात दिले होते. प्रत्येक कामगाराला किमान 2.5 लाख मिळाले असते. गेली 7 वर्षे या गिरणीतील कामगार उध्वस्त झाला आहे. मानसिकदृष्टया उध्वस्त झाला आहे. बेकारी असल्यामुळे त्याच्या मुलांना नोक-या नाहीत. तो जीवन कसे जगत असेल याचा विचार केलेला बरा. उरलेल्या 3327 कामगारांचे भवितव्य काय ? निवेदनाच्या शेवटच्या परि. म्हटले आहे की, व्यवस्थापनाने वित्तीय संस्थांबरोबरची आणि मान्यताप्राप्त नसलेल्या संघटनांबरोबर सुरु असलेली बोलणी लवकरात लवकर अंतिम करावीत अशा सूचना दिल्या होत्या. त्यानुसार व्यवस्थापनाने संघटनेबरोबर कोणता करार केला ? हा करार कामगारांच्या हिताचा होता काय ? करारातील अटी व शर्ती कोणत्या ? सर्वोच्च न्यायालयाने एनटीसीच्या गिरण्या विकण्यासाठी परवानगी दिली. मग राज्य शासन त्यांच्या मालकीच्या आणि खाजगी गिरण्या कामगारांच्या हितासाठी विकण्यासाठी परवानगी का देत नाही ? पिटीशन का दाखल करीत नाही ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मा.सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या अनुषंगाने याठिकाणी प्रश्न उपस्थित केला. 52 कामगारांच्या कागदपत्रांची पूर्तता झाली आणि ते परत पाठविले. 619 दावे अंतिम टप्प्यात आले आहेत. येत्या 10 दिवसात त्यांना पैसे वाटप करण्यात येईल. 3327 दावे वेगवेगळया स्तरावर कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी प्रलंबित आहेत. दुसरे असे म्हटले आहे की, मागील अधिवेशनात आश्वासन दिल्याप्रमाणे 19.04.05 रोजी व्यवस्थापन आणि मान्यताप्राप्त व मान्यताप्राप्त नसलेली युनियन यांच्यामध्ये लवकरात लवकर समेट घडवून मार्ग काढण्यासाठी प्रयत्न केले. अमान्यताप्राप्त युनियनचे म्हणणे असे आहे की, या कामगारांना व्यवस्थापनाने जी रक्कम देऊ केली आहे ती आम्हांला मंजूर नाही. मान्यताप्राप्त युनियनची भूमिका अशी आहे की,व्यवस्थापनाने जास्तीतजास्त पैसे द्यावेत.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ 17:45

श्री. गणेश नाईक ...

बीआयएफआरने जो प्रस्ताव गिरणी पुन्हा सुरु करण्यासाठी मांडला होता त्यानुसार व्यवस्थापन बीआयएफआरने घालून दिलेल्या अटी आणि शर्ती पूर्ण करु शकले नाही. याच्या विरोधात व्यवस्थापन ट्रॅब्युनलमध्ये गेलेले आहे. मध्यंतरी ट्रॅब्युनलला चेअरपर्सन नव्हते. आता चेअरपर्सन आलेले आहेत. मला निश्चितपणाने वाटते की, बीआयएफआरने ज्या भूमिकेतून प्रस्ताव ठेवला होता तो ट्रॅब्युनलमध्ये सुध्दा नाकारला जाईल. आज मुंबईच्या परिसरातील एनटीसीच्या किंवा खाजगी गिरण्यांमध्ये जे व्यवहार झालेले आहेत त्यांची किंमत पाहता या गिरण्यांच्या जमिनीला चांगल्या प्रकारे दर येऊ लागला आहे.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.कानडे 17.50

श्री.गणेश नाईक ..

या बाबतीत मागे या व्यवस्थापनाची अशी भूमिका होती की, 104 कोटी रुपयापेक्षा जास्त पैसे आम्ही देऊ शकत नाही. कारण ही जमीन खरेदी करण्यासाठी कोणी मोठी व्यक्ती पुढे येत नाही परंतु आता परिस्थिती बदलली आहे...

श्री जितेन्द्र आव्हाड (बसून) :ही जमीन खरेदी करण्यासाठी काही व्यक्ती पुढे येत आहेत ना ?

श्री.गणेश नाईक : या ठिकाणी मला कोणाचेही नाव घ्यावयाचे नाही परंतु मला एवढेच सांगावयाचे आहे की, ट्रायब्युनलने नाकारल्यानंतर हे प्रकरण पुन्हा हायकोर्टाकडे जाणार आहे..

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्य श्री.जितेन्द्र आव्हाड हे काहीही म्हणत असले तरी मराठी माणूस एवढा मोठा होत आहे याचा आम्हाला आनंद आहे. 420 अधिक 1 एवढे कोठून आले हे मात्र तपासण्याची गरज आहे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, हा प्रस्ताव ट्रायब्युनलने नाकारला तर हे प्रकरण हायकोर्टात जाईल आणि माननीय हायकोर्टाला विंनती करण्यात येईल.कोहिनूर मिल आणि स्वदेशी मिलच्या बाबतीत सुध्दा तो प्रश्न निर्माण झालेला आहे. कामगारांची देणी देण्यासाठी योग्य पध्दतीने या जागेची विल्हेवाट लावून जागेचे योग्य मूल्यमापन करुन त्या जागेची योग्य किंमत यावी. या किंमतीतून या गिरण्यांनी कामगारांचे पैसे द्यावेत,कर्जदाराचे देणे द्यावे आणि मालकालासुध्दा काही पैसे रहावेत असा विचार केला जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : 3 हजार 372 कामगारांच्या प्रॉव्हीडंड फंडाची रक्कम गणपतीपूर्वी दिली जाईल काय? याबाबतीत युध्द पातळीवर प्रयत्न करुन अधिका-यांनी छोटया छोटया गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यानंतर आणि मोठया गोष्टीची पूर्तता केल्यानंतर आठ दहा वर्षानंतर तरी प्रॉव्हीडंड फंडाचे हे पैसे सबंधित कामगारांना गणपतीपूर्वी दिले जातील काय ?

श्री.गणेश नाईक : त्यामध्ये काही त्रृटी आहेत काय हे पहावे लागेल आणि जुजबी स्वरुपाच्या त्रृटी असतील तर गणपती पूर्वी हे पैसे कामगारांना देण्याच्या अनुषंगाने निदेश दिले जातील.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेन्द्र आव्हाड : मुंबईच्या गिरणी कामगाराच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. या कामगारांमुळे मुंबईला ख-या अर्थाने वैभव प्राप्त झाले होते.परंतु आज हया गिरणी कामगारांचे संसार उध्वस्त झालेले आहेत. खटाव सारख्या अनेक गिरण्या आज लिक्वीडेशनमध्ये आहेत. मी माननीय मंत्रिमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. लिक्वीडेशनच्या बाबतीत .हायकोर्टापुढे ज्या केसेस सुरु आहे त्यामध्ये कोणाचे पैसे प्रायारिटीने द्यावयाचे याबाबतीत हायकोर्टाने प्रायारिटी ठरवून दिलेली आहे. त्या प्रायारिटीमध्ये कामगारांची देणी देण्यास जो प्राधान्य क्रम ठरवून दिलेला आहे तो आठव्या नंबरचा आहे. ज्या धनिकांनी नॅशनलाईज बॅन्कांना आतापर्यन्त 48 हजार कोटी रुपयांना बुडवले आहे . त्यांचे पैसे कोर्ट प्रथम देत आहे आणि कामगारांचे पैसे मात्र नंतर देत आहे.एखादी कंपनी 600 कोटी रुपयांना विकली गेली आणि कामगारांचे देणे 400 कोटी रुपये असेल आणि बॅन्काचे देणे 500 कोटी रुपये असेल तर कोर्ट असे सांगते की, अगोदर बॅन्काचे देणे देण्यात यावे आणि उरलेल्या 100 कोटी रुपयामधून कामगारांचे पैसे देण्यात यावे.तेव्हा हायकोर्टात जाऊन फायनांशिअल इन्स्टिटयुशन्सना आणि बॅन्काना द्यावयाच्या पैशाची प्रायारिटी बदलून कामगारांचे पैसे अगोदर देण्याच्या बाबतीत शासन हायकोर्टाला विनंती करणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात या सभागृहात मी हे सांगितले होते की, कोणत्याही परिस्थितीत कामगारांचे देणे दिल्याशिवाय कोणत्याही जमीन खरेदीदाराला सी.सी. आणि ओ.सी. दिली जाणार नाही. कामगारांचे सर्व पैसे दिले गेले आहेत याची खात्री केलयानंतरच सी.सी. आणि ओ.सी.दिली जाईल.

श्री.जितेन्द्र आव्हाड : या कामगारांचे पैसे दिलेच पाहिजे त्याबद्दल काही प्रश्न नाही.मी माननीय मंत्रिमहोदयांना अशी विनंती करतो की, समजा एखाद्या लिक्वीडेशनमध्ये असलेल्या कंपनीची जागा विकल्यामुळे 600 कोटी रुपये आले आणि कामगारांची देणी 400 कोटी रुपयांची आहे आणि फायनाशिंअल इन्स्टिटयुशन्सची देणी 500 कोटी रुपयांची असेल तर दोन्ही मिळून 900 कोटी रुपयांची देणी त्यांना द्यावयाची आहे. कोर्ट मात्र निकाल देत असतांना प्रायारिटीचा विचार करते आणि असे सांगत असते की , बॅन्कांचे 500 कोटी रुपये द्यावयाचे राहिलेले आहेत ते प्रथम देण्यात यावे. असे सांगितल्यानंतर 100 कोटी रुपये शिल्लक राहतात .या 100 कोटी रुपयामधून कामगारांचे पैसे देण्याच्या बाबतीत ॲडजेस्टमेन्ट करण्यास सांगितले जाते.

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.कानडे 17.50

श्री.जितेन्द्र आव्हाड ...

माननीय मंत्रीमहोदय सांगतात ते बरोबर आहे की,हे 100 कोटी रुपये देण्याच्या बाबतीत कंपनीच्या मालकांना मी सांगीन व तोपर्यन्त या जमिनीचा विकास करु देणार नाही.

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड ....

किंबहुना माझा प्रश्न असा आहे की, बँकेला पैसे मिळाले नाहीत, त्यांचे काही लाख रुपये बुडाले तरी काही हरकत नाही पण जो गोरगरीब कामगार आहे, त्या माणसाला त्याचे पैसे प्राधान्याने मिळावेत या दृष्टीने आपण काही प्रयत्न करणार आहात का ?

श्री. गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड यांनी जी बाब निदर्शनास आणली आहे ती अतिशय योग्य अशीच आहे. म्हणूनच या संदर्भात कोर्टाला अशी विनंती करण्यात येईल की, कामगारांची देणी देण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, भायखळा आणि बोरीवली येथील कामगारांची देणी आणि स्वेच्छानिवृत्ती योजनेचा लाभ या पोटी रुपये 104 कोटी उपलब्ध करण्याचा प्रस्ताव दिला होता. व्यवस्थापनाने 22.8.2003 रोजीच्या बीआयएफआरच्या आदेशाविरूद्ध दिनांक 10.10.2003 रोजी एएआयएफआर मंडळासमोर अपील अर्ज दाखल केला असून तो प्रलंबित आहे असे या निवेदनामध्ये म्हटलेले आहे. आता हा अर्ज करून दोन वर्षे होतील. अजूनही हे का प्रलंबित आहे ? आणि मग कामगारांना न्याय केव्हा मिळणार आहे ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबाबत मी मघाशीच उत्तर देताना म्हटले आहे की, ट्रॅब्यूनलकडे अर्ज केला पण तेथे कोणी चेअरपर्सनच नव्हते. आता ते आलेले आहेत आणि त्यामुळे तेथे लौकरच याबाबत निर्णय घेतला जाईल आणि तो कामगारांच्या हिताचाच असेल असे मला वाटते.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या देशातील कामगारांचे दुर्दैव आहे, अशा साठी की, या देशामध्ये बीआयएफआर नावाची यंत्रणा कारखाने, गिरण्या बंद करण्यासाठीच जणू काही उभी केली गेली आहे. त्यातून कामगारांचा फायदा काहीही नाही. हे स्टेटमेंट करताना मी या स्टेटमेंटला विरोध करणाऱ्यांना मी असा प्रश्न विचारतो की, आजवर बीआयएफआर ने चालू केलेला एखादा कारखाना वा गिरणी या देशात कोठे असेल तर त्याचे नाव आपण मला सांगावे. पण असे कधी घडलेलेच नाही आणि त्यामुळेच ही यंत्रणा संपूर्णपणे मालकांना मदत करण्यासाठीच उभी केलेली आहे असे मी म्हणतो. आता अुदाहरण म्हणून सांगतो की, खटाव मिलच्या बाबतीत इतके काही घडले आहे की आता तर ही गिरणी जाळण्यात आली. त्यामध्ये मिल मालकाचाच हात होता. सुपारी देऊन ही गिरणी जाळण्यात आली. हायकोर्टानेच नाही तर सगळ्या कोर्टांनी निर्णय दिलेले

...... 3झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सरपोतदार ....

आहेत तरीही या गिरणीच्या मालकाच्या विरूद्ध महाराष्ट्र शासनाने कोणतीही कारवाई अद्याप पर्यंत केलेली नाही. कोर्टाचा आदेश काहीही असो, प्रत्येक वेळी काही ना काही पळवाटा काढून हा गिरणी मालक बाजूला जातो. अशा परिस्थितीत त्या गिरणीतील कामगारांची अवस्था दयनीय झ ाालेली आहे इतकी की आता त्यांची एवढी तरी देणी मिळणार आहेत का ? किंबहुना त्यांना काहीच मिळणार नाही अशीच परिस्थिती आहे. तेव्हा महाराष्ट्र शासनाकडे अशा सगळ्या लबाड, लुटारू कारखानदारांच्या, गिरणी मालकांच्या विरूद्ध कारवाई करण्याच्या दृष्टीने काही सक्षम कायदे आहेत काय ? असल्यास, आपण त्यांचा वापर करून या लोकांचा बंदोबस्त करणार काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, अशा मालकांविरूद्ध आपण काहीही कारवाई केली की, ते मालक कोर्टामध्ये जातात आणि एकदा प्रकरण कोर्टामध्ये गेल्यानंतर शासनावर बंधने येतात. आता ही गोष्ट खरी आहे की, सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे बीआयएफआर ही संस्था कंपनी, कारखाना, गिरणी दुर्बल झाली असेल तर तिला सशक्त करण्यासाठी म्हणून निर्माण करण्यात आली. परंतु दुर्दैवाने या संस्थेकडून दुर्बल असलेल्या कंपनीला शेवटची घरघर लावण्याचेच काम होत आहे या सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी देखील सहमत आहे. मालक वर्गाला वठणीवर आणण्यासाठी आपल्याकडे कायदे जरूर आहेत. आता खटाव गिरणी मालकाच्या बाबतीत मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आम्ही उच्च न्यायालयाला विनंती करणार आहोत की, आज मुंबईमध्ये जागांचे भाव आकाशाला भिडले आहेत आणि हीच वेळ आहे की, कोर्टाने या गिरणीच्या मालमत्तेचा लिलाव होऊ दिला तर त्यातून येणाऱ्या मोठ्या रकमेतून कामगारांची देणी भागविता येतीलच शिवाय बाकी सर्व देणी चुकवून मालकाला देखील पैसे मिळतील. अशी दुसरी वेळ यासाठी येणे कठीण आहे.

****

( यानंतर श्री.जागडे .... 4ए 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दुग्धव्यवसाय विभागातील रोजंदार कामगार श्री. पी. झेड. सरवदे यांची सेवा नियमित करणे.

मु. शी : दुग्धव्यवसाय विभागातील रोजंदार कामगार श्री. पी. झेड. सरवदे यांची सेवा नियमित करणे यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यां-ी दिलेली लजवेधी सूच-ा.

श्री. दिवाकर रावते ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : अध्यज महोदय, मी आपल्या अ-ुमती-ने नियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वज-िज महत्वाच्या बाबीज्डे स-मा-ा-ीय दुग्धविकास मंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ी निवेद-ा ज्रावे, अशी वि-ंती ज्रतो.

" शासकीय दूध योजना औरगाबाद येथे रोजंदारीवर कनिष्ठ लिपिक या पदावर श्री. प्रेमचंद सरवदे यांनी २४० दिवस पूर्ण केलेले असणे, श्री. सरवदे यांनी आपले २४० दिवस पूर्ण भरल्याने सेवेत नियमित करण्याची शासनास केलेली विनंती, व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायालयाने दिनांक ७.७.२००३ रोजी श्री. सरवदे यांना शासनाच्या सेवेत नियमित करण्याबाबत व त्याअनुषंगाने त्यांना आर्थिक फायदे देण्याचा दिलेला निर्णय, सदर निर्णय देऊनही शासकीय दुग्धशाळा, औरगांबाद यांनी त्यांना अद्याप नियमित सेवेत न घेणे, कृषी व दुग्धविकास विभाग व विधी व न्याय विभागाने श्री. सरवदे यांना सेवेत नियमित करण्याचा दिलेला सल्ला, श्री. सरवदे हे केवळ मागासवर्गीय असल्याने त्यांचा पध्दतशीरपणे करण्यात येणारा छळ, शासनाने कोर्टाचा निर्णय पायदळी तुडविल्याने व शासन न्याय देत नसल्याने शासकीय व विशेषतः मागासवर्गीय कर्मचाऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, यावर शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. हसन मुश्रीफ ( दुग्धविकास राज्यमंत्री ) : अध्यज महाराज, लजवेधी सूच-ेसंबंधीच्या निवेद-ाच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ा आधीच वितरीत ज्ेल्या असल्यामुळे मी ते निवेद-ा आपल्या अ-ुमती-ने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेद-ा सभागृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

निवेद-ा

( प्रेस : येथे सोबतचे निवेद-ा छापावे. )

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एका मागासवर्गीय कर्मचा-याचा हा प्रश्न आहे. हा कर्मचारी आपल्या अस्तित्वासाठी गेल्या 15 वर्षापासून भांडत आहे. असे असतानाही त्या कर्मचा-याला न्याय मिळाला नाही. त्यामुळे आम्हाला या ठिकाणी लक्षवेधी सूचना आणावी लागली आहे. श्री. पी. झेड. सरवदे नावाचा कर्मचारी हा मागासवर्गीय कर्मचारी आहे. दुग्ध विकास महामंडळाच्या माध्यमातून त्याला कायम स्वरुपी नोकरीत सामावून घेण्याबाबतचा हा प्रश्न आहे. सभापती महोदय, 1977-78 मध्ये सरकारी कर्मचा-यांनी संप केला होता, त्यावेळी 54 हजार कर्मचारी संपकाळात भरती करण्यात आले होते. त्या सर्व कर्मचा-यांना विविध ठिकाणी नोकरीत सामावून घेण्यात आले आहे. ज्या कर्मचा-यांनी सलग 240 दिवस भरले आहेत, त्यांना कायम स्वरुपी नोकरीमध्ये सामावून घेण्यात आले आहे. सभापती महोदय, श्री. सरवदे हे 1977-78 मध्ये सरकारी नोकरीत होते की नाही, याचा निर्णय होण्यासाठी 1983 साल उजाडले. 1983 सालानंतर काही कर्मचा-यांना सरकारी नोकरीत सामावून घेण्यात आले होते. ज्या कर्मचा-यांना सामावून घेतले नाही, ते कर्मचारी न्यायालयात गेले. मा. न्यायालयाच्या आदेशानुसार आतापग्रनत 2366 कर्मचा-यांना नियमित करण्यात आले. तसेच न्यायालयाच्या आदेशाशिवाय शासन स्तरावरुन मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार 1099 रोजंदार कर्मचा-यांना नियमित करण्यात आले. असे असताना या एका कर्मचा-याला मात्र न्याय मिळाला नाही. श्री. सरवदे यांनी 1977-78 साली 240 दिवस सलग सेवा केलेली असतानाही त्यांना नोकरीत सामावून घेण्यात आले नाही. त्यांना नियमित करण्यात आले नाही. त्यासाठी त्यांना झुंजावे लागले आहे. या बाबत प्रशासकीय न्यायाधिकरणाने त्यांना दि. 4.3.1985 पासून सेवा नियमित करण्याबाबत व त्या अनुषंगाने फायदे देण्याबाबतचे निदेश दिले आहेत. असे असतानाही त्यांना नोकरीत सामावून न घेता संभाजीनगर उच्च न्यायालयात अपील करण्यात आले आहे. हा कर्मचारी मागासवर्गी असल्यामुळे त्याला त्वरीत न्याय देण्याच्या बाबतीत शासन विचार करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, असे 17 रोजंदार कर्मचारी आहेत. त्यांची सेवा नियमित करण्याबाबत मॅटने निर्णय दिला आहे. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार आतापग्रनत 2366 कर्मचा-यांना नियमित करण्यात आले. तसेच न्यायालयाच्या आदेशाशिवाय शासन स्तरावरुन मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार 1099 रोजंदार

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ MHM/ SBT/ MAP/ KGS/ 18:00

श्री. हसन मुश्रीफ....

कर्मचा-यांना नियमित करण्यात आले. आता या 17 कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर आणला होता. त्या बाबत मंत्रिमंडळाने असा विचार केला की, .....

( यानंतर श्री. सरफरे..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

अशापध्दतीने बॅक डोअरने जे कर्मचारी नोकरीला लागतात त्यामुळे राज्यामध्ये जी असंख्य मुले बेकार आहेत ती नोकरीशिवाय रहातात. आणि म्हणून बॅक डोअरने लागलेल्या कर्मचाऱ्यांना ज्या अधिकाऱ्यांनी लावले आहे त्यांच्यावर कारवाई करु. आणि यापुढे जे कर्मचारी बॅक डोअरने येतील...

श्री. दिवाकर रावते : एवढे तुम्ही बेशरम कसे रहाता? 2366 आणि 1099 कर्मचाऱ्यांचा प्रश्न आपण याठिकाणी मांडता, परंतु 17 कर्मचाऱ्यांसाठी आपण काहीच सांगत नाही? उलट बेशरमपणे बॅक डोअरचे कर्मचारी आहेत म्हणून सांगता. अशापध्दतीने बेशरमपणाने आपल्याला राज्यकारभार हाकता येणार नाही...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा एका व्यक्तीचा प्रश्न नसून संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. म्हणून मंत्रिमंडळाने त्यासंबंधी निर्णय घेतला आहे.

श्री. दिवाकर रावते : या 17 लोकांना आपण बॅक डोअर कां म्हणता? या ठिकाणी साडे तीन हजार लोकांचा प्रश्न आहे. 1977-78 पासून माणसे न्यायालयात जात आहेत. आपण जर मला उत्तर दिले नाहीतर मला वेलमध्ये जाऊन बसावे लागेल...

श्री. हसन मुश्रीफ : 17 लोकांच्या बाबतीत औरंगाबाद खंडपिठापुढे अपिल केले आहे. या विषयावर पुर्नविचार करण्यासाठी हा विषय पुन्हा मंत्रिमंडळाच्या बैठकीपुढे ठेवला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. तेव्हा या बाबतीत आपण निर्णय दिला तर बरे होईल. हा 17 लोकांचा प्रश्न आहे, मागासवर्गीयांचा प्रश्न आहे...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या खात्यामध्ये ज्यांचे 240 दिवस झाले आहेत असे 778 कर्मचारी आहेत. 17 लोकांचा मॅटमध्ये निर्णय लागला होता. तेव्हा औरंगाबादच्या खंडपिठाच्या निर्णयाची आम्ही वाट पहात आहोत. मंत्रिमंडळाने याबाबतीत निर्णय घेतला तर 778 कर्मचाऱ्यांनाही घ्यावे लागेल. म्हणून या 17 कर्मचाऱ्यांचा प्रश्न मंत्रिमंडळापुढे आणला जाईल्.

**सभापती** : सभागृहातील माननीय सदस्यांच्या या प्रश्नावरील भावना तीव्र आहेत. ज्या कर्मचाऱ्यांनी 240 दिवस रोजंदारीवर काम केले असेल तर त्यांच्या बाबतीत आपल्यावर काही जबाबदारी येते. त्यापैकी जवळ जवळ 4 हजार कर्मचाऱ्यांना आपण कायम करीत आहोत. यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. सभापती...**

17 लोकांचे नुकसान होत आहे. त्याबाबत विचार करण्यासाठी आपण एक वेळ मंत्रिमंडळासमोर गेला होता. याबाबतीत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे असे मला वाटते. हा प्रश्न किरकोळ आहे. व तो पॉझिटीव्ह स्वरुपामध्ये कसा सुटेल हे आपण पहावे.

श्री. आर. आर. पाटील (उप मुख्यमंत्री): सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशाप्रमाणे मंत्रिमंडळासमोर हा विषय आणला जाईल. आणि या 17 लोकांबाबत सहानुभूतीचे धोरण स्वीकारले जाईल.

---

**औचित्याच्या मुद्दयासंबंधी...**

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मला औचित्याच्या मुद्दयाव्दारे आपणास माहिती द्यावयाची आहे...

**सभापती** : औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली जात नाही. आपण माझ्या दालनामध्ये येऊन मला माहिती द्यावी.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुंबईतील एन्टॉप हिल भागातून अश्लिल सिडींचा जप्त केलेला साठा" या विषयावरील माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, वि.प.स. व इतर यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वयेच्या सूचनेबाबत दिनांक 25.5.2005 रोजी झालेल्या चर्चेच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : या ठिकाणी सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी. ).

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

पृ.शी.: हाजिबंदर येथे शासनाने कोळसा वाहतुकीसाठी
दिलेली परवानगी.

मु.शी.: हाजिबंदर येथे शासनाने कोळसा वाहतुकीसाठी
दिलेली परवानगी याबाबत मा.सदस्य श्री.मधुकर
चव्हाण यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा.सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली सूचना छापावी.)

. . . .4 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी मी माननीय मंत्री महोदयांच्या एकच गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, याठिकाणी तेल कंपन्या, अजूबाजूला डिझेलचे साठे आहेत आणि कोळसा हा ज्वालाग्रही आहे. अशा वेळी तर स्फोट झाला तर मुंबईच्या अजूबाजूच्या परिसरात गंभीर परिस्थिती निर्माण होईल. आपण याठिकाणी उत्तर द्याल, पण याबाबतीत त्वरित कारवाई होणे आवश्यक आहे. जेणेकरुन भविष्यकाळात गंभीर परिस्थिती निर्माण न होता जिवित व वित्तहानी वाचेल. याबाबतीत माननीय मंत्री महोदय काही सांगू शकतील का ?

(उत्तर नाही)

. . . .4 सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: श्री.अनंत तरे अधिवेशनासाठी ठाण्याहून मुंबईला येत असताना पोलिसांनी सतत त्यांची गाडी अडवून केलेली विचारणा.

मु.शी.: श्री.अनंत तरे अधिवेशनासाठी ठाण्याहून मुंबईला येत असताना पोलिसांनी सतत त्यांची गाडी अडवून केलेली विचारणा याबाबत मा.सदस्य श्री.अनंत तरे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा.सदस्य श्री.अनंत तरे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"दिनांक 11 व 12 जुलै 2005 रोजीपासून विधानपरिषदेचे अधिवेशन मुंबई येथे सुरु झाले असून सदर अधिवेशनाला मी ठाण्याहून मुंबईला येत असताना मुलूंड नाका ते वडाळा इथपर्यात पोलीस माझी गाडी अडवून सतत विचारणा करीत होते. माझ्या गाडीच्या मागे पोलिसांची गाडी पाठलाग करीत असणे, इतर अनेक गाडया सदर रस्त्यावरुन जात असताना त्या तपासल्या जात नसता मला जाणीवपूर्वक अडवून गाडी तपासली जात आहे. पोलिसांना अधिवेशनासाठी जात असल्याचे सांगूनही गाडी अडविली जात आहे. ही बाब गंभीर असून या प्रकाराची चौकशी करुन संबंधित पोलिसांवर कारवाई करावी, ही विनंती."

सभापती महोदय, दिनांक 11 जुलै 2005 पासून अधिवेशन सुरु झाले. या अधिवेशनाला येत असताना पहिल्या दिवशी आलेला अनुभव येथे विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मांडू इच्छितो. या सदनाचा सदस्य म्हणून माझा या अधिवेशनाला उपस्थित राहण्याचा हक्क होता. त्यानुसार मी सकाळी 9.00 वाजता निघालो.

**सभापती** : मी औचित्याच्या मुद्यासाठी परवानगी दिलेली नाही.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, मी विशेष उल्लेख मांडत आहे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे सकाळी 9.00 वाजता घरातून निघालो. ठाण्याची बॉर्डर क्रॉस केल्यावर मुलुंड सिग्नलला आलो.त्यावेळी मला असे वाटले की, मला आज पायलट कार आणि मागे-पुढे पोलिसांची

. . . .4 सी-4



श्री.अनंत तरे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पोलिसांची व्हॅन मिळाली आहे का ? पण मला बाजूला घेऊन थांबविण्यात आले आणि गाडी चेक केली. कुठे चालला आहात ? असे विचारले. त्यावर मी सांगितले की, मी अधिवेशनासाठी जात आहे. तर पोलिसांनी सांगितले की, तुम्हाला जाता येणार नाही. याबाबतीत आमच्या साहेबांनी बोलावे. मग मी नवघर पोलीस स्टेशनचे सिनिअर पोलीस इन्स्पेक्टर श्री.खरपुडे यांच्याकडे विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, आम्हाला वरुन आदेश आहेत की, तुम्हाला जाता येणार नाही. अधिवेशनाला येण्याचा माझा हक्क आहे. म्हणून मी त्यांना सांगितले की, तुम्हाला पाहिजे ते करा. मी जाणार आहे. असे सांगून मी तेथून निघालो. ही अतिशय खेदाची आणि दु:खाची गोष्ट आहे की,मला सात ठिकाणी अडविण्यात आले. माझ्या बरोबर दोन-तीन गाडया अडविण्यात आल्या. जेव्हा नाकाबंदी असते, तेव्हा सर्व गाडया अडविल्या जातात. पण याठिकाणी केवळ मराठी नंबर असलेल्या आणि भगवा ध्वज असलेल्या गाडया अडवित होते. माझी गाडी अडवून बाजूला घेतल्यावर येणा-या-जाणा-या लोकांना वाटत होते की, यांनी असे काय केले आहे ? या सर्व प्रकारामुळे मला येथे येण्यास दोन तास उशीर झाला. म्हणून मला याबाबतीत विनंती करावयाची आहे आणि शासनाला असे विचारु इच्छितो की, राज्य शासनाने अशा प्रकारचे आदेश कोणाला दिले होते का ? दिले असतील तर तसे आदेश देणे योग्य होते का ? दि.11 व 12 या दोन दिवशी या राज्यात मराठी नंबर असलेल्या, भगवा ध्वज लावलेल्या गाडया अडविण्याचे प्रकार घडले आहेत.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे (पुढे सुरु....

मुलुंडहून, नवीमुंबईहून, भिवंडीहून येणाऱ्या सगळया लोकांना थांबविण्यात आले, त्यांची झडती घेण्यात आली. त्यांना ठाण्याच्या, नवी मुंबईच्या बॉर्डरच्या पुढे जाण्यासाठी प्रतिबंध करण्यात आलेला होता. या गोष्टीची राज्य शासनाने चौकशी केली पाहिजे. त्या दिवशी कोणतेही अनुचित प्रकार घडले नव्हते, मग असा कोणता प्रसंग होता की, त्या दिवशी विधानमंडळाच्या सदस्याला अडवून त्यांची झडती घेण्यात आली ? पाच-पाच मिनिटे त्या ठिकाणी थांबविण्यात आले. हा गंभीर प्रसंग आहे. या प्रसंगाची चौकशी होण्याची गरज आहे. नवघर पोलीस स्टेशनचे जे सिनियर इन्स्पेक्टर श्री.खरबुडे यांना कोणाचा आदेश होता, याचा खुलासा होण्याची गरज आहे. आपण विशेष उल्लेख मांडण्यासाठी परवानगी दिली, त्याबद्दल धन्यवाद.

**सभापती** : लोकप्रतिनिधी सभागृहात येत असतांना, त्यांना कोणताही अडथळा होणार नाही, याची काळजी घेणे हे आपले काम आहे. कायदा व सुव्यवस्था मेंटेन करणे जरुरीचे आहे. पण त्याचबरोबर लोकप्रतिनिधींचा जो हक्क आहे, तो हक्क जतन करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने मी शासनाला सूचना देतो. या हा विषय गृह विभागाने हाताळत असतांना सदस्यांना व्यक्तीगत त्रास झाला असे नाही तर सदनातील अनेक सदस्यांनाही त्यादृष्टीने त्रास झाला, याची मंत्रीमहोदयांनी नोंद घ्यावी आणि त्या दृष्टीने योग्य ती कारवाई करावी.

श्री.मधुकर सरपोतदार : तसे काही असेल तर पोलीस खात्याने सूचना अगोदर द्यावी.

**सभापती** : ठीक आहे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृशी. : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामधील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत.

मु.शी. : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी निवृत्ती वेतन योजना लागू करणे याबाबत डॉ.अशोक मोडक,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य डॉ.अशोक मोडक, वि.प.स. यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडणार आहे, त्या विषयाशी संबंधित मंत्री महोदय उपस्थित आहेत, हा योगायोग आहे.

"यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत"

सभापती महोदय, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातील अध्यापकांना आणि अध्यापकेतर कर्मचाऱ्याना निवृत्ती योजना लागू करावी, अशा अर्थाचा ठराव मंत्रिमंडळाच्या 2005 मध्ये झालेल्या पहिल्या पंधरवडयातील बैठकीत पारित करण्यात आला, त्यासंबंधीचे वृत्त शासनाचे मुखपत्र "लोकराज्य" आहे, त्या 'लोकराज्या'च्या मार्च 2005 च्या अंकातील पृष्ठ क्रमांक 37 वर प्रसिध्द झाले. दुर्दैव असे आहे की, आता चार महिने उलटून गेलेले आहेत, याचा फॉलोअप मात्र शून्य आहे. उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाने त्या ठरावाला अनुसरुन शासन निर्णय जारी करणे ही जी औपचारिकता आहे, ती औपचारिकता न झाल्यामुळे त्या विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी पत्र पाठवून मला विचारणा केली. सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत मंत्री महोदयांना विनंती आहे की, विद्यापीठामागून विद्यापीठे सुरु करण्याचा सपाटा सरकारचे चालविलेला आहे. जवळपास कमीअधिक प्रमाणात सर्वदूर अशीच स्थिती आहे. लोणेरे विद्यापीठ असेल, कालिदास विश्व विद्यापीठ असेल, नुकतेच जन्माला आलेले सोलापूर विद्यापीठ असेल, या सर्व विद्यापीठांमधून अध्यापक आणि अध्यापकेतर कर्मचाऱ्यांना विद्यापीठातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच न्याय मिळाला तरच या विद्यापीठांचे भविष्य काही आशादायी ठरु शकेल. म्हणून माझी विनंती आहे की, या विशेष उल्लेखाचा गांभीर्याने विचार करुन या संबंधात आपण जो मंत्रिमंडळ म्हणून निर्णय घेतलेला आहे, त्याचा पाठपुरावा करा, त्याची कार्यवाही करा, अशी विनंती करुन माझे बोलणे मी संपवितो.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

पृशी. : मांढळ जि.नागपूर येथील जंगलामध्ये रोजगार हमी योजनेवर काम केलेल्या मजुरांना वेतन न मिळणे.

मु.शी. : मांढळ जि.नागपूर येथील जंगलामध्ये रोजगार हमी योजनेचे काम केलेल्या मजुरांना वेतन न मिळणे, याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे ,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेजाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे,वि.प.स. यांनी एज विशेष उल्लेजासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "एफ.डी.सी.एम. अंतर्गत रोजगार हमी योजनेचे (जि.नागपूर) मांढळ येथील जंगलामध्ये सागवन जळ्यापासून तर निंदण काढेपर्यन्तचे काम 250 मजुरांनी 31 जून 2003 मध्ये कुपन नं.437 कुपन 89 हेक्टरवर चिकना येथे रोजगार हमी अंतर्गत केले, काम करणाऱ्या काही मजुरांना कुपनचे धान्य व मजुरी देण्यात आली.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

काही मजुरांना कुपनवर धान्य आणि मजुरी देण्यात आली. उरलेल्या 92 मजुरांना दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनसुध्दा आजपर्यंत त्यांच्या मजुरीचे धान्य मिळाले नाही आणि मजुरीही देण्यात आलेली नाही. एफ.डी.सी.एम.चे अधिकारी, राऊंड आफिसर, वनरक्षक यांच्या अधिकाराखाली हे काम करण्यात आले. हया अधिका-यांना तीन निवेदने दिली असतांना देखील तुम्हाला तुमच्या मजुरीची रक्कम देतो, परंतु तुमचे धान्य देणार नाही असे त्या सर्व मजुरांना सांगण्यात आले. तेव्हा या 92 मजुरांचे हक्क दोन वर्षे डावललेले आहेत. त्यांना न्याय देण्यात यावा. या प्रकरणाची सगळी चौकशी करुन या 92 मजुरांना त्यांची मजुरी आणि कुपनवरील धान्य देण्याचे निर्देश शासनाच्या माध्यमातून देण्यात यावे," अशी या विशेष उल्लेखाच्या मामध्यमातून मी विनंती करतो. धन्यवाद.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृशी**. :महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात अनुकंपा तत्वावरील मिळणा-या नोकरीपासून वंचित ठेवणे.

**मु.शी**. : :महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात अनुकंपा तत्वावरील मिळणा-या नोकरीपासून वंचित ठेवल्याबाबत श्री. जयंत प्र. पाटील वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी एक विशेष ------------- उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित): महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेत असलेले सुमारे 250 कर्मचारी-कामगार यांचे सेवेत असतांना निधन झाले आहे, त्यांच्या कुटुंबातील व्यक्तिला अनुकंपातत्वावर नोकरी मिळण्याचा हक्क असतांना यापैकी काही व्यक्तिंना वाहक भरतीसाठी या योजनेखाली मुलाखतीसाठी बोलाविले असता, केवळ 1 सेंटीमिटरने उंची कमी भरल्याचे कारण दाखवून त्यांना अपुकंपा तत्वावरील मिळणा-या नोकरीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. महामंडळाच्या या निर्णयामुळे अनुकंपा तत्वावरील नोकरी म्हणजे काय याचा अर्थच महामंडळाला समजलेला नाही. या घटनेमुळे अनेक संसार अनुकंपातत्वावरील नोकरी न मिळाल्याने उघडयावर आलेले आहेत. तरी केवळ 1 सेंटीमीटर उंची न भरल्याने व इतर सर्व पात्रता परिपूर्ण असतांना देखील नोकरी पासून वंचित राहिलेल्या व्यक्तिंना मानवतेच्या दृष्टीकोनातून नोकरी मिळण्यासाठी शासनाने खास बाब म्हणून या प्रश्नाकडे पाहून निर्णय घेण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

---

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृशी**. :भिलार येथे जमीन खचल्यामुळे झालेले नुकसान.

**मु.शी**. :भिलार येथे जमीन खचल्यामुळे झालेले नुकसान याबाबत श्रीमती कांता नलावडे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती कांता नलावडे( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"भिलार (ता. महाबळेशवर, जि.सातारा) येथे दिनांक 16.7.2005 पासून जमीन खचण्याचे सुरु झाले आहे, व आता पर्यंत ते कमी झालेले नाही. जमीन खचल्यामुळे प्राथमिक अंदाजानुसार सुमारे तीन कोटी छत्तीस लाख रुपयांचे नुकसान झाले आहे, व ते वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी शासकीय जमिनीबरोबरच खाजगी जमीन ताब्यात घेऊन ग्रामस्थांचे पुनर्वसन केले जाईल असे आश्वासन जिल्हाधिकारी सातारा यांनी दिले आहे, भूगर्भशास्त्रज्ञांनी परिसराची पाहणी केली असून दोन दिवसात अहवाल सादर केल्यानंतर शासनामार्फत पुढील कारवाई केली जाईल, अशाच प्रकारे साटेली जिल्हा सिंधुदुर्ग येथे व दुसरा प्रकार खोपोली जिल्हा रायगड येथे जमिनीला भेगा पडून ग्रामस्थांवर भितीचे संकट उभे राहिले आहे, अशा प्रकारे भूगर्भातील घडामोडींमुळे नागरिकांमध्ये चिंतचे व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, सदर विषय अत्यंत महत्वाचा व गंभीर असल्यामुळे तो मी आज सभागृहात "विशेष उल्लेखा" द्वारे उपस्थित करु इच्छिते, कृपया परवानगी द्यावी.

सभापती महोदय,विशेष उल्लेखाच्या माध्यमातून ज्या ज्या ठिकाणी नैसर्गिक आपत्ती ओढवलेली आहे, त्याबाबतचे निवेदन करणार आहे. भिलार, तालुका महाबळेशवर, जिल्हा सातारा येथे दिनांक 16-7 पासून जमीन खचण्यास प्रारंभ झाला आणि अजूनही त्या भागातील जमीन खचत आहे. भिलार गावात जमिनीला मोठ मोठया भेगा पडलेल्या आहेत. ते गाव पूर्णपणे दुभंगलेले आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

घरे, विजेचे खांब पूर्ण सरकलेले आहेत. विहिरी जमिनीच्या खाली गेलेल्या आहेत.गावातील ग्रामस्थांचे स्थलांतर केलेले आहे. पालकमंत्र्यांनी स्वत: त्या ठिकाणी भेट दिलेली आहे. दोन ते अडीच कोटी रुपयाचे नुकसान झालेले आहे. पावसाळयाच्या प्रारंभीच ही नैसर्गिक आपत्ती त्या ठिकाणी ओढवली आहे. सातारा जिल्हयात कास तलावाच्या परिसरातही आता पुन्हा अशा प्रकारे जमीन खचली आहे आणि घरे खाली जात आहेत. भूगर्भ शास्त्रज्ञानी या परिसराची पाहणी केली. परंतु अद्याप त्यांचा अहवाल आलेला नाही. ही फार गंभीर घटना आहे. तोपर्यंत या ग्रामस्थांना तातडीने सर्व सोयी सवलती त्वरित उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. याच बरोबर सायली येथे मायनिंग प्रकल्पाची दरड कोसळत आहे. त्या ठिकाणी सुध्दा लोकवस्ती गाडली जाण्याची भिती व्यक्त केली जात आहे. खोपोली येथे सुध्दा 300 कुटुंबावर मृत्यूची टांगती दरड आहे. ती दरड कधी कोसळेल हे सांगता येत नाही. खरे म्हणजे भूगर्भामध्ये हया ज्या घडामोडी होत आहेत, त्यामुळे नैसर्गिक आपत्तीच्या दुर्घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये अत्यंत भितीचे आणि चिंतेचे वातावरण आहे. तरी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी सरकारचे लक्ष वेधू इच्छिते की, ज्या ज्या ठिकाणी अशा नैसर्गिक आपत्ती निर्माण झालेल्या आहेत. ग्रामस्थ आणि नागरिक भयभीत झालेले आहेत. पावसाळा आणखी दोन महिने आहे. तेव्हा त्या ठिकाणी पुन्हा अशा घटना घडू शकतात. म्हणून भूगर्भ शास्त्रज्ञांकडून अशा परिसरांची पाहणी करुन लोकांना सूचित करावे. धन्यवाद.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कुपवाड (ता.मिरज,जि.सांगली येथील हजरत लाडलेशा पीर दर्ग्याच्या जमिनीवर महापालिकेने केलेले आरक्षण उठविणे.

**मु. शी.** : कुपवाड (ता.मिरज,जि.सांगली येथील हजरत लाडलेशा पीर दर्ग्याच्या जमिनीवर महापालिकेने केलेले आरक्षण उठविणे याबाबत प्रा. शरद पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी एज विशेष उल्लेजासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूचना मांडतो.

" कुपवाड ( ता. मिरज, जि. सांगली ) येथील हजरत लाडलेशा पीर दर्ग्याच्या सुमारे दीडशे एकर जमिनीवर सांगली, मिरज कुपवाड महापालिकेने आपल्या सुधारित विकास आराखडयात आरक्षण टाकलेले असून या दर्ग्याला अली आदिलशहा बादशहा विजापूर यांनी भेट देवून जवळपास 200 एकर जमीन इनाम म्हणून दिलेली आहे. देवस्थानची ही इनाम जमीन सध्या दर्ग्याच्या मुजावर लोकांच्या ताब्यात असून या जमिनीवरच त्यांची उपजीविका व दर्ग्याच्या देखभालीचा खर्च चालतो. दर्ग्याच्या 200 एकदर इनाम जमिनीपैकी 49 एकर जमीन यापूर्वीच भारत सूतगिरणी व औद्योगिक वसाहतीच्या रस्त्यासाठी घेण्यात आलेली आहे. उरलेल्या दीडशे एकर जमिनीवरही महापालिकेने आपल्या सुधारित विकास आराखडयात क्रीडा संकुल, बफरझोन, पब्लिक युटिलिटी, पिवळा पट्टा यासह अन्य कारणासाठी आरक्षण टाकलेले आहे. महापालिकेने हे आरक्षण उठवावे या मागणीसाठी दि. 12 जुलै, 2005 रोजी "हिंदी है हम, हिंदोस्ताँ हमारा" या परिषदेच्या वतीने डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली दर्ग्याचे ट्रस्टी, हिंदू मुस्लीम समाजातील सर्वपक्षीय नागरीक यांनी मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगलीवर काढलेला भव्य मोर्चा व त्यांनी दिलेले निवेदन, आरक्षण तात्काळ रद्द करुन दर्ग्याची जमीन परत देण्याविषयीची शासनाची भूमिका स्पष्ट व्हावी, ही विनंती. शासनाने यासंबंधी जिल्हीाधिकाऱ्यांना आणि महापालिकेला हे आरक्षण रद्द करावे अशी सूचना करावी अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करतो."

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

**पृ. शी.** : अधिग्रहित जागेतून निष्कासित झालेल्या कर्मचाऱ्यांना शासनाकडून देण्यात आलेल्या पर्यायी जागा त्यांना कायम स्वरुपी देण्याबाबतच्या आश्वासनाची पूर्तता न होणे.

**मु. शी.** : अधिग्रहित जागेतून निष्कासित झालेल्या कर्मचाऱ्यांना शासनाकडून देण्यात आलेल्या पर्यायी जागा त्यांना कायम स्वरुपी देण्याबाबतच्या आश्वासनाची पूर्तता न होणे याबाबत श्री. संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य श्री. संजय दत्त यां□ एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच□ मांडतो.

" शासनाने डिसेंबर, 1996 व मार्च 1998 मध्ये मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण जमीन अधिग्रहण आणि मुंबईचा सरकारी जागा (काढून टाकण्याबाबत) सुधारणा विधेयक दोन्ही सभागृहांमध्ये मंजूर करतेवेळी विधेयक मंजुरीपूर्वी अधिग्रहित जागेतून निष्कासित झालेल्या सुमारे 125 कर्मचाऱ्यांना शासनाकडून देण्यात आलेल्या पर्यायी जागा त्यांना कायमस्वरुपी देण्याकरिता मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणण्यात येईल व त्यांना संरक्षण देण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन दिले होते. परंतु त्यानंतर आजपर्यन्त पर्यायी जागेत राहणारे कर्मचारी वेळोवेळी शांततेच्या मार्गाने शासनाकडे विनंती अर्ज करीत आहेत. अनेकवेळा सभागृहामध्ये विविध माध्यमातून हा प्रश्न उपस्थित झालेला आहे. परंतु अद्यापही सभागृहात आश्वासन दिल्याप्रमाणे मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणला नसल्यामुळे निवृत्तिनंतर या कर्मचाऱ्यांना त्यांची घरे सोडावी लागत आहेत. त्यामुळे या पर्यायी जागेत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे, घबराटीचे व संतापाचे वातावरण पसरलेले आहे. तरी त्यांना न्याय मिळण्यासाठी सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शासनाने मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणून या विस्थापित कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाकडे विनंती करीत आहे."

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

**पृ. शी.** : मालवण येथील मागासवर्गीय वसतिगृहातील पाण्याच्या टाकीत तसेच अन्नधान्यामध्ये अळ्या सापडणे.

**मु. शी.** : मालवण येथील मागासवर्गीय वसतिगृहातील पाण्याच्या टाकीत तसेच अन्नधान्यामध्ये अळ्या सापडणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी एज विशेष उल्लेजासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूचना मांडते.

" मालवण, जि. सिधुदुर्ग येथील शासकीय वसतिगृहात पाण्याच्या टाकीत तसेच कडधान्यामध्ये अळ्या व जंतू असल्याचे दिसून आल्याचे वृत्त दि. 22.7.2005 रोजी दैनिक लोकमत मध्ये प्रसिध्द झाले आहे. जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती यांच्याकडे काही तक्रारी आल्याने त्यांनी अचानक भेट दिली असता असे निदर्शनास आले की, शौचालयाची दुरावस्था झाली आहे. घाणेरडया टोपलीत चपात्या ठेवण्यात आल्या होत्या. जेवणाची भांडी कित्येक दिवस घासलेली नव्हती. पाण्याची टाकी दोन वर्षे धुतलीच नव्हती. कडधान्य ठेवलेली जागा सुध्दा घाणेरडी होती. हळदीच्या पुडयात अळ्या सापडल्या. कर्मचारीवर्गाबाबत चौकशी केली असता वसतिगृहातील विद्यार्थी आजारी असल्याचे आढळले तर शिपाई दारुच्या नशेत होता. अधीक्षक वसतिगृहात राहात नव्हते. मुलांच्या अशा वसतिगृहासोबतच मुलींच्या वसतिगृहाबाबत मुलींना अर्धपोटी ठेवून परीक्षा द्यावी लागल्याचे मार्च, 2005 मध्ये उघडकीस आले होते. थोडक्यात मालवणच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहातील दुरावस्था व मुलींचे वसतिगृह याबाबत जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण सभापतींनी भेट देऊनही समाजकल्याणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट दिली नाही व दखल घेतली नाही. ही परिस्थिती होण्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी व मुलींचे वसतिगृहात सुधारणा व्हावी याकडे मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे."

-----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढवून देण्याबाबत माजी सैनिक कल्याण मंत्र्यांचा प्रस्ताव.

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

" माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसांपर्यन्त वाढविण्यात यावा."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वैद्यक व्यवसायी ( सुधारणा ) विधेयक

**मु.शी.**: **L.C.BILL NO.XVII OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MEDICAL PRACTITIONERS ACT,1961.)**

श्री.दिलीप वळसे-पाटील ( वैद्यकीय शिक्षण व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 17 महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1961 च्या कायद्याच्या अंतर्गत कलम 37 मध्ये तरतूद आहे त्या तरतुदीनुसार साधारणपणे ग्रामीण भागामध्ये जुन्या काळातील जे नोंदणीकृत व्यावसायिक असतील त्यांना व्यवसाय करता यावा यासाठी ही तरतूद मूळ कायद्यामध्ये करण्यात आलेली होती. 1961 मध्ये हा कायदा झाला त्यावेळी डॉक्टरांची नोंदणी करीत असताना ते त्या भागामध्ये जुन्या पध्दतीने ट्रीटमेंट करीत असतील त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून त्या काळामध्ये तरतूद केली होती. परंतु आज परिस्थिती बदलली आहे. बहुतेक ठिकाणी नोंदणीकृत डॉक्टर्स झालेले आहेत. असे असले तरी दुर्गम आणि अतिदुर्गम भागामध्ये काही असे लोक या कलमाचा आधार घेऊन वैद्यकीय प्रॅक्टीस करीत आहेत आणि ब-याच वेळा काही भागामध्ये बोगस डॉक्टर्स आहेत त्या डॉक्टरांविरुध्द मोहिम हाती घ्यावयाचे ठरविले जाते यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांची एक कमिटी करण्यात आलेली आहे. या कमिटीच्या माध्यमातून काही केसेस केल्या नाही तर संबंधित अनोंदणीकृत डॉक्टरांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची किंवा कारवाई करण्याचा प्रश्न येतो त्यावेळी या कायद्यातील कलम 37 चा आधार घेतला जातो आणि बचाव केला जातो, त्यामुळे संबंधिताविरुध्द कारवाई करण्याला विलंब होत असतो. म्हणून मूळ कायद्यातील कलम 37 ची तरतूद वगळण्याचा प्रस्ताव या बिलाच्या माध्यमातून आणलेला आहे तो कृपया मंजूर करावा अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

-----

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1961 यामध्ये सुधारणा करण्यासाठी आज हे विधेयक मांडण्यात आले आहे. सभापती महोदय कलम 37 मधील तरतूद मी पहिल्या प्रथम वाचून दाखवितो. यामध्ये असे म्हटले आहे की,"Not with standing anything contained in the Chapter a person may practice medicine in any rural areas:--

(i) if he has commenced practice in any village in the said area prior to a date on which a practitioner registered under the Bombay Medical Act,1912, or under the Bombay Medical Practitioners' Act,1938 ( or any law corresponding thereto) or under the Bombay Homeopathic Act, 1951 (or other law in relation to the qualifications and registration of Homoeopathic or Biochemic practitioners) for the time being in force, has commenced, and is in regular practice of medicine in that village and;

(ii) So long as he continues to practice in that village as his principal place of practice."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 18:35

(डॉ. दीपक सावंत...)

ग्रामीण भागामध्ये अशा डॉक्टरांनी प्रॅक्टीस करण्यासाठी हा कायदा होता. 1961सालामध्ये हा कायदा बनविण्यात आला. ग्रामीण भागामध्ये आरोग्य सेवा पोहोचावी एवढाच या कायद्याचा उद्देश होता. त्यावेळी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये आरोग्य व्यवस्था पोहोचली नव्हती. आजही महाराष्ट्रातील कित्येत खेडी उत्तम, क्वालिफाईड प्रॅक्टीशनर्स् पासून वंचित आहेत आणि ही गोष्ट मंत्री महोदय देखील मान्य करतील. मी याठिकाणी सिंधुदुर्ग जिल्हयातील उदाहरण देतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 379 खाजगी डॉक्टर्स् आहेत. त्यापैकी 22 डॉक्टर्स् बोगस असल्याचा संशय व्यक्त करण्यात आलेला आहे. या 379 डॉक्टरांची आपण वर्गवारी पाहिली तर त्यामध्ये 51 ॲलोपॅथीचे, 124 होमिओपॅथीचे आणि 203 आयुर्वेदिक डॉक्टर्स आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 51 ॲलोपॅथीचे डॉक्टर्स् कोणकोणेत्या ठिकाणी जातील ? जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषाप्रमाणे एक हजार वस्तीमागे एक डॉक्टर असावयास पाहिजे. आपल्या राज्यामध्ये हा नियम फुलफिल होत नाही. या सरकारने या डॉक्टरांच्या उपजिविकेचा प्रश्न होता म्हणून त्यांना प्रॅक्टीस करण्यास परवानगी दिली असे मा.मंत्री महोदयांनी विधान केले. परंतु वस्तुस्थिती अशी नाही. हे डॉक्टर्स् पारंपरिक पध्दतीने व्यवसाय करतात आणि ग्रामीण भागातील लोकांना झाडपाला, जडीबुटीची औषधे देतात. त्यांना आपण वैदू म्हणा किंवा अन्य कोणतेही नाव त्यांना द्या. ते ग्रामीण भागातील लोकांची वैद्यकीय गरज भागवतात. दुसरा मुद्दा हा बोगस डॉक्टरांचा आहे. वास्तविकपणे बोगस डॉक्टर्स् हे महाराष्ट्रातील नाहीतच. हे बोगस डॉक्टर बिहार, उत्तरप्रदेश अशा परप्रांतातील आहेत. हे सरकार परप्रांतील डॉक्टरांवर बंदी घालणार आहे काय ? मग हा बायपास का काढला ? ग्रामीण भागामध्ये एखादा सुतार, एखादा न्हावी कावीळ सारख्या रोगांवर औषध देतो. गावात अर्थोपेडिक डॉक्टर नसतात त्यामुळे एखादा माणूस हाडांवर देखील उपचार करतो. मी या गोष्टीचा पुरस्कार करीत नाही. परंतु अन्य सिस्टीम राज्यामध्ये नाही. आज ग्रामीण भागामध्ये वैद्यकीय व्यवसायाचे उत्तर ज्ञान असणारे डॉक्टर्स् उपलब्ध नाहीत. असे असताना कलम 37 रद्द करण्याचा अट्टाहास हे शासन का करीत आहे ? तत्कालीन सार्वजनिक आरोग्य मंत्री श्रीमती प्रमिलाताई टोपले यांच्या काळामध्ये "बेअर फूटेड डॉक्टर्स्" ही कन्सेप्ट आणली गेली. त्यांना डीएमएस, डिप्लोमा इन मेडिसिन ॲण्ड सर्जरी, अशी डिग्री देण्यात आली. त्यानंतर त्यांना रेग्युलराईज करु घेऊ असे शासनाने सांगितले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत....)

आता वृतपत्रातून अशा जाहिराती येत आहेत की, हे डॉक्टर्स् एम.बी.बी.एस. करु शकतात. ग्रामीण भागातील वैद्यकीय उपचाराची गरज भागविण्यासाठी शासनाने या लोकांचा उपयोग केला. मात्र त्यांना ॲलोपॅथीचे, फॉर्मसीचे ज्ञान दिले नाही. आज त्यांना एम.बी.बी.एस. करण्याची परवानगी दिली जात आहे. ॲलोपॅथी, होमिओपॅथी,युनानी अशा पॅथीमध्ये बेसिक पॅथी ही ॲलोपॅथीची ठेवली गेली पाहिजे. शासनाला होमिओपॅथीचा, आयुर्वेदाचा किंवा युनानीचा पुरस्कार करावयाचा असेल तर तो जरुर करावा. परंतु पुन्हा क्रॉस प्रॅक्टीसवर बंदी आहे. पुनम वर्मा केसमध्ये कोर्टाने असा निर्णय दिलेला आहे की, ॲलोपॅथीचा डॉक्टर होमिओपॅथीची प्रॅक्टीस करु शकत नाही. होमिओपॅथीचा डॉक्टर ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करु शकत नाही. शासनाने महाराष्ट्राच्या बाबतीत एक बेसिक कन्सेप्ट करावयास पाहिजे. आज महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये डॉक्टरांची संख्या कमी आहे. शहरी भागामध्ये खूप डॉक्टर्स् आहेत. शहरातील एकेका गल्लीमध्ये डॉक्टरांच्या अनेक पाट्या आपणाला दिसतात.

...नंतर श्री. गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 18:40

डॉ.दीपक सावंत..

पण ग्रामीण भागामध्ये ताबडतोब ट्रीटमेंट करणारे काही लोक आज उपलब्ध आहेत. तुम्ही या माध्यमातून त्यांचे काम करणे बंद करीत आहात. ग्रामीण भागात ताबडतोब ट्रीटमेंट करण्यासाठी पर्यायी काय व्यवस्था केलेली आहे, याचा खुलासा झाला पाहिजे. तुम्ही बाकीच्या पॅथीच्या डॉक्टरांना स्पेशल कोर्स देणार आहात काय ? त्यांना तुम्ही ॲलोपॅथीचे ज्ञान देणार आहात काय ? त्यांना ज्ञान देऊन ,या मुख्य प्रवाहामध्ये आणणार आहात काय ? सभापती महोदय, मागच्या काळात श्री.दिग्विजय खानविलकर हे आरोग्य मंत्री होते. त्यांनी दीड हजारात डॉक्टर व्हा, अशी एक टूम काढली होती. अमूक व्यक्ती डॉक्टर आहे असे सिव्हील सर्जन सर्टिफिकेट देणार अशी योजना आणली होती. सभापती महोदय, याची आपल्याला माहिती आहे की नाही याची मला कल्पना नाही. ही स्कीम कोल्हापूर विभागात सुरु करण्यात आली होती. त्या योजनेला मी या सभागृहात विरोध केला होता. दीड हजार रुपये भरावयाचे. काही दिवसाचे ज्ञान घ्यावयाचे. एक जुजबी परीक्षा द्यावयाची. त्याला सिव्हील सर्जन सर्टिफिकेट देत होते. ती व्यक्ती डॉक्टर म्हणून वावरत होती. अशा योजना सुरु करण्याची या शासनाला गरज का भासते ? कारण तुमच्या सिस्टीममध्ये मोठ मोठे लुप होल्स आहेत. ते तुम्ही दूर करु शकत नाही. आपण पुनम वर्मा यांचे जज्जेमेंट जर वाचले तर आज तुमचे बी.ए.एम.एस. डॉक्टर देखील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रॅक्टीस करु शकत नाही. त्यांनी प्रॅक्टीस बंद केली तर तुमची प्राथमिक आरोग्य केंद्रे बंद होतील. कारण पुनम वर्माच्या जज्जमेंट प्रमाणे A person who is qualified in his pathy, he should practice that pathy only. असे क्लिअर कट म्हटले आहे. Integrated qualification is closed long back. पूर्वी जपान वगैरे मध्ये असे केले जात होते. ते आता बंद झाले. त्यानंतर सगळे कोर्सेस बंद झाले. माझी या विधेयकाच्या माध्यमातून माननीय मंत्र्यांना विनंती आहे की, तुम्ही अन-क्वॉलिफाईड, अन-रजिस्टर्ड डॉक्टरांना प्रतिबंध करा त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. पण ग्रामीण भागासाठी पर्यायी आरोग्य व्यवस्था राखण्यासाठी डॉक्टरांची टीम तयार करा. ती टीम कशी करावयाची, त्यासाठी काय करावयाचे यावर तुम्ही चांगले विचारमंथन करा. अशा प्रकारचे जे क्वॉलिफाय आहेत त्यांना परंतु त्यांच्या पॅथी भिन्न आहेत अशा लोकांना तुम्ही ॲलोपॅथीचे ज्ञान द्या. त्यांना 12 महिन्यांचा कोर्स द्या. त्यांची परीक्षा घ्या. कारण मेडीकल फिल्डमध्ये कंटीन्यू मेडीकल एज्युकेशन ही सिस्टीम आहे. कारण कालचे औषध हे आज

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत

चालत नाही. आजचे औषध उद्या चालणार नाही. त्यामुळे सी.एम.ई. इज ऑलवेज हेल्थफूल इन मेडीकल प्रॅक्टीस अशा प्रकारचा उपाय काढा. कलम 37 बंद करण्यास माझा विरोध नाही. परंतु आपण काही तरी पर्यायी व्यवस्था करुन ठेवा एवढे बोलून मी माझे बोलणे संपवितो.

--------

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, विधेयक क्रमांक 17 वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. महाराष्ट्र वैद्यक व्यवसायामध्ये कलम क्र.37 गाळून बोगस डॉक्टरांना ग्रामीण भागामध्ये प्रॅक्टीस करण्यास बंदी घालत आहे ही एक चांगली गोष्ट शासन करीत आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी काही गोष्टी सांगितल्या त्यात काही गोष्टी ख-या आहेत. परप्रांतातून या ठिकाणी येऊन प्रॅक्टीस करतात ही गोष्ट खरी आहे. आपल्याकडे चांगल्या डॉक्टरांकडे काम करणारे कंपाऊंडर हे काही दिवसानंतर ग्रामीण भागात जाऊन खेडयांमध्ये जाऊन स्वत: प्रॅक्टीस चालू करतो. तो गोळया आणि इंजेक्शन देण्यास सुरुवात करतो. मी ग्रामीण भागातील उदाहरण देऊ शकतो. मुंबईत देखील अशा प्रकारच्या व्यक्ती प्रॅक्टीस करीत आहेत. एक गंभीर बाब आपल्या लक्षात आणून द्यावयाची आहे. आपले जवेढे मेडीकल कॉलेज आहेत. त्यातील जे प्रोफेसर आहेत, त्यातील जे सर्जन आहेत ते देखील स्वत:ची प्रॅक्टीस करतात. अंबेजोगाईचे उदाहरण मी या ठिकाणी नाव घेऊन सांगू शकतो. वास्तविक महाविद्यालयातील प्रोफेसर यांना खाजगी प्रॅक्टीस करण्याची परवानगी नसताना ते प्रॅक्टीस करतात, एवढेच नव्हे तर ते आपल्या रुग्णालयात रुग्णांचे ऑपरेशन्स सुध्दा करतात. अशा प्रकारे प्रोफेसर खाजगी प्रॅक्टीस करीत असतील तर त्यांना देखील बोगस डॉक्टर म्हणून जाहीर केले पाहिजे. त्यांचे विरुध्द शासनाने कडक ॲक्शन घेतली पाहिजे. ज्या ठिकाणी हे प्रोफेसर कार्यरत आहेत तेथे पुरेशी सेवा न देता गुपचुपपणे जास्तीत जास्त पैसे गोळा करण्यासाठी खाजगी प्रॅक्टीस करतात. या गोष्टीस प्रतिबंध केला गेला पाहिजे. परंतु दुर्देव असे की, डॉ.सुधीर देशमुख यांच्या दवाखान्याचे उदघाटन करण्यासाठी या राज्याचे आरोग्य मंत्री डॉ.विमल मुंदडा या स्वत: हजर होत्या. डॉ. देशमुख हे अंबेजोगाई येथील हेड ऑफ दि डिपार्टमेंट आहे. ते डॉक्टर काही ठिकाणी अनेस्थेशियासाठी जातात. आपल्या डिपार्टमेंटची मोठ मोठे डॉक्टर खाजगी प्रॅक्टीस करीत असतील ते बरोबर नाही. वास्तविक त्यांनी लिहून दिलेले असते की, आम्ही फक्त मोठ मोठी हॉस्पीटल सांभाळतो. अशा मोठया हॉस्पीटलमध्ये काम करणा-या डॉक्टरांना प्रायव्हेट प्रॅक्टीसचा मोह पडत असेल तर सर्व सामान्य डॉक्टरांनी खाजगी प्रॅक्टीस केली तर काय हरकत आहे...

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 18:45

श्री. श्रीकांत जोशी....

सगळयात महत्वाचा विचार जो डॉ. दीपक सावंत यांनी सांगितला त्याच्यावर मला बोलावयाचे आहे. ॲलोपॅथी,होमियोपॅथी आणि आयुर्वेद या तिन्हीच्या बेसिक कन्सेप्टच वेगळया आहेत. ॲलोपॅथी डायरेक्टली डिसीजवर ट्रीटमेंट करतात. आयुर्वेदीक ही आपली हजारो वर्षांची परंपरा आहे जी तुमच्या शरीरामध्ये प्रतिकारशक्ती वाढवते आणि तुमची बॉडी सक्षम करुन ती रोगाचा प्रतिकार करु शकते. होमियोपॅथी ॲन्टीबॉडीज तयार करण्याचे प्रिन्सीपल वापरले आहे. असे मला तीनही क्षेत्रात तज्ञ असलेल्या लोकांनी सांगितले आहे. होमियोपॅथी बाहेरच्या देशातून आलेली पध्दत आहे. परंतु आयुर्वेद आपल्याच देशातील पध्दत आहे याचे सगळे सायन्स आपल्याकडे आहे म्हणून याचा ग्रामीण भागामध्ये विस्तार करुन त्याचे चांगले नेटवर्कींग करण्याची राजकीय इच्छाशक्ती का नाही. नेहमी कायदे करुन,बडगा दाखवून पोलीस केस करुन समाजाचे प्रश्न सुटत नसतात. राज्यकर्त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे आणि प्रश्न सोडविण्यासाठीची राजकीय इच्छाशक्त्‌ी बाळगली पाहिजे. आयुर्वेदाचा इतिहास काय आहे ते मी सांगतो. परवा मी इंटरनॅशनल ड्रग आणि फार्माविषयीचा एक लेख वाचला. दोन वर्षापूर्वी मी दिल्लीला गेलो होतो. शरद पवार साहेबांचे जे पीएस आहेत अरविंदसिंग ते त्यावेळी ड्रग आणि फार्मास्युटिकलचे सेक्रेटरी होते. त्यांनी मला जी आकडेवारी दिली ती त्यानुसार 60 हजार कोटीचा इंडियाचा ड्रगचा टर्नओव्हर होता. 60 हजार कोटीपैकी 8 हजार कोटी रुपयांची बोगस औषधे होती. त्यातील साडेचार ते पाचहजार कोटींची आयुर्वेदाची औषधे होती. ग्लोबलायझेशनमुळे फार्माचा सेल 1 लाख कोटी रुपयांपर्यंत गेला असेल. पुढील काळामध्ये आयुर्वेदीक फार्माचे भारतातील पोटेंशीअल 12-15 हजार कोटी रुपयांचे होणार आहे. एक्सपोर्ट करु शकलो तर हे पोटेंशीअल 20-25 हजार कोटी रुपयापर्यंत जाणार आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्रातील आयुर्वेद हे अग्रक्रम होण्याची शक्यता होती. परंतु दुर्देवाने कित्येक वर्षात या क्षेत्रात आपण काही केले नाही. आजच सकाळी एक विषय निघाला होता. नाशिकचे विद्यापीठ शासनाचे आदेश पाळत नाही. ॲलोपॅथी शिकलेल्या डॉक्टरांनी आयुर्वेदमधील रिसर्च करुन त्या डॉक्टर्सच्या आयुर्वेदीक कॉलेजला मान्यता देणे ही क्रूर चेष्टा आहे. मराठवाडयामध्ये फक्त दीड हजार आयुर्वेदीक डॉक्टर म्हणजे बीएएमएस असे आहेत की जे बेकार आहेत. त्या सगळयांचा मी मेळावा घेतला त्यांना विचारले बेकार का तर त्यांनी जी आकडेवारी दिली ती धक्कादायक आहे. जिंतूर या गावी 4 बोगस डॉक्टर आहेत. त्यांनी चार वेळेला परभणीला तक्रार

....2

श्री. श्रीकांत जोशी...

केली. परभणीच्या कलेक्टरने एसपीला सांगितले. एसपीने डीएचओला सांगितले. ते जिंतूरला गेले. त्यांनी सांगितले की तेथे तो प्रॅक्टीस करीत नव्हता. बोर्ड वेगळा होता आणि माणूस वेगळा होता. ज्या गावात जाऊन प्रॅक्टीस करावयाची आहे तेथपर्यंत डीएचओला आणि एसपीला घेऊन पळत जायचे त्यांना दाखवायचे की पेशंटला बघत आहे. अशा पध्दतीने क्रूर चेष्टा बीएएमएस आणि एमबीबीएस डॉक्टरची करु नका. ते अशा पध्ध्दतीने बोगस डॉक्टर पकडून आणतील अशी सुतराम शक्यता पुढील 10 वर्षात तरी नाही. अशा बोगस डॉक्टरांची आमच्याकडे यादी द्या. मी मंत्रीमहोदयांना सांगेन,मी एसपी यांना सांगेन. कलेक्टर यांची किती कामे वाढविणार आहात. एकटया परभणी जिल्हयात 150 बोगस डॉक्टर आहेत. हप्ता मात्र व्यवस्थित चालू आहे. शेजारच्या पीआय ला ही गोष्ट माहिती आहे. तक्रार केलेली आहे पण अजून ॲक्शन झालेली नाही. त्यामुळे परिणाम असा झाला आहे की, याप्रश्नाकडे पॉझीटीव्ह दृष्टिकोनातून शासन पाहणार आहे किंवा नाही ? 150 डॉक्टरांबरोबर ॲलोपॅथीचे आणि काही तज्ञ डॉक्टरांना घेऊन चर्चा केली त्यावेळी 4-5 सूचना केलेल्या आहेत त्या मला सांगावयाच्या आहेत. पहिली सूचना अशी आहे की, ॲलोपॅथीमध्ये पायाभूत सुविधा उभ्या करण्यासाठी खर्च खूप येतो. त्यादृष्टिकोनातून ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्राचा विस्तार कसा करावयाचा याची योजना आपल्याकडे तयार आहे. जास्तीत अंमलबजावणी करा. परंतु जिल्हा परिषद सर्कल,पंचायत समिती सर्कल आणि जेथे बाजार असतात तेथे सर्वात मोठे ग्रामीण रुग्णांचे पोटेंशीअल असते. मी याबाबतीत मराठवाडयाचा अभ्यास केलेला आहे. एक हजार गावे अशी आहेत की, आठवडयाला एक बाजार असे धरले तर सगळयात मोठा आरोग्य खात्याचा टर्नओव्हर होतो या 1 हजार गावाच्या बाजारगावी होत असतो. 200 मोठी बाजारगावे आहेत आणि बाकीची छोटी छोटी बाजारगावे आहेत. याठिकाणी जर आपण एक आयुर्वेदिक डिस्पेंसरी जरी काढली आणि त्याला बेसिक 3000 रुपयाप्रमाणे त्याला पगार दिला तरी ते अत्यंत चांगल्या पध्दतीने सेवा देऊ शकतात. परंतु हे करण्यासाठी किमान 20 खाटांचे रुग्णालय तालुका स्तरावर पाहिजे आणि किमान 50 खाटांचे आयर्वेदाचे हॉस्पीटल जिल्हा पातळीवर पाहिजे आणि रिजनल प्लेसला आयुर्वेदीक फार्मसीची लॅबोरेटरी पाहिजे. जडीबुटी वेगवेगळी तयार केली जाते. पेशंटना दिली जाते. काही पेशंटना ट्रीटमेंट मिळते काही पेशंटना काहीच होत नाही.परंतु हे तपासणीची सोय महाराष्ट्र सरकार एवढे मोठे आहे पण कुठेही नाही.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीकांत जोशी ..

म्हणून मी या निमित्ताने मागणी करीत आहे की, एक वेगळे आयुर्वेदिक विद्यापीठ काढणे ही काळाची गरज आहे.जर काळावर तुम्हाला स्वार व्हावयाचे असेल तर हे विद्यापीठ काढणे गरजेचे आहे. जर तुम्हाला वेळेवर स्वार व्हावयाचे असेल तर ही वेळ अगदी योग्य आहे असे मला सांगावयाचे आहे .तेव्हा हे विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यात यावा तसेच .डिव्हीजनल व डिस्ट्रीक्ट कॉनसीस करण्यात यावे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्या प्रमाणे याची ट्रिटमेन्ट जरी वेगळी असली तरी कोठे ना कोठे को-ऑर्डिनेशन करुन ॲलोपॅथीने बरे न झालेले पेशंटस, आयुर्वेदाने बरे न झालेले पेशंटस तसेच आयुर्वेदाने ब-यापैकी फरक पडलेले पेशंटस परंतु फायनली ॲलोपेथीकडे जाणारे पेशंटस याचा समन्वय कोठे ना कोठे तरी घडवून आणला पाहिजे. डॉ.मुरली मनोहर जोशी यांनी याबाबतीत खूप चांगले विवेचन केले होते त्यांनी असे सांगितले होते की आयुर्वेदाचे हे शास्त्र पाच हजार वर्षापासून जीवंत आहे आणि जगात त्याला मान्यता मिळालेली आहे. तेव्हा या शास्त्राला नाकरावयाचे किंवा त्याला टाकून देण्याचा कोणालाही अधिकार नाही. परंतु आयुर्वेदाचे शास्त्र आणि ॲलोपेथीचे शास्त्र यामधील कॉमन मुद्दे काढून एक नवीन मेडिकल सायन्सचा आविष्कार करण्याची इच्छा शक्ती आज खरोखर महाराष्ट्रात आहे काय ? आणि तसे करण्याची ताकद आपल्याकडे आहे काय ?माननीय मंत्री श्री दिलीप वळसे पाटील यांच्या सारखे मंत्री याप्रमाणे निश्चित करु शकतील परंतु बाकीच्या मंत्र्यांनीसुध्दा त्यांना साथ दिली पाहिजे असे मला वाटते.त्यांनी जर याप्रमाणे करावयाचे ठरविले तर अधिक बरेक होईल. या विधेयकाव्दारे 37 वे कलम आपण काढून टाकत आहोत परतु त्याचबरोबर आपला पुढचा ॲक्शन प्लॅनसुध्दा तयार असला पाहिजे.बोगस डॉक्टरांवर प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने जबरदस्त कारवाई चालू केली पाहिजे तरच पुढच्या काळात त्याचा फायदा होईल .मेडिकल मधील नॉलेज बॅन्क आणि मेडिकलमधील सायन्स हे पेशंटसशी रिलेटेड असते ,ते सायन्स हे लाईव्ह गोष्टीशी रिलेटेड असते. त्यामुळे त्यातील नॉलेज हे रोजच्या रोज अपडेट करावे लागते व त्याचे मॉनेटरीग व्यवस्थित करावे लागते. या गोष्टी केवळ कागदपत्रावर आणून चालत नाही तर त्यासाठी राजकीय इच्छा शक्ती आणि समाजाची साथ असणे आवश्यक आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी काही चार चांगल्या गोष्टी कराव्यात अशी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

समाज आपल्याकडून अपेक्षा ठेवत असतो. केवळ कायदे करुन आणि कलमे टाकून काहीही फायदा होणार नाही. या कायद्यातील कलम 37 हे रद्द करण्यात आल्याबद्दल मी मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो परंतु त्याची अंमलबजावणी करीत असतांना सर्व समूहाला बरोबर घेऊन जाण्याचे ठरविले तर अधिक बरे होईल.मध्यंतरी गायनाकॉलाजीच्या परिषदेला माननीय मंत्रीमहोदय उपस्थित राहिले होते त्यावेळी झालेल्या चर्चेतून त्यांच्या असे लक्षात आले असेल की, सर्व डॉक्टर्स शासना बरोबर काम करण्यास तयार आहेत.तेव्हा ॲलोपॅथी आणि आयुर्वेदीकचे सर्व डॉक्टर्स आपल्याबरोबर काम करु शकतील. तेव्हा जनरल ट्रिटमेन्ट ती एका बाजूला ठेवावी आणि ऑपरेटिव्ह ट्रिटमेन्ट तसेच जी खर्चिक लॉग टर्म ट्रिटमेन्ट आहे ती ॲलोपॅथीकडे शिफट होतील परंतु ज्या बेसिक गोष्टी आहेत त्यातील साधर्म्याचा विचार करुन पुढच्या काळात प्लॅन तयार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ( विधान सभेने निवडलेल्या ) सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी जे विधेयक मांडलेले आहे त्यावर विचार व्यक्त करण्यासाठी मी येथे उभी आहे. सभापती महोदय, समाजातील विविध व्यावसायिक बुध्दिमान असतात असे आपण मानतो परंतु डॉक्टर्स आणि वकील यांना रेग्युलेट करणे ही सर्वात अवघड अशी गोष्ट आहे.असे आपल्याला सातत्याने दिसून येत असते. याचे कारण असे की, प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत प्रत्येकाचे त्या विषयाच्या बाबतीत काही ना काही वेगळे मत असते आणि त्यांना त्यासबंधीचा वेगळा अनुभव आलेला असतो. कोणत्या तरी नियमामध्ये एखादे तंत्र बसविणे ही गोष्ट डॉक्टरी व्यवसायातील लोकांच्या दृष्टीने अतिशय आव्हानात्मक आहे आणि गर्भलिंग निदानाच्या चिकित्सेच्या बाबतीत निर्बंध घातले होते त्यावेळी आपल्याला त्यासंबंधीचा अनुभव आलेला आहे.या संदर्भात कायदा करुन वीस वर्षे होऊन गेलेली आहे तरी सुध्दा अजूनही त्या कायद्याची अंमलबजावणी कशी करावयाची आणि ती अंमलबजावणी कोण करणार याबाबतीत अचूक अशी कार्यपध्दती आपल्याला सापडलेली नाही त्यामुळे त्या संबंधी कोठे तरी नोंदणी करुन घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे अशा प्रकारची नोंदणी केल्या नंतरसुध्दा पुन्हा आपण पुढील कारवाई करण्यासाठी पोलिसांकडे वळतो.आज पोलीस विभागावर कामाचा लोड मोठया प्रमाणावर आहे.पोलीस सातत्याने असे सांगत आहेत की आमचे हे काम नाही. अशा परिस्थितीमध्ये या सारख्या कलमांची आवश्यकता आहे हे जरी खरे असले तरी त्याच्या अंमलबजावणीमध्ये अनेक अडचणी आहेत. आज समाजामध्ये अनेक गोष्टींचा गैर फायदा कशा प्रकारे घेतला जातो हे आपल्या निदर्शनास आलेले आहे अर्थात त्याची काही वेगळी कारणे असतात. मी मराठवाडयातील उद्‌गीर सारख्या भागात वैद्यकीय व्यवसाय सात वर्षे केला होता. मराठवाडयातील अनेक लोक डॉक्टरांकडे जातात त्याचे मी निरीक्षण केले होते त्यावेळी मला दोन तीन गोष्टी दिसून आल्या होत्या.बुरखा घालून जर महिला पेशंट त्या डॉक्टरकडे आली तर ती पडद्याच्या पलीकडे बसलेली असते आणि ती फक्त डॉक्टरांकडे हात देते आणि नाडी तपासून तो डॉक्टर त्या महिलेला औषध देत असतो.अशा प्रकारे पडद्याच्या पलीकडे बसलेल्या महिला पेशंटसना तपासून औषध देणारे डॉक्टर्स मोठया प्रमाणावर आहेत.महिलांना हे डॉक्टर्स तपासत नाहीत.त्यामुळे लेडी डॉक्टर्सकडे या महिला पेशंटस न जाता या डॉक्टरांकडे त्या जातात असे मला दिसून आले आहे.या सबंधीचे सर्व वर्णन मी या ठिकाणी करणार नाही परंतु "डॉक्टर तुम्ही सुध्दा ?"असा प्रश्न विचारावा अशा पध्दतीने गैरप्रकार होत असल्याचे आपल्याला सातत्याने दिसून येत असते.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/SBT/MAP/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 18:55

डॉ. गोऱ्हे ....

म्हणून मला या निमित्ताने एका मुद्याकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे. ज्या पॅथीचा अभ्यास केलेला आहे आणि ज्याने त्याची नोंदणी ज्या प्रकारे केली आहे त्या खेरीज त्यांना दुसरा व्यवसाय करता येणार नाही असे आपण म्हटले तर त्याच बरोबर आयुर्वेदाचा देखील गैरवापर प्रचंड मोठ्या प्रमाणात लोक आज करीत आहेत किवा ते एक फॅडच बोकाळलेले आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. एका अर्थाने ग्लोबलायझेशन ऑफ योगा, ग्लोबलायझेशन ऑफ आयुर्वेद असे झालेले दिसते आहे. त्याचा परिणाम असा झालेला दिसतो आहे की, जो येईल तो माणूस, मग त्याच्याकडे आयुर्वेदाची डिग्री असो वा नसो, तो आयुर्वेदिक तज्ज्ञ आहे म्हणून अनेक प्रकारची औषधे तो बाजारामध्ये आणतो, मग त्याद्वारे केले जाणारे उपचार आणि त्यातून होणारे अनेक परिणाम आपल्याला दिसताहेत. म्हणूनच एका अर्थाने आपण या नियमाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करीत असताना मला असे वाटते की, या संबंधात एखादी आचार संहिता आपण कशी विकसित करणार आहोत हा एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. दुसरे म्हणजे तुम्ही हैद्राबादची एक मोठी कॉंट्रव्हर्सी वाचली असेल की, दरवेळेस पावसाळ्याच्या सुरूवातीस घशामध्ये ठराविक पद्धतीचे माशाचे औषध टाकले की दमा दूर होतो अशी जाहिरात येत असते. अशी जाहिरात वाचून लक्षावधी लोक आपला दम्याचा आजार दूर करण्यासाठी तेथे गर्दी करतात आणि मग त्यावर सरकारने काही निर्बंध आणले असता लोकांनी तेथे दगडफेक करून एक उद्रेकाची परिस्थिती निर्माण केली जाते आणि त्याद्वारे सांगितले जाते की, आम्हाला हेच औषध घ्यायचे आहे. तेव्हा स्वस्त पण ज्याचे साईड इफेक्टस् नाहीत, ज्या औषधाची लोकांना भीती वाटत नाही अशीच औषधे घेण्याकडे लोकांचा कल असतो. म्हणूनच आयुर्वेदिक औषधे फार मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होत आहेत. ज्यांच्याकडे कोठलीही डिग्री नाही असेही लोक या गोष्टीचा गैरफायदा घेत असताना कोठे ना कोठे त्यांनी लोकांमध्ये आपल्याबद्दलचा विश्वास निर्माण केला आहे. त्याचप्रमाणे आम्हाला डोळ्यावरचा चष्मा काढून बघावे, या पध्दतीचा विचार केला तर जी फी दाखविली जाते आणि कारण नसताना वेगवेगळ्या तपासण्या केल्या जातात त्यामुळे यामध्ये जो माणूस उपलब्ध आहे.. मी तर असे म्हणेन की, या डॉक्टरांच्याच बरोबर 80 टक्के केमिस्ट लोकच डॉक्टर बनून औषधे लोकांना देत असतात, सुचवित असतात. लिंबोणीच्या गोळ्या कोठून मिळाल्या तर केमिस्टकडे गेलो होतो, त्याने सांगितले की, डोळ्यांची साथ आली आहे, तू दे. ताप आला आहे तर मग अमुक अमुक गोळ्या घे. अमुक गोष्ट झाली तर

...... 4एल 2 ...

अमुक मलम लावा. अशा प्रकारे सुचविण्यामध्ये केमिस्ट अग्रभागी असतात आणि अशा प्रकारे डॉक्टरांऐवजी केमिस्टच डॉक्टरचा रोल करीत असतो. आणि लोक देखील डॉक्टरांकडे जाण्या ऐवजी केमिस्ट सांगतो तीच औषधे घेत असतात, त्याच्यावर भरोसा टाकत असतात. म्हणून आपण हे जे विधेयक आणले आहे ते आणण्यामागील आपला हेतू स्तुत्य असाच आहे. स्वत: माननीय मंत्री महोदय हे नेहमी शॉर्ट टर्म आणि लॉंग टर्म या दोन्ही गोष्टींबद्दल विचार करीत असतात असा मला एक त्यांच्याबद्दल विश्वास आहे. म्हणूनच हे विधेयक आपण एक अपरिहार्यता म्हणून पास करीत असलो तरी देखील अनेक मुद्यांवर आपल्याला पुढील काळामध्ये केवळ आपल्याच नाही तर राष्ट्रीय स्तरावर देखील लक्ष घालावे लागणार आहे. कारण काही आयुर्वेदिक पेशंटस्‌ना देखील विशेषत: लीवर डॅमेज होणे, लीवर फेल्युअर होणे आणि त्यातून त्याची लिटीगेशन देखील वाढल्याची उदाहरणे झालेली आहे. म्हणून या पार्श्वभूमीवर आपण हे सारे रेग्युलरायझेशन कसे करणार आहोत आणि त्याच बरोबर आपलच घेतलेलं औषधाचे पेटंट शेवटी आपल्याला परदेशातून विकत घ्यावे लागेल किंवा काय, आणि यामधून आपल्याला संरक्षण पाहिजे असेल तर आपल्याला फार मोठ्या प्रमाणात संशोधनाची जोड या सगळ्या कामाला द्यावी लागणार आहे. त्याचबरोबर आज आयुर्वेद किंवा होमिओपॅथी यांना तशी राजमान्यता नाही. राज्यमान्यतेचा आपण विचार करू लागलो तर तर या दोन्ही पॅथीच्या लोकांची अनेक दिवसांपासूनची मागणी आहे की, त्यांचे जे जे प्रलंबित प्रश्न आहेत त्याबद्दल आरोग्य विभाग आणि मंत्री महोदय आपण स्वत: बैठका घेतल्या असतील तर ते चांगलेच आहे. पण त्यावर अद्याप तोडगा निघालेला नाही तो निघणे आवश्यक आहे. मी स्वत: पोद्दार मेडिकल कॉलेजमध्ये शिकण्यासाठी होते तेव्हा सगळ्या असोसिएशनची महाराष्ट्राची अध्यक्ष होते. त्यावेळेपासून आतापर्यंत त्याच त्या मागण्या हे लोक अनेकदा शासनाकडे करीत आहेत पण त्यातून मार्ग निघत नाही. म्हणून जे तीन-चार प्रकारचे आयुर्वेदिक पदवीधर आहेत म्हणजे ज्यांनी शुद्ध आयुर्वेदिक अभ्यास क्रम घेतला आहे ते, मिक्स इंटिग्रेटी स्वरूपाचा अभ्यासक्रम केलेले, काही शॉर्ट टर्म कोर्स केलेले आणि ज्यांनी पूर्ण पदवी घेतली आहे ते, अशा सर्व प्रकारच्या आयुर्वेदिक पदवीधर, होमिओपथिक पदवीधर यांचे जे वेगवेगळे कोर्सेस आहेत त्यांचे वेगवेगळे कोडीफिकेशनस् आहे त्यामध्ये आणि पूर्वी ज्यांनी रजिस्ट्रेशन केलेले आहे त्या सगळ्यांच्या प्रश्नांवर, त्यांची असोसिएशन अस्तित्वात आहे. परंतु त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन मग आपण यातील रेग्युलेशन्स ठरविली तर बरेचसे काम सोपे होऊ शकेल असे मला वाटते. (यानंतर श्री.जागडे ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, व्यवसायाने डॉक्टर असलेल्या दोन सदस्यांनी या विधेयकावर आता विचार मांडले आहेत. मी व्यवसायाने डॉक्टर नाही. परंतु माझ्या जीवनात जो काही अनुभव आला आहे, त्या बाबत मी माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश आणि कारणे यामध्ये असे म्हटले आहे की, "हल्लीच राज्य शासनाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, काही अनर्ह व्यक्ती व वैदू उक्त कलम 37 च्या तरतुदींचा गैरफायदा घेत आहेत व त्याचा गैरवापर करीत आहेत." आता हल्ली म्हणजे केव्हा ? मी जेव्हापासून या विधानमंडळात आलो, तेव्हापासून मी हा विषय मांडीत आहे. साथीच्या रोगाचा जसा फैलाव होतो, तसाच फैलाव बोगस डॉक्टरांचा या मुंबई शहरात झ ााला आहे. मुंबई, पुणे, नाशिक सारख्या मोठमोठ्या शहरात हे बोगस डॉक्टर आपले पोट भरत आहेत. त्यामुळे याचा सर्वसामान्य जनतेला मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. याकडे कोणीही आतापर्यन्त गांभीर्याने घेतलेले नाही. आता हल्लीच ही बाब आपल्या अधिका-याच्या लक्षात आली आहे. तेव्हा याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी वेळीच काळजी घ्यावी, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, कलम 37 रद्द करण्याविषयी आपण या ठिकाणी तरतूद केली आहे. सभापती महोदय, आज जे बोगस डॉक्टर्स आहेत, त्यांच्याबद्दल हे शासन कोणती कार्यवाही करणार आहे ? आताच माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे हे बोगस डॉक्टर्स बिहार आणि उत्तर प्रदेशातून आलेले आहेत. मी या बाबत सदनाला एक केस सांगू इच्छितो. त्रिपाठी नावाचे डॉक्टर आहेत. ते विजीटला गेल्यानंतर त्यांची पत्नी दवाखाना चालवावयाची, पेशंटना तपासायची आणि इंजेक्शन सुध्दा द्यावयाची. तिने दिलेल्या एका चुकीच्या इंजेक्शनमुळे एका महिलेचा मृत्यू झाला. त्या मयत महिलेचे नातेवाईक अगोदर सगळीकडे गेले आणि नंतर माझ्याकडे आले. श्री. त्रिपाठी यांनी पोलिसांना हाताशी धरुन ही केस दडपण्याचा प्रयत्न केला. माझ्या पत्नीने हे इंजेक्शन दिले नाही, असे त्यांनी सांगितले. माझ्याकडे या मयत महिलेचे कुटुंबिय आल्यामुळे याबाबत मी काहीतरी करु शकलो. म्हणून योग्य काय किंवा अयोग्य काय हे बोगस डॉक्टर्स पाहत नाहीत. तेव्हा त्यांच्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार......

सभापती महोदय, ग्रामीण भागात वैद्य हाताची नाडी पाहून कोणता रोग झाला आहे, हे सांगतात. तसेच आयुर्वेदातून बीएएमएस झालेले डॉक्टर्स महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रॅक्टीस करीत आहेत. त्यांची प्रॅक्टीसही चांगली सुरु आहे. म्हणून आता हे विधेयक आणल्यामुळे कोणाकोणावर बंदी घालणार आहांत ? आयुर्वेदिक तसेच इतर डॉक्टरांचे हे शासन काय करणार आहे ? जनतेच्या मनात संभ्रम निर्माण होईल असे काही शासनाने करु नये. करेक्टीव्ह स्टेप्स घेण्याची आवश्यकता आहे. आता या विधेयकामुळे कोणाला प्रोत्साहन मिळणार आहे आणि कोण बाद होणार आहे ? याचा माननीय मंत्रिमहोदयांनी विधेयक मांडीत असताना खुलासा केला असता तर ते अधिक बरे झ ाले असते. सभापती महोदय, विधेयकात असे म्हटले आहे की, " शंका दूर करण्यासाठी, याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, मुख्य अधिनियमाचे कलम 37 वगळण्यात येत असल्यामुळे, न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा, आदेश किंवा निर्देश यामध्ये किंवा लायसन....." आता या ठिकाणी मराठी शब्द परवाना वापरला असते तर ते योग्य झाले असते. त्याचा विचार माननीय मंत्रिमहोदयांनी करावा. तसेच या विधेयकामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "अथवा विलेख यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी हा अधिनियम राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्याच्या दिनांकास व त्यानंतर जी, अन्यथा मुख्य अधिनियमान्वये नोंदणी केली जाण्यास पात्र नव्हती अशा कोणत्याही व्यक्तीस, उक्त कलम 37 च्या तरतुदीन्वये ग्रामीण क्षेत्रामध्ये व्यवसाय करण्यास देण्यात आलेली परवानगी किंवा मोकळीक रद्द करण्यात आली असल्याचे व अशा व्यक्तीला प्रदान करण्यात आलेले विशेषाधिकार मागे घेण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. "

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

माझ्यासमोर प्रश्न असा आहे की, शहरी भागामध्ये या डॉक्टर्सचा धंदा तेजीत चालू आहे. तेव्हा ग्रामीण भागाला हा कायदा लागू होणार असेलतर शहरी भागाला सुध्दा तो लागू झाला पाहिजे. मुंबई शहरामध्ये 5 हजार बोगस डॉक्टर्स आहेत, ते प्रॅक्टिस करीत आहेत. त्यांना आपण मोकाट सोडणार काय? त्यांच्या बोगस गोष्टी वाढत चालल्या आहेत. ते आपले काम नियमितपणे करीत आहेत. त्यामुळे अधिकृत डॉक्टर्सची संख्या कमी झाली आहे. माझ्या मनामध्ये आणखी एक विचार येतो की, वैद्यकीय महाविद्यालयामध्ये शिक्षण घेऊन व डिग्री घेऊन जे डॉक्टर बाहेर पडतात. त्यांना खेडयामध्ये ज्या ठिकाणी आरोग्य केंद्रे उभी राहिली आहेत त्या केंद्रामध्ये त्यांनी कमीत कमी दोन वर्षे प्रॅक्टिस केली पाहिजे तरच तुला मेडिकल कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळेल असा नियम केला पाहिजे. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये शिक्षण घेऊन जे डॉक्टर तयार होतात ते शहरामध्ये आपला व्यवसाय करतात, काही हॉस्पिटल्स काढतात तर काही नोकरी करतात. आणि म्हणून अशा परिस्थितीमध्ये खेडयापाडयामध्ये हा व्यवसाय कसा जाईल, खेडयापाडयातील लोकांना वैद्यकीय उपचार कसे मिळतील याचा विचार केला पाहिजे. आज खेडयामध्ये 5 ते 10 हजार लोकवस्तीला एक डॉक्टर मिळणे कठीण झाले आहे. एखादा खेडयातील माणूस आजारी पडला तर त्याला 50 कि.मी. अंतरावर जाऊन डॉक्टरची मदत घ्यावी लागते. गंभीर आजार झाला व अशावेळी हॉस्पिटलमध्ये जायचे असेलतर खेडेगावामध्ये पक्का रस्ता उपलब्ध नाही. त्यामुळे त्याला शहरामध्ये घेऊन जाता येत नाही. अशा परिस्थितीत योग्य औषधोपचार न मिळाल्यामुळे खेडेगावामध्ये रुग्ण दगावतात. याचा आम्हाला अनुभव आहे. आज खेडेगावामध्ये डॉक्टर्सचा तुटवडा असल्यामुळे व आरोग्याच्या सुविधा नसल्यामुळे मुंबई, पुणे व संभाजीनगर सारख्या शहरामधून डॉक्टरांची वैद्यकीय पथके पाठवावी लागतात. तेव्हा अशाप्रकारे ग्रामीण भागामध्ये आपल्याला डॉक्टर्सची सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची असेल तर आपल्याला या कायद्यामध्ये तरतूद केली पाहिजे. आज आपण या विधेयकान्वये 37 वे कलम रद्द केले तर वैदू व्यवसाय करणाऱ्यांवर बंदी येईल. परंतु आज खेडापाडयामध्ये आजारी असलेल्या माणसांना हेच वैदू मदत करीत असतात. अशा वैदूंवर आपण बंदी आणली तर ग्रामीण भागातील लोकांनी जायचे कुठे? तुम्ही त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था केली आहे काय? ती पर्यायी व्यवस्था केल्यानंतर जरुर त्यांच्यावर बंदी आणा. खेडापाडयातील,ग्रामीण ज्नतेला कोणत्या प्रकारचे औषधोपचार आपण उपलब्ध केले आहेत या प्रश्नाचे उत्तर शासनाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

द्यावे लागेल. या लोकांसाठी आपण पर्यायी व्यवस्था कशी करणार आहात त्या संबंधी या विधेयकामध्ये खुलासा केलेला नाही. मी आपणास नम्रपणे सांगतो की, आपण हे 37 वे कलम रद्द करीत आहात ती चांगली गोष्ट आहे मी त्याचे स्वागत करतो. परंतु पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी शासनावर आहे. महाराष्ट्रामध्ये 42 हजार खेडी आहेत. त्यामध्ये किती डॉक्टर आहेत? किती दवाखाने आहेत? किती हॉस्पिटल्स आहेत? यांचा शोध न घेता या विधेयकाव्दारे या व्यवसायावर एक प्रकारचा इलाज केला जात आहे त्याचे परिणाम काय होतील याचा आपण विचार केला पाहिजे. शेवटी आमच्यासमोर त्या जनतेचे आरोग्याचे प्रश्न उभे रहातात. त्यांना आज आपण कोणत्याही प्रकारच्या आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करीत नाही. मुंबई शहरामध्ये गल्लोगल्ली भोंदू डॉक्टर आहेत. झोपडपट्टीमध्ये रहाणाऱ्या गरीब माणसाला काही झाले तरी तात्काळ त्यांची सेवा मिळते. या भोंदू डॉक्टर्सचा आपण शोध घ्या. खेडयापाडयामध्ये सुध्दा आज तेथील आरोग्याची व्यवस्था कोण पहात आहे? हा महत्वाचा प्रश्न आहे. आज तेथील भोंदू डॉक्टर्सच्या व्यवसायावर बंदी आणाल परंतु त्या ठिकाणी आजारी पडलेल्या जनावरांवर उपचार करण्यासाठी एकही डॉक्टर उपलब्ध नाही. एखाद्या बैलाचा पाय मोडलातर जनावरांवर उपचार करणारे जे अनुभवी लोक असतात तेच ट्रीटमेंट करतात. अशा भागामध्ये वर्षानुवर्षे अशा पध्दतीने उपचार करणाऱ्या लोकांचा व्यवसाय चालला आहे. आजच्या युगामध्ये डॉक्टर आले,पूर्वी डॉक्टर नव्हते. आज व्हेटर्नरी डॉक्टर आले, ते तात्काळ जनावरांवर उपचार करु शकतात. गावामध्ये जवळपास जरी नसलेतरी पाच कि.मी. अंतरावरुन येऊन ते ट्रीटमेंट करु शकतात. अशा परिस्थितीत कायद्यामध्ये जर आपल्याला परिवर्तन करावयाचे असेलतर जरुर करावे. या भोंदू डॉक्टर्सचा आपण बंदोबस्त करा. त्याचप्रमाणे युनानी, आयुर्वेदीक, होमियोपॅथिक वगैरे डॉक्टर्सचे दवाखाने आहेत त्यांच्या बाबतीत सुध्दा शासनाचे धोरण स्पष्ट असले पाहिजे. त्यांची देखील प्रॅक्टिस चांगल्या पध्दतीने चालली पाहिजे. परंतु त्यामध्ये भोंदू लोकांचा सहभाग असता कामा नये याबाबत कुणाचेही दुमत असणार नाही. या निमित्ताने या विधेयकावर बोलणाऱ्या प्रत्येक माननीय सदस्यांचे या संदर्भातील विचार आपल्यासमोर मांडले जाणार आहेत. आणि म्हणून त्यांनी मांडलेला प्रत्येक मुद्दा लक्षात घेऊन आपण यासंबंधी विचार केला पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

ते आपल्यासमोर मांडले जाणार आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुनच आपल्याला यावर इलाज करावयाचा आहे. कलम 37 जरुर रद्द करावे, मी त्याचे स्वागत करतो. पण अशा वेळी प्रभावी व्यवस्था निर्माण करुन लोकांसमोर समस्या उभ्या राहणार नाहीत, त्यांच्या अडचणी मार्गी लागतील, भोंदू डॉक्टरांपासून लोकांचे संरक्षण होईल या उद्देशाने आपण पाऊल उचलले आहे. पण त्याच बरोबर याबाबतीत कोणती पर्यायी व्यवस्था करणार आहात याचे विश्लेषण केले तर मी आपल्याला धन्यवाद देईन. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

. . . .4 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, याठिकाणी महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम, 1961 मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी जे विधेयक आणलेले आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम, 1961 चा जो अधिनियम आहे, त्यामध्ये ग्रामीण भागातील जनतेची वैद्यकीय गरज लक्षात घेऊन या कायद्यात कलम 37 घालण्यात आले होते. त्यानुसार ग्रामीण भागात अनक्वॉलीफाईड आणि अनरजिस्टर्ड अशा प्रकारची वैद्यकीय खाजगी सेवा देण्यात येत होती. त्यामध्ये वैदू, औषध विकणारे लोकांचा समावेश होता. पण या लोकांनी त्याचा गैरफायदा घेऊन ग्रामीण भागातील जनतेला अनेक वेळा नाडण्याचा प्रयत्न केल्याची अनेक उदाहरणे आपल्या लक्षात येतील. अर्हता नसताना वैद्यकीय व्यवसाय करणा-या व्यक्ती केवळ ग्रामीण भागापुरत्या मर्यादित राहीलेल्या नाहीत, तर आता मुंबई सारख्या महानगरामध्ये रस्त्याच्या कडे तंबू लावून औषध विकणारे, लाऊड स्पीकरवर प्रचार करणारे एवढेच नव्हेतर वर्तमानपत्रात देखील औषधांच्या आणि वैद्यकीय उपचार करणा-या व्यक्ती किंवा संस्था आहेत, त्यांच्या जाहिराती येत असतात. पण त्याचा जनतेला आणि गरजू लोकांना कितपत फायदा होतो याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. वैद्यकीय व्यवसाय करणा-या ज्या बोगस व्यक्ती आहेत, त्यांना प्रतिबंध करणे आवश्यक आहे. काही ठिक्राणी आम्ही पाहिले आहे की, बंगाल मधून आलेल्या डॉक्टरांनी येथे येऊन पाटया लावलेल्या असतात आणि ठेकेदारी पध्दतीने इलाज केला जातो. म्हणजे एखाद्याला आजार झााला असेल तर पाच हजार रुपये घेऊन अमुक इतक्या दिवसात तो बरा करुन देऊ असे त्यात सांगितलेले असते. अशा डॉक्टरांचे देखील महाराष्ट्रात अमाप पीक वाढलेले आहे. अनेक वेळा असेही पाहिले आहे की, वैदू किंवा औषध विकणारे जे लोक आहेत किंवा नाडी तपासणी करणारे जे लोक आहेत, त्यांच्याकडे अनेक मोठमोठया नेत्यांची, लोकप्रतिनिधींची प्रमाणपत्रे असतात आणि ते लोक ही प्रमाणपत्रे दाखवून आपला धंदा करीत असतात. अशा लोकांचा सुळसूळाट केवळ ग्रामीण भागातच नाही तर मुंबईसारख्या कॉस्मॉपॉलीटन शहरात देखील झालेला आहे. पूर्वी 1961 अधिनियमामध्ये चांगल्या भावनेने तरतूद केली होती. जेणेकरुन ग्रामीण भागातील जनता वैद्यकीय सेवेशिवाय राहता कामा नये. पण त्याचा अशा प्रकारे गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. ज्यांच्याकडे वैद्यकीय क्षेत्रासंबंधात अर्धवट स्वरुपातील ज्ञान आहे, त्यांच्यामुळे ग्रामीण भागातीलच नव्हे तर शहरी भागातील लोकांचे जीवन धोकादायक

. . . .4 ओ-3



APR/MHM/SBT 19:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे . . . .

झालेले आहे. तसेच ग्रामीण व शहरी भागातील गोरगरीब जनतेचे जीवन उध्वस्त होण्याची भीती आहे. म्हणून 37 व्या कलमचा गैरवापर करुन या लोकांनी आतापर्यंत गोरगरीब जनतेला नाडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु..

भारतीय औषध परिषदेने देखील आपल्या राज्य शासनाकडे हे 37 वे कलम वगळण्याची जी शिफारस केली आहे ती करण्यामागचा हेतू मला हाच दिसतो की, ज्या अर्हताप्राप्त नसलेल्या ज्या व्यक्ती आहेत किंवा ज्या अन क्वालिफाईड अन रजिस्टर्ड वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती आहेत त्यांना यापासून अडविणे आणि जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे, या दृष्टीकोनातून या भारतीय औषध परिषदेनेसुध्दा आपल्या राज्य शासनाकडे 37 वे कलम वगळण्याची शिफारस केलेली आहे. या अधिनियमाच्या अंतर्गत 37 कलमान्वये जी मोकळीक देण्यात आली होती, त्या बहाण्याखाली तरतुदीचा फायदा घेऊन वैद्यकीय व्यवसाय करणारे, ज्या अशा अन क्वालिफाईड, अन रजिस्टर्ड व्यक्ती होत्या, अशा व्यक्तींना भारतीय वैद्यकीय व्यवसाय करण्यास प्रतिबंध करण्यासाठी हे कलम वगळणे आवश्यक असल्याचे दिसल्यामुळेच या विधेयकाच्या माध्यमातून ही सुधारणा करण्यासाठी विधेयक आणलेले आहे. त्यामुळे आपल्या ग्रामीण भागातीलच नव्हे तर शहरी भागामध्ये देखील भोंदू, बोगस अशाप्रकारच्या वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती आहेत, त्यांना संरक्षण न देता गोरगरीब लोकांना संरक्षण देण्यासाठी हे पाऊल उचललेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनी सूचना केली. या वैदूंचा सुळसुळात थांबला तर ग्रामीण भागामध्ये, गरजू भागामध्ये पर्यायी अशाप्रकारच्या या सोयी जास्तीत जास्त कशा उपलब्ध होऊ शकतील, याचा देखील गांभीर्याने विचार केला तर मला असे वाटते की, राज्यातील जनतेच्या फायद्याचे ठरेल. तेव्हा हे 37 वे कमम वगळण्याच्या संदर्भात जे विधेयक आलेले आहे त्याचे मी समर्थन करतो. धन्यवाद.

-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अंतिम आठवडा प्रस्तावाबाबत**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आणखी बराच वेळ विधेयकांवर चर्चा होणार आहे. म्हणून हा अंतिम आठवडा प्रस्ताव उद्या सकाळी स्पेशल सिटींग घेऊन घेतला तरी चालू शकेल.

**सभापती** : अंतिम आठवडा प्रस्तावाच्या चर्चेच्या संबंधाने विरोधी पक्षनेतंनी जी सूचना केली त्याप्रमाणे आपल्याला तो प्रस्ताव उद्या सकाळी देखील घेता येईल. परंतु शासकीय विधेयके आहेत ती आपण आज घेऊ.

श्री.दिवाकर रावते (बसून) : आपण आल्यानंतर पहिल्यांदाच कामकाज चालू झालेले आहे.

**सभापती** : बरोबर आहे. परंतु तेच कामकाज आपण चांगल्या पध्दतीने संपवू या.

श्री.पांडुरंग फुंडकर : अंतिम आठवडा प्रस्तावाच्या चर्चेचे काय ?

: उद्या सकाळी 10-30 वाजता विशेष बैठक घेऊन प्रस्तावावरील चर्चा घेऊ. त्याचवेळेला आज एक अर्धातास चर्चा घेण्याचे कबूल केलेले होते, ती अर्धातास चर्चा त्याच दरम्यान घेऊ. त्यानंतर रेग्युलर कामकाज दुपारी 1-00 सुरु होईल. अर्धातासाची वेळ कशी देता येईल ते मी पाहून घेईन.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO. XVII OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MEDICAL PRACTITIONERS ACT, 1961.)**

(चर्चा पुढे चालू....

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)**

श्रीमती कांता नलावडें (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी जे विधेयक आणलेले आहे, हे खरोखरच चांगले विधेयक आहे. परंतु तरीही काही गोष्टी सांगाव्याशा वाटतात. आयुर्वेदिक आणि ॲलोपॅथी यांची जी उत्पादने येतात, त्याची जाहिरात दूरदर्शनवरुन आणि वर्तमानपत्रातून पहातो, ऐकतो. खरे म्हणजे उत्पादनाचा दर्जा पाहूनच दूरदर्शन आणि वर्तमानपत्रमध्ये जाहिरात करण्यास परवानगी दिली पाहिजे. उत्पादनाचा दर्जा तपासण्यासाठी आरोग्य विभागावर जबाबदारी टाकली पाहिजे. 'रुप अमृत' नावाचे एक आयुर्वेदिक औषध आहे. वजन कमी करण्यासाठी, रंग गोरा करण्यासाठी आयुर्वेदिक किंवा ॲलोपॅथीच्या जाहिराती वर्तमानपत्रामधून किंवा दूरदर्शनवरुन दाखविल्या जातात. मी एका कौन्सिल सेंटरमध्ये 15 दिवसापूर्वी गेले होते. त्या ठिकाणी गरीब घरच्या मुलींच्या 15 केसेस आलेल्या होत्या. कारण 'ई' टीव्ही वाहिनीवर 'रुप अमृत' या आयुर्वेदिक औषधाची जाहिरात दिली जाते त्यामध्ये तुम्ही हे औषध 15 दिवस वापरले की तुमचा रंग गोरा होतो. बिचारे, त्या मुलींचे आईवडील गरीब होते. त्यांना असे वाटते की, मुलीचा रंग गोरा झाला पाहिजे, म्हणून ते एक हजार रुपये खर्च करतात.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ 19:20

श्रीमती कांता नलावडे..

एक हजार रुपयाची बाटली देतात आणि त्यांना सांगतात हे पंधरा दिवस वापरा, जर फरक वाटला नाही तर पंधराव्या दिवशी फोन करा, त्यातील अर्धे पैसे परत करण्यात येतील. सगळेच लोक पंधराव्या दिवशी फोन करीत नाहीत. काही सोळाव्या दिवशी फोन केला की पैसे परत मिळत नाहीत. त्या मुलींचा रंग बदलत नाही. त्या बाटलीमध्ये मध असते. एक हजार रुपयात मधाची छोटी बाटली दिली जाते. त्यामुळे अक्षरशा ही लूट आहे. गोरगरीब लोक आपली मुलगी गोरी व्हावी, तिचे लग्न व्हावे म्हणून अशा प्रकारची औषधे विकत घेतात, त्यावर बंधन आले पाहिजे. त्याचबरोबर लाईफ सेव्हिंग्ज ड्रग्सच्या बाबतीत काय करण्यात येणार आहे? याचे स्पष्टीकरण करण्यात यावे. या विषयावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे.साप चावला किंवा अपघात झाल्यानंतर रक्तस्त्राव ताबडतोब थांबविण्यासाठी काय करण्यात येणार आहे, याचे स्पष्टीकरण मा.मंत्रिमहोदयांनी करावे. धन्यवाद.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे ( रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयकाचे मी स्वागत करतो. तरी सुध्दा सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितलेली गोष्ट सत्य आहे की, या राज्यामध्ये परप्रांतातून आलेले बोगस डॉक्टर्स आहेत.त्यांची प्रॅक्टीस ग्रामीण भागात जोरात सुरु आहे. श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी असे सांगितले की, शहरी भागातील स्लम एरियात, त्यांनी आपला धंदा चांगल्या प्रकारे सुरु ठेवलेला आहे. मी सुध्दा त्याची माहिती घेतलेली आहे. एम.सी.आय.कडे रजिस्टर केल्यानंतर, त्यांना प्रॅक्टीस करण्यास परवानगी मिळते. पण एम.सी.आय.कडे त्यांचे सर्टिफिकेट परराज्यातून आलेले आहे काय ही बाब लवकर सर्टिफाय केली जात नाही. त्याच्या व्हेरिफिकेशनसाठी वर्ष, दोन वर्ष लागतात. सभापती महोदया, माझी सूचना अशी आहे की, आता इन्टरनेटची सुविधा उपलब्ध झ ाालेली आहे. डॉक्टरांनी दिलेले सर्टिफिकेट त्याच दिवशी तपासता येऊ शकते. तरी सुध्दा हे सर्टिफिकट व्हेरिफाय करण्यासाठी दोन वर्षे लागतात. डॉक्टर आपल्या दवाखान्यावर बोर्ड लावतात.डॉक्टर अमुक अमुक, एम.बी.बी.एस. पण त्यापुढे मुंबई वगैरे काही लिहीत नाहीत. ग्रामीण भागात हया डॉक्टरांच्या माध्यमातून रुग्णांच्या आयुष्याशी खेळ सुरु आहे. काही ठिकाणी अशा प्रकारची औषधे दिली जातात की, त्यामुळे तो पेशंट बरा होण्याऐवजी तो दगावतो. म्हणून माझी अशी विनंती आहे की, यातील कलम 37 वगळण्यात यावे. आपण या ठिकाणी बोगस डॉक्टरांवर बंधन आणू शकलो नाही. अनरजिस्टरर्ड, अनव्हेरिफाईड डॉक्टरांना प्रतिबंध करण्यात येणार आहे की नाही? बोगस डॉक्टरांच्या बाबतीत काय उपाययोजना करण्यात येणार आहे? माननीय राज्य मंत्रीमहोदय, श्री. रविशेठ येथे बसलेले आहेत.रायगडमध्ये किती बोगस डॉक्टर्स आहेत? ठाणे जिल्हयात वसई, भिवंडी परिसरात प्रचंड प्रमाणात बोगस डॉक्टरांचा व्यवसाय सुरु आहे. वर्तमानपत्रात माहिती येते आणि सुवोमोटो त्यावर कारवाई केली जाते. याबाबत पोलिसांना सांगितल्यानंतर पोलीस काहीही करु शकत नाहीत. म्हणून जिल्हाधिकारी , पोलीस अधिक्षक, मुंबई, ठाणे विभागाचे पोलीस कमिशनर यांचा यामध्ये समावेश करुन त्या एरियात असलेल्या बोगस डॉक्टरांचा शोध काढून, त्यांच्यावर कारवाई करण्याची वेळ आलेली आहे.

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे.....

आर.एम.पी. 1980 सालापासून बंद झालेले आहेत पण त्यांची प्रॅक्टीससुध्दा सुरु आहे. डॉक्टरकडे पाच/दहा वर्षे कम्पाऊंडर म्हणून काम केलेले ग्रामीण भागात डॉक्टरचा बोर्ड लावतात. आणि डॉक्टरांनी दिलेले प्रिस्क्रीप्शन रुग्णांना देतात. असे काही डॉक्टर तर ऑपरेशनसाठी शिफारसपत्र देतात. म्हणून या अन रजिस्टर्ड, अन क्वालिफाईड डॉक्टर्संना कशा प्रकारे प्रतिबंध करता येईल, बोगस डॉक्टर्संना कशा प्रकारे प्रतिबंध करता येईल, याच्यामध्ये आणखी काही सुधारणा करता येईल काय याचा अभ्यास करुन त्याच्यावर कारवाई करावी एवढीच माझी सूचना आहे. धन्यवाद.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील (वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदया, आज मी या सभागृहामध्ये जे सन 2005 चे वि. प. वि. क्रमांक 17- महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1961 मध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडलेले आहे त्या विधेयकावर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री श्रीकांत जोशी, मधुकर सरपोतदार, अनंत तरे, प्रा. जोगेंद्र कवाडे व श्रीमती कांता नलावडे यांनी आपले विचार मांडलेले आहेत. या सर्व सन्माननीय सदस्यांचा मी मनापासून आभारी आहे. अतिशय चांगल्या स्पिरीटमध्ये आपण विधायक अशा सूचना या ठिकाणी केलेल्या आहेत. हा कायदा जरी मंजूर झालेला असला तरी त्यामध्ये आपल्याला काही सुधारणा रुल्सच्या माध्यमातून कराव्या लागतील आणि त्या सुधारणा करीत असताना आपण सगळयांनी केलेल्या सूचनांचा जरुर समावेश करण्याचा प्रयत्न केला जाईल. हा कायदा ज्यावेळी अस्तित्वात आला त्यावेळी वेगळी परिस्थिती होती. त्यावेळी कमी प्रमाणात डॉक्टर्स तयार होत होते. यामध्ये वेगवेगळया पॅथीचे डॉक्टर्स असले तरी ज्यावेळी डॉक्टर्स नोंदणी करतात त्यावेळी महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1961 आणि महाराष्ट्र मेडिकल काऊंसिल ॲक्ट, 1965 या दोन कायद्याच्या अंतर्गत ज्यावेळी डॉक्टरची नोंदणी होते त्यावेळी 1961 मध्ये हा विचार करण्यात आला की, नवीन डॉक्टर्सची नोंदणी होईल परंतु खेडेगावामध्ये ज्या ठिकाणी अजिबात डॉक्टर नाही त्या ठिकाणी पारंपारिक पध्दतीने, व्यावसायिक पध्दतीने दुर्गम भागातील लोकांना, खेडेगावातील लोकांना ट्रिटमेंट देणारे काही लोक असतील त्यांना हा कायदा आणून बंदी केल्यानंतर एक तर त्या भागातील डॉक्टरची सुविधा बंद होईल आणि त्या डॉक्टरच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होईल म्हणून जाणीवपूर्वक कलम 37 ची तरतूद त्या कायद्यामध्ये करण्यात आली होती. परंतु 1961 सालापासून आतापर्यन्तची परिस्थिती पाहिली तर त्यामध्ये फार मोठया प्रमाणावर बदल झालेला आहे, सुधारणा झालेली आहे. शिक्षणाचा विस्तार झालेला आहे. त्यावेळी फक्त शासनाची मेडिकल कॉलेजेस होती आणि आपल्यापैकी एखाद्याला डॉक्टर व्हावयाचे असेल तर बेळगावला जावे लागत होते. कॅपिटेशन फी द्यावी लागत होती. अलीकडच्या काळामध्ये जसा अन्य क्षेत्रामध्ये शिक्षणाचा विस्तार केला तसाच वैद्यक व्यवसायामध्ये सुध्दा शिक्षणाचा विस्तार झाला आणि त्यातून वेगवेगळया फॅकल्टीमधील, वेगवेगळया पॅथीमधील डॉक्टर्स तयार झाले. जसे इंजिनिअरींग,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

पॉलिटेक्निक, मॅनेजमेंट, आर्किटेक्चर या बाकीच्या सगळया क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर विस्तारीकरण केले आणि आज अशी परिस्थिती आहे की, ज्या ठिकाणी आधी इंजिनिअरींगला प्रवेश मिळत नव्हता त्या ठिकाणी आता इंजिनिअरींगमध्ये 12-12 हजार जागा रिक्त राहावयास लागल्या. पॉलिटेक्निकच्या 50 टक्के जागा रिक्त राहावयास लागल्या. आता चर्चा आहे ती विशिष्ट कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्याची आहे. आपल्या राज्यामध्ये या वैद्यक क्षेत्रामध्ये सुध्दा मोठया प्रमाणावर विस्तार झालेला आहे आणि अगदी तालुका पातळीपर्यन्त गेलो तरी त्या पातळीवर सुध्दा आज डॉक्टर्सची उपलब्धता झालेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/ श्री.बरवडनंतर 19:30

श्री.दिलीप वळसे-पाटील....

जवळपास 1,69,302 एवढया मोठया प्रमाणावर वेगवेगळया पॅथीचे डॉक्टर्स आहेत. याचा अर्थ 572 लोकसंख्येमागे एक डॉक्टर असे त्याचे प्रमाण असल्याचे दिसून येते. मा.सदस्यांनी याठिकाणी चिंता व्यक्त केली की, तुम्ही कलम 37 चे कलम वगळण्यास निघालात आणि हे कलम वगळल्यानंतर त्याचा समाजावर काय परिणाम होईल आणि त्या त्या परिसरामध्ये वैद्यकीय सुविधा मिळू शकतील की नाही आणि 1500 रुपयामध्ये डॉक्टर होण्याची चर्चा याठिकाणी झाली आहे. अनेक वेळेला असा निर्णय धेतो त्याच्यातून 1500 रुपयामध्ये जे वर्षानुवर्षे प्रॅक्टीस करतात त्यांना नोंद करावयाची असेल त्यांनी कलम 37 अंतर्गत नोंदणी करावी आणि तुमची प्रॅक्टीस सुरु ठेवावी अशी भूमिका घेतली गेली त्यावेळी सर्व जिल्हाधिका-यांकडे 1729 अर्ज आले आणि ही संख्या पाहता त्याचे प्रमाण फार मोठे आहे असे वाटत नाही. त्यामुळे यातून फार गैरसोय होईल अशी माझी तरी धारणा नाही. मी आपल्याला एवढेच सांगतो की, आज आपण ज्यावेळी 37 कलम वगळू त्यावेळी हा जो 1500 रुपयासंबंधीचा जी.आर.होता तो आपोआपाच रद्द होईल आणि ही योजना यापुढील काळामध्ये चालू राहणार नाही. आपण यासंबंधी चिंता व्यक्त केली की, या डॉक्टरांनी प्रॅक्टीस करण्याचे थांबविल्यानंतर पर्यायी व्यवस्थेचे काय ? याठिकाणी मा.आरोग्य मंत्री याठिकाणी बसलेले आहेत, आज महाराष्ट्रामध्ये जी व्यवस्था आहे त्याच्यामध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम अंतर्गत मल्टीपर्पज वर्कर्स असतात, कम्युनिटी हेल्थ वॉलिंटियर्स असतात, परिचारक असतात, अंगणवाडी सेविका असतात यांच्या माध्यमातून खेडोपाडी राज्यसरकारच्यावतीने औषध वाटपाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या राज्यामध्ये हीही मागणी ब-याच दिवसांपासून आहे की, होमिओपॅथीच्या माध्यमातून उत्तीर्ण झालेल्या डॉक्टर्सना ॲलॉपॅथीची प्रॅक्टीस करण्याची मुभा असावी. यासंबंधी मंत्रिमंडळासमोर दोन वेळा प्रस्ताव आणून यासंबंधीचा अंतिम निर्णय केंद्र सरकारने करावा अशी भूमिका राज्यसरकारने घेऊन तो प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे. या राज्यातील आरोग्य सुविधांची स्थिती पाहिली तर एकूण 9727 प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत, 1812 आरोग्य केंद्र, 364 ग्रामीण रुग्णालय, 27 कुटीर रुग्णालय, 6 महिला रुग्णालय, 4 कुष्ठरोग रुग्णालय, 6 मनोरुग्णालये, 6 क्षय रुग्णालय आणि 70 उप केंद्र आहेत. त्याचबरोबर आरोग्य

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्री.दिलीप वळसे-पाटील....

सहाय्यक 11503, बहुउद्देशीय कार्यकर्ते 24,561 या सर्वांच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये आरोग्य सुविधा पुरविण्याचा प्रयत्न करीत असतात. यामध्ये अधिक सुधारणा करणे आवश्यक वाटले तर यामध्ये वेगवेगळया प्रकारे निश्चित प्रयत्न करता येईल. यामध्ये दोन प्रश्न आहेत. कलम 37 वगळल्यामुळे जे बोगस डॉक्टर्स आहेत किंवा जे भोंदू डॉक्टर्स प्रॅक्टीस करत आहेत त्यांच्यावर निर्बंध येईल. मला ही गोष्ट सांगितली पाहिजे की, ज्यावेळी इंडियन मेडिसीन सेंट्रल कौन्सिल ॲक्ट 1970 या कायद्यांतर्गत सुधारणा करण्यात आली आणि म्हणून ती तरतूद तशी पाहिली तर....There is always conflict between State and Central Act. But, the Central Act prevails.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. Since health is concurrent subject, it is State's privilege to finalise any Act of Government. It can amend any Act. It can supersede Central Act, but limited to State only.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, माझे सन्माननीय मित्र श्री.सावंत यांच्या म्हणण्याशी मी पूर्ण सहमत आहे. ज्यावेळी कंकरंस लिस्ट एखाद्या विषयाची असते त्यावेळी केंद्र सरकारच्या कायद्यात सुधारणा करण्याचा अधिकार राज्यसरकारला असतो. त्यानुसार इंडियन सेंट्रल मेडिसीन कौन्सिल ॲक्टला सुधारणा केली होती.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 19:35

(श्री. दिलीप वळसे-पाटील....)

माझा सांगण्याचा उद्देश वेगळा होता. 1970 मध्ये केन्द्राने हा कायदा केला. हा कायदा देशपातळीवर अस्तित्वात असला तरी या कायद्यातील कलम 37 ची तरतूद वगळण्याच्या संदर्भात हे विधेयक याठिकाणी आणले याचे कारण असे आहे की, आपल्या राज्यामध्ये हा कायदा परिपूर्ण असायला पाहिजे. मा.सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी बोगस डॉक्टरांचा याठिकाणी उल्लेख केला. बोगस डॉक्टरांच्या संदर्भात आपण जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माध्यमातून कमिट्या नेमलेल्या आहेत. कलम 37 वगळल्या नंतर बोगस डॉक्टरांची प्रॅक्टीस बंद होईल. तरी सुध्दा आज परराज्यातून अनेक डॉक्टर्स् आपल्या राज्यामध्ये येऊन व्यवसाय करीत आहेत. मग त्यांनी एमसीटीकडून रेकग्निशन घेतलेले असेल किंवा अन्य कोणाचे तरी रेकग्निशन घेतलेले असेल, अशा डॉक्टरांना शोधण्याची व्यवस्था आज आपल्याकडे नाही. मग केवळ पदवी आहे म्हणून असा डॉक्टर कुठची तरी जागा घेतो आणि आपली डॉक्टरकी तेथे सुरु करतो. त्याची ती पदवी खरी आहे की खोटी आहे हे कोणी तपासत नाही. या राज्यामध्ये डिस्पेन्सरी किंवा क्लिनिक सुरु करण्यासाठी बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट खाली कार्पोरेशनची परवानगी घेण्याची आजपर्यन्त आवश्यकता नव्हती. यापुढच्या काळामध्ये एस्टॅब्लिशमेंट लायसन्सेस घ्यावे, महानगरपालिका, नगरपालिका किंवा ग्रामपंचायत अशा कोणत्या तरी एजन्सीकडे नोंद करावी अशी तरतूद करीत आहोत. डिस्पेन्सरी किंवा क्लिनिक सुरु करण्यासाठी त्या डॉक्टरला स्थानिक ॲथॉरिटीची परवानगी घेण्याचे बंधनकारक केले, तसा नियम केला तर माझी खात्री आहे की, त्या डॉक्टरला अशा प्रकारचे लायसन्स देताना त्याची डिग्री तपासून घेतली जाईल. तशा प्रकारची व्यवस्था आपण आपल्या राज्यामध्ये करीत आहोत. नोंदणीच्या कामासाठी आपल्याला वेगळी यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. आपण जेव्हा वेगवेगळया आजारासंबंधी पेशण्टची माहिती घेतो त्यावेळी आपल्याला फक्त सरकारी रुग्णालयातील आकडेवारी उपलब्ध होते. खाजगी रुग्णालयातील रिपोर्टींग आपल्याकडे होत नाही. आता खाजगी रुग्णालयातील रिपोर्टिंग करण्याच्या संदर्भात अजून विचारविनिमय सुरु झालेला नाही. परंतु तो देखील आपण सुरु करीत आहोत. राज्यात खाजगी रुग्णालयामध्ये विविध आजाराचे किती रुग्ण आहेत, एडस्चे किती रुग्ण आहेत याची माहिती इन्टरनेटच्या माध्यमातून, वेबसाईटच्या माध्यमातून राज्य सरकारकडे उपलब्ध होण्याच्यादृष्टीने

..2..

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

भविष्यात आपणाला व्यवस्था करावी लागणार आहे आणि ती व्यवस्था करण्याचे काम आपण करीत आहोत. याठिकाणी आयुर्वेदिक विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. मा.सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी सांगितल्या प्रमाणे चॅलेन्जेस आणि अपॉर्च्युनिटीजमध्ये आपण लाँग टर्म आणि शॉर्ट टर्म प्लॅनिंग काय करतो ? आज शिक्षणामध्ये डॉक्टरांवर एवढ्या मोठया प्रमाणावर खर्च केल्यानंतर राज्यात तयार होणारे डॉक्टर्स् हे परदेशात जातात किंवा शहरात प्रॅक्टीस करतात. ग्रामीण भागामध्ये प्रॅक्टीस करण्यास ते जात नाहीत. परिणामी ग्रामीण भागातील जनतेला वैद्यकीय सेवा मिळत नाही. आपण स्पेशलायझेशन आणि जनरल ट्रीटमेंटचा विचार केला तर आज जे.जे. हॉस्पिटल आणि ससून हॉस्पीटल ही स्पेशल ट्रीटमेंट करणारी सुपरस्पेशॅलिटी हॅास्पिटल असताना जनरल ट्रीटमेंटसाठीच सर्व बेड् ऑक्युपाय होतात आणि परिणामी एक्सपर्ट ट्रीटमेंटसाठी बेड् उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे स्पेशल ट्रीटमेंट घेणा-या पेशण्टची गैरसोय होते. शासनाने आता स्पेशल हॉस्पीटल मॅनेजमेंट सिस्टीम तयार करण्याच्यादृष्टीने पावले उचललेली आहेत. याबाबतीत एक-दीड महिन्याच्या आत निर्णय घेऊन त्याची सुरुवात जे.जे.हॉस्पीटल पासून करण्याचे ठरविलेले आहे. ...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 19:40

श्री. दिलीप वळसे पाटील...

त्यादृष्टीकोनातून पाऊले टाकण्यास सुरुवात केली आहे. या ठिकाणी विद्यापीठांचा उल्लेख केला. लोणेरे विद्यापीठाचा उल्लेख केला, नाशिक विद्यापीठाचा उल्लेख केला. आता अशा प्रकारची सारखी विद्यापीठे राज्य सरकारने काढावीत आणि त्याच्यामध्ये कुठलेच काम चांगले होऊ नये अशी देखील चर्चा दुस-या बाजुस करीत आहोत. मी सभागृहाला सांगतो की, या राज्यामध्ये आपल्याला अशी स्पेशल विषयामधली स्वयंसहाय्य विद्यापीठे निर्माण करण्याच्या संदर्भामध्ये एक विचार मी मागच्या टर्ममध्ये केला होता. त्या संदर्भात मी एक विधेयक सुध्दा तयार केले होते. दरम्यानच्या काळात ऊर्जा खात्याची जबाबदारी माझ्याकडे आल्यामुळे मला त्यामध्ये लक्ष देता आले नाही. परंतु जे विधेयक या सभागृहात मांडले गेले आहे. ते विधेयक या सभागृहामध्ये मांडल्यानंतर संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविले. संयुक्त चिकित्सा समितीची बैठक घेण्यात आली. ती बैठक जवळपास दहा तास चालली. त्या बैठकीस समितीच्या सदस्यांनी अतिशय चांगले मुद्दे उपस्थित केले आहेत. त्याच प्रमाणे सुप्रीम कोर्टाने सुध्दा यांसदर्भात जज्जमेंट दिलेले आहे. सध्या हे विधेयक सुयक्त चिकित्सा समितीकडे पाठविले आहे कदाचित ते विधेयक उद्या मी सभागृहात आणेल. या समितीच्या सदस्यांनी बैठकीत केलेल्या सूचना, त्याच प्रमाणे सुप्रीम कोर्टाने नवीन उपाययोजना यामध्ये सुचविल्या आहेत त्यासंबंधीची माहिती तसेच यासंदर्भात इतर राज्यात काय परिस्थिती आहे यासंबंधीची घेतलेली माहिती या सर्व गोष्टी या समितीचे सदस्य, विरोधी पक्षाचे नेते, त्याच प्रमाणे सर्व पक्षाचे प्रतोद यांच्या समोर ठेऊन या विधेयकावर सर्वांचे एकमत होईल अशा प्रकारची सविस्तर चर्चा करुन, सध्याच्या विधेयकामध्ये ज्या काही त्रुटी आढळून आल्या आहेत त्या त्रुटया वगळून या विधेयकाचा नवीन ड्राफ्ट तयार करुन ते विधेयक नव्याने सादर करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. सभापती महोदय, मुंबई सारख्या शहरात एक गर्व्हमेंट लॉ कॉलेज सोडले तर "लॉ" विषयाचे दर्जेदार शिक्षण घेण्यासाठी मुंबई सारख्या शहरात दुसरे कोणतेही कॉलेज उपलब्ध नाही. स्पेशलाईज सब्जेक्टमधील स्पेशलाईज विद्यापीठे निर्माण केली पाहिजेत. आयुर्वेदिकच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर आपल्या देशात मोठया प्रमाणात चांगल्या प्रकारची वनस्पती उपलब्ध आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात आयुर्वेदिक डॉक्टर तयार करण्यात आले पाहिजे. आपल्याकडे वनऔषधी मोठया प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे त्यापासून औषधी तयार करुन ती एक्सपोर्ट करण्याकरिता पुढाकार घेतला गेला पाहिजे. वनऔषधीला जास्त महत्व दिले तर आपल्या

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे- पाटील..

राज्यातील शेतक-यांना चार पैसे कसे मिळवून देता येईल यासंदर्भात निश्चित प्रकारे विचार आपणा सर्वांकडून केला गेला पाहिजे. मी मघाशीच सांगितले की, जगामध्ये जवळपास 1 कोटी नर्सेसची आवश्यकता आहे. यासंदर्भात आपल्याला सगळयांना एकत्र येऊन या विषयी चर्चा करावी लागणार आहे. बी.ए.,बी.कॉम.चे विद्यार्थी करावयाचे, इंजिनियर्स करावयाचे, डॉक्टरर्स करावयाचे, या खेडयापाडयामध्ये आवश्यकता असणारे आणि जगामध्ये आवश्यकता असणारी यंत्रणा निर्माण करावयाची आहे. सभापती महोदय, आरोग्य शिक्षणाच्या संदर्भातील राज्य शासनाचे धोरण ठरविण्याच्या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्र्यांना दोन दिवसापूर्वी विनंती केलेली आहे की, विधानसभेचे अधिवेशन संपल्यानंतर आठ- पंधरा दिवसात किंवा एका महिन्यामध्ये राज्यातील सर्व शिक्षण प्रमुखांना बोलावून एकत्रित एक-दोन दिवस चर्चा करावी लागणार आहे. परंतु आपल्याला शिक्षण परिषद या राज्यात घेतली पाहिजे त्या परिषदेतून या राज्यातील शिक्षण क्षेत्रासाठी एक चांगली दिशा ठरवून घेतली पाहिजे. या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अपॉर्चन्यूटी आपल्याला तयार करावयाच्या आहेत. म्हणून या विषयाच्या संदर्भात आपणा सगळयांना विश्वासात घेऊन, सर्वांशी एकत्रित रित्या चर्चा करुन मार्ग काढण्याचा निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने काही महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. बोगस डॉक्टरांना कसे पकडणार ? या संदर्भातील नॅशनल पॉलिसी कशी ठरविली जाणार आहे ? पोद्दार हॉस्पीटलच्या बाबतीत सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी काही प्रश्न मांडलेले आहेत. या अनुषंगाने तयार करण्यात आलेला कायदा आपण पाहिला तर अतिशय सिनियर अशी रिगरस इन-पिझनमेंट तरतूद करण्यात आलेली आहे.कमीत कमी दोन वर्षे आणि जास्तीत जास्त पाच वर्षे शिक्षा व 2000 पासून ते 10000 हजार रुपयांपर्यन्तचा दंड आकारण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. अशा चुकीच्या पध्दतीने प्रॅक्टीस करणा-या डॉक्टरांसाठी ही तरतूद असताना यासंदर्भाती नवीन नियम तयार करुन यासंदर्भातील नक्की जबाबदारी ही आरोग्य विभागाने स्वीकारावयाची, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जबाबदारी स्वीकारावयाची की आणखी कोणी अधिका-याने ती स्वीकारावयाची यासंबंधी जबाबदारी निश्चित करुन त्याच्यामधून या राज्यातल्या सर्व सामान्य माणसांच्या आयुष्याशी कोणाला खेळता येणार नाही. परराज्यातून येथे येऊन आपण वाटेल ते करु शकतो अशी भूमिका कोणाला घेता येणार नाही. अशा प्रकारची तयारी राज्य शासनाने या

3..



ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 19:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे- पाटील..

विधेयकाच्या माध्यमातून केलेली आहे. आपण ज्या काही सूचना केल्या त्या सूचनांचा देखील त्या विधेयकामध्ये समावेश करुन घेण्याचा निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल. हे विधेयक नव्याने तयार करीत असताना आपल्याला सगळयांना विश्वासात घेऊन त्या विधेयकामध्ये ज्या काही त्रुटी आहेत त्यामध्ये सुधारणा करण्यात येतील. आपण सगळयांनी या विधेयकास पाठिंबा दिला त्याबद्दल मी सगळया सदस्यांचे आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, या राज्यामध्ये 1 लाख 69 हजार रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टीशनर्स आहेत आणि 572 लोकांच्या मागे एक डॉक्टर असे आता मंत्रीमहोदयांनी सांगितले. राज्याची लोकसंख्या 10 कोटींच्या आसपास आहे. याची तुलना केली तर ग्रामीण भाग आणि शहरी भाग यांचा विचार करता हे आकडयांचे गणित चुकते आहे असे वाटते. प्रमाण व्यस्त आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, राज्यामध्ये 5173 ॲलोपॅथी प्रॅक्टीशनर्स,आयुर्वेद आणि युनानी चे 4500 प्रॅक्टीशनर्स आणि होमिओपॅथीचे 38400 प्रॅक्टीशनर्स आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, परिचारिका आणि अंगणवाडी सेविका या ग्रामीण भागामध्ये जाऊन लोकांच्या आरोग्याची काळजी घेत आहेत. परंतु त्यांच्यासाठी मूलभूत प्रशिक्षण देण्याची सोय नाही. यासाठी एखादे वर्कशॉप,क्लासेसच्या माध्यमातून ट्रेनिंग दिले तर ग्रामीण भागातील लोकांचे आरोग्य टिकविण्यासाठी मदत होऊ शकेल. ग्रामीण भागापुरती ही योजना मर्यादित ठेऊन तेथल्या तेथे त्यांना तो विषय शिकवून एखादा वेगळा कोर्स राज्य शासनामार्फत सुरु करण्यात येईल काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, मा.सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केली आहे. यासंदर्भात नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठाबरोबर चर्चा करुन तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाशी चर्चा करुन धोरण ठरविता येईल. सगळयाच सरकारी आणि खाजगी मेडिकल कॉलेजना सांगण्यात आले आहे की, आता पॅरामेडिकल स्टाफ निर्माण करण्यासाठी प्रयत्न करा. यासाठी जेवढा म्हणून पगार द्यावा लागेल तेवढा द्या. आता केवळ डॉक्टर्स तयार होऊन चालणार नाही तर पॅरामेडिकल स्टाफ सुध्दा तयार करावा लागणार आहे. यासाठी सुध्दा वेगळा ट्रेनिंग कोर्स विकसित करण्याच्या संदर्भात नाशिकच्या मेडिकल विद्यापीठाला जरुर सूचना दिल्या जातील. मा.सदस्यांनी याठिकाणी जी सूचना केली आहे ती मी स्वीकारतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, ज्याप्रमाणे शासनामध्ये प्रोटोकॉल बॅचेस दिले जातात त्याप्रमाणेच डॉक्टरांना देखील बॅचेस दिले तर ओळखण्याच्या दृष्टीने मदत होईल. पूर्वी गाडीवर चिन्ह लावत असत. त्यामुळे डॉक्टरांना मान होता. ज्याप्रमाणे प्रोटोकॉलचा बॅच आहे त्याप्रमाणेच डॉक्टरांना सुध्दा बॅचेस देण्याबाबत शासन विचार करील काय ?

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदया, मा.सदस्यांनी जी सूचना केली आहे त्याबाबत जरुर विचार केला जाईल. महाराष्ट्रामध्ये प्रॅक्टीस करणारे डॉक्टर्स आहेत त्यांना अशा पध्दतीने ओळखपत्रे देणे आणि त्यांचे नंबरींग करणे यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदया, सन 2005 चे वि.प.वि.क्र.17 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2005 चे वि.प.वि.क्र.17 संमत झाले आहे.

-----

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी :सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक**

**मु.शी:L.C.BILL NO.XVIII OF 2005.**

**( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)**

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदया, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 18 - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

सभापती महोदया, भू विकास बॅन्केच्या चर्चेच्या निमित्ताने या विषयावर या पूर्वी बरीच चर्चा झालेली आहे. एक लाख रुपयापर्यतच्या कर्जावर दामदुपटीपेक्षा जास्त दराने व्याज वसूल करण्यात येऊ नये असे या विधेयकात सांगण्यात आलेले आहे. हे विधेयक आणण्याचे कारण म्हणजे मागच्या वेळी या सभागृहात अशी चर्चा झाली होती की, सहकारी बॅन्काना दामदुप्पटीपेक्षा जास्त व्याज वसूल करता येत नाही,मूळ मुद्दलापेक्षा ज्यास्त व्याज त्यांना वसूल करता येत नाही असा नियम आहे,परंतु भू विकास बॅन्का त्या नियमाच्या कक्षेत येत नव्हता त्यामुळे या नियमात सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणले जावे. त्या चर्चेनुसार.त्या संदर्भात शासनाने विचार विनिमय करुन हे विधेयक आणण्याचा निर्णय घेतला आहे .व आज ते विधेयक आपल्यासमोर आणले आहे. आज भू विकास बॅन्काची परिस्थिती फार अवघड झाली आहे.शेतक-यांच्या सात बाराच्या उता-यावर या बॅन्कांच्या कर्जाचा बोजा आहे. आज जवळजवळ 12-13 बॅन्का लिक्वीडेशनमध्ये गेलेल्या असून नॉन फंक्शनल सारखी त्यांची अवस्था झालेली आहे.शेतक-याच्या सात बाराच्या उता-यावर या कर्जाचा बोजा आहे. त्यामुळे या शेतक-यांना दुस-या कोणत्याही बॅन्कांकडून कर्ज घेता येत नाही. चक्रव्याढ पध्दतीने व्याज आकारले जात असल्यामुळे कर्जाची रक्कमसुध्दा प्रचंड वाढलेली आहे. .तेव्हा लहान,मध्यम आणि अल्प भू धारकाला यातून दिलासा मिळावा म्हणून ज्या शेतक-याकडे एक लाख रुपयाच्या मर्यादेपर्यन्त ज्याच्याकडे मोटारीचे आणि पाईप लाईनचे कर्ज असेल अशा शेतक-यांना फायदा मिळावा या हेतूने हे विधेयक आणले आहे.व ते आपल्यासमोर विचारासाठी मांडलेले आहे.त्यावर जास्त चर्चा करावी अशा प्रकारचे हे विधेयक नाही. एवढे बोलून मी माझे भांषण संपवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदया, माननीय सहकार राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडलेले आहे. त्या विधेयकाचे सर्व प्रथम मी स्वागत करतो.मागच्या अधिवेशनामध्ये या संदर्भात या सभागृहात पुष्कळ चर्चा झाली होती.माननीय सहकार मंत्र्यांनी त्यावेळी कबूल केले होते की, या संदर्भात विधेयक आणण्याच्या  बाबतीत निर्णय घेण्यात येईल त्याप्रमाणे या अधिवेशनामध्ये विधेयक आणले गेले आहे. सभापती महोदया, या विधेयकाच्या संदर्भात दोन तीन गोष्टीचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांकडून होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदया, या विधेयकाचे उद्देश आणि कारणांमध्ये असे म्हटले आहे की, "महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,1960 (1961 चा महा.24) च्या कलम 44 फ अन्वये,सहकारी संस्थेवर (सहकारी बॅक धरुन )तिच्या सदस्यांकडून व्याजापोटी,कर्जाच्या (पुनर्वसन कर्ज धरुन, परंतु पाटबंधारे किंवा कृषी विषयक प्रयोजनांसाठी असलेली दीर्घ मुदतीची कर्जे वगळून) मुद्दल रकमेपेक्षा अधिक रक्कम कोणत्याही रीतीने वसूल करण्यास मनाई करण्यात आलेली आहे." दीर्घ मुदतीची कर्जे यातून वगळण्यात आलेली आहेत आणि अल्प मुदतीच्या कर्जाच्या बाबतीत मात्र दामदुप्पट व्याज घेता येणार नाही असे सांगण्यात आलेले आहे.मी गेल्या पंधरा वर्षा पासून जिल्हा बॅन्केचा संचालक म्हंणून काम करीत आहे.या बाबतीत जरी आपण कायदा केलेला असला तरी जिल्हा बॅन्कांच्या माध्यमातून या कायद्याचा आधार घेऊन शेतक-यांना त्याचा निश्चितपणे फायदा मिळतो काय यासंबंधी विचार केला पाहिजे. एखाद्या केसमध्ये व्यवस्थापन मंडळाने  असा निर्णय घेतला की, दामदुप्पटीपेक्षा जास्त व्याज आकारण्यात येऊ नये तर अडचण निर्माण होते आज सकाळी  प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न विचारण्यात आला असतांना असा खुलासा करण्यात आला होता की, एखाद्या सहकारी बॅन्केने जर असा निर्णय घेतला तर त्याबाबतीत ऑडिट ऑब्जेक्शन येत असते. त्यामुळे सहकारी बॅन्का दामदुपटीने व्याज वसूल करीत असतात. खरे म्हणजे शेतक-यांना त्याची पुरेपूर माहिती नसते.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

आणि म्हणून नवे जुने करून हा प्रश्न सुटणार नाही. कारण त्याचे कर्ज वाढतच जाते. म्हणून सहकारी बँकांमध्ये देखील हे कटाक्षाने पाळले गेले पाहिजे. सहकारी बँकांच्या माध्यमातून अशा प्रकारे दामदुपटीने वसुली या बँकांनी केली नाही तर कोठलाही ऑडिटचा मुद्दा उपस्थित होणार नाही कारण आपण आता कायद्यात सुधारणा केलेली आहे. तेव्हा आपण आज भूविकास बँकांसाठी हे दुरुस्ती विधेयक आणले आहे पण जिल्हा सहकारी बँकांच्या माध्यमातून देखील शेतकऱ्यांकडून दामदुपटीने वसुली न करण्याचे धोरण अधिक कटाक्षाने राबविले गेले पाहिजे अशा सूचना आपण केल्या पाहिजेत किंवा ते अमलात आणले पाहिजे त्याशिवाय याचा उपयोग होणार नाही तसेच यामध्ये दीर्घ मुदतीची कर्जांचा देखील समावेश केला पाहिजे. कारण शेवटी या जिल्हा सहकारी बँकेकडून कर्ज घेणारा हा शेतकरीच असतो. मग तो कधी आपल्या विहिरीसाठी, पंपासाठी, पाईप लाईनसाठी कर्ज घेत असतो. शेतीपूरक धंद्यांसाठी कर्ज घेतले असेल तर त्या कर्जाचा समावेश देखील आपण यामध्ये करावा. पण मुख्यत: शेतीचे उत्पादन वाढीसाठी लागणाऱ्या सोयी-सुविधांसाठी तो कर्ज घेतो, त्या कर्जाला मात्र हे आवर्जून लागू करावे. कारण अनेकदा नैसर्गिक आपत्तीमुळे तो दबला गेला असेल आणि त्यामुळे ते कर्ज तो फेडू शकला नसेल तर त्यालाही यामध्ये आपण घेतले पाहिजे. सहकारी बँकांची दीर्घ मुदतीची कर्जे असतात त्याचाही यामध्ये समावेश केला पाहिजे. सभापती महोदया, नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातून आजकाल शेतकऱ्याला कर्ज दिले जाते. पीक कर्ज, औजारांसाठी कर्ज, शेती विकासासाठी कर्ज दिले जाते पण या बँका दामदुपटीने ते कर्ज वसूल करतात. नैसर्गिक आपत्तीमुळे म्हणा वा अन्य अशाच काही कारणांमुळे तो 5-10 वर्षे तो ते कर्ज फेडू शकत नाही आणि मग 10 हजार रुपयांचे कर्ज असेल तर त्या जागी तो 60-70 हजार रुपये बँकेकडे व्याजातून जमा करतो पण तरीही ते कर्ज फिटले जात नाही. म्हणजे जवळपास 10 पटीने हे कर्ज वाढत जाते. म्हणूनच आपण हे विधेयक संयुक्तपणे आणले असते तर त्याचे स्वागत आम्ही अधिक जोराने केले असते एवढे बोलून मी भाषण संपवितो.

***

...... 4एक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, अतिशय चांगल्या स्वरूपातील हे विधेयक आहे. माझ्या मनामध्ये या संदर्भात काही प्रश्न आहेत आणि ते मी आजच्या सकाळच्या प्रश्नाच्या वेळी मांडण्याचा प्रयत्न करीत होते. अनेक उपेक्षित घटकांशी संबंधित असे हे प्रश्न आहेत पण त्यांना वावच राहत नाही. सभापती महोदया, या विधेयकाच्या निमित्ताने मला आपल्याला सांगावयाचे आहे की, यामध्ये जेथे जेथे शेतकरी म्हटलेले आहे त्यामध्ये महिलांचाही समावेश आहे का ? आपण पाहिले असेल की, बऱ्याच ठिकाणी महिला बचत गटामध्ये शेतकरी महिलाच आहेत आणि त्यांच्या संदर्भात तुम्ही जी पुढील कारणे दिलेली आहेत की कशा कशासाठी कर्ज काढले असेल, त्यामध्ये शेती उत्पन्नावर प्रक्रिया करणे, कुटिरोद्योग, सामाजिक वनीकरण वगैरे. तर ही सर्व अल्पमुदतीची कर्जे आहेत. मला या ठिकाणी दोन गोष्टींकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे. 30 एप्रिल 2005 ला पुण्यामध्ये केंद्र सरकारच्या योजनांसंदर्भात माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांनी एक बैठक आयोजित केली होती आणि त्या बैठकीला सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील हे देखील उपस्थित असल्याचे मला आठवते आहे. तेव्हा त्यांना आठवत असेल की, मी त्यावेळी असा प्रश्न विचारला होता की, महिला बचत गटाला जे कर्ज दिले जाते त्यामध्ये व्याजावर व्याज आकारले जाते का ? त्या संबंधात मग माननीय श्री.शरद पवार यांनी मध्यवर्ती बँकांच्या लोकांना विचारले असता त्यांनी संगितले की, आम्ही अशा प्रकारे व्याज आकारीत नाही. परंतु नाबार्ड कडून मात्र अशा प्रकारे व्याजावर व्याज आकारले जाते. त्यामुळे हे लागू झाल्यावर अवर्षण भागातील बचत गट आहेत त्यांची अल्प मुदतीची कर्जे दीर्घ मुदतीची झालेली आहेत. ...

( यानंतर श्री.जागडे ...4वाय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नीलम गो-हे.....

कारण या महिला कर्जाची परतफेड करण्याच्या परिस्थितीत नाहीत. त्यांना त्यांच्या व्याजात सूट देण्यात यावी, म्हणून आम्ही महिला आणि बाल कल्याण विभागाकडे अनेक निवेदने दिली आहेत. परंतु या विभागाने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. ज्या ज्या वेळी अर्थमंत्री या सभागृहात येतात, त्यावेळी आम्ही सतत या बाबतची मागणी करीत असतो. त्यामुळे महिलांच्या या बचतगटाचा विचार केला पाहिजे. त्याना व्याजात सूट देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. " आमची माती आणि आमची माणसे " असा कार्यक्रम दूरदर्शनवर दाखविला जातो. आता यामध्ये पुरुषच नसतात. तर दोन तृतियांश महिलांच्या श्रमावरच शेती उभी राहत असते. माननीय मंत्रिमहोदय हे ग्रामीण भागातील असल्यामुळे त्यांना मी जास्त सांगण्याची आवश्यकता नाही. नाबार्डच्या माध्यमातून महिला आर्थिक विकास महामंडळाला कर्ज दिले जाते. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत ग्रामीण भागातील बचत गटातील महिलांना कर्ज दिले जाते. तेव्हा या महिलांना देण्यात येणा-या कर्जावरील व्याजात सूट देण्याबाबतचा विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने ग्रामीण भागातील शेतक-यांचा विचार आपण करीत आहोत. परंतु शहरी भागातील गरीब लोकांना खावटी कर्जे देण्यात येते. आता शहरातील मोठमोठे कर्जदार लोक आहेत, त्यांचा विचार करण्याची गरज नाही. परंतु जे गरीब लोक, गरीब महिला आहेत, त्यांना कर्जावर व्याज द्यावे लागणार नाही, याचा विचार शासनाने करावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, या विधेयकाच्या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना काही प्रश्न विचारावयाचे आहेत. तसेच काही सूचना करावयाच्या आहेत. या विधेयकाच्या पान क्र. 9 वरील परिच्छेद क्र. 2 मध्ये असे म्हटले आहे की, " कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या किंवा शिखर कृषी आणि ग्रामीण विकास बँकेच्या बाबतीत ज्या सदस्यांनी त्या बँकेकडून कोणतेही कर्ज घेतलेल नाही, अशा सदस्यांचे अशा बँकेच्या समितीवर एकाहून अधिक प्रतिनिधी असणार नाही आणि असा प्रतिनिधी पदनिर्देशित अधिकारी म्हणून निवडून येण्यास किंवा नेमला जाण्यास पात्र असणार नाही. " आता या ठिकाणी व्याख्या करण्यात आली आहे, त्याची व्याप्ती त्या व्यक्तीच्या कुटुंबापर्यन्त वाढवावी. कारण आज संचालकांच्या कुटुंबियांच्या नावावरच मोठ्या प्रमाणात कर्ज घेतल्याचे दिसून येत आहे. त्याबाबतचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा.

सभापती महोदया, शेतक-यांना चार टक्के व्याजाच्या दराने कर्जपुरवठा करण्याबाबत फायनान्स टू द फार्मींग असले पाहिजे. शेतक-यांना कर्जपुरवठा करीत असताना हॉनेस्टी आणि वायाबिलीटीचा विचार झाला पाहिजे. Finance should be given to honest than the viability. जे लोक कर्ज बुडविणारे असतील त्यांना कर्ज देऊ नये. यामध्ये हॉनेस्टीचा विचार झाला पाहिजे. अशा प्रकारचे निकष या ठिकाणी लावणे गरजेचे आहे. सभापती महोदय, आज परिस्थिती अशी आहे की, घेतलेल्या कर्जाची रक्कम दुप्पट होते. एखाद्या शेतक-यांने 50 हजार रुपयाचे कर्ज घेतले असेल तर त्याचा व्याजाचा विचार करता ते दुप्पट होते. शेतक-याला दिलेल्या कर्जामुळे त्या शेतक-याची उलाढाल वाढलेली आहे काय ? त्या उलाढालीतून शेतकरी आपल्या कर्जाची परतफेड करीत आहे काय ? याचा विचार झाला पाहिजे. समजा एखाद्या शेतक-याला जिल्हा मध्यवर्ती बँकेने 50 हजार रुपयाचे कर्ज दिले असेल तर त्याचे वर्षाचे व्याज 9 हजार रुपये होते. आता त्या शेतक-यांने आपले व्याज बँकेला भरले नाही तर व्याजाच्या रकमेचा प्रश्न उभा राहतो. त्यामुळे त्या शेतक-याला पुन्हा 10 हजार रुपयाचे कर्ज दिले जाते आणि त्यातून 9 हजार रुपयाची व्याजाची रक्कम कापून घेतली जाते.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी.....

असे चालू राहील. आणि ऑन पेपर दिसत राहील की, दरवर्षी कर्ज दिले जाते. खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना कर्ज देत असतांना त्याला चाट लागलेली असेल आणि त्याच्या खिशात कमी कर्ज पडलेले असेल. त्याचा बोजा वाढत जाईल.परंतु शेतकरी कधीही ऑन पेपर दुप्पट कर्जामध्ये गेलेला आपल्याला दिसणार नाही. आणि म्हणून यामध्ये असलेल्या मूलभूत गोष्टींचा आपण विचार करणार आहोत कां? वर्षअखेर त्याचे अकाऊंट ॲनालिसीस होऊन त्याची अंमलबजावणी होणार आहे कां हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. त्यासाठी कायद्यामध्ये तरतूद कुठेच दिसत नाही. आज नॅशनलाईज बँकेचे अकाऊंट बघत असतांना ते एन.पी.ए. अकाऊंट व्हेरिफाय करीत असतात. Where the receivable are coming from नेमके ते पैसे कोठून आले हे व्हेरिफाय करतात ते करीत असतांना कर्जाची रक्कम दुसरीकडून घेतली असेल तर ते पहिले अकाऊंट आणि दुसऱ्या अकाऊंट दोघांनाही एन.पी.ए. करुन टाकतात. ही तरतूद आपण खऱ्या अर्थाने करणार काय? हा माझा महत्वाचा प्रश्न आहे. शेवटचा प्रश्न असा आहे की, प्रत्येक शेतकऱ्याकडून आपण शेअर कॅपिटल घेणार? शेअर कॅपिटल घेतल्यानंतर त्यांना डिव्हिडंड कां देणार नाही? त्याला शेअरची रक्कम परत देणार कां? शेअर सर्टिफिकेट देणार कां? यापैकी कोणतीही गोष्ट आपल्याला करावयाची नसेलतर शेअर घेण्याचा अधिकार आपल्याला आहे काय? किमान व्याज दर एक-दोन टक्का कमी करुन शेतकऱ्यांवरील बर्डन आपण कमी करणार कां? या प्रश्नाचे उत्तर आपण या निमित्ताने द्यावे अशी मी विनंती करतो..

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 18 महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक सभागृहामध्ये मांडण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे एक चांगले विधेयक आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विधेयकाच्या उद्देश व कारणामधील ज्या बाबींचा उल्लेख केला. ती मी याठिकाणी वाचून दाखवितो. "परंतु पाटबंधारे किंवा कृषीविषयक प्रयोजनांसाठी असलेली दीर्घ मुदतीची कर्जे वगळून " असा या ठिकाणी उल्लेख केला आहे. हे बघितल्यानंतर मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, कर्ज हे कर्ज आहे. ते कशापध्दतीने फेडले जाते हे पाहिले पाहिजे. राष्ट्रीयीकृत बँकांचा आज नियम असा आहे की, एम.पी.ए. होत असेल तर वन टाईम सेटलमेंट करण्याची तरतूद आहे. मुंबई शहरामध्ये सहकारी बँका आहेत. त्यांच्याकडे एम.पी.ए.चा वर्षाच्या शेवटी आढावा घेतात. तेव्हा एम.पी.ए. वाढलातर त्याचा परिणाम बँकेवर होतो. आणि ते टाळायचे असेल तर वन टाईम सेटलमेंटची त्यामध्ये तरतूद आहे. असे पुष्कळ वन टाईम सेटलमेंटमध्ये येतात. आणि त्यामध्ये व्याज जर मुद्दल रकमेपेक्षा जास्त झाले असेलतर ते माफ केले जाते किंवा सोडून दिले जाते अशातऱ्हेची तरतूद आहे. आणखी एक गोष्ट मला खटकली की, या ठिकाणी आपण 1 लाख रुपयांची मर्यादा कोठून आणली आहे. ती वाढवून आपण 5 लाखाची करावी. 1 लाखाची मर्यादा करण्याचे कारण काय आहे हे याठिकाणी स्पष्ट झाले पाहिजे. शेवटी शेतकरी हा चैन म्हणून कर्ज घेत नाहीतर गरज म्हणून घेतो. ती गरज तपासून घेऊन आवश्यक तेवढे कर्ज मिळेल ही व्यवस्था पहाण्याची आपली जबाबदारी आहे. बँकेकडे कर्ज मागितल्यानंतर कर्ज दिल जाते. परंतु त्याच्याकडे असलेले ॲसेट्स, त्याची परतफेडीची कुवत लक्षात न घेता कर्ज दिले तर त फेडायचे कोठून? प्रत्येक व्यक्तीला पैसा हा हवा असतो. पंरतु ज्या कामासाठी तो घेतला असेल तर त्या कामासाठी खर्च न होता अन्य कामांवर खर्च झाला तर ते व्यवस्थापनाने लक्षात घेणे आवश्यक आहे. परंतु तसे होत नाही आणि म्हणून शेतकरी कर्जबाजारी होतो. आणि कर्ज न फेडल्यामुळे चक्रवाढ पध्दतीने त्याच्या व्याजाची रक्कम वाढत जाते. त्याचा परिणाम सहकारी बँकामधून जे कर्ज घेतात त्यांच्यावर होतो. माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी प्रश्न उपस्थित केला की, ज्यांनी बँकेकडून शेअर घेतले असेल तर त्यांना बँक डिव्हिडंड देणार. आणि जर बँक तोटयात गेली तर त्यांना डिव्हिडंड देणार नाही, परंतु त्यांचे बँकेमधील शेअर शिल्लक रहातात.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

परंतु जे लोक कर्जच घेत नाहीत त्यांना डिव्हिडंडचा फायदा मिळत नाही. आज 100 टक्के लोक कर्ज घेतात असे नाही, काही लोक घेतही नाहीत. जसे सहकारी बँकेमध्ये होते त्याप्रमाणे या ठिकाणी करणार काय हे या ठिकाणी स्पष्ट झाली पाहिजे. आपण कायद्यामध्ये तरतूद केली नाहीतर त्याचा निराळा अर्थ लावला जाईल. आणि त्या प्रमाणे व्यवहार केला जाईल. आणि म्हणून या सर्व गोष्टींची स्पष्टता झाली पाहिजे. आणि 1 लाखाचे बंधन आहे ते 5 लाखापर्यंत केले पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

शेतक-यांना कर्ज देताना शेतक-यांची ऐपत पाहून, त्याच्याकडे किती जमीन आहे ? त्याच्यावर जबाबदारी किती आहे ? कर्ज घेतले तर तो ते फेडू शकतो का ? याचा विचार करुन ही मर्यादा वाढविण्याची आवश्यकता आहे. याठिकाणी एक लाखाची मर्यादा घातली आहे. पण हल्ली एक लाखाची मर्यादा म्हणजे काहीच नाही. 1 लाखाला काय किंमत आहे ? पूर्वीचे एक हजार ते आताचे एक लाख झाले आहेत, ही आज पैशाची स्थिती झाली आहे. या पार्श्वभूमीवर आपण 21 व्या शतकात 2005 मध्ये ही सुधारणा करीत आहोत, आपण आता 19 व्या किंवा 20 व्या शतकात नाही. याचा कायद्यात सुधारणा करताना विचार केला पाहिजे. आपण जी सुधारणा करीत आहोत, ती पुढचे कमीतकमी 25 वर्षे तरी टिकली पाहिजे. तोपर्यंत त्यात आणखी सुधारणा करण्याचा प्रसंग या सदनावर येता कामा नये याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. तशी आपण याठिकाणी काळजी घेतली आहे का ? याठिकाणी विधेयकाच्या उद्देश व कारणे मध्ये म्हटले आहे की, "उक्त कलम 44 (क) मध्ये योग्य ती सुधारणा करुन ज्यांनी कृषी व ग्रामीण विकास बँकेकडून 1 लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतके कर्ज घेतले असेल अशा शेतक-यांकडून," तर हे बदलण्यात यावे. समजा पाच लाखापर्यंत करावयाची नसेल तर निदान तीन लाखापर्यंत केली तरी चांगले होईल आणि शेतक-यांना दिलासा मिळेल. आपण महाराष्ट्र सहकारी (सुधारणा) अधिनियमात सुधारणा करीत आहोत. तेव्हा ही सुधारणा डोळयात भरण्यासारखी असू द्या आणि ही सुधारणा केल्यावर शेतक-यांनाही वाटले पाहिजे की, या कायद्यात परिवर्तन झाले आहे आणि ते आपल्या फायद्याचे आहे असा काहीतरी चमत्कार करण्याची आवश्यकता आहे. केवळ बँकचा फायदा पाहून चालणार नाही. बँक टिकलीच पाहिजे. बँक असेल तर शेतकरी उभा राहणार आहे. बँक टिकली नाही तर शेतक-यांची काय परिस्थिती होईल ? आज भूविकास बँकेची काय परिस्थिती आहे ? आज अनेक ठिकाणचे कर्मचारी कर्ज वसूलीचे काम करतात. भूविकास बँक बंद होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आपण ज्या सुधारणा करतो, त्या प्रोग्रेसिव्ह असतील तर भविष्य काळात बँकेचा विकास जरुर होईल. परंतु त्याचबरोबर शेतकरी सुध्दा सुखी होईल या दृष्टीकोनातून आपल्यावर खूप मोठी जबाबदारी आहे, ती आपण पार पाडावी आणि त्यादृष्टीने आपण या सुधारणेकडे पहावे एवढेच मला सांगावयाचे आहे. धन्यवाद.

-----

. . . .5 ए-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, भूविकास बँकेच्या सुधारणेसंबंधात सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री.श्रीकांत जोशी, मधुकर सरपोतदार, डॉ.नीलम गो-हे यांनी वेगवेगळया सूचना केल्या आहेत, त्या सूचनांचे मी स्वागत करतो. या बिलाचा स्कोप मर्यादित होता. चार वर्षापूर्वी भूविकास बँक महाराष्ट्रात एक होती आणि जिल्हयाजिल्हयात त्याच्या शाखा होत्या. तसे पाहिले तर 1990 पासूनच बँकेचे चित्र बिघडत गेले. आज भूविकास बँकेची थकबाकी 1400 कोटी रुपयांच्या जवळपास आहे आणि या 1400 कोटी रुपयाला शासनाची हमी आहे. यापूर्वी राज्य शासनाने काही पैसे भरलेले आहेत. 15-16 बँका अवसानयात काढल्या आहेत. नागपूर हाय कोर्टाच्या ज्युरिडिक्शनमध्ये येणा-या बँकांना स्थगिती आहे आणि पश्चिम महाराष्ट्रातील 15 बँका सुरु आहेत. पण त्यांनी सुध्दा मागच्या तीन वर्षात केवळ 4 कोटीचे कर्जवाटप केले आहे आणि वसूलीचे प्रमाणही अत्यल्प आहे. अशा वेळी प्रयोग म्हणून त्यांना एक सवलत द्यावी आणि त्यातून काही वसूली होते का ? या दृष्टीने फक्त हे सुधारणा विधेयक आणले आहे. जेणेकरुन 7:12 वरचा बोजा कमी व्हावा. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे काही प्रमाणात मध्यम, लहान शेतक-यांसाठी हे शासन जास्तीतजास्त काळजी करीत आहे. या सुधारणेच्या माध्यमातून त्यांना रिलीफ मिळाला, चांगले वाटले तर सन्माननीय सदस्य सांगतात, त्याप्रमाणे ही मर्यादा तीन लाखापर्यंत पुढे वाढविण्याच्या बाबतीत काहीही अडचण नाही. सन्माननीय सदस्यांनी सबसिडीच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. भूविकास बँक, तसेच इतर बँका एवढया तोटयात असल्यानंतर किंवा अवसानयात आल्यानंतर डिव्हीडंटचा प्रश्न येत नाही. सुधारणेच्या बाबतीत एक मुद्दा उपस्थित केला की, 73(अ) प्रमाणे विवक्षित समितीच्या बाबतीत काहीही बदल नाही. फक्त भूविकास बँकेचे विभाजन झाल्यानंतर एक शिखर शाखा आणि बाकी जिल्हा शाखा, तेवढयापुरती मर्यादित ही दुरुस्ती आहे. पण कोणत्याच बँका फायद्यात नसल्यामुळे डिव्हीडंटचा प्रश्न येत नाही. ग्रामीण भागात सोसायटीच्या माध्यमातून, नागरी बँकेच्या माध्यमातून, भूविकास बँकेच्या माध्यमातून कर्ज दिले जाते. याबाबतीत पूर्वी सदनामध्ये चर्चा केल्यानंतर माननीय सभापती सर्व पक्षाच्या प्रमुखांबरोबर एकत्र बसून यातून मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. आज जे चित्र निर्माण झालेले आहे, ते गेल्या 15 वर्षापासून साठत-साठत हे अवघड चित्र निर्माण झालेले आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . . .

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी सौ.रणदिवे.. 20:15

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (पुढे चालू..

आणि त्याला इलाज अर्ध्या तासाच्या चर्चेत किंवा एका तासाच्या चर्चेत किंवा नियम सुधारुन निघणार नाही तर दीर्घ मुदतीचे प्लॅनिंगच आपल्या सगळयांना मिळून करावे लागणार आहे आणि यातून मार्ग काढावा लागणार आहे. कारण शेतीचे कर्ज हे इंडस्ट्रीसारखे किंवा शहरात दिलेल्या ॲशुअर्ड फायनान्ससारखे नाही. मी नेहमीच सांगतो की, "wherever there is a life, there is a risk." प्रत्येक झाडामध्ये, पिकामध्ये जीवन आहे आणि जेथे जेथे जीवन असते त्या ठिकाणी रिस्क असते. शेती हा जगातील सगळया व्यवसायामधील रिस्की व्यवसाय आहे.

Shri Madhukar Sarpotdar: It is applicable to human body.

Shri Jaiprakash Dandegaonkar: That is why wherever there is life, there is risk. आपण झाडामध्ये जीवन आहे असे समजतच नाही. त्यामुळे तेथे देखील लाईफ आहे, त्यामुळे तेथील फायनान्स देखील रिस्की फायनान्स आहे. जगातील सगळया फायनान्शियलमधील जास्त रिस्की फायनान्स हा शेतीचा आहे. कारण अनेक फॅक्टर्सवर हा अवलंबून असतो म्हणून सहकारी बँका असो किंवा अर्बन बँकांनी शेतीला दिलेले कर्ज असो किंवा भूविकास बँकांनी शेतीला दिलेले कर्ज असो ही कर्जे बऱ्याचप्रमाणात थकित राहिली. कारण तेथील माणूस व्यवसाय म्हणून नाही तर चरितार्थासाठी शेती करतो. जेव्हा चरितार्थालाच कमी पडते, तेव्हा बँकेचे चक्रवाढ व्याज आहे, सावकारी कर्ज आहे याचा तो कोठेही विचार करत नाही. म्हणून शेतीच्या कर्जाच्याबाबतीत हे अडचणीत आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी बचत गटाच्याबाबतीत मुद्दा उपस्थित केला. काही बचत गटांना जिल्हा बँकांकडून फायनान्स मिळतो. भूविकास बँकांनी बचत गटाला फायनान्स केलेले आहे आणि त्याला चक्रवाढ व्याज वगैरे आहे, असे कोठे झालेले आहे, असे मला वाटत नाही. या दृष्टीने काय करता येईल हे पाहिले जाईल. तसा जिल्हा बँकांना देखील सूचना देऊ. पण आपण देखील जेव्हा जागतिकरणाची भाषा करतो, जागतिक स्पर्धेमध्ये उतरण्याची भाषा करतो, तेव्हा आपण देखील आता शेतीचे चित्र आता बदलण्याची गरज आहे, त्याला फार मोठयाप्रमाणात फायनान्सची गरज आहे. देशाचे अर्थसंकल्प आपण पाहिले तर 1970 ते 1980 च्या दरम्यान शेतीला 8 टक्के कर्जपुरवठा होत होता. 1980 ते 1990 च्या दरम्यान साधरत: पावणेपाच टक्क्याच्या जवळपास कर्जपुरवठा होत होता. मग फॅसिलिटी असो किंवा लोन आहे या प्रमाणात दिला जाते. पुढच्या काळामध्ये ते दोन अडीच टक्क्यापर्यन्त आलेले आहे. एका

...5B-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (पुढे चालू..

बाजूला 70 टक्के लोक ग्रामीण भागात रहातात आणि 70 टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय शेती किवा शेतीवर उपजिविका करणारे मजूर असतील रोजंदारी करणारे लोक आहेत. हे सगळे असतांना या सगळयाबाबतीत जे आज चित्र आहे त्याबाबत आपण सगळयांनीच एकत्र बसून शेतीसाठी एक व्यापक धोरण आखले पाहिजे. सहकार खात्यापुरते मर्यादित त्यातल्या त्यात कसा रिलीफ देता येईल, यादृष्टीने भूविकास बँकेचे जे कर्जधारक आहेत त्यांना काही प्रमाणात रिलीफ मिळावा, म्हणून हे विधेयक आणलेले आहे. मी आपल्या सगळया सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचे स्वागत करतो. पुन्हा या सूचनांच्या सुधारणेमुळे शेतकऱ्यांना काही उपयोग होत असेल तर त्याही बाबी पुढच्या काळामध्ये विचारात घेऊन, तशा सुधारणा आणण्यात येतील, एवढेच मी आपल्यामार्फत सर्व सभागृहाला आश्वासन देतो.

श्री.दिवाकर रावते : या सदनामध्ये साधे निवेदन आणण्याचीसुध्दा जाणीव न बाळगणाऱ्या अशा मंत्रिमंडळामध्ये गेल्यावेळच्या चर्चेमध्ये सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी शब्द दिली होता की, पुढच्या अधिवेशनामध्ये हे विधेयक मी आणतो. त्यांनी दिलेला शब्द पाळून हे विधेयक आणल्याबद्दल मनापासून त्यांना आम्ही धन्यवाद देतो. निवेदन न आणणाऱ्या मंत्री महोदयांनी त्यांच्यापासून धडा घ्यावा असे मी सांगतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते (दोन्ही संम्मिलित) 10 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 18 -महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक,2005 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 18 संमत झाले आहे.

--

यानंतर कु.थोरात...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत.</u>**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशन असा आहे की, या सदनामध्ये सलमान खानच्या प्रकरणाच्या संदर्भातील निवेदन करण्यात येईल अशा प्रकारचे मंत्रिमहोदयांनी सांगितले होते. ते निवेदन अद्याप झालेले नाही.

श्री. गुरुनाथ कुलकणी : सभापती महोदया,माननीय उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी या सभागृहात त्यासंबंधीचे निवेदन केलेले आहे. आणि ते रेकॉर्डवर आलेले आहे.माननीय उपमुख्यमंत्र्यांनी ते निवेदन सभागृहात वाचलेले आहे. फक्त त्यावेळी ते निवेदन सर्क्युलेट केले नव्हते.

**तालिका सभापती** : निवेदन करण्यात आलेले आहे.

आता विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो वाचून दाखवतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा) विधेयक.

मु. शी. सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 68- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा) विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे, या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधानपरिषदेने सहमती देण्याची विनंती करणारा विधानसभेचा संदेश व प्रस्तावास सहमती.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सचिव तो वाचून दाखवतील.

**संदेश**

उप सचिव : महाराष्ट्र विधनसभेने दिनांक 21 जुलै,2005 रोजी झालेल्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानपरिषदेच्या सहमतीसाठी महाराष्ट्र विधानसभेच्या नियमातील नियम 129 व 198(2) अन्वये पाठविण्याचा मला निदेश दिला आहे.

**प्रस्ताव**

सन 2005 चे विधानसभा विधेयक क्रमांक 68- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2005 विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभगृहांच्या 17 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

श्री. हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदया, दिनांक 21 जुलै,2005 ला झालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास सभागृहाने अनुमती द्यावी असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

"सन 2005 चे विधानसभा विधेयक क्रमांक 68- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2005. विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 17 सदज्ञस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश् देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"सन 2005 चे विधानसभा विधेयक क्रमांक 68- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2005. विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 17 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश् देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे आणि या समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत. :-

1) श्री. धनाजी साठे, वि.प.स.

2) श्री. सुरेश देशमुख, वि.प.स.

3) श्री. जणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

4) श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स.

5) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. बरवड..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक

**L.C. BILL NO. XIX OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT)**

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदया, सन 2005 चे वि. प. वि. क्रमांक 19- मुंबई महानगरपालिका अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 140 अन्वये मालमत्ता कर आकारण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. प्रामुख्याने मुंबई बेटावर 1940 च्या अगोदर पासूनच्या अनेक इमारती आहेत. त्यामुळे अशा मोडकळीस आलेल्या ज्या इमारती आहेत, ज्यांना सेस बिल्डींग असेही म्हटले जाते, अशा मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी आणि पुरर्विकास ही आवश्यक बाब आहे. आजमितीला जो मालमत्ता कर आकारण्यात येतो तो रेटेबल व्हॅल्यूवर आहे. जुन्या काळामध्ये, त्या त्या काळात जे भाडे होते त्या भाडयाच्या अनुषंगाने जो मालमत्ता कर आकारला जातो तो निश्चितच कमी आहे. म्हणून ज्यावेळी या मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी किंवा पुनर्विकास करण्याची गरज पडते त्यावेळी मात्र त्यांचा मालमत्ता कर कित्येक पटींनी वाढल्याशिवाय राहात नाही. या ठिकाणी विधिमंडळाच्या माध्यमातून सातत्याने मागणी होत होती आणि मुंबईतील लोकांची देखील सातत्याने मागणी होती की, मोडकळीस आलेल्या जुन्या इमारतींचा ज्यावेळी पुनर्विकास होतो त्यावेळी अशा इमारतींना प्रॉपर्टी टॅक्समध्ये सवलत दिली पाहिजे. ही सवलत देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने 114ड हे नवीन पोटकलम यामध्ये घातलेले आहे. त्याच्या माध्यमातून या सेस इमारतीच्या सर्व भाडेकरुंना मोठी सवलत मिळू शकणार आहे. या विधेयकाला सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, या सदनामध्ये सन्माननीय सदस्यांना अशासकीय बिलाच्या माध्यमातून एखादा कायदा यावा असे वाटत असते. कायदा करण्याचा अधिकार सत्तारुढ पक्षाला असल्यामुळे कायद्यासंबंधी चर्चा करुन आपले मत मांडणे व जास्तीत जास्त जागरुकता दाखवून एखादी सुधारणा आणावयाची आणि ती मंजूर होते किंवा नाही ते सांगता येत नसते. म्हणून सत्तारुढ पक्षाकडून होणारा कायदा स्वीकारणे भाग असते. अशा वेळी सदनामध्ये येणा-या लोकप्रतिनिधींना विविध कायदे कसे असावेत यासंबंधी ज्यावेळी असे मत मांडतात त्यावेळी अशासकीय विधेयकातून ते येत असते. अनेक शासकीय विधेयके येत असतात, चर्चा होत असते, प्रत्येकाला 45 मिनिटांचा वेळ उपलब्ध असतो, त्यानंतर संबंधित मंत्री विनंती करतात की, शासन पूर्णपणे गंभीरपणे या बाबीचा विचार करील. यासंबंधीचा निर्णय घेईल, त्यामुळे अशासकीय विधेयक मागे घ्यावे. त्याप्रमाणे ते विधेयक मागे घेण्यात येते आणि जनमाणसाची भावना मांडण्यात येते. यासंदर्भामध्ये या मुंबई शहरामध्ये पिढयांपिढया, वर्षानुवर्षे राहणारे जुन्या इमारतीचे भाडेकरु आहेत ज्याचा उपकरप्राप्त इमारत म्हणून उल्लेख केला की, 62-63 पूर्वी मुंबईमध्ये ज्या इमारती आहेत त्यांना हा कायदा लागू झालेला आहे. पुनर्बांधणी व घरदुरुस्ती हा पर्याय असतो. अशा इमारती मोडकळीस आल्या असतील आणि पडण्याच्या स्थितीत आल्या असतील त्यांची म्हाडाच्या माध्यमातून पुनर्बांधणी करावी आणि काही इमारतींची दुरुस्ती करावी. या दुरुस्तीचा सेस सुरुवातीला 1978 मध्ये 75 रुपये होता, आता तो 1200 रुपये झाला आहे म्हणजे एवढया मोठया प्रमाणात खर्च वाढलेला आहे. आता 1200 रुपये झाल्यामुळे आमदार निधी हा विषय आलेला आहे. मुंबईच्या मूळ भाडेकरुंचे भवितव्य अंधारमय झाल्यामुळे आणि सरकारच्या पुनर्बांधणीच्या कक्षेत ते बसत नसल्यामुळे शासनाने निर्णय घेतला की, सर्व जबाबदारी सरकार पेलू शकत नाही म्हणून तो खर्च जे भूधारक आहेत ते पुनर्बांधणी करणार असतील आणि वर्षानुवर्षे राहणा-या भाडेकरुंना मालकी हक्कावर सहकारी सोसायटया निर्माण करणार असतील तर त्यांना 1.33 क्षेत्रफळ द्यावयाचे. त्यानंतर 2.5 क्षेत्रफळ देण्याचा निर्णय घेतला. काही इमारती जुन्या आहेत की त्या याही क्षेत्रफळाच्या पलीकडच्या आहेत. त्यांच्यासाठी असा कायदा केला की, भाडेकरुंना जेवढे देण्यात येईल त्याच्या 50 टक्के, मग त्याला चटई क्षेत्राची जी मर्यादा होती ती

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते....

पुढे गेली. उद्देश एवढा होता की, सरकारला करता येत नाही ते खाजगी माध्यमातून व्हावे व जुन्या भाडेकरुंना संरक्षण मिळावे. हे करीत असताना अशा इमारती बांधल्या गेल्या, काही म्हाडाने बांधल्या आणि त्यातील भाडेकरु संक्रमण शिबिरातून आल्यानंतर त्यातील बरेचसे 1000 रुपये, 700-800 रुपये महिन्याला कमविणारे होते त्यांना 1500 रुपये, 2000 रुपये इतर करापोटी देण्याची परिस्थिती आली. या भाडेकरुंनी मुंबई शहरासाठी मोठे योगदान दिलेले आहे. त्यांनी आवाज उठविला, श्री.प्रभाकर कुंटे यांनीही आवाज उठविल्यानंतर त्याच्यातील कलम बदलल्यानंतर त्याचे भाडे कमी केले गेले. अशारितीने या पुनर्रचित नवीन इमारती बांधण्यात आल्या आणि त्यांना तेथे जाणे भाग पडल्यामुळे पूर्वी जे 12 रुपये, 13 रुपये भाडे देत होते अशा भाडेकरुंना 500 ते 700 रुपये देण्याची पाळी आली.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 20:35

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

त्यामुळे त्यांचे धाबे दणाणले. काही ठिकाणी 1000 रु. तर काही ठिकाणी 1200 रु. हा टॅक्स भरण्याची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर हा विषय अत्यंत गंभीर झाला. प्रत्येक भागातील लोकप्रतिनिधी या प्रश्नासंबसंधीच्या भावना व्यक्त करु लागले. आर्किटेक्ट श्री. बबलानी यांनी माझी भेट घेऊन त्यांनी जुन्या इमारतींच्या पुनर्वसानाच्या संदर्भात आणि रेटेबल व्हॅल्यूच्याबाबत मला माहिती दिली. त्या माहितीच्या आधारे मी 2001मध्ये या कायद्यामध्ये परिवर्तन व्हावे म्हणून अशासकीय विधेयक मांडले. आर्किटेक्ट श्री. बबलानी यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे मी या सदनामध्ये विचार मांडले. त्यावेळी श्री. सुनील तटकरे हे राज्यमंत्री होते. त्यांनी नेहमीसारखे उत्तर दिले नाही. शासन या प्रश्नाच्या बाबतीत अत्यंत गांभीर्याने विचार करील, म्हणून मा.सदस्यांनी विधेयक मागे घ्यावे असे त्यांनी सांगितले. त्यानंतर दोन-तीन महिन्यात अशाच प्रकारचे अशासकीय विधेयक मा.सदस्य श्री.बाळा नांदगावकर आणि मा.सदस्य श्रीमती विशाखा राऊत यांनी विधानसभेत मांडले. त्यानंतर मा. मंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात आमची तिघांची एक बैठक लावली. त्यावेळी नगरविकास खात्याचे सचिव श्री. लाला हे होते. श्री. भिडे हे मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त होते. या बैठकीमध्ये हा कायदा करण्यासंबंधीचा निर्णय घेण्यात आला. बैठकीचे मिनिटस् तयार करुन ते महानगरपालिकेकडे रिमार्क्स घेण्यासाठी पाठविण्यात आले. परंतु दुर्दैवाने या प्रश्नाची महानगरपालिकेमध्ये गांभीर्याने दखल घेतली गेली नाही. महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये यामुळे घट होईल असा आविर्भाव आणून महानगरपालिकेमध्ये ही बाब दोन वर्षे प्रलंबित ठेवली गेली. महानगरपालिकेकडे सतत पाठपुरावा करुन देखील या बाबीसंबंधीचा अहवाल महानगरपालिकेकडून येत नव्हता. त्यानंतर सत्तांतर झाले. नवीन सरकार आले. नवीन मंत्री आले. मी याठिकाणी माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांना जरुर धन्यवाद देतो की, त्यांनी या प्रकरणी पाठपुरावा करण्याचे ठरविले. हा कायदा करण्यासाठी 5 वर्षे लागली. मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांना आपण मुंबई शहरातील भाडेकरुंवर मेहेरबानी करीत आहोत, दया दाखवित आहोत असे वाटत होते. एसआरअे अंतर्गत झोपडपट्टयांना ज्या सवलती मिळतात त्या सवलती या मुंबई शहरामध्ये पिढ्यान पिढ्या राहिलेल्या भाडेकरुंना मिळाव्यात हाच अशासकीय विधेयक आणण्याचा आमचा उद्देश होता. पहिली 5वर्षे 20 टक्के, दुसरी 5वर्षे 40 टक्के, तिसरी 5

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

वर्षे 80 टक्के आणि नंतर 100 टक्के याप्रमाणे असेसमेंट टॅक्समध्ये एसआरअे अंतर्गत सवलत मिळते, त्याप्रमाणे मुंबई शहरातील जुन्या इमारतीतील भाडेकरुंना नवीन इमारतीमध्ये गेल्यानंतर सवलत मिळावी असा उद्देश होता. यासंबंधातील अशासकीय विधेयक मी या सदनामध्ये 2001साली मांडले होते. त्यानंतर आज हा कायदा करण्यात येत आहे. या अगोदर सहा-सात महिने हा कायदा झाला असता तर त्याचा फायदा अनेक भाडेकरुंना झाला असता. आज परिस्थिती अशी आहे की, अनेक भाडेकरुंना जप्तीच्या नोटीसा लागलेल्या आहेत. असेसमेंट टॅक्सच्या बाबतीत अनेक भाडेकरु चिंतेत आहेत. आता माझे घर खाली होईल, माझ्या घराचा लिलाव होईल अशी चिंता भाडेकरुला वाटत आहे. जेव्हा हे अधिकारी अशा पध्दतीने वागतात त्यावेळी त्यांना आपण हजारो कुटुंबांच्या चिंतेचा विषय निर्माण करीत आहोत हे कळत नाही. मी या शासनाला आणि विशेषत: राज्यमंत्री महोदय श्री. राजेश टोपे यांना धन्यवाद देतो. त्यांनी हा कायदा करण्यासाठी पाठपुरावा केला. हाच विषय मी 2001साली अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून या विधानपरिषदेमध्ये मांडला होता. तोच विषय आता 144(5) या तांत्रिक भाषेत विधेयकाच्या रुपाने आलेला आहे. हा कायदा पूर्वलक्षीप्रभावाने लागू होणार आहे काय याचा खुलासा मा.मंत्री महोदयांनी करावा. सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सूचनेचे आज कायद्यामध्ये रुपांतर होण्याचा हा चांगला प्रसंग आहे त्याबद्दल मी शासनाला मनापासून धन्यवाद देतो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ श्री. शिगम 20:40

श्री. दिवाकर रावते...

अशाच प्रकारे या सदनामध्ये विरोधी पक्षाच्या मर्यादित सामर्थ्यामधून अशासकीय विधेयके येत असतात. अशी अशासकीय विधेयके शासकीय विधेयकात रुपांतर करण्याचे त्यामध्ये सामर्थ्य त्यामध्ये असेल व शासनाची जर तशी इच्छाशक्ती असेल तर महाराष्ट्रातील जनतेकरिता चांगले-जडण घडण करणाचे सामर्थ्य विधिमंडळामध्ये असा चांगला संदेश राज्यातील जनतेपर्यन्त जाणार आहे. तो संदेश हे विधेयक या सभागृहात आणून दिल्याबद्दल मी मन:पूर्वक आपल्याला धन्यवाद देतो. या मुंबई शहरातील मूळ नागरिकाला ब-याच वर्षांनी का होईना परंतु न्याय देण्याचे काम विधान परिषदेच्या सदनाच्या माध्यमातून झालेले आहे. विधान परिषदेच्या सभागृहाचे एक वेगळे असे महत्व यामुळे निर्माण झालेले आहे. विधान परिषदेच्या सभागृहाचे सामथ्याचे महत्व महाराष्ट्रातील जनतेला कळेल त्यामुळे मी पुन्हा शासनाला धन्यवाद देतो. भविष्यातही अशाच प्रकारे लोकहिताच्या निर्णयाकरिता विरोधी पक्षाचा सन्मान केला जावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

**( सभापतीस्थानी मा.सभापती )**

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. व मु.शी.** : सभागृहाच्या कामकाजाची घोषणा.

**सभापती** : उद्या, शनिवार, दिनांक 23 जुलै, 2005 रोजी सभागृहाचे कामकाज खालील प्रमाणे करण्याचे मी ठरविले आहे.

सभागृहाची बैठक सकाळी 10.00 वाजता सुरु होईल. सकाळी 10.00 ते 10.25 वाजेपर्यन्त डॉ.दीपक सावंत यांची अर्धा तास चर्चा घेण्यात येईल. सकाळी 10.35 ते 12.45 वाजेपर्यन्त अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होईल. दुपारी 1.00 वाजता सभागृहाचे नियमित कामकाज घेण्यात येईल अशा प्रकारचा कार्यक्रम मी निश्चित केलेला आहे. अशासकीय कामकाज पुढील अधिवेशनात म्हणजे नागपूर येथे होणा-या अधिवेशनात घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी आपले भाषण सुरु करावे.

----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MAP/ KGS/ श्री. शिगम 20:40

पृ.शी. मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक.

मु.शी. **L.C.BILL NO.XIX OF 2005**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)**

( चर्चा पुढे सुरु..)

डॉ. विलास अवचट ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : महोदय, या विधेयकाचे मी प्रथम स्वागत करतो. झोपडपट्टी पुनर्वसन योजना, झोपडपट्टी पुर्नबांधणी योजना, सुकथनकर कमिटीच्या अनुषंगाने मुंबई शहरात अनेक इमारती उभ्या राहिल्या. त्यामुळे मुंबई शहरातील उपकर प्राप्त इमारतीमधील भाडेकरुच्या दृष्टीकोनातून हा शासनाचा ऐतिहासिक निर्णय आहे असे मी समजतो. सभापती महोदय, या विषयासंदर्भात अशासकीय विधेयक आणण्याचे श्रेय कोणी घेतले असेल तर ते सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी घेतले आहे आणि म्हणून त्यांचा नावाचा मला आवर्जून उल्लेख करणे आवश्यक वाटते. सभापती महोदय, झोपडपट्टी पुनर्वसन योजना किंवा एस.आय.ए. यांच्या माध्यमातून ज्या इमारती बांधण्यात आल्या. या योजने अंतर्गत 225 चौरस फुटाला मालमत्ता कर देण्याचा प्रयत्न प्रश्न उपस्थित झाला. नंतर सुकथनकर समितीच्या अन्वये मुंबईमध्ये म्हाडा अंतर्गत इमारत पुर्नबांधणी योजना सुरु झाली. 33(7) अन्वये मुंबई शहरात इमारती बांधण्यात आल्या. त्यावेळी मुंबईतील नागरिकांना खरोखर दिलासा वाटला होता. परंतु मालमत्ता कर हा मोठया प्रमाणात भरावा लागणार आहे अशी पुर्नबांधणी इमातीतील रहिवाशांना माहिती मिळाल्यापासून त्यांच्यावर दडपण आले आहे. मालमत्ता कराच्या प्रस्तावाच्या बाबतीत या सभागृहात गेल्या एक-दोन वर्षापासून सातत्याने चर्चा होत होती.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 20:45

श्री. विलास अवचट ....

या बिलाच्या माध्यमातून महानगरपालिका आणि शासन यांच्याकडून न्याय मिळेल काय ? अशा प्रकारे नवीन इमारतीमध्ये गेल्यानंतर खरोखरच भाडेकरुंची मालमत्ताकर भरण्याची परिस्थिती आहे काय हे पाहिले पाहिजे. सर्वसामान्य भाडेकरु आणि मध्यमवर्गीयांना दिलासा देणारे हे विधेयक आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. परंतु याबाबतीत ज्या काही शंका-कुशंका आणि अडचणी आहेत त्याबाबतीत शासनाने खुलासा करणे आवश्यक आहे. पुनर्रचित इमारतीमध्ये ज्यावेळेला 100 टक्के मालमत्ता कर वसूल करावयाचा त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की दादर-प्रभादेवी भागामध्ये हिलव्हीला,किशोरव्हीला,मधुव्हीला अशा प्रकारच्या इमारती बांधल्या आहेत त्याठिकाणी मालमत्ता कराचा प्रश्न निर्माण झाला. महानगरपालिकेने थकबाकी वसूल करण्याचा सपाटाच लावला. शेवटी त्यांनी नोटीस पाठविली की ही थकबाकी न भरल्यास इमारतीचा लिलाव करण्यात येईल. माझी अशी विनंती आहे की, हे विधेयक संमत झाल्यानंतर याचा पूर्वलक्षी प्रभावाने फायदा द्यावा. असा पूर्वलक्षी प्रभावाने फायदा देणार काय हा माझा पहिला प्रश्न आहे. 33(7) अन्वये मुंबईमध्ये अनेक इमारती उभ्या राहिल्या नाहीत. कारण शेवटी महानगरपालिकेला महसूल मिळण्यापेक्षा सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी हे विधेयक आणले आहे. याठिकाणी जो मुद्दा मी उपस्थित केला त्याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. दुसरा प्रश्न सुकथनकर समितीने सुचविल्याप्रमाणे झ ोपडपट्टी पुनर्वसनच्या योजनेनुसार भाडेकरुला 225 चौ.फू जागा मिळाली पाहिजे. कमीत कमी 225 आणि जास्तीत जास्त 750 चौ.फूटाची सदनिका त्याला मिळाली पाहिजे असे सुचविले होते. याठिकाणी विधेयकामध्ये 350 चौ.फुटाची मर्यादा टाकलेली आहे. हे कोणत्या आधारावर ठरविण्यात आले आहे ? 300 चौ.फूट का नाही,400 का नाही किंवा 450 चौ.फूट का नाही ? याबाबतचे स्पष्टीकरण शासनाने करावे. जो न्याय झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये दिला आहे तोच न्याय झ ोपडपट्टी पुनर्बांधणी मध्ये दिला पाहिजे. 33(7) अन्वये ज्या इमारती बांधल्या असतील त्यांना हे विधेयक मंजूर झाल्यावर झोपडपट्टीवासियांना सवलत मिळेल असे वाटते. झोपडपट्टी सुधार योजनेतील ही सवलत 23.11.95 पासून करण्यात आली. त्याचप्रमाणे 33(7) अन्वये पुनर्रचित झ ालेल्या इमारतींना आतापर्यंत ज्या बांधण्यात आल्या आहेत त्यांना अशाच प्रकारचा फायदा होईल काय हे पाहणे आवश्यक आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे 350 चौ.फूट याबाबत खुलासा व्हावा. मुंबई शहरामध्ये हाताच्या बोटावर बोजण्याइतक्या लोकांना

...2

श्री. विलास अवचट ....

350 चौ.फूटापेक्षा जास्त एरियाचा फायदा होणार आहे. महानगरपालिकेला महसूल कमी जाईल पण भाडेकरुंना फायदा होईल असे वाटते यादृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. या बिलाचे मी स्वागत करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

....3

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, पहिल्यांदा मी मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करतो. परंतु यामध्ये काही चुका राहिल्या आहेत त्यामुळे लोक कोर्टात गेले तर अडचण निर्माण होईल. झोपडपट्टयांचा विकास करतो त्यावेळी हा झोपडीधारक 10 X 10 च्या खोलीत रहात असतो. म्हाडाच्या कायद्याप्रमाणे कमीत कमी 225 आणि जास्तीत जास्त 753 चौ.फूट जागा त्याला दिली पाहिजे. म्हाडा ॲक्टमधील तरतुदीप्रमाणे ज्याची जेवढी जागा असेल तेवढी त्याला त्याठिकाणी मोफत दिली जाईल आणि ती जास्तीत जास्त 753 चौ.फूट असेल.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

.म्हाडा कायद्यात अशी तरतूद आहे की, "ज्याची जेवढी जागा असेल तेवढी जागा त्याला मोफत दिली जाईल. जाास्तीत जास्त 753 स्केअर फुट एवढी दिली जाईल" तेव्हा .350 स्केअर फूट जागा देण्याची कल्पना कोणाच्या डोक्यातून निघाली आहे ? सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी सांगितल्या प्रमाणे 300,400वा 500 स्केअर फुट जागा का देत नाही ? तर्काच्या आधारावर कायदेशीरपणे एखाद्या व्यक्तीवर अन्याय होईल. असे मला वाटते.या बाबतीत मी आपल्याला एक उदाहरण देतो की, माझी जागा 350 स्केअर फुट आहे म्हणून शासनाने मला सवलत दिली आहे परंतु माझी जागा 400 स्केअर फुट असेल तर मी पुन्हा 100 स्केअर फुटावर टॅक्स भरावयाचा काय ? माझ्याकडे 400 स्केअर फुट जागा आहे यामध्ये माझा काय गुन्हा आहे ?एखाद्या व्यक्तीची जागा 500 स्केअर फुट असू शकते.मुंबईमध्ये अशी अनेक कुटूंबे आहेत की, त्या ठिकाणी दोन तीन भाऊ एकत्र राहतात. गिरगाव, प्रभादेवीचा काही भाग किंवा गोरेगावकर रोड तसेच दादर किंवा माहिमचा परिसर इत्यादी ठिकाणी अशा प्रकारे अनेक कुटूंबे राहत आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी मुंबई शहरातील या भागाचा परिसर लक्षात घ्यावा. मुंबई शहरामध्ये भायखळा, शिवडी या भागात 10 बाय 10 फुटाच्या खोल्यां आहेत तर गिरगावमधील फणसवाडी भागात 10 बाय 15 फुटाच्या .खोल्या आहेत..वाळकेश्वर किंवा माहीम सारख्या किनारपट्टीमध्ये पूर्वी गावठाण होते व त्या ठिकाणी ज्या इमारती झालेल्या आहेत त्या ठिकाणच्या खोल्या 400 ते 500 स्केअर फुटाच्या आहेत.महानगरपालिकेतील कोणता तरी अधिकारी ए.सी.मध्ये बसत असतो व त्याला प्रत्यक्षात व्यवहार काय असतो हे माहीत नसते.वस्तुस्थितीची जाणीव नसते.तो अधिकारी चाळीमध्ये कधीही गेलेला नसतो.मी त्या अधिकारांचा आदर ठेवून हे बोलत आहे. काही अधिकारी इतके ॲडामन्ट असतात. की झापड लावून घोडा जसा पुढे जातो त्या झापड लावलेल्या घोडयाप्रमाण् ते अधिकारी पुढे जात असतात.सुखटणकर समितीने जो अहवाल दिलेला आहे तो अहवाल आपण वाचावा. त्या अहवालामध्ये जो प्रिएम्ब्ल आणि जो कनक्लुजीव्ह पार्ट आहे त्या पार्टमध्ये असे लिहिलेले आहे की, कराचे चार्जेस टेलिस्कोपीक पध्दतीने त्या ठिकाणी लावण्यात आले पाहिजेत आणि हे चार्जेस हळूहळू वाढविण्यात आले पाहिजेत.तसेच एका विशिष्ट मर्यादे नतर कर वाढविण्याचें थांबवले पाहिजे. परंतु आज तसे करण्यात आलेले नाही त्यामुळत् दोन ते तीन लाख रुपयापर्यन्तचे ॲरिअर्स या लोकांवर आलेले आहे तसेच .1200 ते 1500 रुपयापार्यन्त या लोकांना

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

भाडे पडत आहे.यामध्ये सुध्दा एक फरक असा होईल की, मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने ज्या इमारती बांधलेल्या आहेत त्या इमारती 400 वा 500 वा 700 स्केअर फुटाच्या असल्या तरी त्या ठिकाणी मालमत्ता कर नाही.परंतु ज्या इमारती 2.5 एफ.एस.आय.देऊन ज्या विकासककाराकडून इमारती बांधलेल्या आहेत त्यामध्ये सुध्दा दोन भाग असतात एक भाग सेलेबल असतो आणि दुसरा भाग " रियाब " असतो. तेव्हा या "रियाबमध्ये" जे लोक राहतात त्यांच्या बाबतीत म्हाडाची अशी अट असते की, बोर्डाने जर इमारत बांधली असती ,म्हाडाने जर इमारत बांधली असती तर आम्ही जेवढी जागा त्याला जागा देऊ तेवढीच जागा त्यांनीसुध्दा दिली पाहिजे.यामध्ये फरक एवढाच असतो की, या ठिकाणी 3.99 म्हणजे 4एफ.एस.आय. घेऊन बोर्ड इमारत बांधते आणि त्या ठिकाणी 2.5 एफ.एस.आय. घेऊन विकासककार बांधत असतो.त्याचबरोबर आणखी एक फरक असा असतो की ,या ठिकाणी सेलेबल एफ.एस.आय. नसतो आणि त्या ठिकाणी सेलेबल एफ.एस.आय.असतो. त्यामुळे तो तेथे दोन विंग करतो.दोन को-ऑपरेटिव्ह सोसायटी करतो आणि मध्ये भिंत घालतो.त्या ठिकाणच्या लोकांना पार्कीग ,टेरेस इत्यादी सुविधा तो काहीही देत नाही.फक्त त्या व्यक्तीची जेवढी जागा असेल तेवढीच जागा त्याला बांधून दिली जाते.त्यामुळे मला असे वाटते की, या संदर्भात आपल्याला अमेन्डमेन्ट स्वीकारता आली तर आपण ती स्वीकारावी .अन्यथा कोणी तरी कोर्टात जाईल.तेव्हा कोर्टात असे विचारण्यात येईल की, 350 स्केअर फुटासाठी कोणते निकष लावण्यात आले होते ? त्याकरता कोणते मापदंड ठरविण्यात आले आहेत? त्यासाठी कोणता तर्क लावला आहे ?त्यावेळी आपले अधिकारी काय उत्तर देणार आहेत ? माझ्या मनात आले म्हणून मी 350 स्केअर फुट ठरविले अशा प्रकारचे उत्तर तेथे हे अधिकारी देणार आहेत काय ? असे सागितल्यानंतर जज्ज त्यांना असे विचारतील की, 450 स्केअर फुट का नाही ? 500 स्केअर फुट का नाही ? 325 स्केअर फुट का नाही ? म्हणून मला असे वाटते की, ज्याची जेवढी जागा असेल तेवढी जागा त्याला दिली पाहिजे.

माझ्याकडे या संदर्भात काही माहिती आली आहे. श्री.सदा सरवणकर यांच्या नेतृत्वाखाली दादर येथे एक भाडकरु परिषद झाली होती.आणि हे लोक जास्तीत जास्त 1800 ते 2000 एवढेच आहेत.तेव्हा एखाद्याच्या वडीलांनी 450 स्केअर फुट जागा घेऊन ठेवली असेल तर ते त्यांनी पाप केलेले आहे काय ? या जागेमध्ये दोन तीन भाऊ एकत्र राहत असतात.मध्ये पार्टीशन घालून एका

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठिकाणी दोन तीन कुटुंबे राहत असतात  व ती कुटुंबे एवढे भाडे देऊ शकणार नाहीत.तेव्हा 350 स्केअर फुटाची सवलत न ठेवता म्हाडा कायद्यातील तरतुदीप्रमाणे ज्याची जेवढी जागा असेल तेवढया जागेच्या बाबतीत सवलत द्यावी .हे जर करता येत नसेल तर मी दुसरा एक पर्याय सागतो परंतु तत्पूर्वी ज्याची जेवढी जागा असेल तेवढया जागेच्या बाबतीत त्याला सवलत द्यावीच. त्याप्रमाणे तरतूद करावी असा माझा आग्रह आहे. परंतु एखाद्याची जागा 500 स्केअर फुट जागा असेल तर 350 स्केअर फुटापर्यन्त त्याला पूर्ण सवलत देऊन 351 स्केअर फुटापासून पुढे 150 स्केअर फुट जागा असेल तर तेथे टेलिस्कोपीक करण्यात यावे. स्लॅबवाईज भाडे ठरविण्यात यावे.आपण जास्त भाडे ठरविल्यामुळे एवढे भाडे हे लोक देऊ शकणार नाहीत व हे सर्व लोक रस्त्यावर येतील . तसेच हे लोक आपल्या खोल्या विकून दुसरीकडे रहावयास जातील तेव्हा स्लॅबवाईज भाडे ठरविण्यात आले पाहिजे.माननीय मंत्रिमहोदयांना मला असे सांगावयाचे आहे की ,त्यांनी या ठिकाणी जे विधेयक आणले आहे ते अतिशय चांगले आहे त्यामुळे मी माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो . हे विधेयक आणत असतांना ॲडामन्ट न राहता तर्काच्या आधारे आम्ही

या ठिकाणी  आम्ही जे मुद्दे मांडलेले आहेत त्याचा विचार करुन लोकांना दिलासा देण्यात यावा. तसेच आम्ही ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचना माननीय मंत्रिमहोदयांनी  स्वीकाराव्यात. अशी मी त्यांना विनंती करतो. मध्यम वर्गीयासाठी आणि चाळीत राहणा-या लोकांसाठी  त्यांच्या भाडयात सवलत मिळावी यासाठी शासनाने एक चांगले बिल आणले आहे. याबद्दल शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करुन मी माझे भाषण संपवितो.धन्यवाद

------

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MAP श्री.गायकवाड नंतर --- 20:55

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शासनाने हे जे विधेयक आणले आहे तयाचे मी मन:पूर्वक स्वागत करतो. मागील अधिवेशनामध्ये 5 एप्रिलला असेच मुंबई महापालिका सुधारणा विधेयक आणले होते तेव्हाही मी जे भाषण केले होते त्यात रेटेबल व्हॅल्यू, .. कशा प्रकारे 20 वर्षे मालमत्ता कर वाढत जातो हे सांगितले होते. एक मालमत्ता कर आणि दुसरा निपटारा कर. जो महिन्याला 5 रुपये होता तो आता दिवसाला साडेतीन रुपये केला. म्हणून हे जे विधेयक आपण आणले आहे त्याबाबतीत माझ्या मते दोन विषय महत्त्वाचे आहेत. एक तर आपण हे विधेयक आणताना आपल्या डोळ्यासमोर एसआरए योजना ठेवली म्हणूनच या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अवचट आणि श्री.मधु चव्हाण म्हणाले की, तुमच्यासमोर झोपडपट्टी सुधार योजना आहे ती 225 चौ.फू. जागाची. काही ठिकाणी उदा. मृणाल गोरे यांनी गोरेगावला बांधलेल्या ज्या जागा आहेत त्या 350 चौ.फू.च्या सदनिका आहे. माझ्या सबंध भाषणामध्ये मी उल्लेख केला होता की, त्या घरांचा आकार पहा आणि मग तुम्ही हे 225 चौ.फू. कसे केले ते पहा. याचा इफेक्ट पर्सस्पेक्टिव असेल तर ते त्यांना त्रासदायक आहे. आपली ही एसआरए योजना 1996 पासून आली. त्यावेळी तुम्ही तर तिची टिंगल टवाळीच केली होती. त्यामुळे फार मोठे प्रकल्प उभे राहिले असे नाही. परत आमचा महसूल बुडतो म्हणूनही आपण म्हणता. पण त्या झोपडपट्टीतून नाही तरी तुम्हाला काय महसूल मिळत होता ? तेथे आपल्याला शून्य महसूल मिळत होता म्हणून आता 225 चौ.फू.च्या सदनिका झाल्यामुळे आपल्याला त्यातून महसूल तरी मिळणार आहे. तेवहा आता आपण ही जी 350 ची मर्यादा लावली आहे ती आपल्या एसआरए आणि एमएमआरडीए या दोन्हींशी कॉंट्रॅडिक्टरी आहे. म्हणजे एसआरए मध्ये 1995 पूर्वीच्या झोपड्या असतील तर त्यांनाच लागू होते आणि एमएमआरडीए म्हणजे मी आम्ही सर्वेक्षण करताना तेथे जे काही असेल त्यांचे आम्ही पुनर्वसन करू. मग ते तेथे कोणत्याही वर्षामध्ये आलेले का असेनात. म्हणजे हे दोन्ही कायदे एकमेकांना छेद करतात हे आपण लक्षात घेतले पाहिजे. तसेच आताचा आपला हा कायदा आणि म्हाडाचा 225 चौ.फू. जागा देणारा कायदा, या दोन्हीतील तरतुदी एकमेकांना कॉंट्रॅडिक्ट करीत आहेत. म्हणूनच याचा विचार करणे आवश्यक आहे हे मला येथे आवर्जून आपल्या लक्षात आणून द्यावयाचे आहे. तसेच याची डेट ऑफ इफेक्ट काय आहे ? आपण जे काही यामध्ये केले आहे त्यामुळे प्रभादेवी मधील चाळीमध्ये राहणाऱ्यांना वाटेल की, दुर्दैवाने आपण येथे राहतो आहोत. शेवटी ही चाळीमध्ये राहणारी माणसे आहेत. चाळीतील पोटमाळ्यावर

...... 5 जे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

राहणारी माणसे आहेत. त्यांना तेथे फार मोठ्या सुविधा मिळताहेत असे नाही. कारण आमच्या वेळी चाळीमध्ये कॉमन व्हरांडा होता, गच्ची होती. पण आताच्या या आपल्या 225 चौ.फू.च्या सदनिके मध्ये पोटमाळासुद्धा बांधता येत नाही कारण तेवढी उंचीच त्या खोलीची नसते. जेमतेम 8 फूटाची उंची असते. उलट चाळीमधील खोल्यांचे छत उंच असायचे त्यामुळे तेथे पोटमाळा बांधता येऊन वेगळी राहण्याची सोयही होत होती तसेच तेथे टॉयलेट बाहेर असायचे त्यामुळे खोलीतील पूर्ण जागा वापरायला मिळत होती. आता आपण 225 फूटामध्ये टॉयलेट आत आणल्यामुळे तेवढी जागा कमी झाली आहे. तेव्हा याचाही विचार करण्याची गरज आहे. तेव्हा यातील 350 ची मर्यादा आपण वाढवावी आणि याची डेट ऑफ इफेक्ट आहे ती पूर्वलक्षी प्रभावाने करावी अशी माझी या निमित्ताने सूचना आहे. तिसरा मुद्दा म्हणजे माननीय मुख्यमंत्र्याच्या स्वेच्छाधिकाराखाली जी 5 टक्के वा सुरूवातीस 10 टक्के जागा देण्याची सवलत यूएलसी मधून आली. तेव्हा कालांतराने विकासकांनी काय केले ? तर सुरूवातीस ते त्या जागेवर जी काही इमारत बांधत होते त्यातील 10 टक्के जागा म्हणजे जेवढ्या सदनिका असतील त्या सरकारला द्यावयाचे. पण आता तसे कले जात नाही. आता मोठ मोठे प्रकल्प अशा जागांवर उभे राहतात. मग तेथे 5 वा 10 टक्क्यांमध्ये मोडणाऱ्या ज्या सदनिका आहेत त्या साठी वेगळी इमारत बांधली जाऊ लागली आणि ती म्हाडाच्या पध्दतीने बांधली जाऊ लागली आणि बाकी चांगली इमारत त्याच्या बाजूला उभी राहू लागली की ज्यातून त्या विकासकाला पैसा मिळणार आहे. मग ती इमारत अगदी हायफाय असते. पुन्हा मग येथे रेटेबल व्हॅल्यूचा मुद्दा येतो. तेव्हा स्वेच्छाधिकारातून मिळणाऱ्या अशा ज्या जागा आहेत त्यांच्याबद्दलही आपण विचार करावा. कारण हे सगळे कायदे आहेत त्यातील तरतुदी या एकमेकांना छेद देणाऱ्या आहेत. म्हणून आपण त्याचाही विचार केला पाहिजे. वाटल्यास आपण अशा जागा पहाव्यात. आमच्या इमारतीमध्ये इतकी गरीब माणसे आहेत की, त्यातील काही खानावळ चालवून तेथे रहात आहेत. पण आता तुमचा मालमत्ता कर एवढा आला आहे की, ती घाबरून तेथून जायला निघाली आहेत. .....

( यानंतर श्री.जागडे .....5के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ 21:00

श्री. अरविंद सावंत....

माननीय मुख्यमंत्र्यांनी साहित्यिक, कलावंत तसेच गरजवंताना आपल्या कोट्यातून घरे दिली आहेत. परंतु या ठिकाणी मोठ्या प्रमाणात टॅक्स लावला असल्यामुळे ही गरीब माणसे त्या ठिकाणी राहू शकत नाहीत. तेव्हा याचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, सदनासमोर जे विधेयक मांडण्यात आले आहे, त्याचे मी स्वागत करीत आहे. परंतु अजूनही या विधेयकात सुधारणा करता येतील. तशा प्रकारच्या सूचना माननीय मंत्रिमहोदयांनी कराव्यात, अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सदनासमोर सन 2005 चे वि. प. वि. क्र. 19 चर्चेला आहे. या बाबत आता ज्या माननीय सदस्यांनी महानगरपालिकेमध्ये काम केले आहे, त्यांनी आपले विचार मांडले आहे. हे विधेयक आणण्यामध्ये बराच डिले झाला आहे, तरी देखील हे विधेयक या सदनासमोर आणले आहे, त्याबद्दल मी शासनाचे कौतूक करीत आहे. सभापती महोदय, मुंबई शहरातील झोपड्यांच्या बाबतीत आंदोलने झाली होती आणि 1976 साली प्रथम स्लम ॲक्ट लागू करण्यात आला. त्यानंतर आमचे युतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर या झोपड्यांना पक्की घरे देण्याच्या बाबतीत कायदा करण्यात आला. त्यामुळेच मुंबईतील झोपड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. संपूर्ण देशात असा संदेश गेला की, मुंबईत घर फुकट मिळते. त्यामुळे संपूर्ण देशातून नाहीतर बांगला देशातील लोक या मुंबई शहरात येऊन झ ोपडी बांधून राहिले आहेत. आज मुंबई जिल्ह्याची लोकसंख्या 33 लाख आहे आणि मुंबई उपनगर जिल्ह्याची लोकसंख्या एक कोटी इतकी आहे. म्हणजे संपूर्ण मुंबईचा विचार केला तर जवळपास दीड कोटी लोकसंख्या या मुंबई शहराची आहे. सभापती महोदय, केशवजी नाईक चाळीला 120 वर्षे झाली आहेत. माननीय लोकमान्य टिळकांनी मुंबई शहरात केशवजी नाईक चाळीत पहिला गणपती बसविला आणि गणेशोत्सवास सुरुवात केली. आज ही चाळ अस्तित्वात आहे. मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या चाळींबाबत घर दुरुस्ती मंडळ अस्तित्वात आले. परंतु या मंडळाच्या मार्फत कोणतीही चांगली योजना आली नाही. याचा परिणाम वेगळाच झाला. मुंबई शहरात येऊन झोपडी बांधून राहणा-या माणसाला आज प्राथम्याने घर उपलब्ध होते. परंतु मुंबईतील या जुन्या चाळीत वंशपरंपरागत राहत असणा-या गरीब माणसाला मात्र फुकटात घर मिळत नाही. त्यामुळे या जुन्या रहिवाशांमध्ये एक वेगळी भावना निर्माण होत आहे. या बाबत अनेक विचारमंथनातून हे विधेयक या ठिकाणी आले आहे. जुन्या चाळीत राहणा-या नागरिकांसाठी हे विधेयक या ठिकाणी आणले आहे. हे विधेयक पास झाले तर या माणसांना अतिशय आनंद होईल. सभापती महोदय, मुंबईतील चाळीत राहणारी माणसे कशा प्रकारचे जीवन जगत आहेत, याची आम्हाला कल्पना आहे. कारण आम्ही देखील चाळीत राहत होतो. पूर्वीच्या इमारतींचा विचार केला तर दोन इमारतींमध्ये पटांगण असायचे. भरपूर मोकळी जागा आणि कॉमन पॅसेज असायचा. घराची उंची जास्त असल्यामुळे पोटमाळे असायचे. त्यामुळे एका कुटुंबात तीन भाऊ असतील तरी त्यांना ती जागा पुरेशी होत होती.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

अशा परिस्थितीत त्यांना 350 ते 750 ची मर्यादा घातली आहे. माझ्या मनामध्ये एकच दु:ख आहे की, त्यांची जेवढी जागा आहे तेवढी जागा त्यांना मिळाली पाहिजे. वर्षानुवर्षे, परंपरागत ते आपल्या चाळीत रहातात. For generation they are staying here. त्यांना आपण कायद्याच्या बंधनात आणीत आहात, त्यामुळे यातना होतात. त्या चाळींमध्ये सर्व समाजांचे लोक रहातात, हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी हे लोक रहातात. आमच्या खोताच्या वाडीमध्ये बहुतांशी ख्रिश्चन लोक रहातात. तेथे खऱ्या अर्थाने सर्वधर्म समभाव आहे.अशा ठिकाणी गुण्या गोविंदाने लोक रहातात. त्यांच्या आपापसात दंगली कधी झालेल्या नाहीत. फार थोडया वस्तींमध्ये दंगली झाल्या आहेत. त्याला कारणे वेगळी आहेत. पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर ती कारणे जास्त स्वरुपात आल्यामुळे या दंगली घडतात. त्याच्या पार्श्वभूमी वेगळी असते. मला या ठिकाणी एकच सांगावयाचे आहे. या विधेयकातील महत्वाचे मुद्दे माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी सांगितले आहेत. त्यांना सवलती देतांना आपण विचार करा. ज्यांच्या इमारती बांधल्या जातील त्या ठिकाणी खेळण्यासाठी पटांगण असेल, त्यांना श्वास घ्यायला मोकळी जागा मिळाली पाहिजे. नाहीतर एफ.एस.आय. वाढवून दिल्याचा एकच परिणाम होईल की, या सर्व इमारती पुन्हा कंझेस्टेड होतील. त्यामुळे तेथील लोकांना परत जीवन जगणे कठीण होईल. आणि म्हणून चांगल्या योजना तयार करण्यासाठी या जागा दिल्या जाव्यात. या दृष्टीने आपण काळजी घ्यावी असे प्रामुख्याने सांगावेसे वाटते. त्याकरिता मी शासनाचे अभिनंदन करतो. अंतिमत: आपण हा कायदा अंमलात आणीत असतांना व आमच्या उपस्थित तो मंजूर होत असतांना आम्हाला आनंद होत आहे. या विधेयकावर रात्री उशिरापर्यंत बसून चर्चा करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे. तेव्हा मुंबईचा जो मूळ नागरीक आहे त्याला आपण कुठेतरी न्याय देत आहोत अशी भावना निर्माण झाली आहे. अशाप्रकारच्या जुन्या इमारती मुंबई उपनगरामध्ये आहेत. त्या ठिकाणी घरदुरुस्ती कायदा लागू करावा की नाही यासाठी आयोग नेमण्यात आला. त्यावर चर्चा झाली, त्यामध्ये आम्ही सर्व आमदारांनी एकत्र बसून त्यासंबंधी सूचना केल्या. आणि एक ते दिड महिन्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, मुंबई उपनगर जिल्हयासाठी अफझलपूरकर समितीचा अहवाल त्यातील दुरुस्तीच्या शिफारशीसह आपण स्वीकारीत आहोत. याचा अर्थ मुंबई उपगनरामधील जे जुने रहिवाशी आहेत, विशेषत: जे भूमीपुत्र म्हणून मुंबईचा कोळी समाज आहे. तो पूर्वीच्या मुंबईतील गावठाणामध्ये रहाणारा आहे. या मूळच्या

...5L-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

गावठाणात रहाणाऱ्या माणसाला आपण दिलासा दिला नाहीतर बाहेरुन आलेले लोक ज्याठिकाणी टोलेजंग, गगनचुंबी इमारती उभ्या रहात आहेत त्यामध्ये ऐषारामात रहात आहेत. आणि वर्षानुवर्षे या शहरामध्ये समुद्राच्या किनाऱ्यावर रहाणारा जो कोळी समाज आहे तो अतिशय दुर्दैवी जीवन जगत असल्याचे चित्र निर्माण होईल. आणि म्हणून या दृष्टीकोनातून जुन्या इमारतीच्या दुरुस्ती व पुर्नबांधणीच्या संदर्भात आपण हा कायदा मुंबई उपनगर जिल्हयासाठी लागू करीत आहात त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. यामधील योग्य त्या दुरुस्तीनंतर हा कायदा अंमलात येईल. हा कायदा संमत झाला पाहिजे यासंबंधीचा आग्रह आपण धरला होता परंतु अनेक लोकांनी या कायद्याचा उपयोग नाही. या कायद्यामुळे शासनाला खूप अडचण येणार आहे. या कायद्यामध्ये खूप अडचणी आहेत अशाप्रकारच्या भावना त्यावेळी व्यक्त झाल्या होत्या. तेव्हा मालकांचा विरोध आहे म्हणून घरदुरुस्तीचा कायदा स्वीकारु नये असे होऊ नये. शेवटी जनकल्याणासाठी आपण ही पावले उचलली पाहिजेत. लोकशाहीमध्ये जनकल्याण हा प्रधान हेतू असला पाहिजे. दुर्दैवाने आज ते घडत नाही. सर्व क्षेत्रामध्ये घडत चालले आहे. त्याला आमचा विरोध आहे. शिक्षण, नोकरी,उद्योग या सर्व क्षेत्रामध्ये सर्वसामान्य माणूस हा केंद्रबिंदू असला पाहिजे ही गोष्ट नजरेसमोर ठेवून काम केलेतर हे राज्य हे याहून जास्त प्रभावी होईल, जनकल्याणकारी होईल असे मला सुचवावयाचे आहे. या ठिकाणी आम्ही केलेल्या सूचना लक्षात घेऊन आपण पुढील काळात त्याची अंमलबजावणी कराल असा विश्वास व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, विलास अवचट, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण यांनी या विधेयकावर आपले विचार मांडले आणि शासनाचे अभिनंदन केले, त्याबद्दल मी त्यांचा निश्चितच आभारी आहे. विधानसभेमध्ये मागच्या अधिवेशनात सन्माननीय सदस्य श्री.गजाजज किर्तीकर आणि अन्य सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचना आणली होती. त्यावेळी या विषयाचे गांभीर्य माझ्या लक्षात आले. तेव्हा मी सभागृहात आश्वासन दिले होते की, यासंबंधी तातडीने ऑर्डीनन्स् आणू, नाहीतर येणा-या अधिवेशनात विधेयक आणू. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ऑर्डीनन्स् आणण्याच्या दृष्टीकोनातून ती गोष्ट लाल फितीत इकडे-तिकडे चालली होती. पण मनात अतिशय दृढ निश्चय केला की, कोणत्याही परिस्थितीत मुंबईतील सर्वसामान्य लोक, चाळीत राहणारे कामगार तसेच मध्यमवर्गीय लोकांना दिलासा देणारे हे महत्वाचे विधेयक आहे आणि यादृष्टीकोनातून या विधेयकासाठी मी व्यक्तीश: सातत्याने पाठपुरावा केला आणि आज हे विधेयक आपल्या सर्वांच्या संमतीने मंजूर होत आहे याचा मला निश्चितच आनंद आहे.

सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यात प्रामुख्याने सर्वांचे म्हणणे होते की, या अधिनियमाच्या किंवा या सवलतीचा रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट देणार आहात किंवा कसे ? ही वस्तुस्थिती आहे की, मुंबई महानगरपालिकेने लोकांना थकबाकीच्या नोटीसेस दिलेल्या असतील. परंतु आजमितीला, हे विधेयक मांडत असताना मला याचा अंदाज नाही की, ख-या अर्थाने 350 आणि 750 चौ.फुटाच्या किती सदनिका असू शकतील. त्यामुळे हा अंदाज येण्याच्या दृष्टीने ही बाब तपासून पाहण्याची आवश्यकता आहें. पण सन्माननीय सदस्यांची ही सूचना अतिशय रास्त आहे. कधीकधी एकत्र कुटुंब असते, ते 500 चौ.फुटाच्या जागेत रहात असेल तर ते या कायद्यात बसणार नाही. त्यामुळे ही बाब तपासून पाहून, याबाबतीत गरज पडल्यास सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे निश्चित प्रकारे विचार केली जाईल, असे मी जाणीवपूर्वक सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी असे विचारले आहे की, 350 हा आकडा कसा आला ? 144 (क) ही ॲमेंडमेंड आणली होती. 144 (ब) हा एस.आर.एस.खाली बांधण्यात आलेल्या इमारतीच्या संबंधात आहे.शासनाने एखाद्या सहकारी संस्थेला जमीन दिली असेल आणि तेथे इकॉनॉमिकली वीकर सेक्शनच्या लोकांसाठी घरे बांधण्यात आली असतील तर त्यासाठी 144 (क)

. . . .5 एम-2

श्री.राजेश टोपे . . . .

कलम आहे. कलम 144 (ब) व 144 (क) यामध्ये या सर्वांसाठी सवलती आहेत. मी त्या सदनाला सांगू इच्छितो. यात 20 वर्षाची सवलत आहे. त्यात पहिली दहा वर्षे 20 टक्के मालमत्ता कर आकारला जातो. 11 वर्षापासून 15 वर्षापर्यंत 50 टक्के आकारला जातो आणि 16 वर्षापासून 20 वर्षापर्यंत 80 टक्के आणि 20 वर्षानंतर संपूर्ण मालमत्ता कर आकारला जातो. ब आणि क मध्ये येणा-या इमारती आणि त्यातील रहिवाशींसाठी हा नियम आहे. सन्माननीय माजी सदस्या श्रीमती मृणाल गोरे यांची "नागरी निवारा गृहनिर्माण सोसायटी" होती. त्यातील सदनिका 350 चौ.फुटाच्या होत्या. पण जुन्या नियमामध्ये 250 चौ. फुटा. च्या सदनिकांसाठी तरतूद असल्याने यांना करामध्ये माफी देता येत नव्हती. पण ही गृहनिर्माण सोसायटी दुर्बल घटकांसाठी केली होती. पण या गृहनिर्माण सोसायटीतील लोकांना या सवलतीपासून वंचित रहावे लागत होते. म्हणून खास करुन 144 (क) आणले आणि आता 144 (ड) हा सेस पात्र इमारतीत राहणा-या लोकांसाठी आणला आहे आणि याला आधार नागरी निवारा गृनिर्माण सोसायटीचा घेण्यात आला आहे. आपल्याकडून सूचना आल्या आहेत. सेस पात्र इमारतीत 753 चौ.फुटापर्यंत जागा बांधून दिली जाते. जसे रिपेअर ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन बोर्ड किंवा म्हाडाच्या वतीने ज्या खोल्या बांधल्या जातात.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (पुढे सुरु...

किंवा म्हाडाच्या वतीने सदनिका बांधल्या जातात, कमीतकमी 350 स्क्वे.फू. आणि जास्तीत जास्त 753 स्क्वे.फू.पर्यन्त सदनिका बांधण्याची रिपेअर ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन बोर्डला तो अधिकार आहे. त्यामुळे एक चांगली मध्यम मार्गी सूचना सन्माननीय सदस्य श्री.चव्हाण साहेबांनी सांगितली. टेलिस्कॉपिक कर आपल्याला लावता येईल का, 350 स्क्वे.फू.पर्यन्त जो काही सवलतीचा दर असेल तो दर आणि त्याच्या पुढच्या स्क्वे.फू.चा असेल तो दर ते टेलिस्कोपीक दराने लावता येईल काय, ही देखील एक उपसूचना त्याला म्हणू, त्याबाबत निश्चितप्रकारे विचार करण्यात येईल, असेही मी या ठिकाणी जाणीवपूर्वक सांगू इच्छितो. मला आपल्या सगळयांच्याच विचाराच्या माध्यमातून, आपल्याला मिळालेल्या समाधानाच्या माध्यमातून...

श्री.अरविंद सावंत (बसून) : मुख्यमंत्र्यांच्या कोटयातील सदनिकांच्याबाबतीत सांगा.

श्री.राजेश टोपे : मुख्यमंत्र्यांच्या स्वेच्छा कोट्यातून 5 टक्के सदनिका दिल्या जातात त्याबद्दल देखील मालमत्ता कराच्या सवलतीच्या दृष्टीकोनातून विचार करावा, असे सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी मुद्दा उपस्थित केला. मला वाटते की, त्याची व्याप्ती खूप मोठी असेल, परंतु त्याचीही व्याप्ती तपासण्याची आवश्यकता आहे. कारण शेवटी याचा परिणाम कोणावर होणार असेल तर मुंबईच्या महानगरपालिकेच्या महसूल वसुलीवर होणार आहे. तो किती प्रमाणात वसूल होईल ते तपासण्याची निश्चिपणे आवश्यकता आहे. मला वाटते, तेवढी मुभा सन्माननीय सदस्य देतील. आज सगळयाच सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाला पाठिंबा दिला, त्याबद्दल मी सर्व सदस्यांचे आभार मानतो आणि हे विधेयक मंजूर करावे अशी सभागृहाला विनंती करतो.

श्री.मधुकर चव्हाण : मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारतो. आता मंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे. ते त्यांना पटलेले आहे. याबाबत तपासून पाहून नागपूर अधिवेशनामध्ये या दुरुस्तीसह सुधारित विधेयक आणणार आहात काय ? आपल्याला ते पटलेले आहे.

श्री.राजेश टोपे : मी या बाबीची व्याप्ती किती आहे, हे तपासून पहाण्यात येईल असें सांगितले. महानगरपालिकेकडून याबाबातची आकडेवारी घेतल्यानंतर आम्हाला असे वाटले की, खूप तूरळक प्रमाणात या सदनिका असतील तर जरुर त्याचा विचार सकारात्मक केला जाईल.

श्री.अरविंद सावंत : मी मघाशी मुख्यमंत्र्यांच्या स्वेच्छा अधिकाराबाबत बोललो. त्यामध्ये दोन प्रकार आहेत. मूळ इमारतीत ज्यांनी बांधकाम त्यामध्ये दिले असेल तर समजू शकतो. सगळया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.अरविंद सावंत पुढे सुरु....

लॅव्हीश फॅसिलिटी आहेत. ज्या स्वतंत्र इमारती बांधतात तेथे तरी निदान हा विचार करावा. सन्माननीय सदस्य श्री.चव्हाण साहेबांच्या सूचनेच्या संदर्भात आपण जसे सांगितले की 351 स्क्वे.फू. च्या पुढे तात्पुरते काही करता येईल काय, याचा विचार करु. तशा पध्दतीने विचार केला तर त्याची व्याप्ती कमी होईल, त्यादृष्टीने प्रयत्न करावा.

श्री.राजेश टोपे : तपासून पहाण्यात येईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : सन 2005 चे वि..प.वि. क्रमांक 19 मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक संमत करावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 19 संमत झाले.

--

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) (भूतलक्षी प्रभावाने मुदतवाढ व सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO.LVIII OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE MANAGEMENT AND TRANSFER) ACT,1963.)**

श्री. दयानत मस्के : (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 58-महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( ज्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत ) अधिनियम, 1963, यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** :विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 58-महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( ज्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, 1963, यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये काय म्हटले आहे? याबाबत मला सांगावयाचे आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "प्रथमत: पाच वर्षाच्या मुदतीकरिता अधिनियमित करण्यात आला होता. उक्त अधिनियमाची मुदत वेळोवेळी वाढविण्यात आली असून शेवटची वाढीव मुदत दिनांक 31 मार्च 2005 पर्यंत होती. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे विविध कारणांसाठी, विशेष: रोजगार मिळविण्यासाठी, सतत येणा-या लोकांच्या लोढयांमुळे, महाराष्ट्र राज्यातील अनेक भागांमध्ये, विशेषत: मुंबई, पुणे, नागपूर इत्यादी महानगरांमध्ये, घरांच्या आधीच अस्तित्वात असलेल्या टंचाईत दिवसेंदिवस वाढच होत असल्याचे निदर्शनास आले आहे. हे लक्षात घेता, मालकी हक्काच्या तत्वावर घेण्यात आलेल्या सदनिकांचे बांधकाम, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांमधील गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी आणि मालकी हक्काच्या सदनिकांचे बांधकाम करण्यास प्रोत्साहन देण्यासंबंधीच्या अडचणींवर मात करण्यासाठी देखील, कायमस्वरुपी कायदा असणे इष्ट आहे, असे शासनास वाटले." याचा अर्थ असा की, विधेयकात हे वर्डिंग असल्यामुळे, या शहरामध्ये आणखी लोंढे येणार आहेत. या लोढयांमुळे या मुंबई शहराची लोकसंख्या वाढत चाललेली आहे. हे लोंढे कसे आवरणार? हे लोंढे आवरण्याची शासनाची इच्छा आहे काय? ही घरे कोणासाठी बांधण्यात येते आहेत? येथील जनता मात्र घराविना राहते. त्यांच्यासाठी या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. आमची 1966 साला पासून मागणी आहे की, मुंबईत येणारे हे लोंढे थांबवावेत. या लोढयांमुळे मुंबईची परिस्थिती अतिशय भयानक झालेली आहे. तेव्हा याबाबतीत विचार करण्यात यावा.

( उत्तर आले नाही )

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 58 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**सभापती** : सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 58 संमत झाले आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शनिवार, दिनांक 23 जुलै, 2005 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 27 मिनिटांनी, शनिवार, दिनांक 23 जुलै, 2005 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही